

# संयुक्त महाराष्ट्र

१९८६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.

दि. के. बेडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
संग्रहालय/वाचनालय शाखा.
विभाग क्रमांक
REFBK-0006954
लेखक
सूचना— पुस्तक आठ दिवसांवर ठेवू नका. पुस्तकाची खराबी करू नका.


माळवा
प. खानदेश
पू. खानदेश
नाशिक
ठाणें
औरंगाबाद
अहमदनगर
बीड
कुलाबा
पुणे
भोर
उस्मानाबाद
सोलापूर
सातारा
रत्नागिरी
कोल्हापूर
कारवार
महाराष्ट्र
सध्यांचे प्रांत
निजाम राज्य
मिश्रविभाग


छिंदवाडा
बैतूल
बालाघाट
नागपूर
भंडारा
वर्धा
यवतमाळ
चांदा
आदिलाबाद
बस्तर

# संयुक्त महाराष्ट्र

★

दि. के. बेडेकर

★

१९४७ ] [ किंमत ५ रुपये

किंमत पांच रुपये

☆

मुद्रक
एस्. व्ही. पोरे
चैतन्य प्रेस, ६९१ बुधवार
पुणें २

☆

प्रकाशक
के. एस्. गुप्ते
६९१ बुधवार
पुणें २

☆

मुखपृष्ठ
चित्रकार : द. ग. गोडसे
मुंबई.

एकमेव विक्रेते
चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग
पुणें २.

☆

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

☆

# अ नु क्र म णि का


लेखकाचे दोन शब्द

श्री. शंकरराव देव यांचा पुरस्कार

श्री. न. र. फाटक यांची प्रस्तावना

१. महाराष्ट्रीय लोक व राष्ट्रभूमि १–२३

महाराष्ट्राची लोकसंख्या, सार्वमताची जरुरी, संयुक्त-महाराष्ट्र व संस्थानें—लोकसमाजाचें स्वरूप—देशविस्तार व वन्य जातींचा विचार.

२. महाराष्ट्रीयांचें राष्ट्रीय संयुक्तीकरण २४–४२

विभागलेला महाराष्ट्र—संयुक्त महाराष्ट्राचा दर्जा—वऱ्हाड हा प्रांतच—राष्ट्रीय एकीकरणाची गरज—हिंदी संघ-राज्याचें घटकराष्ट्र—सक्तीचें संघराज्य नको—राष्ट्राचा आधार—शेतकरी—"संयुक्त महाराष्ट्रा"ची क्रांति-कारक घोषणा.

३. राष्ट्रीयत्वाची आधुनिक कल्पना ४३–६८

राष्ट्रीयत्वाचा विचार—संस्कृति व राष्ट्रीयत्व—राज्य व राष्ट्रीयत्व—प्रदेश, भाषा व आर्थिक सहजीवन—आयर्लंडचें उदाहरण—हिंदी 'प्रांतांत' राष्ट्रीयत्वाची वाढ.

४. महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास ६९–९२

(सन १९२० पर्यंत)

नव्या सुशिक्षितांचा राष्ट्रवाद—वंगभंगाचा ठराव—ब्रिटिशांनीं निर्मिलेलें एकराष्ट्र—हिंदुराष्ट्रवादाचा पुर-स्कार—राजवाडे मक अणे यांचें मत.

५. महाराष्ट्रांतील ९३–११५

(


REFBK-0006954

REFBK-0006954

किंमत पांच रुपये

☆

मुद्रक

एस्. व्ही. पोरे

चैतन्य प्रेस, ६९१ बुधवार

पुणें २

☆

प्रकाशक

के. एस्. गुप्ते

६९१ बुधवार

पुणें २

☆

मुखपृष्ठ

चित्रकार : द. ग. गोडसे

मुंबई.

एकमेव विक्रेते

चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग

पुणें २.

☆

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

☆

# अनुक्रमणिका


लेखकाचे दोन शब्द
श्री. शंकरराव देव यांचा पुरस्कार
श्री. न. र. फाटक यांची प्रस्तावना

१. महाराष्ट्रीय लोक व राष्ट्रभूमि १–२३
महाराष्ट्राची लोकसंख्या, सार्वमताची जरुरी, संयुक्त-महाराष्ट्र व संस्थानें–लोकसमाजाचें स्वरूप–देशविस्तार व वन्य जातींचा विचार.

२. महाराष्ट्रीयांचें राष्ट्रीय संयुक्तीकरण २४–४२
विभागलेला महाराष्ट्र–संयुक्त महाराष्ट्राचा दर्जा–वऱ्हाड हा प्रांतच–राष्ट्रीय एकीकरणाची गरज–हिंदी संघ-राज्याचें घटकराष्ट्र–सत्तीचें संघराज्य नको–राष्ट्राचा आधार–शेतकरी–" संयुक्त महाराष्ट्रा"ची क्रांति-कारक घोषणा.

३. राष्ट्रीयत्वाची आधुनिक कल्पना ४३–६८
राष्ट्रीयत्वाचा विचार–संस्कृति व राष्ट्रीयत्व–राज्य व राष्ट्रीयत्व–प्रदेश, भाषा व आर्थिक सहजीवन–आय-र्लंडचें उदाहरण–हिंदी 'प्रांतांत' राष्ट्रीयत्वाची वाढ.

४. महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास ६९–९२
(सन १९२० पर्यंत)
नव्या सुशिक्षितांचा राष्ट्रवाद–वंगभंगाचा ठराव–ब्रिटिशांनीं निर्मिलेलें एकराष्ट्र–हिंदुराष्ट्रवादाचा पुर-स्कार–राजवाडे ... मक अणे यांचें मत.

५. महाराष्ट्रांतील ... ९३–११५
(


REFBK 0006954
REFBK-0006954

ब्रिटनविरोधी लढ्याचा विस्तार—एकसूत्र हिंदी अर्थ-व्यवस्था—हिंदी भांडवलदारांचा एकराष्ट्रवाद—नेहरू रिपोर्ट—भाषावार प्रांतरचना—सन १९३५ नंतरचा राष्ट्रवाद—पाकिस्तानी द्विराष्ट्रवादाचा उदय—प्रांताभिमानाच्या कवचांत राष्ट्रवादाची वाढ.

एकात्म महाराष्ट्र व संयुक्तभारत ११६—१३५

राष्ट्रीयत्व कां हवें—राष्ट्रवादाच्या दोन अवस्था—आक्रमक राष्ट्रवाद व साम्राज्यवाद—नवा सहकारी राष्ट्रवाद—'एकात्म महाराष्ट्राचा'' निर्माता शेतकरी—वऱ्हाडचा प्रश्न—संस्थानें रद्द व्हावीं—शेजारीं राष्ट्रांशीं मैत्री.

७. मराठ्यांचा इतिहास व राष्ट्रीयत्व १३६—१७६

'राष्ट्र' व 'स्वराज्य' यांचे प्राचीन अर्थ—शिवकालासंबंधीं न्यायमूर्तीचें मत—दत्तोपंत आपटे यांचें मत—महाराष्ट्रधर्माचा आशय—'मऱ्हाष्ट' राज्याची कल्पना—हिंदू व मुसलमान राज्यकर्त्यांत राष्ट्रीयत्वाचा अभाव—मराठी राज्य व बहुजनसमाज—राजसत्ता, वतनसंस्था, ग्रामसंस्था—स्वराज्यांतील मराठी भाषा.

परिशिष्टें

१. महाविदर्भाचा प्रश्न १७७—१८३

२. महाराष्ट्रांतील अल्पसंख्यांक १८४—१९०

३. महाराष्ट्र—गीतें १९१—१९९

४. महत्त्वाच्या घटना २००—२०४

५. ''महाराष्ट्र-दर्शना''ची योजना २०५—२०७

६. महाराष्ट्रांत विद्यापीठांची स्थापना २०८—२१५

७ महानुभवकालीन महाराष्ट्राचा नकाशा २१६—२१७

८. मराठी साम्राज्याचा नकाशा (सन १७९५) २१८

९ कांहीं दुरुस्त्यांची नोंद २१९

## दोन शब्द

दि. के. बेडेकर

ऑगस्ट पंधरा (१९४७) या दिवशीं ब्रिटनची सार्वभौम सत्ता गेली व हिंदी लोकसत्तेचें युग सुरू झालें. ही लोकसत्ता निर्माण करण्याचें प्रचंड कार्य यापुढें आपल्याला सर्वांना करावयाचें आहे. लोकशाहीची स्थापना करावयाची म्हणजे सामाजिक व राजकीय क्रांति घडवून आणण्याचें अवघड कार्य आहे. या क्रांतिकार्याचा एक भाग म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक, तसेंच पठाणिस्तान, सिंध इत्यादि भारतीय प्रदेशांचें सर्वांगीण एकीकरण व पुनरुज्जीवन होय.

महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाची चळवळ ऑगस्ट पंधरा तारखेपूर्वी जशी महत्त्वाची व क्रांतिकारक होती तशीच ती यापुढें राहील, असें मला कां वाटतें याचें कारण वर सांगितलेंच. या चळवळीचें ध्येय सोपें व तितकेंच लोकजीवनाशीं संलग्न आहे; तें ध्येय असें: महाराष्ट्रांतील तीन कोटी जनतेच्या अन्नवस्त्राचा, घरादारांचा, शिक्षणाचा व संस्कृतीचा प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांच्यामधलें राष्ट्रीय सामर्थ्य व कर्तृत्व जागृत झालें पाहिजे, व त्यांच्या सामर्थ्याचा भारतांतील इतर राष्ट्रीय लोकसमूहांच्या सामर्थ्याशीं समन्वय झाला पाहिजे. तरच या बहुजनसमाजाला आपल्या प्रबळ शत्रूंशीं टक्कर देतां येईल.

असें न झालें तर महाराष्ट्रीयांचें सामर्थ्य धार्मिक भेदभावांनीं, कृत्रिम सरहद्दींनीं व राष्ट्रीय भावनेच्या अभावानें सुप्तच राहील. हिंदुस्थानभर

उठलेल्या धार्मिक यादवीच्या वणव्याची आग येथेंहि पसरेल व आहेत तेवढींहि लोकशाहीचीं रोपटीं व बीजें जळून जातील.

धर्मनिरपेक्ष परंतु सर्व धर्मांना व धर्मप्रधान संस्कृतिमूल्यांना सहिष्णुतेनें वागविणारी, लोकशाहीप्रधान पण लोकशत्रूंना खंबीरपणें दंड देणारी, अनेकविध लोकसमूहांच्या स्वतंत्र अस्तित्वावर आधारलेली पण त्यांच्या संयुक्त सामर्थ्यानें प्रबळ झालेली अशी **भारतीय संघराज्याची** कल्पना प्रत्यक्ष मूर्त स्वरूपांत घडविण्यास किती काळ लागेल तो लागो. परंतु त्या ध्येयानें पुढें पाहूं शकणारे महाराष्ट्रीय आज " संयुक्त महाराष्ट्र " निर्माण करण्यासाठीं सज्ज होत आहेत. म्हणूनच " संयुक्त महाराष्ट्रा " ची चळवळ एकसारखी वाढत व प्रभावी होत जाणार हें निश्चित. या चळवळींतील एक कार्यकर्ता या नात्यानें हें पुस्तक मीं लिहिलें व आज सुमारें एक वर्षानें तें लिखाण प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे.

## महाराष्ट्र हें एकात्म राष्ट्र

" संयुक्त महाराष्ट्र " परिषदेचें कार्य जुलै १९४६ पासून चालू आहे व त्यामुळें " **संयुक्त** " हा शब्द रूढहि झाला आहे. पण मी जें विवेचन व प्रतिपादन केलें आहे, त्यांत महाराष्ट्राला **एकात्म राष्ट्र** मानावें असें आग्रहानें मांडलें आहे. राष्ट्रीयत्वाच्या शास्त्रशुद्ध दृष्टीनें व भारतीय राजकारणांतील सत्यस्थितीच्या दृष्टीनें मी केलेलें प्रतिपादन बरोबर आहे की नाहीं हें तज्ज्ञ वाचक ठरवतीलच. मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं महाराष्ट्र हें **एकात्मराष्ट्र** मानलें पाहिजे असें मांडत असतांनाच **संयुक्त भारतीय राज्याचा** मी स्पष्ट पुरस्कार केलेला आहे, हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें. तसेंच एकात्म अशा या महाराष्ट्र राष्ट्रांतील नागपूर, वऱ्हाड, कोंकण, मुंबई इत्यादि **विभागांना (उपप्रांतांना) स्वायत्तता** देण्याचें तत्त्वहि मीं मानलें आहे, हें विसरूं नये. ही विनंति प्रस्तावनेंत करण्याचें कारण असें कीं, महाराष्ट्राला एकात्म राष्ट्र मानणारा मनुष्य भारताच्या संयुक्तीकरणाला

विरोधी, व पाकिस्तानसारख्या विच्छेदनात्मक व प्रतिगामी प्रवृत्तींचा पुरस्कर्ता असलाच पाहिजे, असा दृढ गैरसमज मला आढळून आला आहे. त्याचप्रमाणें महाराष्ट्राला राष्ट्र मानलें कीं, महाविदर्भासारख्या प्रदेशांचा स्वायत्तपणा नाकारला जाईलच अशी साशंकता मला आढळली आहे. वस्तुतः, महाराष्ट्राचें राष्ट्रीय एकीकरण हें जसें लोकशाहीला पोषक आहे, तसेंच अनेक भारतीय राष्ट्रांचें एका संघराज्यांत होणारें एकीकरणहि लोकशाहीला धरूनच आहे व राष्ट्रांतर्गत उपप्रांतांची स्वायत्तताहि लोकशाहीच्या तत्त्वांतच सामावणारी आहे.

महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करतांना माझ्या डोळ्यांपुढें पठाणांची पठाणिस्तानची चळवळ, स्वतंत्र काश्मीरची चळवळ, कानडी लोकांची कर्नाटक–राष्ट्रनिर्मितीची मागणी, आंध्रांची विशाल आंध्र–निर्मितीची चळवळ इत्यादि आधुनिक राष्ट्रीय चळवळींचा इतिहास आहे. या सर्व चळवळींना आजच स्पष्ट राष्ट्रीय स्वरूप नाहीं, किंबहुना या सर्व चळवळींना सध्यां प्रांतिक स्वरूप आहे. वेळप्रसंगीं या प्रांतिकतेला दुरभिमानाचें व भारतीय संघराज्याला विरोधी असेंहि विकृत रूप येत आहे. त्यामुळें, धर्मप्रधान राष्ट्रीयत्वाच्या चुकीच्या व घातुक सिद्धान्तानुसार भारताचें जें विच्छेदन झालें आहे, त्याच प्रकाराची पुनरावृत्ति या नव्या राष्ट्रीय आंदोलनामुळें होण्याचा धोका पुष्कळांना वाटत आहे. साहजिकच, जुन्या भारतीय राष्ट्रीय परंपरेंतील लोक व नवे जहाल राष्ट्रवादी व समाजवादी लोकहि या चळवळींकडे उपेक्षेनें व साशंकतेनें पहात आहेत. त्या उपेक्षेचें निराकरण माझ्या प्रतिपादनामुळें होईल अशी माझी अपेक्षा आहे. पण नुसत्या तात्त्विक प्रतिपादनापेक्षां आणखी एका प्रत्यक्ष कार्यामुळेंच ही उपेक्षा पूर्णपणें नाहींशी होईल. तें कार्य म्हणजे या राष्ट्रीय चळवळींचा शेतकरीवर्गांत प्रसार होणें. हें झाल्यास मराठी, कानडी, आंध्र, पठाण इत्यादि शेतकऱ्यांच्या लोकसत्तावादी आकांक्षेच्या

व लढ्याच्या क्रांतिकारक सामर्थ्याचें एक आवश्यक रूप असें या राष्ट्रीय चळवळींचें महत्त्व सर्वांना दिसून येईल. हा मुद्दा प्रस्तुत पुस्तकांत मी फार संक्षेपानें मांडला आहे, म्हणून त्याकडे प्रस्तावनेंत उल्लेख करून जास्त लक्ष वेधणें मला जरूर वाटतें.

शेतकरी वर्गांत या नव्या राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वाचा खंबीर पाया घातला पाहिजे असें म्हटलें कीं, साहजिकच असा निष्कर्ष निघतो कीं, शेतकरी-वर्गाचे व सर्व जनतेचेहि शत्रु असलेल्या प्रतिगामी वर्गांना या राष्ट्रीय चळवळींत महत्त्व मिळून उपयोगी नाहीं. उदाहरणार्थ, संस्थानिकांनीं जरी महाराष्ट्राबद्दल जिव्हाळा दाखविला तरी त्यांना या चळवळींत महत्त्व लाभणें धोक्याचें आहे, नव्हे आधुनिक राष्ट्रनिर्मितीच्या मुळावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखेंच आहे.

## महाराष्ट्रापुढील दोन मार्ग

यावेळीं, महाराष्ट्रापुढें दोन मार्ग खुले आहेत: ( १ ) शेतकरी वर्गाच्या आधारावर लोकसत्तात्मक राष्ट्रवाद स्वीकारावयाचा किंवा (२) संस्थानिक, हुकूमशाहीला भाळलेला वरिष्ठ पांढरपेशा वर्ग व धनिक वर्ग यांच्या आधारावर आक्रमक राष्ट्रवादाचा झेंडा उभारावयाचा. हे दोन मार्ग पूर्वपश्चिम दिशांसारखे परस्परांना विरोधी आहेत. जर्मन राष्ट्रापुढें हेच दोन मार्ग शंभर वर्षांपूर्वी होते. जर्मनांनीं आक्रमक, रक्तपिपासू राष्ट्रवाद स्वीकारला व त्यामुळें त्यांच्यासारखे बुद्धिमान, प्रातिभावान् व उद्योगी लोक स्वतःला व जगाला दुःखी करून आज पराभूत स्थितींत आहेत. जर्मन व महाराष्ट्रीय लोकांच्या जीवनांत व घडणींत कांहीं साम्यस्थळें आहेत असे उद्गार मीं अनेकदां ऐकले आहेत व त्यांत अर्थहि आहे; म्हणूनच जर्मन राष्ट्राच्या इतिहासानें दिलेला धडा आपल्याला फारच मनःपूर्वक व गंभीरपणानें विचारांत घ्यावयास हवा !

पण, धोका आहे तो असा कीं जर्मन आक्रमक राष्ट्रवाद्यांप्रमाणें महाराष्ट्रीयांच्या दृष्टीला चढाईखोरीची धुंद येण्याचा संभव आहे.

हा धोका काल्पनिक नाहीं, कारण महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाची परंपरा पाहतांना मागेंमागें जात शिवकालीन स्वराज्यापर्यंत जाण्याची आपल्याकडे प्रथा पडलेली आहे. त्यामुळें महाराष्ट्र म्हणजे " तंजावर ते ग्वाल्हेर " पर्यंतचा प्रदेश असा विपरीत ग्रह आजहि बोलून दाखविला जात आहे. या बाबतींत आपल्या सुशिक्षित वर्गांतहि नीट कल्पना नसल्यामुळें या विषयावर एक विस्तृत प्रकरण ( सातवें ) मीं लिहिलें आहे. त्यांतील विवेचन अत्यंत विवाद्य आहे व माझ्यासारख्यानें या विषयावर लिहणें हें धाडस आहे, पण एक निश्चित अशी भूमिका मांडणें मला जरूर वाटलें व म्हणून वाचकांपुढें व तज्ज्ञांपुढे मीं ती मांडली आहे. " मराठ्यांचा इतिहास व राष्ट्रीयत्व " ह्या प्रकरणांत **वतनदारी, राजसत्ता व ग्रामसंस्था** या तीन संस्थांवर उभारलेल्या हिंदी समाजव्यवस्थेचें स्वरूप मी मांडलें आहे; त्यामुळें ' राष्ट्रीयत्वा'चा उदय आधुनिक काळांतच कां व कसा झाला हें स्पष्ट होईल व महाराष्ट्राच्या आधुनिक राष्ट्रीयत्वाला ठोस व शास्त्रशुद्ध असा तात्त्विक पाया मिळेल असा माझा विश्वास आहे.

मी ही प्रस्तावना लिहीत असतांनाच निजामराज्यांतील जनतेनें, विशेषतः शेतकरीवर्गानें, जो जोमदार व व्यापक लढा चालविला आहे त्या लढ्यामुळें महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक या तीनहि राष्ट्रांचें संयुक्तीकरण सुलभ होत आहे. या लढ्यामध्यें जनतेनें दाखविलेल्या शौर्यामुळें व त्यागामुळें आपल्याला, मोंगलाईबाहेरच्या मराठ्यांना, महाराष्ट्र–राष्ट्रनिर्मितीच्या कार्यांत स्फूर्ति मिळाली पाहिजे व मराठवाड्यांतील जनतेला आपण सर्वतोपरी साहाय्य केलें पाहिजे. लोकसत्ताक राष्ट्रवादाच्या एकमेव ध्येयाला आपलें लक्ष्य व अढळ अधिष्ठान मानून आपण सर्वांनीं निजामी एकतंत्र–सत्तेच्या विरुद्ध निकरानें झगडलें पाहिजे.

एकीकडे निजामराज्यांतील प्रजेची स्फूर्तिदायक चळवळ अशी वाढत असतांना दुसरीकडे लोकसत्ताक राष्ट्रवादाला मारक अशा शक्तींचा व विचारांचा पगडा आपल्याकडे वाढत आहे ही दुर्दैवी घटनाहि आपण सावधपणें ओळखली पाहिजे. प्रतिगामी विचारसरणीचा उघड पुरस्कार तर आज महाराष्ट्रांत होत आहेच, पण मोठमोठ्या बुद्धिवादी व तर्ककठोर विचारवंतांच्या मनांतहि नकळत ही प्रवृत्ति उद्‌भवूं लागली आहे ही मोठीच धोक्याची गोष्ट आहे. या प्रकाराचें अगदी ताजे परंतु ठळक व दूरगामी परिणाम करणारें उदाहरण म्हणून डॉ. ध. रा. गाडगीळ यांच्या ता. ९ ऑक्टोबरच्या पत्रकाकडे मी वाचकांचें लक्ष वेधितों. निर्वासितांना नागरिकत्व देणें, हैद्राबादी सत्तेविरुद्ध चौफेर लढा सुरू करणें, वगैरे बाबतींत डॉ. गाडगीळ यांच्या सूचनांशीं सहमत असूनहि मला त्यांच्या राज्यविषयक मुख्य तात्त्विक भूमिकेवर आक्षेप घ्यावयाचा आहे. या भूमिकेचा "संयुक्त महाराष्ट्राच्या" चळवळीवर अनिष्ट परिणाम होणार आहे, म्हणून तिचा विचार प्रस्तुत ठिकाणीं मला अत्यावश्यक वाटतो.

## डॉ. गाडगीळ यांच्या पत्रकावर आक्षेप

त्यांच्यामतें, हिंदी संघराज्याचें अधिष्ठान हिंदू संस्कृति आहे, असें स्पष्टपणें ओळखलें पाहिजे व घोषित केलें पाहिजे. या सूत्राला पोषक म्हणून मुख्यतः दोन कारणें ते देतात, ( १ ) संघराज्याचें " मुख्य व सर्वांत महत्त्वाचें " वैशिष्ट्य कोणचें ? तर हिंदू संस्कृतीसंबंधीं संघराज्याच्या सर्व नागरीकांना वाटणारें प्रेम. या सामान्य बंधनामुळेंच महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि लोकसमूह वेगवेगळे असूनहि संघराज्यांत एकत्र आले आहेत; आणि ( २ ) समजा, एकसंस्कृतित्वाचें हें बंधन नाहीं असें मानलें तर मग या विभिन्न लोकसमूहांना एकत्र " सांधणारें असें कांहीं उरतच नाहीं, " असें त्यांचें मत आहे.

त्यांच्या वरील भूमिकेवर आक्षेप घेतांना प्रथमच मला स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं हिंदू संस्कृतीचें सर्वसंग्राहक व एका दृष्टीनें उदार असें स्वरूप डॉ. गाडगीळांच्या प्रमाणेंच मलाहि आदरणीय वाटतें, तसेंच ऐतिहासिक काळांत, आजमितीला व भविष्यांतहि हिंदू संस्कृतीचें समान बंधन येथील समाजाला राहील, हें स्पष्ट सत्य मलाहि दिसतें. "हिंदू संघराज्य" हें धर्मवेडावर उभारलेलें असावें असें डॉ. गाडगीळांना म्हणावयाचें नाहीं. राष्ट्रकल्पनेसंबंधीं त्यांचें मत व कित्येक हिंदुराष्ट्रवाद्यांचें मत या दोहोंतील मोठा फरकहि मला जाणवतो. जरा खोलांत शिरून पाहिलें तर असें दिसेल कीं, **हिंदुत्वाच्या आधारावर राष्ट्रनिर्मिति करावयाची हा हिंदुसभावाद्यांचा सिद्धान्त डॉ. गाडगीळांनीं या पत्रकांत मुळींच उचलून धरलेला नाहीं.** उलट ते असें स्पष्टच म्हणतात कीं 'राष्ट्र' हा दर्जा भारत या खंडप्राय प्रदेशाला प्राप्त होत नसून, गुजराथ, महाराष्ट्र इत्यादि एकजिनसी लोकसमूहांना आहे. **धर्मप्रधान राष्ट्रीयत्वाच्या** सिद्धान्ताला त्यांनीं अशा रीतीनें दूर ठेवलें आहे व लोकभाषा, सलंग प्रदेश, इत्यादि राष्ट्रीयत्वाच्या आधुनिक गमकांनाच निर्णा-यक मानून महाराष्ट्रादि राष्ट्रांना हिंदी (किंवा हिंदू) संघराज्याची घटक–राष्ट्रें मानलें आहे. याच्या उलट, हिंदुसभेच्या राष्ट्रवादांत संघराज्याला **एकराष्ट्रीय** राज्यच मानलें आहे, व महाराष्ट्रादि घटकांना निव्वळ प्रांत मानलेलें आहे. त्यांच्या हिंदू राष्ट्रांत "नेपाळ, ब्रह्मदेश, सिलोन यांनाहि स्वयंनिर्णयाचा हक्क नाहीं," मग महाराष्ट्राचें काय ? त्यांच्या मतें "एडन व अंदमान हीं सुद्धां बृहत्तर भारताच्या अभिन्न राष्ट्रसीमाच होत." (श्री. ग. वि. केतकर, "किर्लोस्कर" निवडणूक खास अंक, फेब्रुवारी १९४६, पान ३२८ पहा.)

### आधुनिक राष्ट्राचा जन्म

मग माझा आक्षेप कशावर आहे ? तर **समान संस्कृति–बंधनाचें अस्तित्व मी नाकारीत नसून त्या बंधनाच्या अधिष्ठानावर राज्याची**

उभारणी करणें मला अगदीं चूक वाटतें. मध्ययुगीन इतिहासाची साक्ष काढा. त्या काळांत तर मनुष्याच्या जीवनांत धर्माला व धर्मप्रधान सांस्कृतिक आचारविचारांना केवढें मोठें स्थान होतें ! पण तरी देखील त्या काळांतल्या राज्यांना धर्माचा किंवा संस्कृतीचा पाया नव्हता. आगंतुक व अनुषंगिक रीतीनें धर्माला राज्यविषयक घडामोडींत स्थान मिळे, पण त्यावरून असें मुळींच म्हणतां येत नाहीं कीं त्या काळचीं राज्यें सांस्कृतिक बंधनाच्या आधारावर रचलीं जात. नंतरचा व आजचा इतिहास घ्या. आजचीं युरोपीय राष्ट्रें घेतलीं तर त्यांत धर्माची राज्यापासून संपूर्ण फारकत झाली आहे असें दिसत नाहीं. फक्त सोव्हिएत यूनियन ह्या संघराज्यांत धर्मस्वातंत्र्य आहे, पण धर्म व राज्य यांची फारकत पूर्णतः झालेली आहे; उलट स्पेन, ग्रीस, इटली वगैरे देशांत धर्माला राजकारणांत बरेंच मोठें स्थान आहे. त्यांच्या मानानें इंग्लंडमध्यें राज्याची धर्मनिरपेक्षता जास्त आहे, तरी डॉ. गाडगीळ म्हणतात, त्याप्रमाणें तेथील " राज्य अँग्लिकन चर्चेशीं चांगलेंच निगडित आहे. "

पण राज्य व चर्च यांचा असा संबंध असणें वेगळें व या राज्यांची उभारणीच धर्मप्रधान संस्कृतीच्या अधिष्ठानावर झाली असें मानणें वेगळें ! या युरोपीय राज्यांची उभारणी केव्हां व कशी झाली याच्या इतिहासांत फार खोल जायला नको. ढोबळ मानानें असा इतिहास सर्वांना ठाऊकच आहे कीं, क्रूसेडस्च्या दीर्घ युद्धानंतर युरोपीय लोकसमूहांतून या राष्ट्रीय राज्यांचा हळूहळू विकास होत गेला व मुसलमानी सत्तेविरुद्ध धर्मयुद्ध लढणाऱ्यांची सांस्कृतिक एकजूट बाजूला किंवा मागें पडली. त्या सांस्कृतिक एकजुटीवर क्रुसेडचें युद्ध लढणें शक्य झालें खरें, पण त्यानंतर तिचा प्रभाव व अवतार संपला. नवीं राष्ट्रें निर्माण झालीं तीं फ्रान्स, इंग्लंड, डेन्मार्क, जर्मनी या प्रदेशांतील विशिष्ट आर्थिक विकासाच्या आधारावर व त्या विकासाच्या प्रेरणेनें निघालीं.

आर्थिक विकासाच्याबरोबर या प्रदेशांतील लोकभाषा, विशिष्ट प्रादेशिक आचार वगैरे गोष्टींची प्रेरणा नव्या राष्ट्रीय राज्यांना मिळाली, हें खरें. आर्थिक विकासाचें महत्त्व मानलें कीं, राष्ट्रीयत्वाच्या भावनात्मक स्वरूपाला मी गौण किंवा कमी लेखतो असें नाहीं. राष्ट्रीयत्वाच्या भावनेला धार्मिक व सांस्कृतिक भावनांप्रमाणें मानवी जीवनांत कार्यक्षमतेची शक्ति आहे, व भावनांचा आदर मानवी प्रगतीमध्यें विश्वास असणाऱ्या प्रत्येकाला केलाच पाहिजे. पण ऐतिहासिक विश्लेषणांत, आर्थिक घडामोडींकडे बोट दाखवूनच घटनांची कार्यकारणपरंपरा ढोबळमानानें दाखविणें शक्य होतें. तोच नियम युरोपीय राष्ट्रीय राज्यांच्या जन्माच्या बाबतींत लागतो व आधुनिक भांडवलदारीच्या पूर्वतयारीच्या काळांतल्या **आर्थिक घडामोडींमध्यें** इंग्लंड, फ्रान्स इत्यादि **राष्ट्रांचें अधिष्ठान** आपल्याला सांपडतें. ख्रिश्चन संस्कृतीच्या किंवा एखाद्या चर्चच्या सामान्य बंधनाच्या अधिष्ठानावर इंग्लंडसारखीं राष्ट्रीय राज्यें रचली गेलेलीं नाहींत, हीच गोष्ट ठळकपणानें मला सांगावयाची आहे.

युरोपसंबंधीं हें झालें! पण भारतीय मध्ययुगांत कांहीं वेगळा प्रकार झाला काय? नाहीं. भारतीय मध्ययुगीन समाजाचा वेगळेपणा ध्यानांत घेऊनहि असें म्हणावें लागतें कीं, येथें राष्ट्रीय राज्यांचा उदय झाला नाहीं, पण जीं राज्यें जन्मलीं, साम्राज्यपदाला पोंचलीं व निमालीं तीं धर्मसंस्कृतीच्या अधिष्ठानांवर उठलेलीं किंवा तगलेलीं नव्हतीं. शिवाजीराजांची स्वराज्यस्थापना होण्यापूर्वी भागवत धर्मानें मराठी बहुजनसमाजांत नवा जोम निर्माण केला, अन्यायाच्या प्रतिकाराची तीव्र भावना व बंधुभावाचें सामुदायिक बळ संपादन केलें, हें खरें. पण धर्मसुधारणेचा हा उपक्रम व बहुजनसमाजाचें जीवन यांचा राज्यस्थापनेला **प्रत्यक्ष आधार** नव्हता. जें स्वराज्य स्थापन झालें तें शहाजीराजे व शिवाजीराजे यांच्या राज्यविषयक मसलतींमुळें व पराक्रमामुळें उत्पन्न झालें. या सर्व मसलतींत व

शिवाजीराजांच्या मनांत सनातन धर्माबद्दल कडवा अभिमान व औरंगजेबाच्या हिंदु-द्वेष्टया धोरणाबद्दल त्वेष नव्हता, असें कोण म्हणेल ? परंतु, मूळ प्रेरणा व एकंदर राज्याची धारणा धार्मिक नव्हती, सांस्कृतिकहि नव्हती, तर मध्ययुगीन राज्यस्थापनेच्या भूमिकेवर होती. हीच भूमिका पेशव्यांचीहि होती. मराठेशाहीची सारी मदार लष्करावर होती आणि ह्या लष्करांत ( व आरमारांत ) शिवकाळांतला दौलतखान ( आरमार-प्रमुख ) व पानिपतावरचा इब्राहिमखान ( तोफखाना-प्रमुख ) हे मुसलमान नेमलेले दिसतात. महाराष्ट्रांतल्या प्रमुख किल्ल्यांची किल्लेदारी अरब शिबंदीवर टाकलेली दिसते व या सर्वांनीं धन्याची चाकरी करतांना मरणहि पत्करलेलें दिसतें. जर मराठी राज्य व साम्राज्य धर्माधिष्ठित असतें तर वरील प्रकार घडणेंच अशक्य होतें. ( याच विषयाची विस्तृत चर्चा "मराठ्यांचा इतिहास व राष्ट्रीयत्व" या प्रकरणांत मीं केली आहे. ) शिवाजीराजांच्या उदात्त चारित्र्याबद्दल व अलौकिक कर्तृत्वाबद्दल पूर्ण आदर अंतःकरणांत वसत असूनहि वरील विधानें मी करीत आहे, कारण सत्यकथन हें त्या आदरभावनेशीं विसंगत नाहीं अशी माझी खात्री आहे.

यावर असा एक प्रश्न निघेल कीं **राष्ट्रीयत्वाचा व राष्ट्रीय राज्यांचा** आधार म्हणून संस्कृतीचें समानबंधनत्व उपयोगी पडलेलें दिसत नसलें तरी कांहीं **संघराज्यें** या आधारावर उभारलीं जाणें शक्य आहे. पण इतिहासाकडे पाहून हा तर्कहि टिकत नाहीं. समानसंस्कृतित्वाच्या आधारावर ख्रिश्चन राष्ट्रांचें संघराज्य होण्यास कोणचा प्रत्यवाय होता ! पण तसें न होतां उलट ख्रिश्चन राष्ट्रांनीं गेलीं कित्येक शतकें आपसांत रक्तपाती वैर चालविलेलें दिसतें. चीन व जपान हीं समानसंस्कृतीचीं राज्यें ! त्यांचें वैर चाललेंच. इकडे मुस्लीम संस्कृतीचे लोकसमूह घ्या. पॅन-इस्लामिझम व पॅन-अरेबिझम या चळवळींमुळें डॉ. गाडगीळांच्या सिद्धा-

न्ताला पुष्टि मिळते खरी, पण एकतर ह्या दोन्ही चळवळी उघडउघड ब्रिटिशांच्या कळसूत्री बाहुल्यांनीं चालविल्या व त्यांना अरब किंवा मुस्लीम जनतेचा पाठिंबा जेवढा कांहीं मिळाला तो अगदीं निर्व्वळ राजकीय नफ्यातोट्याच्या अपेक्षेनें. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या पाकिस्तानी राज्यांतच काश्मीरी राष्ट्राची व पठाणीस्तानची बंडखोरी धुमसत आहे व बाहेरून अफगाणिस्ताननेंहि पाकिस्तानशीं दुजाभाव ठेवला आहे. अशाच तऱ्हेचे विसंवाद इराण व अफगाणिस्तान, तुर्कस्तान व तेथील कुर्द यांच्यांत वाढत आहेत. मुसलमानी संस्कृतीच्या समानबंधनाच्या पायावर एक संघराज्य निर्माण होणें म्हणूनच अशक्यप्राय आहे.

## आधुनिक जीवनाची धर्मनिरपेक्षता

राष्ट्रें, राष्ट्रीय राज्यें किंवा संघराज्यें या सर्वांना ख्रिश्चन, मुस्लीम किंवा हिंदू संस्कृतींचें अधिष्ठान देतां येत नाहीं. याला एक साधा व्यावहारिक पुरावा देतां येतो तो असा कीं आजच्या सामाजिक व राजकीय कायदेकानूंना प्राचीन धर्मप्रधान संस्कृतींचा आधार घेणें प्रत्यक्षांत अव्यवहार्य ठरणारें आहे. वैवाहिक संबंधाबद्दलचे कायदे घ्या. त्यांतल्यात्यांत घटस्फोटाचा कायदा घ्या. आधुनिक राष्ट्रीय राज्यांच्या व संघराज्यांच्या विधिमंडळांतून अशा धर्तीचे कायदे पास झाले आहेत किंवा पास होऊं घातले आहेत कीं ज्यांना ख्रिश्चन, महंमदी व हिंदू वगैरे सर्वच धर्मप्रधान संस्कृतींचा खरा परंपरागत आधार नाहीं. तुर्कस्तान, ब्रिटन किंवा आपला भारतदेश या सर्व ठिकाणचे सनातनी लोक नव्या वैवाहिक नीतिविरुद्ध व कायद्यांविरुद्ध झगडत आहेत. त्यांची भूमिका आजच्या सामाजिक गरजेला व नीतीला विरोधी असली तरी परंपरागत संस्कृति–मूल्यांना धरूनच आहे. पण, ती भूमिका न स्वीकारतां आजचीं विधिमंडळें नवे कायदे पास करीत आहेत. याचा स्पष्ट अर्थ असा कीं नवीं राज्यें (व संघराज्यें) धर्मप्रधान सांस्कृतिक मूल्यांना मागें टाकून नवीं लोकसत्तात्मक सामाजिक मूल्यें घेऊन कायदेकानू करीत

आहेत. जी गोष्ट विवाहविषयक कायद्यांची तीच जातिसंस्थेबद्दलच्या, वारसाबद्दलच्या, शिक्षणाबद्दलच्या वगैरे एकंदर कायद्यांची ! थोडक्यांत, आज धार्मिक व सांस्कृतिक मूल्यें वैयक्तिक जीवनांत ज्याला त्याला पूज्य राहतील, पण सार्वजनिक, राष्ट्रीय व राजकीय व्यवहारांतून मात्र त्यांना वगळलें जात आहे. या मूल्यांचें समानबंधन म्हणूनच राज्य या संस्थेचा आधार बनूंच शकत नाहीं.

## संघराज्यांत घटकांनाच प्राधान्य हवें

येथपर्यंत डॉ. गाडगीळांच्या सिद्धान्ताचा एक भाग तपासला, आतां त्यांचें दुसरें विधान घेऊं. संस्कृतीचें समानबंधन हिंदी संघराज्याला आधार माना हा त्यांचा पाहिला आग्रह. तो खोडून काढला तर त्यांचें म्हणणें असें कीं " मग या राज्याला बंधनकारक असें कांहीं उरतच नाहीं. " त्यांचें हें विधान आतां तपासूं.

सन १९४५ सालीं डॉ. गाडगीळांनीं लिहिलेलें " फेडरेटिंग इंडिया' हें पुस्तक घेऊन त्यांतलीं पहिलीं २४ पानें वाचलीं, म्हणजे मनावर एक गोष्ट ठसते ती अशी कीं, हिंदुस्थानाचें संघराज्य होणें जरी आवश्यक आहे तरी प्रथम **संघराज्याचे घटक कोणचे** तें नीट स्पष्ट ठरलें पाहिजे; आधीं घटक ठरवून मग त्या **घटकांनीं स्वयंस्फूर्तपणें एकत्र येऊन संघराज्य निर्माण केलें पाहिजे.** " फेडरेटिंग इंडिया ' या पुस्तकांत या घटकांना ' प्रांत ' किंवा नुसते ' घटक ' म्हणून डॉ. गाडगीळांनीं संबोधिलें आहे, पण त्यांच्या ता. ९ च्या पत्रकांत या बाबतींत पुढें जाऊन ते स्पष्टच म्हणतात कीं हिंदू संघराज्य हें " हिंदू राष्ट्रीय राज्यांचें ( म्हणजेच राष्ट्रांचें ) संघराज्य " असेल. जुनागडच्या बाबतींत लिहितांना ते म्हणतात कीं " जुनागड संस्थानचा प्रदेश गुजराथ या हिंदू राष्ट्राचा प्रदेश आहे. "

संघराज्य व त्याचे घटक, म्हणजे गुजराथ, महाराष्ट्र इत्यादि राष्ट्रें, या

दोघांचे परस्परसंबंध काय असावे याबद्दल ' फेडरेटिंग इंडिया'मध्यें विस्तृत व उद्बोधक चर्चा केली असून निष्कर्ष असा काढला आहे कीं **स्वयंनिर्णयाच्या**, म्हणजे घटकराष्ट्रांनीं खुषीनें सामील होण्याच्या ( किंवा बाहेर राहण्याच्या ), **तत्त्वावर संघराज्याची रचना** झाली पाहिजे. संघ-राज्याला जर जबरदस्त केंद्रीय राज्याचें स्वरूप दिलें तर त्याचे घोर परिणाम होतात व परिणामीं संघराज्याचीं छकलें होतात ही गोष्ट युगोस्लाव्हियन संघराज्याचा इतिहास देऊन डॉ. गाडगीळ यांनीं मांडली आहे.

घटक-राष्ट्रांना असा निर्णायक अधिकार देण्याचें कारण काय ? याचें उत्तर देतांना डॉ. गाडगीळांनीं असें दाखविलें आहे कीं घटकांनाच प्राधान्य व निर्णयाचा अधिकार देण्याचें कारण असें कीं, "संघराज्य हें त्याच्या नांवाप्रमाणेंच अनेकविध घटकांनीं एका संघांत सामील होऊन बनविलेलें असतें. साहाजिकच, ( लोकांच्या निष्ठेचें ) प्रधान केंद्र किंवा अधिष्ठान संघराज्य नसून घटक हेंच असतें " ( पान ८ ).

घटकांचें अधिष्ठान धरून संघराज्याची रचना नंतर साधतां येते याचा अर्थ जास्त खोलांत शिरून पाहिला पाहिजे. घटकांतील लोकांना खरें प्रेम वाटतें तें घटकांबद्दल, असें कां ? 'घटक' हे सध्यांच्या धेडगुजरी प्रांतांप्रमाणें असतील तर हें प्रेम वाटणार नाहीं. यावरून असा निष्कर्ष निघतो कीं घटकांना ' राष्ट्र ' हा दर्जा जर वस्तुस्थितीमळें प्राप्त झाला असेल तर तेथील लोकजीवनाचें केंद्र या राष्ट्राचें राष्ट्रीय जीवनच असतें. राष्ट्रीयत्व हाच लोकजीवनाचा आधार ठरतो. अशीं राष्ट्रें जरी एकाद्या संघराज्यांत सामील झालीं तरी राजकीय जीवनाचें खरें व एकमेव अधिष्ठान हीं राष्ट्रें राहतात,—संघराज्यविषयक अभिमान हा उपरा व गौण राहतो.

वरील सिद्धान्त डॉ. गाडगीळांच्या पुस्तकांत दुसऱ्या एका तऱ्हेनेंहि आला आहे. दक्षिण हिंदुस्थानाविषयीं विचार करतांना ते म्हणतात,

"मुंबई, मद्रास व मध्यप्रांत या राजकीय विभागांचा विचार करावयाचा म्हणजे दक्षिण भारताच्या द्वीपकल्पाचा विचार केला पाहिजे. यांत धर्माची बाब अशी नाहीं कीं, जिच्यामुळें लोकांचें वेगळे किंवा वैशिष्ट्यपूर्ण भाग पाडतां येतील कारण बहुतांश लोक हिंदूच आहेत. पण या प्रदेशांत वेगवेगळ्या भाषा बोलणारे व चांगले स्पष्टपणें परस्परभिन्न असे राष्ट्रीय लोकसमूह आहेत. या भाषिक समूहांना विशिष्ट, समान व अखंड अशा ऐतिहासिक परंपरा आहेत. बहुतेक समूहांनीं, उदाहरणार्थ, आंध्र, कानडी, व मराठे यांनीं, राज्यें व साम्राज्यें स्थापून स्वतःचा अभिमानास्पद इतिहास घडविला आहे."(पान १३) या उताऱ्यावरून स्पष्ट होतें कीं, घटक राष्ट्रांना जो निर्णायक अधिकार व लोकजीवनांत प्रधानस्थान आहे तें भाषा, इतिहास इत्यादि प्रत्यक्ष राष्ट्रीय बाबींवर आधारलेलें आहे.

## संघराज्याला घटकांच्या राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान

राष्ट्रीयत्वाचा अभिमान ही गोष्ट ठळक व सहज दिसणारी आहे. या भावनेचें समानबंधन महाराष्ट्रीय, कानडी वगैरे लोकसमूहांना एकत्र आणण्यास प्रभावी आहे ही गोष्ट डॉ. गाडगीळांनाहि मान्य आहे, इतकेंच नव्हे तर या भावनेलाच तें प्रधान समजतात व संघराज्यविषयक भावनेला गौण समजतात. याचें कारणहि सहज दिसणारें आहे! संघराज्य ही एक तात्कालिक राजकीय गरजेनें पैदा केलेली राज्यविषयक संघटना आहे. कांहीं साम्य दाखवावयाचें तर आधुनिक संघराज्यांत व मराठा सरदारांच्या एकजुटींत दाखवितां येईल. अर्थात, आधुनिक काळांतल्या संघराज्याची रचना स्वयंनिर्णयावर झाली असल्यास त्याला जास्त स्थैर्य असेल, पण तत्त्वतः आजच्या संघराज्याचें स्वरूपहि मध्ययुगीन राजसत्तांच्या मंडळांसारखें किंवा संघांसारखें आहे.

पण लोकसमाजाच्या मूलभूत सहजस्फूर्त निष्ठेची कसोटी लावून संघराज्याचा विचार केला म्हणजे त्याच्या घटक-राष्ट्रांचा विचारच

प्राधान्यानें करावा लागतो व या राष्ट्रांची रचना व विकास ज्या अधिष्ठानावर आहे तेंच संघराज्याचें खरें मूलभूत अधिष्ठान मानावें लागतें; पर्यायानें या राष्ट्रांना ज्या नैमित्तिक कारणानें एका संघांत येण्याची इच्छा झाली असेल तें कारण गौण व आगंतुक मानावें लागतें. ह्याच विस्तृत भूमिकेचा आश्रय "फेडरेटिंग इंडिया"च्या सर्व विचार-मालिकेला आहे. याच भूमिकेमुळें डॉ. गाडगीळ 'संयुक्त महाराष्ट्राच्या' राष्ट्रीय चळवळींत सक्रिय भाग, नव्हे पुढाकारहि, घेतांना आढळत आहेत.

पण, दुर्दैवाची गोष्ट अशी कीं वरील सर्व विचार त्यांना परवांच्या पत्रकाच्या वेळीं सुचलेला नाहीं. संघराज्याच्या आधाराला हिंदुसंस्कृतीचें समानबंधन न मानलें तर मग कांहीं दुसरें बंधन उरतच नाहीं असा जो समज त्यांनीं आज करून घेतलेला आहे त्याचें कारण घटकराष्ट्रांच्या राष्ट्रीयत्वाचा भरभक्कम पाया व महाराष्ट्रादि लोकसमूहांची 'संयुक्त महा-राष्ट्र"साठीं चाललेल्या धडपडीमध्यें प्रगट होणारी सर्वोदयाची आकांक्षा व प्रचंड लोकशक्ति यांचा त्यांना अचानक सपशेल विसर पडला आहे. "हजारों वर्षांचा इतिहास" पाहून हिंदुसंस्कृतीचें समानबंधन हें भारतीय समाजाच्या धारणेचें मूलभूत सूत्र आहे असें त्यांना आज वाटतें व हें सूत्र टाकलें तर समाजधारणेचें दुसरें सूत्रच उरत नाहीं असें ते आज समजतात. पण संस्कृतीच्या अतिव्याप्त व गैरलागू सूत्राची जागा महाराष्ट्रादि लोकसमूहांच्या राष्ट्रीयत्वाच्या भक्कम निष्ठेनें भरून काढणें व समाजाला गतिमान् करणें हाच आज एकमेव मार्ग आहे याचा त्यांना विसर पडला आहे. विसर पडला आहे म्हणण्याचें कारण हा सिद्धान्त त्यांनींच "फेडरेटिंग इंडियांत" सन १९४५ सालीं मांडलेला आहे.

## तिरंगी संमिश्र राष्ट्रवादाचा वारसा

येथपर्यंत डॉ. गाडगीळांच्या मूळ प्रमेयांतील दोन मुद्यांचें मीं परीक्षण केलें, परंतु हें परीक्षण पुरें होण्यासाठीं आणखी एका प्रश्नाचें उत्तर

मिळविलें पाहिजे. तो प्रश्न असा कीं, दोन वर्षांपूर्वी संघराज्य व घटक-राष्ट्रें यांच्यासंबंधीं प्रगट केलेली भूमिका आज डॉ. गाडगीळांनीं सोडली याचीं कारणें काय ?

तात्कालिक घटनांवरून सहज सुचणारीं कारणें म्हणजे पाकिस्तानी राज्यांतील सैतानी अत्याचारामुळें सर्वांचीच मनःस्थिति अस्थिर झाली आहे हें एक, व दुसरें म्हणजे पंडित नेहरूंनीं हिंदुराज्याच्या घोषणेवर केलेला कठोर प्रहार. त्या प्रहारावर प्रत्याघात म्हणूनच जणूं काय डॉ. गाडगीळांचें पत्रक आहे. कालक्रमामुळें असा कार्यकारणभाव मनांत सहज येण्यासारखा आहे.

माझ्या मतें, या तात्कालिक कारणांच्या पलीकडे जाऊन डॉ. गाड-गीळांच्या नव्या भूमिकेचा उगम शोधणें आवश्यक आहे व शक्यहि आहे. तो उगम शोधीत शोधीत आपल्याला न्यायमूर्ति रानडे, लोकमान्य टिळक प्रभृति हिंदी, विशेषतः महाराष्ट्रीय, विद्वानांच्या 'राष्ट्र'कल्पने-पर्यंत जावें लागतें. प्रस्तुत पुस्तकांतील दोन प्रकरणांत महाराष्ट्रीय पुढा-ऱ्यांच्या राष्ट्रवादाच्या विकासाच्या अवस्था मी ढोबळमानानें वर्णन केल्या आहेत. त्यांपैकीं पहिल्या अवस्थेंत, म्हणजे न्यायमूर्ति व लोक-मान्य यांच्या काळांत, आपल्या भारतीय मनाला राष्ट्रवादाचा जो साक्षात्कार झाला होता तो हिंदुसंस्कृतीच्या व मध्ययुगीन भारतीय इति-हासाच्या, विशेषतः शिवकालीन घडामोडींच्या, आधारानें झाला होता. त्याचबरोबर या राष्ट्रवादांत धर्मसंस्कृतिनिरपेक्ष आधुनिक प्रादेशिक राष्ट्र-वादाचेहि कांहीं धागे होते. या दोन आधारांच्या जोडीला तिसरा असाहि विचार होता कीं सर्व भरतखंड हें एकजिनसी राष्ट्र बनत आहे. सारांश, संस्कृति व इतिहास यांचा आधार, प्रादेशिक लोकजीवनाचा आधार व अखंडभारतीय राष्ट्रीयत्वाची धारणा अशा **तिरंगी राष्ट्र-वादाचें** मिश्रस्वरूप आपल्याकडील विद्वानांच्या मनांत नांदत होतें. त्याच

तिरंगी संमिश्र कल्पनाव्यूहाची छाप आजमितीलाहि महाराष्ट्रीय मनावर आहे. डॉ. गाडगीळ यांची सन १९४५ ची भूमिका व आजची भूमिका यांत तफावत आहे. पण दोन्ही भूमिका ते घेऊं शकतात याचें कारण वरील संमिश्र राष्ट्रवादाचा वारसा त्यांच्याकडे आला आहे.

डॉ. गाडगीळांची राष्ट्रविषयक भूमिका निश्चित व एकसूत्र नाहीं, उलट संमिश्र व परस्परविरोधी कल्पनांनीं ती भरलेली आहे, याचें आश्चर्य वाटायला नको. त्यांच्याप्रमाणेंच तज्ज्ञ घटनापंडित व अनुभवी लोकनायक असलेल्या श्री. अणे यांच्यासारख्या पुढाऱ्यांची ' राष्ट्र ' या विषयाबद्दलची कल्पनासृष्टि अशीच विविधरंगी आहे. सन १९१५ पर्यंत त्यांनीं असें ठामपणें सांगितलें कीं भरतखंड हें एक राष्ट्र आहे ही " भ्रामक कल्पना आहे. " " एका संस्कृतींत दहा पांच राष्ट्रांचा अंतर्भाव होऊं शकतो " व भारतांत महाराष्ट्र, बंगाल इत्यादि राष्ट्रें आहेत असें त्यांचें त्यावेळचें मत होतें. पण सन १९३० पर्यंत ते अखंडभारतीय एकराष्ट्रवादी झाले. पुन्हा, अलीकडे ' संयुक्त महाराष्ट्राच्या ' चळवळींत त्यांनीं सहकार्य केलें आहे; पण त्यांतहि महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वावर त्यांनीं भर दिलेला दिसत नाहीं.

सारांश, डॉ. गाडगीळांना काय किंवा इतरहि भारतीय राष्ट्रवाद्यांना काय राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान नेमकें कोठें स्थिर ठेवावें याचा निर्णय—अगदीं भक्कम व निःशंक निर्णय—करतां आलेला नाहीं.

## पारतंत्र्यांतलें खुरटलेलें राष्ट्रीयत्व

याचेंहि मूळ कारण असें कीं अजून महाराष्ट्रादि राष्ट्रें ही " बालराष्ट्रें " आहेत व इतिहासाचार्य राजवाड्यांच्या वेळेपेक्षां त्यांचीं वयें—इतकीं वर्षें नुसतीं गुदरलीं तरी—वाढलेलीं नाहींत. ब्रिटिश सत्तेची मगरमिठी व शोषण अव्याहत चालू असल्यावर माणसाचें सर्व जीवनच निःसत्त्व होत होतें,

मग सर्वंकष अशा राष्ट्रीय प्रगतीची आशाच नको ! या खुरटण्याचा परिणाम आमच्या ‘ राष्ट्र ’ विषयक कल्पनाहि खुरटण्यांत व विपरीत होण्यांत झाला यांत नवल काय ? राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान नेमकें न सांगड-ण्याचें कारण हें अधिष्ठानच इतकें बीजरूपांत व जवळजवळ अभावरूपांत कुचंबून राहिलें.

तें अधिष्ठान कोणचें ? तर, महाराष्ट्रादि लोकसमूहांची आधुनिक तऱ्हेची औद्योगिक प्रगति, भाषेची व विद्येची अभिवृद्धि, इतिहासाची व परंपरेची डोळस जोपासना व एकंदरींतच राष्ट्रीय जीवनाचा सर्वोदय. ह्याचा मूळ पाया म्हणजे स्वातंत्र्य तर हवेंच, शिवाय खरीखुरी लोकसत्ता हवी. राष्ट्राचा खराखुरा आधारस्तंभ जो शेतकरी तो नुसता नांगऱ्या न राहतां राष्ट्रीय व राजकीय जीवनांत डोळस नागरीक झाला पाहिजे. हें सारें न झालें तर राष्ट्रीयत्व हें एक स्वप्नच राहतें व मग विद्वानांनाहि त्याच्या अधिष्ठानाबद्दल भ्रम उत्पन्न होऊं लागतो.

डॉ. गाडगीळांच्या “ फेडरेटिंग इंडिया”मध्यें घटक–राष्ट्रांच्या राष्ट्रीय-त्वाबद्दल योग्य भूमिका आहे असें वरील प्राथमिक चर्चेत मीं म्हटलें आहे. त्या विधानाला आतां मी एक पुस्ती जोडतो ती अशी कीं त्या पुस्तकांतदेखील राष्ट्रीयत्वाचा आशय पूर्ण खुलवून व ठामपणानें त्यांनीं मांडलेला नाहीं. ‘ राष्ट्र ’ हा शब्दहि घटकांना एकसारखा नीट लावलेला नाहीं. विवेचनाचें सूत्र **राष्ट्रांच्या आधारावर रचलेलें संघराज्य कसें** असावें हें नसून, **संघराज्याचें स्थैर्य** कशा मांडणीनें साधेल, हें आहे.

याचा परिणाम असा झाला आहे कीं दोन वर्षांनंतर भीषण वास्तव-तेच्या धक्क्यानें साऱ्या जुन्या कल्पनाव्यूहांचा चक्काचूर होतांच “संघराज्याचा आधार हिंदुसंस्कृति ” असें डॉ. गाडगीळांना भासूं लागलें आहे. वास्तविकपणें संघराज्याच्या आधार कोणचा हें अगदीं उघड आहे. आपल्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, संरक्षणात्मक वगैरे अनेकविध

आधुनिक गरजांसाठीं आपापलें स्वतंत्र सामर्थ्य एकवटण्याची महाराष्ट्रादि राष्ट्रांची इच्छा एवढा एकच परंतु पुरेसा आधार हिंदी संघराज्याला आहे व या राष्ट्रांमधील लोकसत्ता व जनसमूहांचें **राष्ट्रीय जीवन व सामर्थ्य** हीच संघराज्याची एकमेव शक्ति आहे. पण राष्ट्रीयत्वाचा व लोकशाहीचा हा गाभा न दिसल्यामुळें एकात्म हिंदुसंस्कृतीचें समानबंधन या एकेरी बाबीवर सर्व इमारत रचण्याचा प्रयत्न डॉ. गाडगीळांनीं केला आहे.

आज राष्ट्रीयत्वाविषयीं किती जागरूकतेनें व तत्त्वनिष्ठपणानें विचार करणें जरूर आहे हें वरील चर्चेवरून स्पष्ट होईल. महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाच्या चळवळीला तर या विचाराचा पायाच हवा. हिंदु संस्कृतीविषयीं स्वाभाविकपणें आपल्याला सर्वांनाच वाटणारा जिव्हाळा स्पष्ट विचारांच्या आड येऊं देणें किती धोक्याचें आहे व त्यामुळें संघराज्याबद्दल व महाराष्ट्राबद्दल कसें अनर्थमूलक सिद्धान्त उद्‌भवणें शक्य आहे, हें डॉ. गाडगीळांच्या पत्रकामुळें समजण्यासारखें आहे. "संयुक्त महाराष्ट्राच्या" राष्ट्रीयत्व–प्रधान ध्येयाला सांस्कृतिक एकजिनसीपणावर तगलेल्या संघराज्याची कल्पना मूलतःच विरोधी असल्यानें या पत्रकाचा हा तात्त्विक विचार मी प्रस्तावनेंत केला आहे.

## कांहीं अपुरेपणाचें दिग्दर्शन

आतां माझ्या पुस्तकाच्या "मर्यादा" सांगून संपवितों. हें पुस्तक लिहिण्याचें ठरविलें त्यावेळीं त्यांत महाराष्ट्राच्या औद्योगिक, शेतकीविषयक व अशाच इतर धनसंपत्तीचें संकलित चित्र वाचकांपुढें ठेवावें अशी माझी कल्पना होती, परंतु जागेच्या अभावीं तें करतां आलें नाहीं. तसेंच अल्पसंख्याक जमातींबद्दल नुसतें एक परिशिष्ट लिहिलें आहे त्याऐवजीं जास्त तपशीलवार विवेचन व वर्णन हवें होतें. परंतु हें सर्व करणें अशक्य झालें. महाराष्ट्रीय राष्ट्रीयत्वासंबंधींच्या विवेचनावरच मला सर्व लक्ष पुरवावें लागलें व हें विवेचनदेखील त्रोटक झालें आहे. विकास-

क्रमाच्या सर्व अवस्थांचें आणखी बारकाईनें वर्णन करणें आवश्यक आहे हें माझें मलाच शेवटीं कळून आलें, पण एक प्रयत्न म्हणून आहे तें विवेचनच मी वाचकांपुढें मांडीत आहे.

सदर पुस्तकांत आपल्या शेजारच्या राष्ट्रांविषयीं, विशेषतः कर्नाटका-विषयीं, एक स्वतंत्र प्रकरण घालावयाचें मीं ठरविलें, निदान परिशिष्ट देण्याचा विचार होता, पण जागेच्या अभावीं तेंहि अशक्य झालें. कर्नाटकाचा संयुक्तीकरणासाठीं चाललेला दीर्घ व चिकाटीचा प्रयत्न आपण महाराष्ट्रीयांनीं लक्षांत घेण्यासारखा आहे. ७ लक्ष कानडी लोक मराठी संस्थानांतून अडकलेले आहेत. मराठी-कानडी वादाला अनेक कारणांनीं कडवटपणा आलेला आहे. परंतु, दीड कोटींचा कर्नाटक व तीन कोटींचा महाराष्ट्र हीं दोन नुसतीं शेजारीं राष्ट्रें नाहींत, तर सांस्कृतिक दृष्ट्या सहोदर राष्ट्रें आहेत. या दृष्टीनें " संयुक्त महाराष्ट्र " चळवळीचें ध्येय समजावून घेण्यासाठीं व कार्य करण्यासाठीं कर्नाटक, ( तसेंच, गुजराथ, आंध्र इत्यादि), राष्ट्रांची ओळख करून घेणें जरूर आहे. तें काम सदर पुस्तकांत होऊं शकलें नाहीं हा एक अपुरेपणा आहे, असें मी नमूद करतों.

या मर्यादांबरोबरच आणखी एकदोन गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे, कारण त्याची चर्चा मी या पुस्तकांत करूं शकलों नाहीं. आठ दक्षिणी संस्थानांचा संघ बनून ७,५०,००० लोकसंख्येचें 'संयुक्त दक्षिण संस्थान' ता. २९ सप्टेंबर १९४७ रोजीं बनलें आहे. याच्याबाहेर १९,००,००० लोकसंख्या दहा संस्थानिकांच्या वेगवेगळ्या अंमलाखालीं आहे. या नव्या घटनेचें 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या व 'संयुक्त कर्नाटका'च्या दृष्टीनें परीक्षण करणें जरूर आहे. दुसरी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र-कर्नाटक व महाराष्ट्र-कोसल यांच्या सीमांच्या वादांची. सोलापूर, बेळगांव व कारवार या जिल्ह्यांतील मराठी जनतेचा एक स्वतंत्र विभाग न पाडतां हे सलग जिल्हेच कर्नाटकांत सामील केले जातील, असें भय त्या ठिकाणच्या

मराठी जनतेला वाटत आहे व कोसलमध्यें ४,५०,००० मराठी प्रजा हिंदी वर्चस्वाखालीं आधींच गेल्याची तक्रार महाविदर्भीय पुढाऱ्यांकडून होत आहे. मराठी-गुजराथी सीमेबद्दलहि असा वाद निघणें शक्य आहेच. सीमांच्या या तपशीलांत जाणें मला शक्य झालेलें नाहीं एवढेंच येथें मला नमूद केलें पाहिजे.

माझ्याकडून वगळला गेलेला आणखी एक मुद्दा म्हणजे ' संयुक्त महाराष्ट्रां'च्या निर्मितीसंबंधानें मुंबईचें प्रांतिक विधिमंडळ व घटनासमिति यांत झालेल्या व होणाऱ्या प्रयत्नांबद्दलचा. मुंबई प्रांताची भाषावर विभागणी करण्याचा ठराव गतवर्षींच येथील विधिमंडळांत झाला आहे. घटनासमितीनें भारतीय प्रांत—घटकांचीं नांवें आगामी बैठकींतच निश्चित करावींत व भाषावार प्रांतरचनेसाठीं एक सीमा—कमिशन नेमण्याची तरतूद करून घ्यावी, असा ठराव मद्रासच्या विधिमंडळांत ता. २० ऑक्टोबर १९४७ रोजीं पास झाला आहे, तो आपल्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. यासंबंधीं घटना—समितींत आजवर झालेल्या घडामोडी व यापुढें घडणाऱ्या बाबी महत्त्वाच्या आहेत. ता. २० डिसेम्बर १९४७ रोजीं सुरूं होणाऱ्या घटनासमितीच्या बैठकींत यासंबंधीं काय निर्णय घेतले जातात इकडे आपलें सर्वांचें लक्ष म्हणूनच वेधलेलें राहील.

## आभार—प्रदर्शन

माझ्या या परिश्रमाला कित्येक ज्ञानवृद्धांनीं दिलेल्या सहाय्याची जोड मिळाल्यानें पुस्तक तयार होऊं शकलें, व अनेक ढोबळ दोष मला टाळतां आले. पुस्तकाच्या लिखाणाच्या बाबतींत मला ज्यांचें असें सहाय्य झालें त्यांचे आतां आभार मानतों. महाविदर्भाच्या प्रश्नाबाबतींत व " संयुक्त महाराष्ट्र सभेच्या " बाबतींत सं. म. परिषदेचे कार्यवाह श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांनीं मला माहिती पुरवून व चर्चा करून बहुमोल मदत केली, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहें. " मराठ्यांचा इतिहास

व राष्ट्रीयत्व " ह्या प्रकरणांतील मजकूर एकदीड वर्षांपूर्वी लिहून झाला व त्यांत वतनसंस्थेबद्दलच्या विवेचनांत मला श्री. शंकरराव जोशी यांच्या लेखांनीं मार्गदर्शन झालें. या प्रकरणासंबंधीं प्रा. ओतूरकर यांच्याशीं चर्चा करून मी त्यांचेंहि सहाय्य घेतलें. माझीं मतें व निष्कर्ष त्यांना मान्य नसले तरी आम्ही केलेल्या विचारविनिमयांतून बऱ्याच गोष्टी मला कळल्या. या सहकार्याबद्दल मी या दोघांचे आभार मानतों.

या प्रकरणांतील विषयांत मी नवशिका असल्यामुळें, प्रा. न. र. फाटक यांच्याकडे मी तें तपासण्यास दिलें. त्यांनीं मला बहुमोल सूचना तर केल्याच पण शिवाय एकंदर पुस्तकाला प्रस्तावना लिहून देण्याची विनंति मान्य केली. त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील.

महानुभावी वाङ्मयांत महाराष्ट्राच्या विस्तारासंबंधीं जो उल्लेख आहे, त्यावरून एक नकाशा तयार करण्याचें व त्याला संदर्भासहित स्पष्टीकरण करणारें टिपण लिहून देण्याचें सहाय्य मला प्रा. दत्तो वामन पोतदार यांनीं दिलें, त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

माझ्या या प्रयत्नाला आणखी एका ज्ञानवृद्धाचा आशीर्वाद मिळण्याचें सद्भाग्य मला लाभलें आहे. तो आशीर्वाद म्हणजे श्री. शंकररावजी देव यांनीं प्रारंभीं लिहिलेला " पुरस्कार ". " संयुक्त महाराष्ट्रा " च्या चळवळीला कुशल व सर्वसंग्राहक रीतीनें प्रभावी करण्याचें काम त्यांनीं आज आपल्याकडे घेतलें आहे. त्यांनीं माझ्या कृतीला आशीर्वाद देऊन मला उपकृत केलें आहे.

शेवटीं, माझ्या पुस्तकाचें प्रकाशन करणारे श्री. दा. पां. रानडे यांचा मी अत्यंत ऋणी आहें. प्रकाशनाच्या या कार्यांतच त्यांची माझी नवी ओळख झाली, परंतु जुन्या मित्रत्वाच्या आपुलकीनें प्रकाशनाचें कार्य या बिकट टंचाईच्या दिवसांत त्यांनीं करून दिलें, याबद्दल त्यांचें ऋण मानलेंच पाहिजे.

☆

# पु र स्का र

मी तुमचें ' संयुक्त महाराष्ट्र ' हें पुस्तक पुष्कळसें वाचलें. मला तें आवडलें. असे जिव्हाळ्याचे विषय बहुतेक भावना-प्रधान भूमिकेवरून चर्चिले जातात. पण बुद्धिवादी भूमिके-वरून तुम्हीं हा विषय चर्चिला आहे हें या पुस्तकाचें वैशिष्ट्य आहे. नवभारताची प्रादेशिक रचना जी होणें इष्ट व अपरिहार्य आहे ती केवळ संस्कृति, भाषा वगै-रेंच्या पायावर न करतां 'राष्ट्र' या कल्पनेवर व्हावी हें जें आपण मुद्देसूद व साधार प्रतिपादिलें आहे तें आपलें प्रतिपादन मला मनोहर व उद्बोधक वाटलें. भारत हा एक ' बहुराष्ट्र ' देश आहे व भारताचें राज्य हें अनेक राष्ट्रांचें एक संघराज्य आहे, अगर होणें जरूर आहे हा आपला मुद्दा 'संयुक्त महाराष्ट्रा'चा पाया मजबूत करण्याला पोषक आहे. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति शास्त्रशुद्ध पाया-वर होण्यास आपलें विवेचन खात्रीनें साहाय्यक होईल. महाराष्ट्रांतील बुद्धिवान् वाचकवर्ग आपल्या पुस्तकाचें स्वागत करील अशी मला आशा आहे.

पुणें, }
२८-१०-४७ } शंकरराव देव

# प्रस्तावना

प्रा. न. र. फाटक.

'संयुक्त महाराष्ट्र' म्हणजे दोन किंवा अधिक विभाग जोडून एक बनविलेला महाराष्ट्र. संयुक्त हा शब्द मूळच्या विभागांचा अर्थ मनांत उतरविणारा आहे. महाराष्ट्र या नांवानें आतां ओळखला जाणारा प्रदेश एकदां विभागलेला असून आतां त्याला एकरूपता आणावी ही कल्पना 'संयुक्त महाराष्ट्र' या शब्दांनीं सुचविली जाते. ही कल्पना नवीन आहे. गेल्या तीस पसतीस वर्षांपासून तिचा खल होऊं लागला व अलीकडे तिला सफल करावें म्हणून तिच्या मागें संघटना निर्माण झाली आहे. कांग्रेसनें भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व आपल्या आजतागायतच्या कारभारांत अंमलांत ठेवलें असलें, तरी संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचा अंतर्भाव त्या अंमलांत झालेला नव्हता. महाराष्ट्र प्रांत निराळा, वऱ्हाड प्रांत निराळा, असा या दोन प्रदेशांचा विलगपणा कॉंग्रेसच्या कारभारांतहि होता. इंग्रजी राज्यकारभारांतील हा विभक्तपणा कॉंग्रेसला टाळतां आला नाहीं. तथापि दोन्ही ठिकाणच्या जनतेनें आपल्या एकजिनसीपणाकडे लक्ष देऊन जर हा विभक्तपणा घालवून टाकायचें मनांत आणलें तर त्यांना कुणाची आडकाठी होणार ? याप्रमाणें अलीकडे 'संयुक्त महाराष्ट्र' किंवा 'महाराष्ट्राचें एकीकरण' ही कल्पना मनावर घेऊन कित्येकांनीं तिची चर्चा सुरू केली. ही चर्चा निरंतर होत रहावी या उद्देशानें एक कायमचें चर्चामंडळ अस्तित्वांत येणें स्वाभाविक होतें. या मंडळाच्या बऱ्याच बैठकी

झाल्या, त्या बैठकींचे अहवाल प्रसिद्ध होऊं लागले, ठराव लोकांपुढें येऊं लागले तेव्हां साहजिकच 'संयुक्त महाराष्ट्र' हें प्रकरण आहे तरी काय इकडे पुष्कळांचें लक्ष वेधून या विषयाचें शास्त्रीयदृष्ट्या सांगोपांग विवेचन करण्याची प्रवृत्ति एखाद्या खऱ्याखुऱ्या आस्थेवाईक जिज्ञासूच्या ठिकाणीं उद्भवणें क्रमप्राप्तच म्हणावें लागतें. परंतु ही प्रवृत्ति यशस्वी करून दाखविणें फार गुंतागुंतीचें व क्लेशाचें काम आहे. श्री. बेडेकर यांनीं लिहिलेल्या प्रस्तुत पुस्तकावरून अगदीं ओझरती नजर टाकली तरी त्यांनीं स्वीकारलेलें कार्य किती जिकीरीचें आहे याची अटकळ होऊं शकेल. श्री. बेडेकर यांनीं हें काम योग्य प्रकारें पार पाडलें आहे, याबद्दल पुस्तकाचें वाचन केल्यावर कुणालाहि शंका रहाणार नाहीं. प्रत्येकजण त्यांच्या सूक्ष्म परंतु असंदिग्ध विवेचनशैलीचें अभिनंदनच करील. चित्रशाळेच्या व्यवस्थापकांनाहि पुस्तक प्रसिद्ध केलें म्हणून धन्यवाद देणें अवश्य आहे. त्यांनीं अलीकडे महत्त्वाच्या प्रचलित विषयांचीं पुस्तकें छापण्याचा अतिशय महत्त्वाचा असा स्तुत्य उपक्रम केला असून हें पुस्तक त्या उपक्रमाचेंच एक सुंदर फळ आहे.

'संयुक्त महाराष्ट्र' या शब्दप्रयोगानें दोन विभागांतील एकराष्ट्रीयत्वाची जाणीव चटकन् ऐकणाराच्या मनाला स्पर्श करून जाते म्हणून त्या 'जाणिवे'चा खल श्री. बेडेकर यांनीं अनेक अंगांनीं केलेला आहे. समाज, भाषा, संस्कृति, धर्म, राज्य, इत्यादि अंगें विचारांत घेऊन महाराष्ट्राच्या 'राष्ट्रीयत्वा'मध्यें ती कोठें किती प्रमाणांत सांपडतात याचा श्री. बेडेकरांनीं केलेला ऊहापोह अत्यंत बोधप्रद आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत महाराष्ट्रामध्यें मराठेशाहीच्या इतिहासाचा अभ्यास अतिशय ईर्ष्येनें सुरू झाला; तो करीत असतां महाराष्ट्रधर्म, महाराष्ट्रराज्य वगैरे शब्द दृष्टीसमोर येतांच ह्यामध्यें कांहीं तरी गूढार्थ असला पाहिजे, असा ग्रह कै. वा. रानड्यांसारख्या विवेकवंताचा होऊन त्या ग्रहानें पुढें इतरांस झपाटलें. महाराष्ट्रधर्म हा शब्द महिकावतीच्या बखरींत आढळतो व तोच

सर्वांत जुना उल्लेख असावा; ही बखर उजेडांत येण्यापूर्वी 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द एकट्या रामदासांनींच उपयोगांत आणला, असें बोललें जात होतें; (रामदासांनीं ह्याचा उपयोग आपल्या ग्रंथराजांत केलेला नाहीं हें लक्षांत ठेवणें बरें.) पण त्याचा सरस्वतीगंगाधराच्या गुरुचरित्रांत शोध लागतांच रामदासांचा त्यावरील हक्क उडाला होता. आतां गुरुचरित्राच्या संशोधनानें त्या शब्दाची त्या ग्रंथांतून हकालपट्टी करून रामदासांचा हक्क एक प्रकारें कायम केला असला तरी महिकावतीची बखर आधींची म्हणून त्या हक्कावरील ग्रहण सर्वथैव सुटलेलें नाहीं. मात्र येथें हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, ती बखर जितकी जुनी ठरविण्यांत आली आहे तितकी जुनी ती नाहीं, असें त्या बखरींतील कांहीं मजकुरावरून सिद्ध होणारें आहे. त्या बखरीचें व्हावें तसें परीक्षण झालेलें नाहीं. फक्त कै. राजवाडे यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेचा संदर्भ केव्हां केव्हां ऐतिहासिक चर्वेंत निघतो. (राजवाड्यांच्या प्रस्तावनांत मूळ ग्रंथाला सोडून इतर विषयाचा मजकूर पुष्कळ असतो हें निराळें सांगायला नको.) रामदासांच्या आधीं तो शब्द कित्येकांच्या माहितींत होता; पण त्याचें रहस्य काय याचा उलगडा रानडे व राजवाडे यांनीं वेगवेगळ्या रीतीनें केलेला आहे. रानड्यांनीं एकदां 'देशभक्तीचा धर्म' असा अर्थ केला तर दुसऱ्यांदा त्यांनीं उदारविचाराच्या भक्तिमार्गाला तो जोडला आहे. राजवाडे तर आपल्या आयुष्याच्या अखेरीअखेरीपर्यंत त्या शब्दाची परिस्फुटता अनेक प्रकारें करीत असल्याचें आढळतें. तथापि त्यांच्या एकंदर लिखाणाचा श्री. बेडेकरांनीं काढलेला निष्कर्ष यथार्थ म्हणावा लागतो. महाराष्ट्रधर्म म्हणजे महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाचा अर्थात् हिंदूंचा किंवा मराठ्यांचा धर्म असा त्याच शब्दाचा सरळ व सोपा अर्थ आहे. महाराष्ट्रांतील जनतेला मराठे, कर्नाटकांतील जनतेला कानडे या नांवांनीं ओळखण्याच्या प्रघातावरून मराठ्यांचा अर्थात् मराठ्यांच्या देशांतला जो धर्म तो महाराष्ट्रधर्म असा शब्द रूढ झाला. पण शिवाजीच्या राजकारणाशीं

रामदासांना जोडण्याच्या उत्साहानें त्या शब्दांतून निराळा अर्थ काढण्याचा प्रयत्न मध्यंतरीं कांहीं वर्षें होऊं लागला, व त्यायोगानें महाराष्ट्रधर्माच्या साध्या अर्थाला फांटे फुटत गेले. श्री. बेडेकर यांनीं त्यांची खोल छाननी करून महाराष्ट्रधर्माची जी निष्पत्ति मांडली आहे ती जाणत्यांना मान्य होण्याला हरकत नाहीं.

शिवाजीनंतर 'महाराष्ट्रराज्य' या शब्दाचा वापर होऊं लागला. राज्य हें एकराष्ट्रत्वाचें प्रबळ लक्षण आहे. तेव्हां 'महाराष्ट्रराज्य' या शब्दामुळें आजच्या संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचें पोषण घडतें कीं काय हें पाहणें अवश्य ठरतें. शिवाजी हा मराठा (हिंदू), त्याचे पहिले व पुढचे बहुतेक सर्व साह्यकर्ते मराठे, त्यावरून त्याचें राज्य म्हणजे मराठ्यांचें राज्य, अशा धोरणानें महाराष्ट्रराज्य हा शब्दसमूह कांहीं काळ रूढ झाला. मराठ्यांचें राज्य मराठा समाजानें स्थापन केलेलें, लोकशाहीच्या तंत्राचें राज्य असा महाराष्ट्रराज्य या शब्दाचा अर्थ तेव्हां केला अगर समजला जात नव्हता. शिवाजी हा हिंदु, त्यानें राज्य निर्माण केलें, यामुळें त्याच्या ताब्यांतील मुलखांत हिंदूंना स्वाभिमानानें जीवन कंठण्याची संधि मिळावी यांत नवल नाहीं. पूर्वी जेथें मुसलमानांपुढें नमून दबून वागावें लागत असेल तेथें शिवाजीच्या पराक्रमानंतर त्यानें जिंकलेल्या मुलखांत तसें वागण्याची जरूरी उरली नाहीं; अशा अनुभवामुळें मराठ्यांना 'हें आमचें राज्य' असें वाटणें हें अगदीं उचित असलें तरी सामान्य मराठे लोक 'हें आमचें राज्य' असा निर्देश करीत नव्हते. 'महाराष्ट्रराज्य' हे शब्द बहुधा शिवाजीच्या वारसांनीं किंवा त्यांच्या आश्रयाची अपेक्षा धरणारांनीं जास्त प्रमाणांत वापरले आहेत. राजारामानंतर ह्याचा प्रयोग मागें पडला. पेशवाईत 'स्वराज्य' हा शब्द उपयोगांत येऊं लागला. परंतु त्याचा अर्थ 'लोकशाही' असा नव्हता. जें राज्य इतरांचें म्हणजे मुसलमान, फिरंगी वगैरेंचें नाहीं तें स्वराज्य असें त्याच्या उपयोगामागचें धोरण स्पष्ट आढळणारें आहे.

शिवाजीनें मिळविलेलें राज्य उत्तरेस खानदेशापलीकडे गेलेलें नव्हतें. खालीं दक्षिणेस कर्नाटकापर्यंत व कर्नाटकांतहि त्याचा विस्तार झालेला होता. पश्चिमेस कोंकणचा फार मोठा पट्टा शिवाजीच्या ताब्यांत होता. सह्याद्रीच्या पश्चिमेस कोंकण व पूर्वेस मावळ असा प्रकार असल्यामुळें मावळ पादाक्रांत करीत असतां शिवाजीच्या सपाट्यांतून कोंकण सुटणें शक्य नव्हतें; आपली मावळांतील सत्ता बिनधोक होण्यासाठीं कोंकणपट्टी मारून सर्वथैव आपल्या आहारीं ठेवणें त्याला अवश्यच होतें. सह्याद्रीच्या या दोन्ही बाजू एकदां कोळी राजांच्या ताब्यांत होत्या. याची साक्ष पटविणारीं भीमाशंकर, महाबळेश्वर यांसारखीं कांहीं प्राचीन शिवस्थानें अद्यापि आहेत. जावळीच्या मोऱ्यांचा इतिहास कोळी राज्याच्या मूळ वस्तुस्थितीला दुजोरा देणारा आहे. मुसलमानांना समुद्राची बाजू जशी निर्धास्त करतां आली तशी मावळची बाजू निर्धास्त करतां आली नाहीं. मावळच्या पुष्कळशा खोऱ्यांतून जवळजवळ अराजकच होतें. या खोऱ्यांतून देशमुख देशपांडे मन चाहील तें करीत होते. मुसलमानी शाहीचा वचक नांवाचा होता. हें अराजक नाहींसें करून त्याच्या जागीं आपली सत्ता स्थापण्याचें काम शिवाजीनें प्रथम केलें. शिवाजीचें मावळांतलें प्राबल्य डोळ्यांवर येऊन तिकडे लक्ष देण्याचें मोगल पातशाहीलाहि जमलें नाहीं; कारण तिच्यासाठीं औरंगजेबाचें आपल्या भावांशीं रण माजून त्यांत कांहीं काळ गेला. शिवाजीनें आपल्या मार्गांतला मोऱ्यांचा जबरदस्त कांटा उपटून टाकून त्याचा वचपा काढण्यासाठीं आलेल्या अफजुलखानाचा निःपात केल्यावर शिवाजीच्या उद्योगाचें खरें स्वरूप सर्वांना उघड झालें. परंतु यावेळपर्यंत शिवाजीचें सामर्थ्य पुष्कळच वाढलें होतें. या माहितीचें तात्पर्य हें कीं, शिवाजीनें जिंकलेला मुलूख खऱ्या अर्थानें ‘ महाराष्ट्र ’ नव्हता. तेथें मराठी भाषा, मराठ्यांचे रीतरिवाज अशा महाराष्ट्राच्या खाणाखुणा सांपडल्या तरी त्यांतील जनतेकडे देशावरील मराठे ‘ ही जनता आपल्या इतकी अस्सल नाहीं ’ अशा भावनेनें

पहात होते. खुद्द शिवाजीला देखील या भावनेचा तडाखा कांहीं काळ सोसावा लागला. अजून देखील ‘ कुणबी ’ व ‘ मराठा ’ हे दोन शब्द या भावनेचा पगडा प्रत्ययास आणून देतात. मुळांत मावळ व कोंकण प्रदेश निराळे असले तरी शिवाजीच्या राज्यामुळें त्यांना ‘ महाराष्ट्र ’ ही संज्ञा लावली गेली. कोंकणाचा निर्देश जुन्या संस्कृत ग्रंथांतून निराळे-पणानेंच केला गेलेला आहे. कारण वऱ्हाड-मराठवाडा या महाराष्ट्रापासून हे प्रदेश बऱ्याच अंतरावर आहेत. मावळाचा तसा निर्देश नसला तरी त्याचा महाराष्ट्रांत अंतर्भाव केला जात होता, असें मानायला पुरावा नाहीं.

मावळ-कोंकणाचें ‘ महाराष्ट्र ’ हें शिवाजीच्या राज्यामुळें उत्पन्न होऊन पेशवाईंत त्याला कायमची प्रतिष्ठा लाभली. पैठण देवगिरी या राज-धान्यांचें महाराष्ट्र मुसलमानी अंमलाखालीं सदैव रहाण्याचा योग आला. ह्यांपैकीं जो भाग मुसलमानांच्या तावडींतून सुटला त्याला ‘वऱ्हाड’ म्हणूं लागलें व जो त्यांच्या जोखडाखालीं राहिला त्याचें ‘मराठवाडा’ असें नांव पडलें. आजच्या मराठवाड्याचे कांहीं अंश कधीं मराठ्यांकडे तर कधीं मुसलमानाकडे येऊन जाऊन होते. आजच्या वऱ्हाडालाहि अशी ओढाताण मधून मधून सोसावी लागली. शेवटीं वऱ्हाड निजामाच्या हातून इंग्रजांनीं आपल्याकडे घेतलें व निराळेंच ठेवलें. पेशवाईंत या प्रदेशाचा विचार जणूं काय आपल्याच राज्यदेहाचें एक अविभाज्य अंग अशा दृष्टीनें कोणी करीत असल्याचें भरभक्कम प्रमाण नाहीं. नागपूरचे भोसले त्याचा कारभार निराळेपणानें करीत होते. त्या भोसल्यांना आपण पेशव्याइतकेच स्वतंत्र आहों, असें वाटत असे. पेशव्यांविरुद्ध निजामास जाऊन मिळणें किंवा पुढें इंग्रजाशीं तशाच धोरणानें संगनमत राखणें याची त्यांना क्षिति वाटत नव्हती. प्रजेच्या ठिकाणीं आपण कोण व कोणाचे यासंबंधाच्या विचाराची जागृति नसल्यानें आपण ‘ मराठे ’ या नात्यानें एकजूट राखली पाहिजे व परक्यांच्या राज्याचा तिटकारा

केला पाहिजे अशीं तत्त्वें त्यांच्या मनाला कधीं शिवलींच नाहींत. निजामाच्या बाजूनें पेशवाईशीं लढणारें ब्राह्मण व मराठे सरदार पाहिले म्हणजे तत्कालीन मराठ्यांच्या मनोरचनेचा स्वच्छ उलगडा होतो. पेशव्यांच्या बाजूनें निजामाशीं लढणारांत मोठाले मुसलमान सरदार सांपडत नाहींत, हें त्यांतल्यात्यांत लक्षांत ठेवण्याजोगें आहे. याप्रमाणें मीमांसा करीत गेल्यास सर्व मराठ्यांमध्यें एकराष्ट्रीयत्वाचा भाव उत्पन्न झाला होता, असें मानतां येत नाहीं.

महाराष्ट्र या नांवांत ' राष्ट्र ' आहे, परंतु यापलीकडे त्याला जास्त अर्थ पूर्वी नव्हता. राष्ट्र हा शब्द वेदाइतका जुना आहे, पण आजच्या अर्थानें तो रूढ होता कीं काय याबद्दल शंका घेतां येईल. कोशांतून त्याचे व्यापक व संकुचित असे दोन्ही अर्थ दृष्टीस पडतात. त्याचे धर्मशास्त्रांतील प्रयोगहि अशा दोन्ही अर्थांना पुष्टि देणारे आहेत. तथापि हल्लीं ' राष्ट्र ' हा शब्द विशेष निश्चित अर्थानें रूढावला आहे व या हल्लींच्या अर्थानें संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित झाला आहे. स्व-राज्याखालीं बहुत वर्षे राहिलेल्या प्रदेशाचे तुकडे .जबरदस्तीनें केल्यास त्या तुकड्यांच्या ठिकाणीं पुनः आपलें एकत्व प्राप्त करून घेण्याची आकांक्षा किती प्रबळ असते याचें युरोपच्या इतिहासांतलें प्रसिद्ध उदाहरण पोलंडचें आहे. दुसऱ्याच्या पोटांत शतकानुशतकें राहून व अंकित म्हणून असह्य होण्याइतक्या यातना भोगाव्या लागत नसतांहि आपण स्वतंत्र व्हावें अशी आकांक्षा सफल करून घेणारा देश ग्रीस हा आहे. तुर्की साम्राज्यांतून त्यानें आपली सुटका करून घेतली. ह्याचा कित्ता इटलीनें गिरविला. इटलीचेहि पोलंडप्रमाणेंच तुकडे झालेले होते. त्या तुकड्यांचें एकीकरण गेल्या शतकांत झालें. गेल्या शतकांत प्रशियन राज्यकर्त्यांनीं ' जर्मनी ' हें राष्ट्र उदयास आणलें. युरोपांतलीं छोटीं छोटीं जर्मन राज्यें बलात्कारानें नामशेष करून सगळ्या युरोपखंडाला—पर्यायानें जगाला—आपल्या पराक्रमाचा दरारा वाटावयास लावणारा ' जर्मनी ' राष्ट्राराष्ट्रांच्या घडामोडींत

पुढें सरसावला. हीं उदाहरणें महाराष्ट्राच्या कल्पनास्थित संयुक्तपणाला स्पष्ट करण्यासाठीं घेतलीं आहेत व त्यांचें तात्पर्य संदिग्ध नाहीं. पोलंड, इटली यांचें अखंडत्व भंगलें होतें. त्यांना नव्यानें महाराष्ट्राप्रमाणें संयुक्तपणा साधावयाचा नव्हता. ग्रीस हा देश अखंडित होता, महाराष्ट्र हा भंगलेला आहे व तो कोणाच्या जबरदस्तीनें भंगलेला नसून इतिहासाच्या ओघांत त्याला अशी दशा प्राप्त झालेली आहे. जर्मनीचें एकीकरण बिस्मार्कच्या दडपशाहीनें घडून आलें. पोलंड, इटली, जर्मनी यांचे दाखले संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेला जुळणारे नाहींत. जर्मनीचें उदाहरण संयुक्त महाराष्ट्राच्या विषयांत लक्ष वेधून घेणारें असलें तरी त्याचाहि सध्यां उपयोग नाहीं.

एखादा देश मुळांत एक असतांहि त्याचे तुकडे पुनः एक होण्याला उत्सुक नसतात याचेहि नमुने इतिहासांत आहेत. आयर्लंडचें उत्तर दक्षिण विभाग आपखुषीनें एक होतील असा संभव चालू जमान्याच्या उलाढालींत नाहीं. नेदरलँड या नांवाच्या एका प्रदेशानें एकदां स्पेनच्या राजकीय वर्चस्वाची पाळेंमुळें धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ मोठ्या शर्तीनें खणून काढलीं. पण नंतर लवकरच बेल्जम, हॉलंड, याप्रमाणें त्याचीं शकलें पडलीं व तीं आजतागायत वेगळींच आहेत. वऱ्हाड, मराठवाडा, मुंबई इलाख्याचा महाराष्ट्र आणि गोमंतक असा प्रकार शेंकडों वर्षे चालू आहे. त्यांच्या अखंडत्वाला कोणी फोडलें असा इतिहास नाहीं. शिवाजीनें मात्र कोंकण घाटावरच्या महाराष्ट्राला जोडलें व आजवर तें महाराष्ट्रांतच जमा होतें. कित्येकांना आतां सह्याद्रीच्या पश्चिमेचा समुद्राशीं संबंध असलेला सारा पट्टा वेगळा करून त्याला स्वतंत्र प्रांताचा मान द्यावा, अशा कल्पनेचे डोहाळे होऊं लागले आहेत. एकीकडे संयुक्ताचा डाव खेळला जात असता दुसरीकडे विभक्तपणाची नवी भाषा बोलली जावी, हा योग अतिशय सूचक आहे. लोकमत म्हणजे काय मौज आहे, याचा बोध कोंकण तोडण्याच्या कल्पनेनें होईल. संयुक्त

महाराष्ट्राच्या चालू आकांक्षेत मराठवाडा व गोमंतक यांना थारा देण्यांत आलेला नाहीं. फक्त इंग्रजी अंमलांतील मराठी भाषा बोलणारांच्या एकीकरणाची समस्या कित्येकांनीं स्वीकारली आहे व तिलाहि कोंकण निराळें करण्याच्या भावनेचा अपशकुन होऊं लागला आहे !

कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व आपल्या कारभारासाठीं अंमलांत ठेवल्यापासून अशी प्रांतरचना व्हावी ही कल्पना लोकांमध्यें जोरावत गेली. त्यापूर्वी महाराष्ट्राचे चार विभाग असल्याची दुबळी हळहळ मधून मधून व्यक्त होत असे. आतां हिंदुस्थान देशाची नवी राज्यघटना अस्तित्वांत यावयाची आहे, तेव्हां ती हळहळ घालवून टाकण्याचा उपाय मुंबई व मध्यप्रांत या इलाख्यांतील मराठी बोलणारांनीं स्वीकारला. वस्तुतः हा विषय राजकारणाचा असतांही त्याची उठावणी महाराष्ट्र साहित्य-संमेलनांत झाली व संमेलनाच्या मंडळीनें राजकारणांतील कांहीं लहान-मोठ्या धुरीणांना या विषयाच्या खलबतांत ओढलें. सर्वांची मिळून एक बैठक झाली व खरोखरीच संयुक्त व्हावयाचे असा प्रसंग डोळ्यांपुढें येतांच वऱ्हाडच्या मराठ्यांना कित्येक शंका बाधूं लागल्या. शेवटीं दोन्ही प्रदेश वेगळे रहावे, ह्यांचा कारभारहि स्वतंत्र असावा आणि ते एक आहेत असें दिसण्यासाठीं कांहीं निर्जीव खुणा दोघांसाठीं सामान्य ठेवाव्या अशा थाटाची तडजोड करण्याची पाळी आली. ज्या कल्पनेसाठीं मोठी उठाठेव केली त्या कल्पनेची अब्रू संभाळण्याचा हा एक तोडगा आहे. 'आपण सारे एक' ही कल्पना दिसायला रम्य व उच्चारायला सोपी असल्यानें जोंवर तिच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची वेळ नजीक आलेली नव्हती, (आजहि ती विशेष नजीक नाहीं, परंतु जेव्हां या कल्पनेचा उदो उदो होऊं लागला तेव्हां ती नजीक असल्याचा भास उत्पन्न झाला होता ), तोंवर तिच्या स्वीकारानें आपल्या स्थितींत कोणतें परिवर्तन होईल याचा विचार करावा लागत नव्हता. तो विचार करावा

लागतांच आपला निराळेपणा 'संयुक्त' होण्याच्या प्रयोगांत मावळूं नये, असें एका पक्षाच्या मनांत आलें व त्या पक्षाच्या जोरामुळें दुसऱ्या पक्षाला वरच्याप्रमाणें तडजोड काढावी लागली. याचीं कारणें उघड आहेत. मुंबई इलाख्यांतल्या महाराष्ट्रानें इतर प्रदेशांतील महाराष्ट्रीयांना 'आपण सर्व एक' व 'आपल्या एकजुटीला देशाच्या भवितव्यांत कांहीं विशेष कार्य आहे' असें ध्येय कधींच पुरविलें नाहीं. भाषा एक, रहाणीचें स्वरूप एक, धर्म एक अशा एकत्वानें सगळीकडचे मराठे एकमेकांना 'आपण मराठे' या भावनेनें ओळखीत होते. यापेक्षां त्या एकत्वाला जास्त अर्थ इतिहासकाळीं नव्हता. भाषा, रहाणी व धर्म या साधनांचा ध्येयवादी एकजूट घडवून आणण्याकडे उपयोग झाला नाहीं. म्हणून जो तो आपापल्या जागीं स्वार्थाची निगा करण्यांत गुंतल्याचें दिसतें. शिवाजीच्या महाराष्ट्राला सारा हिंदुस्थान जिंकण्याचा अभिलाष असला तरी त्या अभिलाषाचा स्पर्श नागपूरच्या भोसल्यांना झालेला नव्हता. निजामी अंमलांतल्या मराठ्यांची तर फारशी विचारपूसहि केली जात नव्हती. पोर्तुगीजांच्या ताब्यांतील मराठ्यांची अवस्था यापेक्षां निराळी नव्हती. पूर्वींपासून विभागलेल्या महाराष्ट्राच्या इतिहासांत आपण एक आहों या जाणिवेचा पत्ता लागत नाहीं; मग आतां ' एक आहों ' 'एक झाले पाहिजे ' या कल्पनेचें मूळ सर्वत्र झपाट्यानें वाढण्याची आशा धरण्यांत हंशील काय ?

श्री. बेडेकर यांनीं हीच गोष्ट इतिहासकालीन सामाजिक स्थितीची सूक्ष्म मीमांसा करून निराळ्या रीतीनें सिद्ध केलेली आहे. आजच्या काळांत एका आत्म्याच्या दोन शरीरविभागांना केवळ एक भाषा, एकाच धर्तीची रहाणी किंवा एक धर्म एवढें कारण पुरेसें होणारें नाहीं. प्रशियानें जर्मनी हें नवें मोठें राष्ट्र उदयास आणतांना त्याच्या कर्तव्याचें एक नवें तत्त्वज्ञान निर्माण केलें. त्याच तत्त्वज्ञानाची पराकाष्ठा हिटलर-

शाहीनें जगाच्या प्रत्ययास आणून दिली. जगाच्या शर्यतींत सर्वांना मागें टाकील एवढेंच नव्हे तर आपल्या सामर्थ्यापुढें सर्वांना लोटांगण घालावयास लावील असा आपला उत्कर्ष साधावयाचा असल्यास आपली संख्या वाढली पाहिजे या हेतूस अनुसरून हिटलरशाहीनें आस्ट्रिया हें पुरातन प्रतिष्ठेचें जर्मन राष्ट्र बिस्मार्कच्या नव्या जर्मनींत पचवून टाकण्याचा बलात्कारप्रधान धाडसी यत्न केला. आस्ट्रिया हें जुनें जर्मन राष्ट्र अनेक प्रकारच्या अंतर्बाह्य संकटापायीं खची होत असतांहि त्याला आपलें वेगळें अस्तित्व कायम राहण्याचा हट्ट सोडवेना; जर्मनी व आस्ट्रिया एक व्हावा अशा सूचना पहिल्या महायुद्धाच्या शेवटीं तहनाम्याच्या वाटाघाटींत निघत असतां आस्ट्रिया स्वतंत्र वेगळा रहावा, असें आस्ट्रियन जनतेला वाटत होतें व त्या वाटण्याला इतर युरोपियन राष्ट्रांनीं आपल्या फायद्यासाठीं उत्तेजन दिलें होतें. अनेक शतकें स्वातंत्र्याचा बरावाईट उपभोग घेतलेल्या राष्ट्राला दुसऱ्या स्वकीयाच्या लगामीं जाण्याचें संकट वाटावें हें सरळ आहे. संयुक्त होण्याची भाषा बोलणाऱ्या महाराष्ट्राचे तुकडे आजवर विभक्तपणें आपला संसार करीत असल्यामुळें एकीकरणानें आपण नामशेष होऊन तर जाणार नाहींच या संशयाच्या भोंवऱ्यांत सांपडावें यांत आश्चर्य नाहीं व त्याच्या परिणामीं टिकाऊ एकीकरणाचा पूर्वोक्त ठराव जन्मास आलेला आहे. परीक्षा केल्यास 'आपण सगळे एक' ही एक चांगली भावना आपण स्वीकारीत आहों, चांगल्या भावनेचें पोषण हें एक सौजन्याचें लक्षण आहे, यापेक्षां या एकीकरणाच्या भावनेंत जास्त कांहींच आढळणार नाहीं. एकीकरण हें साध्य नसून साधन आहे. त्या साधनाच्या जोरावर आपल्याला हिंदुस्थानांत कांहीं प्रत्यक्ष उत्कर्षाचें कार्य सिद्धीस न्यावयाचें आहे, अशा महत्त्वाकांक्षेची बलिष्ठ प्रेरणा एकीकरणाच्या मागें असल्याशिवाय तिला सौजन्याच्या निष्क्रिय लक्षणांहून जास्त किंमत कधींच दिली जाणार नाहीं. महाराष्ट्राची संस्कृति निराळी आहे, महाराष्ट्राची रहाणी निराळी आहे, ऐतिहासिक परंपरा निराळी

आहे. शिवाजीच्या महाराष्ट्रानें दिल्लीच्या बादशाहीला वेसण घालून साऱ्या हिंदुस्थानाचें राजकीय नेतृत्व एकदां आपल्याकडे घेतलें होतें. हिंदुस्थानांत येणाऱ्या हिंदुस्थानाबाहेरील मुसलमानांच्या धाडी परतवून हिंदुस्थानांतल्या भानगडींचा निर्णय आमचा आम्ही एकमेकांच्या विचारविनिमयानें लावूं, त्यांत हिंदुस्थानाबाहेरच्या लोकांची लुडबूड नको, असा विचार थोरला बाजीराव, नानासाहेब, सदाशिवरावभाऊ यांच्या डोक्यांत घोळत होता; महाराष्ट्राच्या निराळ्या ऐतिहासिक परंपरेची ओळख या माहितीच्या साह्यानें होऊं शकेल. संस्कृति, रहाणी, परंपरा हे महाराष्ट्राच्या निराळेपणाचे घटक जमेला धरून एकीकरणाला जर एखाद्या महत्त्वाकांक्षेची बैठक पुरविण्यांत आली तरच एकीकरण योग्य प्रकारें पार पडण्याचा संभव आहे. नाहीं तर मनोवेधक सद्भावना एवढ्यावरच एकीकरणाच्या कल्पनेची बोळवण करणें प्राप्त आहे. अशा महत्त्वाकांक्षेला आजच्या राजकीय विचारसरणींत जागा नाहीं. भविष्यकाळीं महाराष्ट्रानें साऱ्या देशाच्या राजकारणाचा पुढारीपणा आपल्या हातीं घेण्यासाठीं एकीकरण झालें पाहिजे, असें कोणीं म्हटल्यास तो देशद्रोही ठरेल.

महाराष्ट्राचें रक्षण हें निदान आजच्या घडीस तरी एकीकरणाचें ध्येय बनण्याला हरकत नाहीं. आज महाराष्ट्रांत महाराष्ट्राचें असें काय उरलें आहे ? उद्योगधंदे, कारखाने, व्यापार, सावकारी यांवर महाराष्ट्रियांची सत्ता नाहीं. शेजारच्या प्रांतांतील लोकांनीं महाराष्ट्राची केवढ्या विस्ताराची जमीन पैशाच्या जोरावर खाऊन टाकली आहे, याचा अंदाज करणें फारसें कठिण नाहीं. मराठ्यांची सत्ता आपल्या शेतकीवर सुद्धां अभिमान बाळगण्यासारखी राहिलेली नाहीं. रानें, डोंगर, यांचा व्यवहार परप्रांतस्थांच्या पंजांत गुंतलेला आहे. मराठ्यांचें शरीर देखील सध्यां दुसऱ्याच्या लाभाकरितां खपत असल्यानें तें केवळ जन्ममरणापुरतें त्याचें समजावयाचें. ( त्या शरीराचाही संकर होऊं लागला आहे, पण अजून

तो फार सूक्ष्म आहे, उपेक्षणीय मात्र नाहीं. ) ही भयंकर दुर्दशा नाहींशी करणें अवश्य असून महाराष्ट्र एकीकरणाचें हें ध्येय व्हायला हरकत नाहीं. परंतु या दुर्दशेची स्पष्ट तपशीलवार परिस्फुटता करणें म्हणजेसुद्धां पाप अशी राजकीय परमार्थाची चालू विचारसरणी आहे. ही दुर्दशा इंग्रजी राज्यांतील दोन्ही महाराष्ट्रांना भोंवत असली तरी ती डोळ्यांसमोर ठेवून तिच्यांतून उद्धार करून घेण्यासाठीं महाराष्ट्राचें एकीकरण व्हावें अशी भाषा जेथें निघत नाहीं तेथें तशा घोषणेची अपेक्षा कशी धरतां येईल ? नव्यानें जर एकीकरण घडावयाचें तर त्याच्या मागें असा कांहीं प्रबळ उद्देश असल्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्याच्या अभावीं महाराष्ट्रांतील कित्येकजणांनीं आपला वेळ चांगल्या कामांत किंवा विचारांत जातो असें दिसण्याकरितां एकचित्ताचें कांहीं भाव आकर्षण करणारा 'संयुक्त महाराष्ट्र' किंवा 'महाराष्ट्राचें एकीकरण' हा एक विषय उपस्थित केला आहे; असें म्हणावें लागतें. श्री. बेडेकर यांनीं आपल्या विवेचनाच्या अखेरीस याच तात्पर्याचें प्रतिपादन केलें आहे. 'संयुक्त महाराष्ट्राला' अवश्य असणारी भूमिका महाराष्ट्राच्या आजतागायतच्या इतिहासांत नाहीं, हें दाखविण्यासाठीं श्री. बेडेकरांनीं त्या इतिहासाचीं शाब्दिक व घटनात्मक अंगें पिंजून त्यांचें सत्यस्वरूप निदर्शनास आणण्याची जी कामगिरी परिश्रमपूर्वक केली ती अभ्यासकांना नेहमीच महत्त्वाची वाटेल.

☆

# महाराष्ट्रीय लोक व राष्ट्रभूमि : १ :

"संयुक्त महाराष्ट्र, परिषदे "च्या नेतृत्वाखालीं आज एक व्यापक चळवळ सुरू झाली आहे. या चळवळीचें ध्येय काय ? या चळवळीचा हिंदी स्वातंत्र्याच्या महान् क्रांतीशीं संबंध कशा प्रकारचा आहे ? चाळीसकोटी भारतवासीयांच्या राजकीय व सांस्कृतिक भवितव्यांमध्यें मराठ्यांना कोणतें स्थान आहे ? भारताच्या सर्वगामी उदयोन्मुख लोकसत्तेशी महाराष्ट्राला एकरूप कसें होतां येईल ? आणि एकरूप होऊनहि आपलें वैशिष्ट्य व स्वातंत्र्य कसें जतन करतां येईल ? असें अनेक प्रश्न आज उभे आहेत.

"संयुक्त महाराष्ट्रा "च्या घोषणेबरोबर उत्पन्न झालेल्या वरील अनेक प्रश्नांना वेगवेगळ्या राजकीय पक्षांकडून वेगवेगळीं उत्तरें दिलीं जात आहेत. कॉंग्रेस, हिंदुसभा, समाजवादी वगैरे पक्षोपपक्ष आपापल्या दृष्टीनें या प्रश्नांची उत्तरें देत आहेत हें साहजिकच आहे. मवाळ व जहाल व सनदशीर, क्रांतिकारक असें हे फरक राहणारच. आज संयुक्तीकरणापुरती सर्वांची एकवाक्यता आहे; आणि ही एकवाक्यता कायम राखून सर्व पक्षांनीं व वर्गांनीं आपापल्या परीनें ह्या

चळवळीला बळकटी आणणें आवश्यक आहे. या चळवळीच्या अंतिम यशाचें स्वरूप काय असावें व तें साध्य करण्यासाठीं कोणते मार्ग स्वीकारले पाहिजेत, यासंबंधीं एक विचारसरणी मी पुढील प्रकरणांत मांडली आहे.

त्या विवेचनापूर्वी व सर्व विचाराची पार्श्वभूमि म्हणून महाराष्ट्रीय लोक व त्यांची राष्ट्रभूमि यासंबंधीं कांहीं ठळक माहिती दिली पाहिजे.

## महाराष्ट्रीय लोकसंख्या

प्रथम महाराष्ट्रीय लोकसंख्येचा विचार घेऊं. आजचे सर्व राजकीय विभाग पुसून टाकून, हिंदुस्थानची भाषावार विभागणी करणारा नकाशा काढला तर मराठी बोलणाऱ्या लोकांचा जो प्रदेश ठरेल तोच "संयुक्त महाराष्ट्र". या महाराष्ट्राच्या बाहेरहि मराठे आहेतच. सन १९३१ मध्यें या परदेशस्थ मराठ्यांची संख्या ७,५८,००० होती. यांचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवूं. महाराष्ट्रांत मराठ्यांची जी सलग वस्ती आहे तिची संख्या किती होते, तें पाहूं.

माझ्या मतें, सन १९४१ मध्यें, महाराष्ट्राची लोकवस्ती अशी आहे :

| | | |
|---|---|---|
| १ | कोंकण | ५३,१८,००० |
| २ | गोवें | ६,६७,००० |
| ३ | देश | १,१५,६३,००० |
| ४ | मराठवाडा | ५०,१५,००० |
| ५ | महाविदर्भ (मध्यप्रांत-वऱ्हाड) | ७५,७२,००० |
| | महाराष्ट्र | ३,०१,३५,००० |

ह्या मोजणीमध्यें खालील गोष्टी लक्षांत घेण्याची आवश्यकता आहे :

१. सन १९४१ मध्यें केलेल्या खानेसुमारीमध्यें भाषावार मोजणी केलेली नाहीं. तेव्हां १९३१ मध्यें केलेल्या भाषावार मोजणीचा आधार घेऊन आणि तीच प्रमाणें आजहि कायम आहेत असें समजून कांहीं बाबतींत अंदाजी

आंकडा काढावा लागतो. उदाहरणार्थ, बेळगांव जिल्ह्यांत मराठ्यांची वस्ती, सन १९३१ सालीं, शें. २५·० होती. तेंच प्रमाण सन १९४१ मध्यें कायम समजून १९४१ च्या त्या जिल्ह्याच्या एकूण १,२२,५००० वस्तीपैकीं ३,२६,००० मराठे होते असा अंदाज केला आहे. मराठी–कानडी, मराठी–गुजराती, मराठी–हिंदी मराठी–तेलगू अशा संमिश्र भाषिकांच्या जिल्ह्यांना व संस्थानांना वरील पद्धति लावून मी मराठी वस्तीचा अंदाजी आंकडा निश्चित केला आहे.

२. मराठी–कानडीसारख्या संमिश्र जिल्ह्यांतील किंवा संस्थानांतील मराठी वस्ती शें. २५·० इतकी अल्पसंख्य असून तिला महाराष्ट्रांत सामील करून घेतली आहे, कारण आजचे जिल्हे व संस्थानें हीं भाषावार बनलेलीं नाहींत व अल्पसंख्य असूनहि वरील मराठी वस्ती मूळ मराठी लोकसमूहाशीं वास्तविक संलग्न व अखंडच आहे.

## कांहीं अडचणी

वरील तत्त्व अंमलांत आणतांना अडचणी कशा येऊं शकतात तें पाहण्यासारखें आहे. बेळगांवचेंच उदाहरण घेऊं. तेथें शें. २५·० मराठी वस्ती आहे खरी, परंतु ती महाराष्ट्राशीं संलग्न अशी किती आहे ? बेळगांव व कांहीं मोठ्या गांवांतून मराठी वस्ती असून भोंवतालच्या ग्रामीण विभागांत कानडी वस्ती आहे. अशी बेटांसारखी शहरी मराठी वस्ती महाराष्ट्राला संलग्न समजतां येणार नाहीं. शेंकडा २५·० मराठी वस्तीपैकीं किती भाग असा तुटक आहे ? वरील प्रश्नांचीं उत्तरें मिळाल्याशिवाय शेंकडा २५·० वस्ती मराठी म्हणून महाराष्ट्राला जोडून घेणें कर्नाटकावर अन्याय करण्यासारखें आहे. परंतु मी ढोबळ अंदाजासाठीं हें शेंकडा २५·० चें प्रमाणच हिशेबांत घेतलें आहे.

दुसरें उदाहरण नांदेड जिल्ह्याचें घेऊं. येथील वस्तींत शेंकडा ६२·४ मराठे सन १९३१ मध्यें होते. तो सर्वच जिल्हा मराठी समजावयाचा का ? मी आतांपर्यंत 'संयुक्त महाराष्ट्रा'चीं वर्णनें वाचलीं व नकाशे पाहिले त्यांत नांदेडला असें जोडून घेतलेलें आहे. ( श्री. वाकणकर यांनीं सन १९४० सालीं

प्रसिद्ध केलेला नकाशा पहा.) शें. ६२·४ मराठी वस्तीचा नांदेड जर महाराष्ट्रांत मोडतो तर शे. ६५·० कानडी वस्तीचा बेळगांव संपूर्णपणें कर्नाटकांत कां मोडूं नये ?

वरील अडचणींना नुसत्या सरकारी खानेसुमारीच्या अहवालाच्या आधारानें तोंड देतां येणेंच शक्य नाहीं. या संमिश्र जिल्ह्यांतून महाराष्ट्राची सरहद्द जाते. परंतु ती निश्चित करण्यासाठीं प्रत्येक लहानसहान खेड्यांतून **अगदीं निर्वेध तऱ्हेनें सर्व वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांचें मत** घेतलें पाहिजे. अशा मतमोजणीनंतरच सरहद्दीचा प्रश्न मिटूं शकेल.

वरील स्पष्टीकरण लोकशाहीच्या दृष्टीनें किती महत्त्वाचें आहे, तें सांगावयास नकोच. याच दृष्टीनें माझी अशी सूचना आहे कीं, 'संयुक्त महाराष्ट्राचें' वर्णन करतांना किंवा नकाशे काढतांना आपण फक्त पूर्ण मराठी जिल्ह्यांची सरहद्द तूर्त धरावी व कारवार, बेळगांव, गुलबर्गा, बेदर, अदिलाबाद, बालाघाट, बस्तार (संस्थान), छिंदवाडा, बेतूल, नेमाड व दमण या विभागांना संमिश्र भाग म्हणून मानावें.

मुंबई शहर व उपनगरें यांचा प्रश्न निव्वळ लोकसंख्येच्या मोजणीनें सुटणारा नाहीं. त्यांत आर्थिक वर्चस्वाचा व त्याच्या मागोमाग येणाऱ्या राजकारणाचा हात असणारच. पण भाषावार लोकसंख्येपुरतें सध्यां पाहूं.

सन १९३१ मध्यें मुंबई शहरांत शें. ५१·० व उपनगरांत शेंकडा ६२·० मराठे होते. सन १९४१ मध्यें एकूण लोकवस्ती १७,४१,००० होती. त्यांत ९,१६,००० मराठे असावेत. सन १९४६ मध्यें ही संख्या १३ लक्ष झाली असावी असा कांहीं जणांचा अंदाज आहे.

या १३ लक्ष लोकांना महाराष्ट्राचा भाग न समजतां स्वतंत्र "प्रांत" समजणें ही एक 'तडजोड' आज सुचविली जाते.

कॉंग्रेसनें सन १९२० मध्यें भाषावार प्रांत रचले त्यावेळीं मुंबईची

स्वतंत्र "प्रांतिक" कमिटी बनविली, यांत वरील 'तडजोडीची' भूमिकाच बीजरूपानें दिसत आहे. परंतु केवळ लोकसंख्येकडे पाहिलें तर मुंबई महाराष्ट्रांतच मोडणें सहजप्राप्त आहे. कलकत्त्याचें उदाहरण पहा. तेथेंहि बंगाली भाषिक फक्त शें. ५४·२ आहेत व हिंदी भाषिक शें. ३६·४ आहेत, (मुंबईत गुजराती भाषिक शें. २१·० आहेत).

## पांच विभागांतील जिल्हे व संस्थानें

आरंभीं संयुक्त महाराष्ट्राचे पांच विभाग दिले आहेत व विभागांची एकूण लोकसंख्या दिली आहे. आता प्रत्येक विभागांतील जिल्ह्यांचीं व संस्थानांचीं नांवें खालीं देत आहे.

### १ कोंकण

(अ) मराठी जिल्हे:—मुंबई (शहर), मुंबई (उपनगर), ठाणें, कुलाबा, रत्नागिरी.

(ब) मिश्र जिल्हे:—दमण (नगर हवेली), कारवारमध्यें शें. ३८·० मराठी वस्ती.

(क) संस्थानें:—जव्हार, जंजिरा, सावंतवाडी.

### २ गोवें

गोव्याची सन १९३१ ची वस्ती ५,७९,९७० होती. शें. १५·० वाढ धरून सन १९४१ ची संख्या ६,६७,००० धरावयास हरकत नाहीं.

तेथील थोडी वस्ती "कानडी कोंकणी" नांवाची कानडीची एक पोटभाषा बोलणारांची असावी. त्याबद्दल जास्त तपशील काढून या भाषिकांना कर्नाटकांत समाविष्ट केलें पाहिजे. माहितीच्या अभावीं मी सर्वच वस्ती महाराष्ट्रांत धरली आहे. (अर्थात् कोंकणीला मी मराठीची पोटभाषा धरली आहे.)

**३ देश**

( अ ) मराठी जिल्हे:—अहमदनगर, पूर्व व पश्चिम खानदेश, नाशिक, पुणें, सातारा, सोलापूर.

( ब ) मिश्र जिल्हे:—बेळगांव, शेंकडा २५·० मराठी वस्ती.

( क ) मराठी संस्थानें:—सुरगणा, भोर, फलटण, धरमपूर, बांसडा, डांग.

( ड ) मिश्र संस्थानें:—कोल्हापूर, औंध, सांगली, जत, मिरज ( थोरली व धाकटी पाती ), कुरुंदवाड ( थोरली व धाकटी पाती ).

**४ मराठवाडा**

( अ ) मराठी जिल्हे:—औरंगाबाद, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, बीड.

( ब ) मिश्र विभाग:—बेदर, गुलबर्गा, अदिलाबाद.

**५ महाविदर्भ**

( अ ) मराठी जिल्हे:—बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चांदा.

( ब ) मिश्र विभाग:—नेमाड, बेतूल, छिंदवाडा, बालाघाट, आणि बस्तार संस्थान.

## संयुक्त महाराष्ट्र व संस्थानें

मराठी लोकसंख्येचा विचार करतांनाच संस्थानांचा प्रश्न सहजच पुढें येतो. याला दोन बाजू आहेत. एकीकडे हैद्राबाद व गोवें या मोठ्या संस्थानांचा नाश झाल्याशिवाय महाराष्ट्राचें एकीकरणच पुरें होऊं शकत नाहीं; दुसरीकडे मराठी राजांची कानडी, गुजराती व हिंदी प्रजा स्वतंत्र झाल्याशिवाय महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या कन्नड, आंध्र, महाकोसल, मालव व

गुर्जर या लोकसमूहांचें एकीकरण होऊं शकत नाहीं. संयुक्त महाराष्ट्राची घोषणा लोकशाहीला सुसंगत आहे व ती तशी राहावयाची असेल तर या घोषणेंत शेजारी राष्ट्रांच्या एकीकरणाची दखल घेतलेली असलीच पाहिजे. मराठवाडा व गोवें महाराष्ट्रांत परत घेतांना बडोदें, ग्वाल्हेर, इंदूर व दक्षिणेकडील रामदुर्ग इत्यादि संस्थानें रद्द होऊन तेथील प्रजा त्या त्या मातृभूमीमध्यें मिसळली पाहिजे, असा आग्रह 'संयुक्त महाराष्ट्र'च्या अभिमान्यांनीच धरला पाहिजे.

वरील विचार घेतला तर लोकसंख्येच्या दृष्टीने काय घडामोडी होतील त्याची ढोबळ मोजदाद मी खाली केली आहे.

तीन कोटि मराठ्यांपैकीं जी वस्ती संस्थानी अंमलाखाली आहे, तिची मोजणी अशी:-मोंगलाईत ५०,१५,०००; गोव्यांत ६,६७,०००; तसेंच कोंकण, देश व महाविदर्भ यांमधील मराठी व मिश्र वस्तींच्या संस्थानांत एकूण मराठी प्रजा २१,७८,०००.

सारांश, एकूण ७८,६०,००० मराठी वस्ती निरंकुश राजसत्तेखालीं आहे. ( यापैकीं ५६,८२,००० प्रजा अहिंदु राजसत्तेखाली आहे. )

## मराठी संस्थानांतील मराठेतर प्रजा

आतां, मराठी राजांच्या निरंकुश अंमलाखालील मराठेतर प्रजेची मोजदाद करूं.

प्रथम मराठी-कानडी आठ संस्थानें व पूर्ण कानडी सात संस्थानें घेऊं.

कोल्हापूर, औंध, सांगली, जत, मिरज ( थो. व धा. पाती ), कुरुंदवाड ( थो. व धा. पाती ) या आठ संस्थानांची कानडी प्रजा, माझ्या मोजणीप्रमाणें ४,६९,००० असावी. ही मोजणी मी अशी केली : सन १९३१ मध्यें या आठ संस्थानांची एकूण वस्ती १६,२५,००० व कानडी वस्ती ३,५५,६०० होती. म्हणजे कानडी वस्ती २२·० होती. सन १९४१ मध्यें एकूण वस्ती

१८,३६,००० होती. त्यावरून कानडी वस्ती ४,०४,००० असावी. ही कर्नाटकाशीं संलग्न आहे हें नकाशावरून दिसेल.

पूर्ण कानडी संस्थानें सात आहेत तीं अशीः—जमखिंडी, मुधोळ, रामदुर्ग, वाडी, सावनूर, अक्कलकोट व म्हैसूरजवळचें सोंडूर. यांपैकीं पहिल्या सहांची सन १९४१ मधील वस्ती ३,६७,००० आहे. सोंडूरची वस्ती १६,००० च्या आसपास असावी (कारण सन १९२१ मध्यें ती १३,००० होती.) एकूण ही वस्ती सुमारें ३,८३,००० धरावयास हरकत नाहीं.

एकूण ७,८७,००० कानडी प्रजा मराठी राजांच्या सत्तेखालीं असावी.

ग्वाल्हेर, इंदूर धार व देवास (थो. व धा. पाती) या माळव्यांतील संस्थानांची एकूण वस्ती ५९,४५,००० आहे. ती राजस्थानी किंवा हिंदी भाषा बोलणारी आहे. तसेंच बडोद्याची २८,५५,००० प्रजा गुजरातीभाषिक आहे. सन १९४४ च्या मार्चमध्यें कांहीं लहान संस्थानांचा बडोद्याच्या कक्षेत समावेश करण्यांत आला आहे व अशा रीतीनें सुमारें ६,००,००० नवीन प्रजेवर बडोद्याची अप्रत्यक्ष सत्ता स्थापन झाली आहे.

सारांश, मराठी संस्थानिकांच्या कानडी, गुजराती, हिंदी व राजस्थानी प्रजेची एकूण वस्ती १,०१,८७,००० आहे व यांना कर्नाटकादि प्रदेशांच्या जनतेशीं परत निर्वेधपणें मिसळतां येणें आवश्यक आहे. निजाम राज्य, गोवें इत्यादि राजवटींमुळें महाराष्ट्राची झालेली फाळणी रद्द करतांना आपल्याला कर्नाटक, गुजरात इत्यादि राष्ट्रांची मराठी संस्थानांमुळें झालेली ही फाळणी रद्द करण्याची घोषणा केली पाहिजे

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा निर्भेळ लोकशाहीच्या व्यापक दृष्टीनें विचार करण्यासाठी ७८,६०,००० संस्थानी मराठी प्रजा व मराठी संस्थानांतील १,०१,८७,००० मराठेतर प्रजा यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. किंबहुना ३ कोटि मराठ्यांच्या एकीकरणाच्या चळवळीमध्यें या पावणेदोन कोटि संस्थानी प्रजेच्या मुक्ततेचा प्रश्नच प्रमुख ठरणार आहे.

बाकीचे प्रश्न संख्याबलाच्या दृष्टीने गौण आहेत व पुष्कळसे समदर्शीर मार्गांनीं सुटण्यासारखे आहेत. संस्थानी प्रजेचा प्रश्न मात्र ब्रिटिश सत्तेच्या पूर्ण नाशाबरोबरच सुटणारा व क्रांतिकारक मार्गानेंच सुटणारा आहे.

आतांपर्यंत मराठी लोकसमूहाची जी आंकडेवारी दिली तिचा जिल्हेवार तपशील खालील कोष्टकांत दिला आहे. :

| | क्षेत्रफळ चौ. मैल | लोकसंख्या ( हजारांत ) |
|---|---|---|
| **१ कोंकण** | | |
| ( अ ) मराठी जिल्हे | | |
| मुंबई शहर | ००३० | १४९० |
| व उपनगरें | १५३ | २५१ |
| ठाणें | ३५७६ | ९३३ |
| कुलाबा | २२१२ | ६६९ |
| रत्नागिरी | ४०६९ | १३७३ |
| ( ब ) संमिश्र विभाग | | |
| दमण ( नगर हवेली ) | ? | ? |
| कारवार ( ३८ टक्के मराठी ) | | १६८ |
| ( क ) संस्थानें | | |
| जव्हार | ३०८ | ६५ |
| जंजिरा | ३७९ | ११७ |
| सावंतवाडी | ९३० | २५२ |

**२ गोवें**

## ३ देश

### ( अ ) मराठी जिल्हे

| | | |
|---|---|---|
| अहमदनगर | ६६४६ | ११४२ |
| पूर्व खानदेश | ४५९८ | १३२८ |
| पश्चिम खानदेश | ५३२० | ९१२ |
| नाशिक | ५९२२ | ११११ |
| पुणें | ५३४७ | १३५९ |
| सातारा | ४८९१ | १३२७ |
| सोलापूर | ४५७२ | १०१५ |

### ( ब ) मिश्र जिल्हे

| | | |
|---|---|---|
| बेळगांव ( २५ टक्के मराठी ) | | ३०६ |

### ( क ) मराठी संस्थानें

| | | |
|---|---|---|
| भोर | ९१० | १५६ |
| फलटण | ३९७ | ७२ |
| * सुरगणा | ३६० | १५ |
| * धरमपूर | ७०४ | ११२ |
| * डांग | ९९६ | ३४ |
| * बांसदा | २१५ | ४९ |

### ( ड ) मिश्र संस्थानें

| | | |
|---|---|---|
| कोल्हापूर | ३२२९ | १०९२ |

* ह्या संस्थानांचा समावेश अलीकडे गुजराथमध्यें करण्यांत आला आहे.

| | | |
|---|---|---|
| औंध | ५०१ | ८९ |
| सांगली | ११३६ | २९३ |
| जत | ९८१ | १०७ |
| मिरत ( थो. पाती ) | ३४२ | १०९ |
| ,, ( धा. पाती ) | १९६ | १४६ |
| कुरुंदवाड (थो.पाती) | १८२ | ५३ |
| ,, ( धा. पाती ) | ११६ | ४७ |

**४ मराठवाडा**

( अ ) मराठी जिल्हे

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ६२१२ | १०७२ |
| परभणी | ५१२५ | ८५४ |
| नांदेड | ३७७१ | ८०३ |
| उस्मानाबाद | ३५२६ | ७४९ |
| बीड | ४१३२ | ७१४ |

( ब ) मिश्र जिल्हे

| | | |
|---|---|---|
| बेदर | ( ३७·५ टक्के मराठी ) | ३८४ |
| गुलबर्गा | ( १६·३ टक्के ,, ) | २१४ |
| अदिलाबाद | ( २०·९ टक्के ,, ) | १७२ |

**५ महाविदर्भ**

( अ ) मराठी जिल्हे

| | | |
|---|---|---|
| वर्धा | २४३५ | ५१९ |
| नागपूर | ३८३६ | १०६० |
| चांदा | ९२०५ | ८७३ |

| | | |
|---|---|---|
| भंडारा | ३५८० | ९६३ |
| अमरावती | ४७१५ | ९८९ |
| अकोला | ४०९३ | ९०८ |
| बुलढाणा | ३७६३ | ८२१ |
| यवतमाळ | ५२३८ | ८८८ |

( ब ) मिश्र जिल्हे

| | | |
|---|---|---|
| नेमाड | ( १५ टक्के मराठी ) | ७७ |
| बेतूल | ( २४ टक्के ,, ) | १०५ |
| छिंदवाडा | ( १८ टक्के ,, ) | १८८ |
| बालाघाट | ( २८ टक्के ,, ) | १८१ |

( क ) संस्थानें

बस्तर या संस्थानची लोकसंख्या ५ लक्ष २५ हजार आहे व मराठी भाषिक १ लक्ष ७५ हजार आहेत. परंतु गेल्या ५० वर्षांत येथील जनतेची भाषा व जीवन हें हिंदी भाषिकांच्या विभागाशी समरस होत गेलेलें असून आज या संस्थानांचा समावेश महाराष्ट्रांत करतां येणार नाहीं असें वाटतें.

## मराठा लोकसमाजाचें स्वरूप

लोकसंख्येचा विचार करतांना केवळ आजच्या मराठी भाषिकांच्या संख्येचा विचार केला व या लोकांचें आजचें वसतीस्थान म्हणजे महाराष्ट्र, हेंच तत्व आज मानावें लागेल. लोकसंख्येचा व देशविस्ताराचा विचार करितांना प्राचीन घडा-मोडींकडे पाहूणें जरूर नसलें तरी या लोकसमाजाची घडण ज्या ऐतिहासिक काळांत झाली त्या काळाकडे पाहूणें इतर दृष्टींनीं जरूर आहे. केवळ इतिहास-संशोधनाची दृष्टि ठेऊन या घडामोडी पाहाणें शक्य आहेच; शिवाय या संशो-धनामुळें आपल्याला मराठी समाजाच्या भाषिक व प्रादेशिक एकात्मतेची कुळ-कथा जर उमगली तर ती हवीच आहे. या एकात्मतेच्या ऐतिहासिक विका-

यामुळेंच महाराष्ट्रीय लोकसमूहासारखे समूह अर्वाचीन काळांत "राष्ट्र" या दर्जाला पोंचू शकले आहेत व महाराष्ट्रीय समाजाचा इतिहास या राजकीय दृष्टीनें आजहि महत्वाचा आहे; म्हणून थोडक्यांत तो पाहूं.

प्राचीनकाळीं येथें प्रथम वारली, कोळी, ठाकर वगैरे लोकांची वस्ती होती. नंतर इ. स. पूर्व १००० च्या सुमारास या अरण्यमय प्रदेशांत 'दामनीय' व 'महाराष्ट्रिक' या नांवाचे लोक शिरले व त्यांनीं वारली वगैरे लोकांना डोंगराळ भागांत रेटले. यानंतर इस. पूर्व ३०० पासून इ. स. ५०० पर्यंत महाराष्ट्रावर शातवाहन, आंध्र वगैरे प्राचीन राजघराण्यांनीं राज्यें केलीं. या काळांत ग्राम-संस्थेला व वतनसंस्थेला स्थिर स्वरूप येत गेलें व ह्या संस्थांची परंपरा पुढें ब्रिटिश अंमलापर्यंत अबाधित राहिलेली दिसते. या नंतरच्या सातशें वर्षांच्या काळांत शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकूट व दुसरे चालुक्य अशीं राजघराणीं येथें नांदलेलीं आढळतात. इ. स. १२०० पर्यंतच्या ह्या काळाच्या शेवटीं यादवांचें राज्य चालू होतें व मुसलमानांच्या आघातांनीं तें राज्य बुडाल्यावर मग भोसल्यांच्या घराण्यांत पुन्हां राज्यकर्ते उत्पन्न होईपर्यंतच चारशें वर्षांचा काळ एका दृष्टीनें अराजकाचाच गेला.

या सर्व राज्यविषयक घडामोडींत मराठीभाषिक बहुजन समाजाचें जीवन कसें होतें? त्यांना आपण सर्व "महाराष्ट्रीय" आहेत अशी जाणीव होती काय? या प्रश्नाचें सविस्तर उत्तर देण्याचा प्रयत्न मी "मराठ्यांच्या इतिहास व राष्ट्रीयत्व" या प्रकरणांत केला आहे. सध्यां संक्षेपानें एवढेंच म्हणतां येईल कीं येथील प्राचीन वंशाचे लोक व बाहेरून आलेले क्षत्रिय व इतर लोक यांच्या संकरामुळें उत्पन्न झालेल्या महाराष्ट्रीय लोकसमाजाला स्वतःच्या एकजिनसीपणाची, व इतरांपासून वेगळे असण्याची, जाणीव इ. स. १२०० च्या सुमारास झाली असावी. या काळांतला महानुभाव पंथ हा मराठी भाषेचा तर कट्टा अभिमानी होताच, पण "महाराष्ट्रीं असावे" असें सांगण्याइतका प्रादेशिक अभिमानही त्यांच्यांत उत्पन्न झालेला दिसतो. आजच्या महाराष्ट्राशीं

पुष्कळशी जुळणारी अशी महाराष्ट्रांची क्षेत्रव्याप्ती महानुभावांनीं सांगितलेली आढळते. ( सोबतचा नकाशा पाहा )

महाराष्ट्रांतला एकंदर समाज वांशिक दृष्टीनें व जातिव्यवस्थेनें अनेक पोटविभागांत विभागलेला असूनहि त्यांच्यामध्यें महाराष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न झालेली होती व याला कारण मुख्यतः मराठी भाषाच होय. श्री. वि. का. राजवाडे यांनीं म्हटलें आहे कीं, " मराठा क्षत्रिय, मराठा कुणबी, शुद्र कुणबी व नागवंशी महार बहुप्रज पडल्याकारणानें अल्पसंख्याक ब्राम्हणांना व महाराष्ट्र क्षत्रियांना संस्कृत भाषा सोडून मराठ्यांची भाषा स्वीकारावी लागली " व त्यामुळें या एकभाषी लोकांत साहजिकच एकजिनसीपणा उत्पन्न होऊं लागला. ( राधामाधवविलासचंपू, प्रस्तावना, पा. २०१ ).

आजच्या या संमिश्र मराठा समाजाचें बहारीचें वर्णन प्रा. माटे यांनीं " उपेक्षितांचें अंतरंग " या पुस्तकांत असें केलेलें आढळतें, " ज्या मानवी प्राण्यांनीं हें ( तारळ ) खोरें भरून राहिलें आहे त्यांचेही थर पाहण्या-सारखे आहेत. मधूनमधून एखाद दुसरा वरच्या पृष्ठावरचा खडा मुसलमानी आहे; त्याच्याखालीं गुजर मारवाडी आहे; त्यांच्याखालीं चित्पावन ब्राम्हण आहे; त्याच्याखालीं देशस्थ ब्राम्हण आहे; त्यांच्याखालीं मराठा आहे, पुष्कळ खोल गेल्यावर कुणबी आहे; आणखी खोल गेल्यावर अगस्ति ऋषींची पाऊल-वाट आहे; तिच्याखाली मांग रामोशी आहे. हे समाजसरोवर काळसर गढूळ आहे " ( पान ४३ ). या समाजसरोवराचा एकजिनसीपणा वांशिक किंवा सांस्कृतिकही फारसा नसून भाषिकच आहे असें दिसून येईल.

सन १४४८ मध्यें केशवाचार्यानें लिहिलेल्या 'माहिकावतीच्या बखरींत', राजवंशावळीच्या प्रकरणांत, ' महाराष्ट्रीय ' किंवा ' मराठा ' समाजाची व्यापक व्याख्या केली आहे. या व्याख्येप्रमाणें भोसले, जाधव वगैरे " शहाणव कुळींचे " पाटील, देशमुख वगैरे वतनदार व इनामदार हे सर्व महाराष्ट्रीय; शेतकी पेशा पत्करणारे " देसाय, पाटेल, म्हातरे " वगैरे सर्व मराठेच;

उदीमांत पडलेले राऊत, शिंदे, वगैरेही मराठेच; तसेंच " कोळी, चुरी " वगैरे " बारा कुळींचे " शेतकरीही मराठे; कारकून वृत्तीचे " राणे, प्रभू " इत्यादि लोक, तसेंच " शेतकरी, कांसार, तांबट, पोगार, लोहार, गाडबडे, बाहारे, माळी, वैती, कोळी, सोनकोळी, ढोरकोळी, आंगरी, खारू, डोखळे, नट, भाट, चुरूड चर्मक इत्यादि वर्णावर्ण अत्यंत हे सर्व माहाराष्ट्र." ( महिकावतीची बखर, श्री. वि. का. राजवाडे यांची प्रस्तावना पान १०८ व बखर पान ६० ).

या व्यापक व्याख्येमुळें असें स्पष्ट दिसतें कीं सन १४५० च्या सुमारास महाराष्ट्रांतील सर्व समाजांत एक " मराठेपणाची " जाणीव स्थिर झाली होती. या समाजापैकीं प्रत्येक व्यक्तीनें व जातीनें आपापला कुलधर्म व जातिधर्म पाळावा म्हणजे " महाराष्ट्र-धर्माचें " पालन होईल असें केशवाचार्यांनीं म्हटलेलें आहे. अर्थात्, " महाराष्ट्र-धर्म " ह्या कल्पनेंत आधुनिक राष्ट्रधर्माचा किंवा राष्ट्रीयत्वाचा आशय नाहीं, परंतु परंपरागत हिंदूधर्मानें वागणारा महाराष्ट्र-समाज उन्नत व्हावा अशी या " महाराष्ट्र-धर्माची " घोषणा आहे. हीच घोषणा पुढें " मराठा तेतुका मेळवावा, महाराष्ट्र-धर्म वाढवावा " या रामदासांच्या उद्गारांत पुन्हां दोन शतकांनीं अवतरली. सारांश, आजच्या अर्थानें राष्ट्रीय नसलेली परंतु मध्ययुगीन समाजांत जो एकजिनसीपणा भाषेमुळें व इतर समान बंधनांनीं येतो त्यामुळें उद्भवलेली एक महाराष्ट्रीयत्वाची जाणीव बाराव्या शतकापासून अस्तित्वांत असावी असें दिसतें.

## महाराष्ट्राचा विस्तार

लोकसंख्या व लोकसमाजाचा इतिहास पाहिल्यावर आतां महाराष्ट्राच्या क्षेत्रव्याप्तीकडे पाहणें जरूर आहे. एक गोष्ट प्रथमच लक्षांत घेतली पाहिजे ती अशी कीं, महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा प्रश्न हा एका **अर्वाचीन राष्ट्राच्या** उदयाचा प्रश्न आहे व त्यामुळें या उदयोन्मुख राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादा ठरवितांना आधुनिक काळांतील स्थितिच लक्षांत घेणें आवश्यक आहे. आज महाराष्ट्राची क्षेत्रव्याप्ति ठरवितांना महाराष्ट्र व त्याला संलग्न असलेली कर्नाटक,

आंध्र इत्यादि राष्ट्रें ह्यांच्या सर्वसाधारण जनतेचा कौल घ्यावा लागेल. सरहद्दी ठरवितांना प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणच्या खेड्यांत जाऊन सार्वत्रिक मतदान पद्धतीनें ( प्लेबिसाइट्नें ) मर्यादा ठरवाव्या लागतील. केवळ एखादें सरहद्दी ठरविणारे कमिशन नेमून व आजपर्यंत ब्रिटिश हद्दींत व संस्थानी हद्दींत घेतल्या गेलेल्या शिरगणतीच्या नोंदींचे अहवाल त्या कमिशनपुढें टाकून भागणार नाहीं. एकतर हे अहवाल नोकरशाहीच्या बेशिस्त व बेफिकीर पद्धतीनें केलेलें आहेत व अलिकडच्या शिरगणतीमध्यें तर भाषावार मोजणीच केलली नाहीं; दुसरें असें कीं कित्येक ठिकाणीं नवीनच उद्भवलेलें प्रांतीय दुरभिमानाचें किंवा पॅनइस्लामिझमसारखें धार्मिक दुरभिमानाचें वेड भाषिक मोजणीच्या बाबतींत शिरलेलें आहे. उदाहरणार्थ मराठी भाषिक अशा मुसलमान समाजांतील अनेक व्यक्तींनीं आपली भाषा उर्दू म्हणून नोंदविली आहे. या सर्व गोंधळांमध्यें न पडतां सरळ लोकांकडे जाऊन सार्वत्रिक मतदानपद्धतीनें त्यांचा कौल घेणें हेंच शेवटीं श्रेयस्कर ठरणार आहे.

खरोखरीच लोकशाहीच्या मार्गानें संयुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाला वरील पद्धतीनें मूर्तस्वरुप येईल तेव्हां खरें! तोंपर्यंत या प्रश्नाला अनेक फाटे फुटत राहणार. विशेषतः मूठभर सुशिक्षितांच्या हातीं प्रश्न राहिला तर ऐतिहासिक व सांस्कृतिक संशोधनांतला अनिश्चितपणा व या क्षेत्रांत प्रभावी असलेला प्रांतिक दुरभिमान ह्याचा उपसर्ग त्याला पोहोचणारच. म्हणून याबाबतींत थोडा विचार करणें प्राप्त आहे.

महाराष्ट्राच्या मर्यादा ठरवितांना बहुसंख्य मराठी लेखकांचा कल साधारणपणें महाराष्ट्राचें क्षेत्र शक्य तेवढें फुगवण्याकडे असतो. उदाहरणार्थ ' भाषिक महाराष्ट्र ' चळवळीचें पुरस्कर्ते श्री. शं. रा. शेंडे याचा ' महाराष्ट्राची क्षेत्रव्याप्ति ' हा लेख घ्या ( ' तरुण भारत '–विशेषांक, फेब्रुवारी १९४७ ). त्या लेखांत त्यांनीं महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांत पहिल्यानेंच निश्चितपणें आढळणारी अशी महाराष्ट्राची क्षेत्रव्याप्ति म्हणून दुसरा पुलकेशी ( इ. स. ६०९-६४२ राज्यकाल) याच्या साम्राज्याचाच तपशील दिला आहे! आज ज्याला आपण महाराष्ट्र

म्हणतो त्याच्या व्यतिरिक्त म्हैसूर, दक्षिण गुजराथ, माळवा व अर्धाअधिक राजपुताना हे सर्व प्रदेश " तत्कालीन महाराष्ट्रांत समाविष्ट असलेले विभाग " होते असें त्यांचें मत आहे. या महाराष्ट्रांत ९९००० गांवें होतीं व या विस्तृत प्रदेशांतील समाज सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या एकात्म होता, असें ते म्हणतात. त्याकाळच्या ह्या " महाराष्ट्रांत " आर्थिक ऐक्यही होतें असें त्यांचें प्रतिपादन आहे. पुढें या चालुक्यकालीन महाराष्ट्राचा संकोच होऊन नर्मदेच्या उत्तरेकडील महाराष्ट्र बाराव्या शतकापर्यंत लुप्त झाला व असें होण्याचें कारण दहाव्या शतकाच्या आगेमागें एक " मोठी सामाजिक व सांस्कृतिक क्रांति " झाली असावी असा त्यांचा अंदाज आहे !

वस्तुतः चालुक्यकालीन महाराष्ट्राच्या व्याप्तीबद्दलचें त्यांचें मत चुकीचें आहे. तें ज्याला तत्कालीन महाराष्ट्र म्हणतात तो प्रदेश पुलिकेशीच्या साम्राज्याचा विस्तार आहे. राज्य किंवा साम्राज्य ह्यांचें राष्ट्राशीं समीकरण करणें ही श्री. शेंडे ह्यांची चूक आहे. पुलकेशीच्या साम्राज्याला जर महाराष्ट्र म्हणावयाचें तर पेशवेकालीन मराठी साम्राज्यालाही महाराष्ट्र म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे ? ह्याबाबतींत नमूद करण्यासारखी गोष्ट अशी कीं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या सुरुवातीच्या काळांत श्री. विनायक महाराज मसूरकर यांनीं संयुक्त महाराष्ट्राचा एक नकाशा छापून प्रसिद्ध केला होता व त्यामध्यें महाराष्ट्राची व्याप्ति जवळजवळ मराठी साम्राज्याचा व्याप्ती-इतकी दाखविलेली होती. पुलकेशिच्या साम्राज्यासंबंधीं दुसरी एक गोष्ट पाहण्यासारखी आहे. ह्या दुसऱ्या पुलकेशीनें इ. स. ६२० मध्यें हर्षवर्धनाचा पराभव केला. ह्या पराक्रमी पुलकेशीला श्री. शेंडे महाराष्ट्रीय सम्राट समजतात; उलट कर्नाटकांतील विद्वान् त्याला कर्नाटकीय समजतात. उदाहरणार्थ प्रा. मुगळी हे आपल्या ग्रंथांत म्हणतात, कीं ' हर्षवर्धनाचा हा पराभव म्हणजे कर्नाटकाच्या इतिहासांतील एक महत्त्वाचा विजय आहे. कारण एका कर्नाटकीय सम्राटानें कर्नाटकीय सेनेच्या बळावर हा महत्त्वाचा विजय मिळविलेला होता.

चालुक्यानंतरचे महाराष्ट्रांतील राज्यकर्ते म्हणजे राष्ट्रकूट. हे देखील कर्नाटकीय होते व त्यांच्या साम्राज्यांच्या विस्तारावरूनही महाराष्ट्राची क्षेत्रव्याप्ति ठरविणें अशक्य आहे, असें कर्नाटकीयांचें मत आहे. कर्नाटकीय संशोधक कर्नाटकाची क्षेत्रव्याप्ति कावेरी व गोदावरी या नद्यांच्या मधील प्रदेश समजतात, व श्री. शेंडे ह्यांच्यासारखे लोक महाराष्ट्राची व्याप्ति म्हैसूरपर्यंत नेऊन भिडवितात ! या प्राचीन इतिहासांतील वादाला निर्णायक स्वरूप येणें दुरापास्त आहे. व त्यावर भर देणें "संयुक्त महाराष्ट्राच्या" ध्येयाला विघातक आहे. नंतरचा इतिहास घेतला तर असें दिसतें कीं मराठी भाषेचा उदय, तिच्यामध्यें ग्रंथनिष्पत्ति व महाराष्ट्राविषयीं प्रादेशिक अभिमान असा बाराव्या शतकांत उत्पन्न झाला. यावेळीं उदयास आलेल्या महानुभाव पंथानें महाराष्ट्राची व्याख्या केली आहे व ती कुठल्याही साम्राज्याच्या आधारानें केलेली नसून मराठी **लोकभाषेच्या आधारानें** केलेली दिसतें. या व्याख्येप्रमाणें महाराष्ट्राच्या सीमा काढल्या तर आजच्या महाराष्ट्राशीं त्या पुष्कळशा जुळतात. बाराव्या शतकामध्यें मराठी लोकभाषा व महाराष्ट्रांतच आढळणाऱ्या अशा सामाजिक चालीरीति, संस्था व धार्मिक परंपरा यांचा पाया घातला गेला. याच परंपरेचें सूत्र ज्ञानेश्वर तुकारामादि संतकवींनीं अखंड ठेवलेलें दिसतें. लोकभाषा व बहुजनसमाजाची संस्कृति यांची ही अखंड एकसूत्रता राहिल्यामुळेंच आज आधुनिक महाराष्ट्राला प्रादेशिक, भाषिक व सांस्कृतिक एकात्मता प्राप्त होऊं शकली आहे. महाराष्ट्राच्या क्षेत्रव्याप्तीच्या बाबतींत लोकभाषेच्या ऐवजीं राज्यांच्या यशापयशाकडे व कमीअधिक होणाऱ्या विस्ताराकडे पाहिलें तर असें दिसतें कीं बाराव्या शतकानंतर शिवकालापर्यंत महाराष्ट्राच्या राजकीय उलाढालींत त्याच्या क्षेत्रव्याप्तीचा प्रश्न येऊं शकला नाहीं. कारण या काळांत महाराष्ट्रावर एखादी स्थिर अशी सत्ता नव्हती व जो कांहीं अंमल होता तो परकीय व परधर्मीय राजांचा होता. शिवकालामध्यें व त्यानंतरच्या काळांतदेखील जो राज्यसंस्थापनेचा उद्योग झाला त्यामध्यें मराठी बोलणाऱ्या लोकांचा सलग महाराष्ट्र प्रदेश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र ठेवावा हें ध्येय पुढें

ठेघले मेलें नव्हतें. प्रा. न. र. फाटक ह्या इतिहासज्ञाचें या बाबतींत स्पष्ट मत असें आहे कीं मराठी साम्राज्याच्या वैभवशाली कालांतही महाराष्ट्र हा विभागलेलाच राहिला व महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचें ध्येय मराठी राज्यकर्त्यांना कधींही पुढें ठेवावेसें वाटलें नाहीं. त्यामुळेंच एकीकडे मराठ्यांचा झेंडा अटकेपार, बंगालवर व तंजावरकडे गेला होता तरी गोव्यांतील पोर्तुगीज सत्ता कायम राहिली, गोदावरीच्या खोऱ्यावर निजामाचें राज्य कायम राहिलें व नागपूरकर भोसल्यांचें राज्य तुटकपणें स्वतंत्र राज्य म्हणून नांदत राहिलें. प्रा. फाटक यांच्या मतावर मोठ्या आवेशानें हल्ला करणारे एक इतिहासज्ञ "झंकार" च्या, ता. ४-८-४६ च्या अंकांत, लिहितांना म्हणतात कीं महाराष्ट्राच्या वैभवकाळांत "या देशांत चांगली प्रबल केंद्रसत्ता असती तर या प्रदेशाचे आज दिसणारे चार खंड दिसलेच नसते असें म्हणावयास इतिहासाचा भरपूर आधार आहे. आणि इतिहासांत अपुरें राहिलेलें हें कार्य आतां पुरें करण्याची वेळ आलेली आहे असेंच म्हटलें पाहिजे." ही वेळ आतांच कां आली ? शिवाजी महाराजांचें अपुरें कार्य अटकेपार झेंडा नेणाऱ्या पेशव्यांना कां पुरें करतां आलें नाहीं ? जणुंकाय या प्रश्नाचें उत्तरच देण्यासाठीं हें इतिहासज्ञ म्हणतात, "विसाव्या शतकांत नवे आर्थिक व्यवहार महाराष्ट्रांतील समाजांत स्वतंत्रपणाची भावना वाढविण्यास कारणीभूत होत आहेत." याचा अर्थ असा कीं महाराष्ट्राला भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या विकासामुळें राष्ट्रीय स्वत्वाची जाणीव आज होत आहे व तशी ती ब्रिटिशपूर्व काळांत नव्हती व भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा अभाव हेंच निर्णायक कारण आहे. प्रबल केंद्रसत्ता त्या काळांत उद्भवूं शकली नाहीं हा देखील त्या काळांतील राजसत्ता, वतनसंस्था व ग्रामसंस्था या प्रमुख संस्थांना आधारभूत असलेल्या अर्थव्यवस्थेचाच परिणाम होय. यावरून असें म्हणावेंसें वाटतें कीं प्रा. न. र. फाटक यांच्या प्रतिपादनाला "ऐतिहासिक दृष्ट्या विकृत व भ्रममूलक" समजणारे हे इतिहासज्ञ स्वतःच त्या प्रतिपादनाला पोषक असें विवेचन करीत आहेत.

सारांश, मराठ्यांच्या राष्ट्रभूमीचा विचार करीत असतांना ऐतिहासिक

कालांतील राज्यविस्ताराकडे किंवा सांस्कृतिक विस्ताराकडे पाहून उपयोग नाहीं, उलटपक्षीं केवळ आधुनिक मराठी भाषिकांच्या वसतीच्या प्रदेशाला 'महाराष्ट्र' समजलें पाहिजे. महाराष्ट्र हें प्राचीन इतिहासानें सिद्ध होणारें राष्ट्र नसून अर्वाचीन काळांत भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर उदयास येत चाललेलें राष्ट्र आहे, हें तत्त्व मानल्यावर ऐतिहासिक व सांस्कृतिक कारणें दाखवून महाराष्ट्राची व्याप्ति वाढविण्याचा मोह कोणास होणार नाहीं. परंतु असा मोह पडून महाराष्ट्राच्या मर्यादा ठरवितांना कसा चुकीचा आग्रह धरला जातो ह्याचें एक उदाहरण देणें अप्रस्तुत होणार नाहीं. 'महाराष्ट्राचा राजकीय प्रांत' या पुस्तकाचे कर्ते श्री. शेंडे असें प्रतिपादन करतात कीं भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा महाराष्ट्राच्या बाबतींत एक अपवाद आहे. तो असा : महाराष्ट्राच्या सरहद्दीवर काहीं लोकसमूह असें आहेत कीं ते संस्कृतीनें मराठी असून भाषामात्र मराठी न बोलतां पलीकडील शेजाऱ्यांची बोलतात. उदाहरणार्थ, "खानदेश व नाशिकच्या पश्चिम भागांतील कोंकण समाज, वऱ्हाड व मराठी प्रांतांतील गोंड, भिल्ल व इतर वन्य समजलें जाणारे समाज, हव्ब व तत्सम मानीव वन्यजातीय समाज, धारवाड, विजापूर, बेळगांव, गुलबर्गा, रायचूर, कारवार ह्या जिल्ह्यांतील कानडी बोलणारा महाराष्ट्रीय, मंगळोर ते त्रिवेंद्रम्‌पर्यंतचा कुडुबी व कोंकणी बोलणार समाज" या सुमारें २५ ते ३० लक्ष लोकांना महाराष्ट्रीय समजण्याची चूक श्री. शेंडे हे करीत आहेत. कानडी बोलणाऱ्या लाखों लोकांना ते 'अस्सल महाराष्ट्रीय' समजतात व याला पुरावा म्हणून कर्नाटकामध्यें आढळलेल्या प्राचीन शिलालेखांचा आधार देतात. हे शिलालेख खोदविणारे चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादि घराण्यांतील राजे महाराष्ट्रीय होते हाच मुळांत वादाचा प्रश्न आहे व कर्नाटकीय संशोधक त्या राजांना कर्नाटकीय समजतात, हें मागें आलेलेंच आहे. ऐतिहासिक पुराव्यावर महाराष्ट्राची क्षेत्रव्याप्ति वाढविणें इतिहास संशोधनांतील चर्चेंतही वादातीत नाहीं. अर्थातच अर्वाचीन महाराष्ट्राच्या राष्ट्रभूमीचा विचार करितांना तर असल्या पुराव्यांच्या

व उपपत्तींच्या मार्गे न लागतां सरळ मराठी भाषिकांच्या प्रदेशांपुरतीच महाराष्ट्राची व्याप्ति निश्चित केली पाहिजे.

ह्या ठिकाणीं भिल्ल इत्यादि वन्य जातींसंबंधीं वेगळा तपशीलवार विचार करणें जरूर आहे. आज ब्रिटिश अमदानींत जें प्रांत पडले आहेत त्यामध्यें या वन्य लोकसमूहांना कोठल्यातरी पुढारलेल्या लोकसमूहांच्या बरोबर अनेक प्रांतांत समाविष्ट करण्यांत आलेलें आहे. त्यामुळें आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या या पुढारलेल्या लोकांचा वरचष्मा या वन्यजातींवर बसला आहे. ज्या प्रदेशावर व जमीनीवर हे वन्य लोक शतकानुशतकें मालक म्हणून नांदत होते त्याच प्रदेशांत त्यांना बाहेरील जमीनदारांची व सावकारांची कुळें म्हणून गुलामांसारखें रहावें लागत आहे. ह्या वन्य लोकसमूहांची या गुलामगिरींतून सुटका होण्यासाठीं त्यांना आपापल्या प्रदेशावर पुन्हां मालकांचें स्थान प्राप्त झालें पाहिजे व या प्रदेशांतील राजकीय, आर्थिक व इतर सर्व जीवन या लोकांच्याच हातीं राहिलें पाहिजे. ही हमी देऊन शिवाय त्यांना आधुनिक दृष्टीनें शेतकीमध्यें, उद्योगधंद्यांमध्यें व आधुनिक ज्ञानामध्यें विकास करतां आला पाहिजे. कांहीं वन्य लोकसमूह संख्येनें १० लक्षांपेक्षां जास्ती आहेत व एका सलग प्रदेशावर वसलेले असून त्यांची स्वतःची अशी भाषा व विशिष्ट लोकसंस्था वगैरे आहेत. गोंड, भिल्ल, वगैरे लोकांबद्दल असें म्हणतां येईल. या लोकांचें भवितव्य ठरवितांना महाराष्ट्र, गुजराथ किंवा अशाच एखाद्या पुढारलेल्या व बलिष्ठ समाजांत त्यांना डांबून टाकणें हें त्यांच्या दृष्टीनें अनर्थाचें होईल. आर्थिक चढाओढींत व जीवनकलहांत परकीय शेतकरी, व्यापारी, सावकार, कारखानदार, यांच्यापुढें भिल्लांचा किंवा गोंडांचा काय निभाव लागणार? एकदीड लाख वारली लोकांच्या दुस्थितीचें चित्र आज सर्वांना परिचित आहेच व तीच अवस्था आज महाराष्ट्रांतील भिल्ल वगैरे वन्य जमातींची आहे.

या परिस्थितीवर तोड म्हणून आपल्याला असा विचार करावा लागेल-कीं दहा लक्षांपेक्षां जास्त लोकसंख्या असलेल्या वन्य लोकसमूहांना आपापल्या प्रदेशावर स्वायत्त राष्ट्रगटाचा दर्जा आपण दिला पाहिजे. या बाबतींत पं. जवाहरलाल नेहरू यांनीं आसाममधील नाग लोकसमूहाबद्दल जाहीर केलेलें धोरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नाग लोकांच्या ' राष्ट्रीय कौन्सिलचें ' अध्यक्ष पं. नेहरू यांना ता. ४ ऑगस्ट १९४६ रोजीं भेटले व नागांच्या राष्ट्रीय भवितव्याबद्दल त्यांच्याशी त्यांनीं चर्चा केली. पंडितजींनीं या बाबतींत आपलें असें मत सांगितलें कीं नाग लोकांचा सर्वच्या सर्व प्रदेश अविभक्त राहिला पाहिजे व या प्रदेशावर ' नाग नॅशनल कौन्सिल ' ची सत्ताच बहुतेक सर्व बाबतींत चालली पाहिजे. हाच नियम भिल्ल समाजाच्या बाबतींत लावता येईल. आज महाराष्ट्राच्या चतुःसीमांमध्यें एकंदर वन्य जातींची वस्ती सुमारें तेरा लक्ष असावी. पूर्व व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांतून, सन १९४१ मध्यें, ४ लक्षांवर भिल्ल लोक असावेत. परंतु महाराष्ट्रांत मोडणारी ही भिल्ल वस्ती शेजारच्या मोठ्या भिल्ल समाजाचाच एक सलग भाग आहे. महाराष्ट्रांतील भिल्ल वस्तीचा भाग व गुजराथ आणि माळवा येथील भिल्ल समाज यांचें संयुक्तिकरण केलें तर सुमारें १५ लक्ष लोकांची एका सलग प्रदेशावर वस्ती असलेली दिसून येईल. या समाजाला एक जुनी भाषा आहे व प्राचीन कलेची, लोककथांची, लोकसंस्थांची, व धार्मिक आचारविचारांची विशिष्ट परंपरा आहे. या लोकांवर आज ख्रिश्चन मिशनरी लोकांचें धार्मिक आक्रमण होत असून शेजारच्या पुढारलेल्या जमातींतील व्यापारी, सावकार वगैरे लोकांचें आर्थिक आक्रमण होत आहे. या १५ लक्ष भिल्ल समाजाचें भवितव्य काय ? एक भवितव्य असें कीं त्यांनीं आपलें वैशिष्ट्य गमावून मराठी, गुजराथी व माळवी समाजांतील एक तळचा दडपलेला थर म्हणून जिवंत रहावें; दुसरें असें कीं या शेजारच्या राष्ट्रांतील प्रगतिशील व लोकसत्ताक वृत्तीच्या जनतेच्या मदतीनें या भिल्ल समाजानें एक स्वतःचें स्वायत्त जीवन बनवावें व इतर लोकांप्रमाणेंच आधुनिक काळांतील प्रगति करून घ्यावी.

महाराष्ट्राची व्याप्ती ठरवितांना वरील तत्व लक्षांत घेऊन भिल्ल इत्यादि लोकसमूहाच्या प्रदेशाला महाराष्ट्रांतून वगळावें लागेल असें वाटतें. अशा संपूर्णपणें लोकसत्तावादी दृष्टीनें महाराष्ट्राचा विस्तार निश्चित करण्याचें कार्य " संयुक्त महाराष्ट्र परिषदेला " करावयाचें आहे. तें कार्य करण्यासाठीं अशा लोकसत्तावादी दृष्टीनें इतर प्रश्नांकडेही पाहणें जरुर आहे व त्यांची चर्चा पुढील प्रकरणांतून केली आहे.

म. ग्रं. सं. ठाणे.

# महाराष्ट्रीयांचें राष्ट्रीय संयुक्तीकरण : २ :

मागील प्रकरणामध्यें आपण पाहिलें कीं आज तीन कोटी मराठी भाषिक लोक सुमारें १,५०,००० चौरस मैल क्षेत्रफळाच्या सलंग प्रदेशावर वस्ती करून आहेत व गेलीं ७०० वर्षे तरी या लोकसमूहानें एकच सुखदुःखें अनुभविली आहेत. या दीर्घ काळांत ज्या अनंत घडामोडी झाल्या त्यांत यांनीं एकदिलानें भाग घेतला आहे. आज महाराष्ट्रांतील एकेक शहर व गांव, एकेक किल्ला व देवस्थान या लोकसमूहाच्या सामुदायिक श्रध्देची व कर्तृत्वाची साक्ष देत आहे. समुद्रतीरापासून वैनगंगेपर्यंत व नर्मदेपासून कृष्णेपर्यंत असा एकही भाग आढळावयाचा नाहीं कीं जेथील एखाद्या कवीच्या, संताच्या, मुत्सद्याच्या किंवा वीराच्या कृतीबद्दल सर्व महाराष्ट्रीयाच्या हृदयांत प्रेम व अभिमान नाहीं. जी गोष्ट प्राचीन व मध्ययुगीन काळाची तीच आधुनिक काळांतील साम्राज्यविरोधी लढ्याची, श्रमजीवि वर्गाच्या लढ्याची व सांस्कृतिक जीवनाची. आधुनिक काळांतही सर्व महाराष्ट्रीय लोकसमूह एका सर्वगामी सूत्रांत ओंवल्यासारखा झाल्यासारखा असून त्याचें हें एकीकरण दिवसेदिवस दृढच होत आहे.

## महाराष्ट्रीयांचें राष्ट्रीय संयुक्तीकरण

या समान जीवनाच्या व आकांक्षेच्या एकसूत्रीपणावरच आज "संयुक्त महाराष्ट्रा" ची चळवळ जोमानें वाढत आहे. ही चळवळ आज एका राजकीय स्वरूपांत नव्यानें उत्पन्न झाली आहे किंवा नव्या पातळीवर आली आहे असें दिसेल; कारण तसें पाहलें तर सन १९०४ च्या बंगालच्या फाळणीच्या आधीं-पासूनच महाराष्ट्राच्या फाळणीचा प्रश्न होता व त्यासंबंधीं स्फुट असे विचार जुन्या महाराष्ट्रीय राजकीय पुढाऱ्यांनीं कित्येक वर्षांपासून मांडलेले आहेत. साहित्य, इतिहास-संशोधन इत्यादि क्षेत्रांत सर्व महाराष्ट्राला एकजिनसी क्षेत्र मानण्याची प्रथाही जुनीच आहे.

मग आज हा प्रश्न नव्यानें लोकांपुढें आला आहे याचा अर्थ काय? तर आज या संयुक्तीकरणाची **एकीकडे भारतीय राजकारणाशीं व दुसरीकडे लोकसत्तेच्या ध्येयाशीं** नवी सांगड घालण्यांत आली आहे; घालण्यांत आली आहे म्हणण्यापेक्षां अशी सांगड जमून आली आहे असें म्हणावें लागेल. या दोन दिशांनीं महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा विचार होत आहे व यांतच त्या चळवळीच्या उज्वल भवितव्याचें बीज आहे. यापैकीं प्रत्येक गोष्टीचा वेगवेगळा विचार करूं.

प्रथम "संयुक्त महाराष्ट्रा"चा व भारतीय राजकारणाचा नवा संबंध पाहूं. कांहीं थोड्या वर्षांपूर्वीच महाराष्ट्रीय अभिमानाच्या कोणत्याही बाबीला भारतीय राजकारणांत, विशेषतः कॉंग्रेसच्या परिसरांत, मज्जाव होता. अशा भावनेला 'प्रांतीय कोतेपणा' म्हणून हेटाळण्यांत येई व त्याचा विटाळ मानला जाई. पण आज पहावें तर कॉंग्रेसचे श्रेष्ठीच या चळवळीचें निशाण खांद्यावर घेऊन पुढें पाऊल टाकीत आहेत. "एकात्म महाराष्ट्र" व "संयुक्त भारत" या दोनही घोषणा एकाच व्यासपीठावरून होत आहेत. कॉंग्रेसवादी पत्रें व "केसरी" इत्यादि हिंदुत्ववादी पत्रें एकदिलानें या विषयावर अग्रलेख लिहित आहेत. हा पालट कशानें झाला? तर आज भारतीय लोकसत्तेचा उदयकाळ जवळ आला आहे व गुलामगिरीच्या

अंधाऱ्या काळरात्रींत न दिसणाऱ्या गोष्टी नजरेला पडूं लागल्या आहेत. सत्ता हातीं येणार असें दिसूं लागल्यावर गुलामगिरीच्या दावणींत एकरूप भासणारे लोकसमूह आपापलीं भिन्न स्वरूपें उमगूं लागले आहेत. " आपण सारें एकच " ही भावना जाऊन, " आपण सारे वेगवेगळे आहोंत, आपला शत्रू एक होता " अशी जाणीव उत्पन्न झाली आहे. याचबरोबर एक अशीही जाणीव आहे कीं गेलीं शेंदोनशें वर्षे आपण खांद्याला खांदा लावून एका शत्रूच्याविरुद्ध लढलों तसेंच भावी अभ्युदयाच्या काळांतही बंधुत्वानें नांदू शकूं तर बरें.

दुसरी गोष्ट लोकसत्तेच्या नव्या उदयाची. या नव्या ध्येयाचा " संयुक्त महाराष्ट्रा "शीं फार जिव्हाळ्याचा संबंध आहे. भारतीय स्वातंत्र्याबरोबर लोकसत्तेचा उदय होत आहे व त्यामुळें " संयुक्त महाराष्ट्रा " च्या चळवळीला बहुजनसमाजाच्या दृष्टीनें अर्थ व महत्व प्राप्त झालें आहे. पूर्वीच्या काळांत " भारतीय " वृत्तीचे राजकीय पुढारी " महाराष्ट्रीय " अभिमानाचा विटाळ मानीत, तीच गोष्ट बहुजनसमाजाशीं संबंध असणाऱ्या कार्यकर्त्यांची होती. ब्राह्मणेतर चळवळीमध्यें ' मराठा ' विशेषणाला एक व्यापक व महाराष्ट्रीय अर्थ येण्याची शक्यता होती व ब्राह्मणांना वगळून कां होईना पण इतर सर्व महाराष्ट्रीय समाजाच्या अभिमानाला व एकात्मता जागृत करण्याचें कार्य त्या चळवळीला साधलें असतें. पण ती चळवळ लवकरच शेतकरी बहुजनसमाजापासून दूर जाऊन राजनिष्ठेच्या चिखलांत रुतून बसली. सन १९२८ नंतर मजूर व शेतकरी वर्गांत समाजवादी व जहाल कॉंग्रेसवादी कार्यकर्ते काम करूं लागले. त्यांना या श्रमजीवि वर्गांत प्रथम वर्गीय अभिमान जागृत करणें भाग होतें. त्यांनीं " भारतीय " राष्ट्रवादाशीं वर्गीय लढ्याची सांगड घातली व ब्रिटन-विरोधाच्या समान भूमिकेमुळें तें शक्य झालें व आवश्यकही होतें. पण मराठा मजूर व मराठा शेतकरी वर्गांत " महाराष्ट्रीय "त्वाच्या अभिमानाची चळवळ करणें त्या प्राथमिक काळांत या कार्यकर्त्यांना अशक्यच होतें, व अनावश्यकहि वाटलें.

आजमात्र स्थिति पालटली आहे. तीन कोटी मराठा जनतेला स्वत्वाच्या

जाणीवेनें हलवून सोडील व लोकसत्तेला पोषक अशा जागृतीला प्रेरणा देईल असें सामर्थ्य "संयुक्त महाराष्ट्रा"च्या घोषणेंत आहे, ही गोष्ट आतां कॉंग्रेसवादी व जनतेशीं संबंध ठेवणारे जुने ब्राह्मणेतर कार्यकर्ते, समाजवादी व कम्युनिस्ट यांना पटलेली आहे. "संयुक्त महाराष्ट्र" ही कांहीं नुसती साहित्यिक व सांस्कृतिक हूल नाहीं, किंवा सुखवस्तू वर्गाची भूमिका नाहीं हें त्यांना पटलें आहे व म्हणून ती चळवळही अगदीं खालच्या थरापर्यंत जाऊन पोंचण्याची हमी देणें आतां शक्य झालें आहे.

"संयुक्त महाराष्ट्रा"चें ध्येय भारतीय स्वातंत्र्य व लोकसत्ता यांच्याशीं बिनविरोध तऱ्हेनें कसें निगडीत होईल, हाच आपल्यापुढील प्रश्न आहे. त्यासाठीं महाराष्ट्राचें एकीकरण कोणत्या तात्त्विक भूमिकेवर साधावयाचें? या प्रश्नाचें निश्चित उत्तर शोधलें पाहिजे. भारतीय राज्य हें ब्रिटन, फ्रान्स सारखें एकात्म राज्य राहील व त्या राज्याचे सोइस्कर प्रांत पाडतांना "महाराष्ट्र" हा एक प्रांत बनेल अशी एक भूमिका घेतली जाते, पण ती कशी अपुरी व असमाधानकारक आहे हें पुढील चर्चेत आपण पाहूं; दुसरीकडे, आत्यंतिक समाजवादी व लोकसत्तावादी भूमिका म्हणून अशी घेण्यांत येते कीं सर्वच तऱ्हेचा राष्ट्रवाद श्रमजीवी जनतेच्या दृष्टीनें निरुपयोगी आहे, तेव्हां "महाराष्ट्र" हा प्रांत पाडून त्याला एका भारतीय, किंवा जागतिक, नियोजनांत गोंवणें एवढेंच श्रमजीवि जनतेच्या दृष्टीनें इष्ट आहे; बाकी सर्व काथ्याकूट व्यर्थ आहे. ही भूमिकाही चूक आहे, हें सांगायला नकोच. तेव्हां संयुक्तिक भूमिका कोणची हें पाहणें जरूर आहे. त्यापूर्वी सध्यांच्या महाराष्ट्राच्या विभागलेल्या अवस्थेचा तपशील पाहूं.

## महाराष्ट्राची आजची अवस्था

आज महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाचें खंडित स्वरूप दोन तऱ्हेनीं पाहण्यासारखें आहे. एक ब्रिटिश व संस्थानी राजसत्तांमुळें विभागलेलें व दुसरें

लोकसंस्थांमुळें विभागलेलें. ब्रिटिश व इतर राजसत्तांनीं महाराष्ट्राचे असे तुकडे पाडले आहेत:—

१ कोंकण व देश १,६८,८१,०००, २ महाविदर्भ ७५,७२,०००, ३ मराठवाडा ५०,५५,०००, ४ गोवें ६,६७,०००.

मराठवाडा व गोवें येथील ५६,८२,००० जनता निरंकुश सत्तेचा छळ सहन करीत आहेच त्याशिवाय बाकीच्या भागांतील मराठी संस्थानांतून २१,७८,००० जनता तशाच जुलमाखालीं आहे. एकूण ७८,६०,००० मराठी जनता निरंकुश राजवटींत अनेक दुःखें भोगींत आहे. शेंकडा २५ टक्के मराठी लोकांची ही अवस्था! उरलेल्या लोकसंख्येची शक्तीही दोन ठिकाणीं विभागलेली आहे व ब्रिटिशांच्या जातीय भेदनीतीमुळें व दडपशाहीमुळें या खालसा भागांतील जनतेची सर्वच तऱ्हेनें कुचंबणा झालेली आहे.

या जुलमाविरुद्ध झगडणाऱ्या अनेक लोकसंस्थांचें व राजकीय पक्षांचें कार्यही सत्ताधाऱ्यांच्या विभागणीनुरूप विभागलेलें आहे. साहित्यासारख्या अ–राजकीय क्षेत्रांत ही विभागणी नाहीं. परंतु राजकीयदृष्ट्या पडलेल्या सरहद्दी ह्या सांस्कृतिक क्षेत्रांतही आपला प्रभाव काहीं वेळां दाखवितात; मग काँग्रेस वगैरे संस्थांचें कार्यच मूलतः राजकीय असल्यानें तेथें ही विभागणी अटळच आहे. उदाहरणार्थ भाषावार प्रांतरचनेचें तत्व काँग्रेसनें सन १९२०सालीं नागपूर अधिवेशनांत स्वीकारलें. परंतु त्यामुळें मराठी भाषिकांच्या काँग्रेस–जीवनांत एकात्मता आली नाहीं. गोवें व मराठवाडा सोडला, तरी उरलेल्या मराठी जनतेचे तीन 'प्रांत' करण्यांत आले. सत्ताधाऱ्यांच्या दोन प्रांतांवरही काँग्रेसचें भागलें नाहीं. मुंबईला काँग्रेसचा स्वतंत्र 'प्रांत' मानणें सोईचें ठरलें. ही सोय 'अर्थपूर्ण' होती, असें म्हणण्याची पाळी आज आली आहे! कारण धनिक वर्गाला हवी असलेली अशी ही योजना आहे, असें अनेक घटनांवरून दिसत आहे. सन १९४६ मध्यें, युद्धामुळें भर पडून मुंबईकर

मराठ्यांची संख्या १३,००,००० पर्यंत गेली असावी. यांना महाराष्ट्रांतून वगळणें कोणत्याही दृष्टीनें योग्य नाहीं; विशेषत: राष्ट्रीय संस्थेच्या कारभारांत मुंबईला असें अलग पाडणें मराठी जनसमाजाच्या दृष्टीनें घातुकच आहे. हीच गोष्ट कलकत्त्याचें उदाहरण घेऊन स्पष्ट दिसेल. मुंबईप्रमाणेंच कलकत्तादेखील एक उपटसुंभ ब्रिटिशनिर्मित वस्ती आहे. तेथें बंगाली फक्त शेंकडा ५४ आहेत व हिंदीभाषिक शेंकडा ३६ आहेत. बंगाली न बोलणाऱ्यांचा एक इतका मोठा भाग असूनही कलकत्त्याला बंगालच्या बाहेर ठेवलेलें नाहीं; उलट मुंबईंत मराठेतर समाजाचे गटही फार लहान असून, त्या शहराला 'सार्वजनिक' समजण्यांत आलें आहे. दिल्ली शहराला एक वेगळा 'प्रांत' बनवून टाकण्याचा जो प्रकार ब्रिटिशांनीं केला आहे, त्याची ही एक आवृत्ति म्हणावयाची !

## विभागणी कशी रद्द करावयाची

वर वर्णन केलेली छिन्नविछिन्न अवस्था आज महाराष्ट्राच्या वांट्याला आलेली आहे व ही विभागणी रद्द झाली पाहिजे या मुद्यावर 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीची उभारणी झाली आहे. परंतु केवळ विभागणी रद्द करणें हें संपूर्ण राजकीय ध्येय होऊं शकत नाहीं ती रद्द करून त्या जागीं ज्या "संयुक्त महाराष्ट्राची" स्थापना व्हावयाची त्या नव्या राजकीय घटकाचें स्वरूप, दर्जा वगैरे बाबी आतांच निश्चित केल्या पाहिजेत. सुदैवानें हा विधायक प्रश्नही आतां धसाला लागत आहे व ता. १३ एप्रिल १९४७ रोजीं भरलेल्या जळगांवच्या परिषदेंत ह्या प्रश्नावर बराच खलहि झाला आहे.

"संयुक्त महाराष्ट्राचा" दर्जा कोणचा ? या प्रश्नाची चर्चा होण्याचें मुख्य कारण म्हणजे जळगांव येथें वऱ्हाडी प्रतिनिधींनीं घेतलेली "स्वायतत्ते" ची भूमिका होय. डॉ. पंजाबराव देशमुख प्रभृती वऱ्हाडच्या पुढाऱ्यांनीं असा आग्रह धरला कीं, वऱ्हाडचें भवितव्य ठरविण्याचा अधिकार "संयुक्त परिषदेला" नसून वऱ्हाडच्या लोकांचा आहे. यावर श्री. शंकरराव देव व श्री. पोतदार यांनीं असें स्पष्टपणें मांडलें कीं, "संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा" ठराव

वऱ्हाड व इतर मराठी भाषिक प्रदेशावर बंधनकारक राहील. कोणत्याही प्रादेशिक विभागास, (उदाहरणार्थ वऱ्हाडला), आपले प्रश्न स्वतंत्रपणें सोडविण्याचा अधिकार नाहीं, ही गोष्ट जळगांव परिषदेनें अखेर मंजूर केली.

या प्रश्नाला किती महत्त्व आहे हें कळण्यासाठीं मागील एकाच घटनेचा उल्लेख केला तर पुरे. वऱ्हाडवर आपलें स्वामित्व सांगण्याचा उपक्रम निजामानें अलीकडे जोरानें सुरू केला आहे व खुद्द वऱ्हाडमध्येंच आपला तसा प्रचार सुरू केला आहे. अमरावती येथील श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीच्या "हैद्राबाद इमारतीला" निजामानें दोन लाख रुपये दिले व ता. १० एप्रिल १९४७ रोजीं सर मिर्झा इस्माइल यांच्या हस्तें या इमारतीची कोनशिला बसविण्यांत आली. त्या सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांनीं मिर्झासाहेबांना हें आमंत्रण दिलें होतें व समारंभाच्या प्रसंगीं मिर्झासाहेबांनीं वऱ्हाडसंबंधीं आपली "आपुलकीची" भावना व्यक्त केली; निजामची वऱ्हाडवर स्वारी होणार असा प्रचार करूं नये असें याच डॉ. पंजाबराव प्रभृतीं पुढाऱ्यांनीं अलीकडे म्हटलेलें आढळतें. सारांश, वऱ्हाडमधील वरिष्ठ वर्ग व कांहीं पुढारी निजामला अनुकूल असें धोरण ठेवीत आहेत, असा दाट संशय वऱ्हाडच्या व महाराष्ट्राच्या लोकांना साहजिकच येत आहे. कांहीं पुढाऱ्यांच्याकडून वऱ्हाडच्या "स्वायत्तते"ची जी मागणी होत आहे ती निजामराज्यांत सामील होण्याच्या "दूरदृष्टीनें" होत आहे, अशी साधार भीति वाटूनच जळगांवला या प्रश्नावर एवढें रण माजलें व श्री. देव प्रभृति पुढाऱ्यांनीं निजामधार्जिण्या प्रवृत्तींचें हें "बंड" मोठ्या कणखरपणानें मोडून काढण्यांत यश मिळविलें ही लोकसत्तेच्या दृष्टीनें फार चांगली गोष्ट झाली.

## वऱ्हाड हा प्रांतच

जळगांवच्या या चर्चेतून तात्त्विक दृष्टीनें काय निघतें पाहूं. एक गोष्ट तेथें स्पष्ट झाली कीं वऱ्हाड हा एक प्रांत आहे व त्याला स्वयंनिर्णयाचा हक्क नाहीं;

उलट तो एक महाराष्ट्राचा एक भाग आहे व महाराष्ट्राची **सार्वभौम सत्ता** त्यानें मान्य केली पाहिजे. असें जर आहे तर महाराष्ट्र हा देखील एक प्रांतच आहे कां ? एका प्रांतांतील पोट-प्रांत असें वऱ्हाडचें स्थान आहे काय ?

या प्रश्नाला निर्णायक उत्तर दिलें पाहिजे व जळगांवला श्री. देव प्रभृती पुढाऱ्यांच्या भाषणांतून याला बरेंच स्पष्ट उत्तर मिळालें असें म्हणावयास हरकत नाहीं. महाराष्ट्र हें भारतीय संघराज्याचें एक **घटक राष्ट्र** आहे असे उद्गार श्री. देव यांनीं काढले, असें कांहीं वृत्तपत्रांतून आलें आहे. 'केसरी'च्या ता १८-४-४७ च्या अंकांत, जळगांवचा अहवाल आहे त्यांत वरील उद्गार दिलेले नाहींत, पण असें उद्गार दिले आहेत कीं, "हिंदी संघराज्य एक **बहुजिनसी** राज्य म्हणूनच राहील. हें तत्व कॉंग्रेसनें मागेंच मान्य करून भाषावार व सांस्कृतिक **प्रांतरचनेचें** तत्व मान्य करून प्रत्येक **प्रांत** एक **राज्य** व्हावा अशी आपली भूमिका मांडली आहे. अशा या भावी संघराज्याचा आपला महाराष्ट्र हा एक प्रबल **घटक** राहील." (अधोरेखन माझें)

हा उतारा प्रत्यक्ष भाषणाशीं संपूर्णपणें जुळणारा नसेल; परंतु आपल्या तात्विक विवेचनासाठीं त्याचा तात्पुरता आधार मी घेत आहे. यामध्यें प्रथमच एक गोष्ट मांडली आहे ती अशी कीं भावी हिंदी राज्य एकजिनसी नसून बहुजिनसी आहे—संघराज्य आहे. श्री. देव यांनीं ता. १२-४-४७ रोजीं मुंबईत भरलेल्या "हिंदुस्तानी परिषदे"मध्यें हीच गोष्ट पर्यायानें मांडली. ते म्हणाले कीं हिंदुस्तानी संबंधीं राष्ट्रभाषा हा शब्दच मुळांत गैरसमज पसरविणारा असून हिंदुस्थान एक राष्ट्र होणार नसून तो एक संघराज्य होणार असल्यामुळें त्याला एका संघराज्याच्या (फेडरल) भाषेची जरूरी आहे." ("लोकमान्य", ता. १८-४-४७, श्री. नी. द. पंडित यांचा लेख पहा). यावरून हिंदी संघराज्य 'बहुजिनसी' आहे असें मांडतांना श्री. देव यांना काय अभिप्रेत होतें तें स्पष्ट दिसतें—ज्या अनेक "जिनसांचें" हें संघराज्य बनावयाचें ते म्हणजे वेगवेगळीं घटक राष्ट्रें आहेत असा त्यांच्या म्हणण्यातून निष्कर्ष निघतो. "प्रत्येक

प्रांतानें **राज्य** बनावें " ही भूमिकादेखील तेंच दाखवितें. परंतु, हिंदुस्थान एकराष्ट्र नसून बहुजिनसी आहे हें सांगूनही घटकांना प्रांताचा दर्जाच ते देतात व त्यांना **राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क** न देतां "**भाषावर व प्रांतिक स्वायत्तता**" देऊं करतात, हें विसरून चालणार नाहीं.

## महाराष्ट्राचें राष्ट्रीय एकीकरण

महाराष्ट्र हा 'प्रांत' कीं 'राष्ट्र' या प्रश्नावर आज अशी संदिग्ध भूमिका स्वीकारल्यामुळें "संयुक्त महाराष्ट्राच्या" चळवळीचें राजकीय ध्येय कमकुवत रहात आहे असें मला वाटतें. आज अशी स्पष्ट निसंदिग्ध भूमिका जाहीर करण्याची वेळ आली की महाराष्ट्र हें एक राष्ट्र आहे व ते हिंदी संघ-राज्यांत आपखुषीनें सामील होईल. एकदां ही भूमिका घेतली कीं वऱ्हाडच्या प्रश्नासारखे अंतर्गत प्रश्नही सहज सुटतील. वऱ्हाड, मराठवाडा इत्यादि प्रदेशांतील जनतेच्या सार्वत्रिक मतदानानेंच त्या प्रदेशांचा महाराष्ट्रांत अंतर्भाव व्हावा हें लोकशाहीचें तत्व मान्य करूनही संयुक्त महाराष्ट्राचा दर्जा एका घटकराष्ट्राचा राहील, अशी निश्चित भूमिका आपल्याला घेतां येईल; व त्यामुळें भारतीय राजकारणाशीं आपला संबंधही स्पष्ट होईल.

आज महाराष्ट्राचे राजकीय एकीकरण होण्यास संस्थानें व पोर्तुगीज सत्ता यांचा अडथळा आहेच; पण तो बाजूला ठेवला, तरी मुंबई व महाविदर्भ यांच्या स्वायत्ततेचा प्रश्न उभा राहतो; व याचें मूळ कारण शोधून काढलें पाहिजे. मुंबईच्या बाबतीत स्वायत्ततेचा अर्थ मराठेतर धनिक वर्गाची वेगळेपणाची इच्छा अशी आहे; व महाविदर्भाच्या बाबतींत हीच गोष्ट कांहीं अशीं लागू पडण्याचा संभव आहे. केवळ राज्यकारभाराची सोय किंवा इतर बाबी घेतल्या तरी ही मुंबई, महाविदर्भ व इतर महाराष्ट्र यांचें एकीकरण करणें फायद्याचे ठरेल, हें कोणालाही दिसेल. परंतु या तीन विभागांतील व्यापारी व कारखान-दार वर्गाला चालू गटबारी व प्रादेशिक मक्तेदारी मोडणें नको आहे. एकीकर-णाच्या चळवळीला सुरवात करतांनाच ही फुटीरपणाची वृत्ति पुढें आली आहे;

व तिच्यामागें मोठमोठे पुढारी व प्रबळ वर्ग आहेत, ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. यावरून एक निष्कर्ष निघतो तो असा कीं, महाराष्ट्राचें जें एकीकरण सामान्य मराठी माणसाला हवें, त्या एकीकरणाचा तात्विक पाया काय, याचें स्पष्ट निर्णयात्मक उत्तर दिलें पाहिजे; तरच सर्व प्रकारच्या फुटीरपणावर योग्य ती तोड निघेल.

यासाठींच, महाराष्ट्राचें राजकीय एकीकरण **राज्यकारभाराच्या** किंवा तसल्याच **मर्यादित सोयीसाठीं नाहीं,** हें अगदीं स्पष्ट करून **या एकीकरणाला राष्ट्रीय एकीकरणच म्हटलें पाहिजे,** असें मला वाटतें.

नुसतें राष्ट्रीय एकीकरण म्हटल्यानें महाराष्ट्राचे प्रश्न सुटणार नाहींत, उलटपक्षी अनेक शंका नव्यानें उभ्या राहतील, हें खरें. राष्ट्रीयत्वाचें एक स्वरूप आक्रमक, जनताद्रोही व फुटीरपणाला पोसणारें असतें, हेंहि विसरून चालणार नाहीं; महाराष्ट्राचें 'राष्ट्रीय एकीकरण' त्या स्वरूपाचें होऊं न देण्याबद्दल खबरदारी घ्यायला हवीच. मी ज्या 'राष्ट्रीय एकीकरणा'चा पुरस्कार करीत आहे, तें लोकाभिमुख आहे व संयुक्त भारताच्या वैभवशाली भवितव्याशी पूर्णतः सुसंगत आहे. आज राजकीय एकीकरणाचा प्रश्न या निश्चित राष्ट्रीय पायावर आलेला नाहीं. त्यामुळें निव्वळ राज्यकारभाराची सोयीची दृष्टि व धनिकवर्गाचा फुटीरपणा यामुळें एकात्म महाराष्ट्र बनविणेंच अशक्य होत आहे. आणि 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे'ला निव्वळ भाषिक व सांस्कृतिक ऐक्यासाठीं धडपडणाऱ्या परिषदेचें स्वरूप येण्याचा धोका आहे.

एकदां महाराष्ट्राचें एकीकरण राष्ट्रीय स्वरूपाचें आहे हें ओळखलें कीं भाषिक, सांस्कृतिक, वगैरे गौण बाबींचें महत्त्व तारतम्यानें कळतें. या उपांगाचें एकीकरण हे राष्ट्रीय एकीकरणाचेंच भाग आहेत, हें बहुजनसमाजालाही उमगेल. अशा सर्वांगीण राष्ट्रीय एकीकरणाच्या ध्येयाला जर केवळ मूठभर धनिक वर्गाचा विरोध झाला, तर तो फार बळावूं शकणार नाहीं. राष्ट्रीय एकीकरणाच्या लोकसत्तावादी ध्येयानें प्रेरणा मिळालेला सुशिक्षित वर्ग, शेतकरी वर्ग

व कामकरी वर्ग मूठभर धनिक वर्गाच्या फुटीरपणाला आळा घालण्यास समर्थ ठरेल. आज केवळ सनदशीर राजकारणाची व नफातोट्याची दृष्टि ठेऊन वरिष्ठ वर्गाला ज्या एकीकरणाचा विचार करावासा वाटतो, तीच घोषणा ब्रिटिश सत्ते-विरुद्ध व संस्थानिकांविरुद्ध लढणाऱ्या जनतेला प्रिय वाटूं लागेल. ज्या लोकनिष्ठ राष्ट्रभावनेच्या जोरावर पूर्व यूरोपमधील राष्ट्रें व आशियाखंडांतील राष्ट्रें ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यवादाविरुद्ध लढत आहेत, ती राष्ट्रभावना जितकी प्रभावी तितकीच प्रगतिशीलहि आहे. तशा राष्ट्रभावनेनें मराठी जनसमाज उचंबळून निघण्यासाठीं भाषिक, प्रादेशिक व परंपरानिष्ठ अशा ऐक्याबरोबरच महाराष्ट्राच्या राष्ट्रीय एकीकरणाची घोषणाच झाली पाहिजे.

## महाराष्ट्र हें हिंदी संघराज्याचें घटकराष्ट्र

वरील स्पष्ट राष्ट्रीय भूमिका आज घेतली जात नाहीं याचीं कारणें मी पुढील प्रकरणांतून तपासलीं आहेत. सन १९२० च्या पूर्वी महाराष्ट्रीय पुढारी महाराष्ट्राला राष्ट्र समजत होते व आजही ती भूमिका "बेसावधपणें" घेतली जाते, याविषयीं अनेक पुरावे मी पुढें दिले आहेत. तसेंच महाराष्ट्राला केवळ **अर्वाचीन राष्ट्र** समजणें रास्त असून महाराष्ट्रीय राष्ट्रीयत्वाचा उदय शिवकालांत झाला हें मानणें ही चूक आहे याची विस्तृत चर्चा मी सातव्या प्रकरणांत केली आहे. तूर्त मराठी राष्ट्रीयत्वाविषयीं पुढें सविस्तरपणें मांड-लेल्या विवेचनाचा मी गोषवारा देणार आहे, म्हणजे या राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरून महाराष्ट्रीय व भारतीय लोकसत्तेच्या विशाल व क्रांतिकारक भवितव्याकडे पाहणें कसें शक्य होतें तें दिसेल.

महाराष्ट्र हें राष्ट्र मानलें म्हणजे साहजिकच हिंदी राज्य हें अशा अनेक राष्ट्रांचें **बहुराष्ट्रीय संयुक्त राज्य** ठरतें. या संयुक्त (किंवा 'संघ') राज्याचें बहुराष्ट्रीयत्व मानावें कीं न मानावें अशा संशयाकुल मनःस्थितींत आज आपले बरेच पुढारी आहेत. हिंदी संयुक्त राज्याला "एकराष्ट्रीय" मानण्याची प्रवृत्तिच बहुतेक वेळीं दिसून येत आहे. वर उल्लेखिलेल्या "हिंदुस्तानी परिषदे" मध्यें श्री. कालेलकर व श्री. मुनशी यांनीं हिंदुस्थानीला "राष्ट्रभाषा" ठरविलें

व त्यासाठीं कारण म्हणून हें दिलें कीं हिंदी राज्यघटना एकात्म ( युनिटरी ) किंवा संयुक्त ( फेडरल ) कशीही असली तरी हिंदुस्थान हें एक राष्ट्रच आहे व त्याची राष्ट्रभाषा असलीच पाहिजे ! अशाच विचारसरणीचा दुसरा नमुना आपल्याला "केसरी"च्या ता. १८ ४·४७ च्या अग्रलेखांत आढळेल. महाराष्ट्राच्या एकीकरणाचा आत्मा "मराठ्यांचें राष्ट्रीयत्व" आहे असें प्रथम स्वीकारूनहि पुढें "भाषावार प्रांतरचनेचें" तत्वच त्यांत उच्चारलें आहे. अशा प्रांतिक घटकांचें हिंदी "**संघराष्ट्र**" निर्माण करावयास हवें असें केसरीकरांनीं म्हटलें आहे. परंतु "**संघराष्ट्र**" व "**संघराज्य**" यांत मूलतःच भेद आहे. अमेरिका, स्वित्झर्लंड सारखीं एकराष्ट्रीय राज्यें प्रांतिक स्वायत्ततेमुळें "संघराष्ट्रा" सारखीं मानलीं जातात; उलटपक्षीं, "संघराज्य" हें अनेकराष्ट्रीय राज्य असतें; ती राष्ट्रसंघाच्या पलीकडची एक पायरी असते. सार्वभौम राष्ट्रांनीं एकत्र येऊन बनविलेलें तें एक राज्य असतें. महाराष्ट्राचें राष्ट्रीयत्व मानल्यावर हिंदी "संघराष्ट्रा"चें ध्येय उरतच नाहीं व "संघराज्याचें" ध्येय पुढें ठेवावें लागतें.

महाराष्ट्र, बंगाल, नेपाळ इत्यादि प्रदेश भारतीय राष्ट्रें आहेत, याच मूलभूत भूमिकेवरून भारताच्या अशा संघराज्याची कल्पना आजपर्यंत भारतीय राजकारणांतहि वारंवार मानलीं गेलेली आहे. संघराज्याच्या कल्पनेला ब्रिटिशांनीं प्रारंभ केला व आज त्या संघराज्याचें भवितव्य संस्थानिक व पाकिस्तानवादी मुस्लीम-लीग ठरविणार, असें साम्राज्यवादी कावेबाजपणानें सांगत आहेत. आपल्या भेदनीतीला अवसर सांपडावा यासाठीं संघराज्याची कल्पना ब्रिटिशांनीं अशी वापरली हें खरें. पण, तेवढ्यावरून संघराज्याची कल्पनाच लोकशाहीला विरोधी मानणें घातुक ठरेल. उलटपक्षीं भारताचें बहुराष्ट्रीय संघराज्यच स्थिर व प्रबळ होऊं शकेल, अशी भूमिका घेणें जरूर आहे.

## सक्तीचें संघराज्य नको

या ठिकाणीं, महाराष्ट्र व संयुक्त भारत यांच्या परस्पर संबंधाचा मुद्दा

येतो. हा संबंध आजच्या प्रमाणें सत्तावर अवलंबून असावा काय? आजचें प्रांत मध्यवर्ती सत्तेच्या दावणीत सक्तीनें बांधलेले आहेत; त्यामुळें रेल्वे, तारायंत्र इत्यादि वाहतूक, लष्कराचें संघटन व संचालन, आर्थिक नियोजन, अन्न-व्यवस्थेची अखिल-भारतीय आखणी वगैरे बाबी ब्रिटिश सत्तेला पार पाडतां येतात. अशीच प्रबळ मध्यवर्ती सत्ता असल्याशिवाय ह्या गोष्टी कशा होणार? तेव्हां या भारतीय व्यवस्थेसाठीं संघराज्य असलें तरी तें सक्तीचें असावें, असा आज बहुतेक लोकांचा समज झाला आहे. पाकिस्तानच्या प्रचाराला तोंड देतांना कॉंग्रेसवादी व हिंदुसभावादी पुढाऱ्यांनीं सक्तीच्या संघराज्याची ही कल्पनाच जनतेपुढें मांडली आहे; व या पक्षांच्या बहुसंख्य अनुयायांनीं तीच स्वीकारली आहे.

या बाबतीत मराठी राष्ट्रवादाच्या भूमिकेवरून पाहणें आज अत्यंत आवश्यक आहे. भारतीय संघराज्याचे घटक महाराष्ट्र, बंगाल इत्यादि राष्ट्रें आहेत, ही गोष्ट एकदां स्पष्टपणें स्वीकारली, म्हणजे अशा राष्ट्रांचें सक्तीनें संघराज्य बनविणें लोकशाहीच्या तत्वाशीं अगदीं विसंगत ठरतें. प्रत्येक राष्ट्र हें स्वयं-निर्णयानें, म्हणजेच आपखुषीनें, भारतीय संघराज्यांत सामील झालें तरच त्या संघराज्याला खऱ्या अर्थानें स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या पायावर उभारलेलें राज्य म्हणतां येईल. या बाबतींत प्रत्यक्ष राजकीय प्रगतीची दिशा पाहिली तरी असें दिसतें कीं, महाराष्ट्रासारखीं भारतीय राष्ट्रें आपखुषीनेंच संघराज्यांत सामील होतील, कारण ब्रिटिश सत्तेविरुद्ध चाललेल्या लढयांत भाग घेणाऱ्या प्रत्येक राष्ट्रांतील जनतेला शेजारच्या जनतेबद्दल व राष्ट्राबद्दल जिव्हाळा वाटत आहेच. या संघराज्याला धार्मिक किंवा जातीय संघटनांकडून धोका आहे, असें आज दिसतें. पण तो धोका ब्रिटिश आहेत त्यामुळें आहे. आज राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्वाचा भयंकर विपर्यास होत असून, धार्मिक भावनांच्या पायावर जनतेमध्यें यादवी माजविली जात आहे. सर्व मुसलमान एका "पाकिस्तान" राष्ट्राचे नागरिक आहेत, असा लीगचा प्रचार चालू आहे व त्यावर तोड म्हणून भारताला एकात्म राष्ट्र मानण्याची चूक कॉंग्रेस व इतर पक्ष करीत आहेत.

त्यामुळें त्याच्या प्रचाराला जास्तच धार येत आहे. खरीखुरी संघराज्याची व स्वयंनिर्णयाची कल्पना यादवीला व फाटाफुटीला कारण न होतां, संयुक्त व शक्तिमान भारताच्या संघटनेला उपयोगी ठरणार आहे, हें साधें सत्य मात्र सगळ्यांना दिसेनासें झालें आहे.

## राष्ट्रीय एकीकरणाचा आधार शेतकरी

महाराष्ट्राला एकात्म राष्ट्र मानून त्याला एका बलाढ्य भारतीय संघराज्याचें घटक–राष्ट्र मानणें, हाच आज महाराष्ट्राच्या एकीकरणाचा आत्मा आहे. महाराष्ट्रांचें शेजारच्या राष्ट्रांशीं व एकंदर भारताच्या संघराज्याशीं असणारे संबंध लोकशाहीच्या व समतेच्या पायावर उभारलेले असतील, हें वर सांगितलेंच. परंतु, हें होण्यासाठीं महाराष्ट्रामध्येंच लोकशाही व समता यांची स्थापना झाली पाहिजे. राष्ट्राच्या अंतर्गत जीवनांत ज्या मानानें लोकशाही असते, त्या मानानेंच त्याचें परराष्ट्रीय धोरण लोकशाहीच्या निष्ठेनें चालूं शकतें, हें सूत्र या बाबतींत अनुभवाला येतें. उदाहरणार्थ, शिवकालापूर्वीच्या, शिवकालांतल्या व नंतरच्या मराठेशाहीमधल्या राज्यविषयक कल्पना लोकसत्तेवर आधारलेल्या नव्हत्या; उलटपक्षीं, एकीकडे निरंकुश राजसत्ता व दुसरीकडे स्वायत्त ग्रामसंस्था व वतनसंस्था यांच्या पायावर त्या काळांतील समाजाचें राजकीय जीवन रचलेलें होतें. त्यामुळें त्या सर्व कालखंडांत कर्नाटकादि परराष्ट्रांशीं व भारताशीं महाराष्ट्रानें जे संबंध ठेवले, ते लोकशाहीच्या, स्वयंनिर्णयाच्या किंवा समतेच्या तत्वावर आधारलेलें नव्हते; तसे आधारले जाण्याची शक्यताच नव्हती व तशी कल्पना किंवा अपेक्षाहि त्या कालासंबंधानें करून घेणें वायफळ ठरेल. मराठ्यांचें त्या वेळचें राजकारण मोंगल साम्राज्यसंस्थेच्या कित्याबरहुकूम चाललें होतें; व त्यांतच मराठ्यांच्या सत्तेच्या चढउताराची व यशापयशाची कारणमीमांसा लागते.

## पांढरपेशांचा बहुरंगी राष्ट्रवाद

ब्रिटिश अमदानीमध्यें ग्रामसंस्था, वतनसंस्था व राजसत्ता ह्या तीन

संस्थांचा स्थिर त्रिकोण उध्वस्त झाला; व आंग्लशिक्षित नवा सुशिक्षित वर्ग, ग्रामसंस्थाविहीन नवा शेतकरी वर्ग, कामकरी वर्ग इत्यादि अगदी नवे वर्ग निर्माण झाले. यांपैकीं सुशिक्षित वर्गानें ब्रिटनविरोधी लढयाला सुरवात करतांना धार्मिक व सांस्कृतिक राष्ट्रीयत्वाची घोषणा केली. या घोषणेमध्यें प्रादेशिक राष्ट्रीयत्वाची कल्पनाहि बीजरूपानें स्वीकारण्यांत आली होती, असें लोकनायक अणे, राजवाडे प्रभृतींच्या विचारांवरून दिसून येतें; तरी एकंदरींत पाहतां सुशिक्षितांचा राष्ट्रवाद हा धर्म, संस्कृति, भाषा, प्रदेश वगैरे विभिन्न अंगाशीं वेळ व संधि सांपडेल त्याप्रमाणें एकांगीपणानें समरस होत गेला. त्या राष्ट्रवादामध्यें धरसोड व अतिरेकीपणा दिसतो; कधीं ह्या राष्ट्रवादाचें रूप 'अखिल भारतीय' बनतें, तर कधीं धार्मिक बनतें; कधीं तें 'धर्मनिरपेक्ष'हि बनतें तर कधीं 'प्रांताभिमानाच्या' अभिनिवेशाने प्रादेशिक बनतें. आज घटकेला हिंदु व मुसलमान सुशिक्षित वर्गाचा राष्ट्रवाद या धरसोडीमुळें व एककल्लीपणामुळें वेगवेगळीं रूपें घेतांना दिसत आहे. 'संयुक्त भारताच्या रचनेच्या कार्यांत अडथळे निर्माण करण्याचें ब्रिटिशांचें मायावी धोरण पांढरपेशांच्या या बहुरंगी राष्ट्रवादामुळें सुकर होत आहे.

या परिस्थितीला तोड काढणें प्राप्तच आहे. ती तोड मात्र 'अखिल भारतीय,' 'धार्मिक' किंवा नुसत्या 'धर्मनिरपेक्ष' परंतु अप्रादेशिक अशा राष्ट्रवादाच्या अपसिद्धांतांत सांपडणार नाहीं. महाराष्ट्रासारख्या प्रदेशांना व लोकसमूहांना संयुक्त भारताचे राष्ट्रीय घटक समजण्याचा खरा मार्ग आहे. त्यासाठीं राष्ट्रवादाचें अधिष्ठान संकुचित बळाच्या व धरसोडी वृत्तीच्या सुशिक्षित वर्गावर ठेऊन उपयोगी नाहीं; उलटपक्षीं, महाराष्ट्राच्या शेतकरी वर्गाची अतिशय विस्तृत, स्थिर व भक्कम बैठक या राष्ट्रवादाला मिळवून दिली पाहिजे. राष्ट्रवादाचा खरा आधारस्तंभ व खरा क्रांतिकारक पुरस्कर्ता व लढवय्या म्हणजे शेतकरी वर्गच होय, हें आज महाराष्ट्रीय व भारतीय राष्ट्रवादी राजकारणाचें मुख्य सूत्र बनलें पाहिजे.

## संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणेचा क्रांतिकारक अर्थ

शेतकरी वर्गाची स्थिर भुमिका मराठी राष्ट्रीयत्वाला मिळाली कीं ' संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें ' कार्य व त्याचा व्याप एका निराळ्याच स्वरूपांत दिसूं लागतो. " मुंबई वगळावी कीं महाराष्ट्रांत धरावी ? ", " महाराष्ट्राची राजधानी कोणती ? एक कीं दोन ? " " प्राचीन ऐतिहासिक पुराव्या-प्रमाणें बेळगांव हें मराठ्याचें कीं कर्नाटकाचें ? " हे परिषदेपुढचे आजचे प्रश्न गैरलागू तरी वाटूं लागतात किंवा त्यांचीं उत्तरें झपाझप मिळतात. साहित्य, भाषा, इतिहास वगैरे प्रश्नांना गौणत्व येऊन ते एका मोठ्या निकराच्या महाप्रश्नांत सामावून जातात. तो प्रश्न कोणता ? तर, आधुनिक मराठी राष्ट्र-भूमिचा मालक असा जो शेतकरी त्याच्या सर्वांगीण दास्यविमोचनाचा प्रश्न. हा मोठा प्रश्नच सोडविण्यासाठीं कंबर कसली कीं बाकीचें प्रश्न कसे आपोआप सुटतात पहा: आज ५०,००,००० मराठे शेतकरी निजामराज्यांत भरडले जात आहेत. त्यांचा त्या सत्तेविरूद्ध लढा चालू आहेच. परंतु या लढ्यांत मराठा शेतकऱ्यांच्याच दावणींत दुःख भोगणारे आंध्र व कानडी शेतकरी लाखोंनीं सहभागी आहेत. महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक अशा तीनही राष्ट्रांतील लाखों शेतकऱ्यांना एकाच हुकूमशाहीविरुद्ध सामना द्यावयाचा आहे. ह्या लढ्या-मध्यें त्यांची एकजूट राहणें व स्नेहभाव टिकाऊ होणें क्रमप्राप्त आहे. हा लढा यशस्वी होतांच निजामशाहीखालील मराठे शेतकरी व दुसऱ्या दोन राष्ट्रांचे शेतकरी आपापल्या मूळ राष्ट्रभूमीचे भाग बनतील. त्यावेळीं, महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक या तीन शेजारी राष्ट्रांचे स्नेहसंबंधहि या लाखों शेतकऱ्यांच्या स्नेहामुळें केवढ्या तरी स्थिर पायावर उभारले जातील !

## सरहद्दी सलोख्यानें ठरतील

निजामशाहीच्या नाशानें 'संयुक्त महाराष्ट्र', 'संयुक्त आंध्र' व 'संयुक्त कर्नाटक' या तीन राष्ट्रांचें राजकीय एकीकरण जसें पूर्ण होईल, तसेंच त्यांचे पर-स्परसंबंधहि संस्थानी शेतकऱ्यांच्या या संयुक्त लढ्यांतच नव्यानें बनविले जातील

व टिकाऊ होतील. ही गोष्ट महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सरहद्दीवर पसरलेल्या मराठी संस्थानांसंबंधानेंहि म्हणतां येईल. कांहीं संमिश्र वस्तीचीं व कांहीं पूर्णपणें कानडी वस्तीची अशी ही मराठी राज्यें गतवैभवाचीं स्मारकें असोत, पण आज खऱ्या राष्ट्रीय एकीकरणाच्या आड येणारीं तीं विघ्नें आहेत. त्यांच्यामुळें महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यामधील सरहद्द काढणें दुरापास्त आहे; व या मराठी राज्यांतील ७,००,००० कानडी प्रजा महाराष्ट्रीय राजसत्तेचा, नोकरशाहीचा व पर्यायानें मराठी भाषेचा, इतिहासाचा व जनतेचाहि द्वेष करीत आहे. यातून मार्ग कोणता ! तर, या राज्यांतील कानडी व मराठी शेतकरी प्रजेनें एकजुटीनें लढून स्वतंत्र झालें पाहिजे व त्या एकजुटीच्या पायावर मराठी व कानडी शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या राष्ट्रभूमींच्यामधील सरहद्द या लोकांनींच सलोख्यानें ठरविली पाहिजे.

याच मार्गानें गोव्याचा प्रश्नहि सुटणार आहे. तेथील ख्रिश्चन व हिंदु शेतकऱ्यांच्या शक्तींचें संघटन व संयुक्तीकरण झाल्याशिवाय, पोर्तुगीझ सत्ता उलथून टाकतां येणार नाहीं. उलट ख्रिश्चन विरुद्ध हिंदु अशा यादवीचें ओंगळ स्वरूप देऊन जनतेमध्यें फूट पाडणें सत्ताधाऱ्यांना शक्य होईल. निव्वळ पांढरपेशांच्या चळवळीमुळें अशीच परिस्थिति निर्माण होईल. तेव्हां, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचें यश शेवटीं संस्थानांतील व बाहेरील बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या जागृतीवर व चळवळीवरच अवलंबून राहणार, हें उघड आहे. नेमकी हीच गोष्ट आज संयुक्तीकरणाच्या व्यासपीठावर जोरानें उच्चारली जात नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

## घोषणेचा क्रांतिवादी आत्मा

'संयुक्त महाराष्ट्रा' च्या घोषणेचा खरा आत्मा, माझ्या मतें, असा राष्ट्रीय, **क्रांतिवादी व मूलगामी** आहे. नुसत्या भाषिक किंवा प्रांतिक स्वरूपाच्या एकीकरणानें सुशिक्षितांच्या महाराष्ट्रप्रेमाचें समाधान होईल असें धरून चाललें तरी त्या एकीकरणानें आज जो व्यापक राष्ट्रीय एकीकरणाचा निक-

हीचा प्रश्न आहे, तो सुटणार नाहीं. उलटपक्षीं, एकदां परिषदेच्या चळवळीला राष्ट्रीय एकीकरणाची बैठक मिळाली व शेतकरी वर्गाचें अधिष्ठान लाभलें कीं, त्या चळवळीचा व्याप व प्रखरता वाढतच जाईल व नवा, एकात्म महाराष्ट्र उदयास आणण्याचें कार्य पार पडूं शकेल. शेतकरी वर्गाला या राष्ट्रीयत्वाची जाणीव करून देणें, तेलगू, कानडी व मराठी शेतकऱ्यांच्या प्रचंड क्रांतिकारक सामर्थ्याचें संयुक्तीकरण करून संस्थानें व ब्रिटिश सत्ता यांच्या विरुद्ध यशस्वी लढा उभारणें व बहुजनसमाजाच्या लोकसत्तात्मक राजकारणाच्या अधिष्ठानावर भारतीय संघराज्याची रचना करणें हीं कामें यापुढें निकडीनें पार पाडावयाचीं आहेत. त्यांत सुशिक्षित वर्ग व शहरी कामगार वर्ग यांच्यावरहि मोठी कामगिरी व जबाबदारी आहे. बहुसंख्य शेतकरी वर्गापर्यंत ह्या राष्ट्रीय लोकसत्ताक चळवळीचें लोण पोंचविण्याचें काम या शहरी वर्गाचें आहे. 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे' चें कार्यहि याच दिशेनें झाल्यास तें राजकीय दृष्ट्या प्रभावी होणार आहे.

## संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें ब्रीदवाक्य

ह्या राष्ट्रीय एकीकरणाचें ध्येय जेव्हां पूर्ण होईल तेव्हां मराठी व इतर राष्ट्रीय लोकसमूहांचें नुसतें ब्रिटिशांपासून दास्यविमोचन होईल एवढेंच नव्हे तर अनेक शतकांचें कार्य पुरें होईल. कारण, आज आधुनिक महाराष्ट्र हें राष्ट्र म्हणून नांदणें शक्य होण्यास अनेक शतकांची अनेकविध पूर्वतयारी व तपश्चर्या कारणीभूत झाली आहे. महानुभावांनीं व संतांनीं मराठी भाषेचा पाया घातला व तिची वाढ केली; शिवकालीन मुत्सद्यांनीं व खुद्द शिवाजीनें आपल्या असामान्य व्यक्तित्वानें मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापलें. पुढील काळांत मराठेशाहीचा साम्राज्य विस्तार झाला व त्यामुळें मराठ्यांचा राजकीय स्वाभिमान आणखीच दृढ व भक्कम झाला. या सर्व घटनांच्या व कर्तृत्वाच्या जोरावरच आज महाराष्ट्राला एकभाषिक, एकजिनसी व व्यक्तित्वपूर्ण असें स्थान भारतांत लाभूं शकलें आहे; व त्या पूर्वतयारीच्या व 'पूर्वसंचिता' च्या पायावरच

आजच्या महाराष्ट्राला ' राष्ट्रीयत्वा ' चा लाभ झाला आहे. एकभाषी लोकसमूहाचें राजसत्तात्मक एकीकरण पूर्वापार झालेलें असल्यानें, या ऐतिहासिक परंपरेवर आधुनिक राष्ट्रवादाची उभारणी आज सोपी झाली आहे.

इतिहासाची ही पार्श्वभूमि व शेतकरी बहुजनसमाजाच्या क्रांतिकारक शक्तीचा आधुनिक पाया यांच्या सहाय्यानें महाराष्ट्रीयांना राष्ट्रीय एकीकरण साधावयाचें आहे. तेंच सं. म. परिषदेचें ब्रीदवाक्य असलें पाहिजे.

★

म. ग्रं. सं. ठाणे.

## राष्ट्रीयत्वाची आधुनिक कल्पना : ३ :

"महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा आत्मा मराठ्यांचें राष्ट्रीयत्व आहे" ही गोष्ट मागील प्रकरणांत मांडली आहे, व तींत नवें असें कांहींच नाहीं. मागें आपण पाहिलेंच कीं, बाराव्या शतकांतील महानुभाव लेखक व पंधराव्या शतकांतील केशवाचार्यां-सारखें विद्वान महाराष्ट्र देश, मराठी भाषा, महाराष्ट्रीय लोकसमूह व महाराष्ट्र-धर्म या भावनांची उपासना करीत होते. नंतरचा काळ घेतला तरी हेंच दिसतें. उदाहरणार्थ, सन १७३६ मध्यें पाटणकर यांनीं पहिले बाजीराव यांस लिहिलेल्या पत्रांतील पुढील मजकूर पहा. ते लिहितात, "तुम्ही यंदा जयनगर प्रांतात आलेत म्हणोन आयकिलें त्यावरून चितामध्यें आलें पराष्ट्रामध्यें येऊन अत्यंत सावध सदैव असिलें पाहिजे." ( पेशवे दफ्तर, सिलेक्शन्स, नं. ९, पान ११ ). महाराष्ट्राबाहेरच्या हिंदू प्रदेशांनाहि त्यावेळीं 'परराष्ट्र' समजलें जाई असें त्यावरून दिसेल. मॅलेट वगैरे जुने इंग्रज लेखकहि मराठ्यांना एक 'राष्ट्र' मानीत असें त्यावेळच्या पत्रांवरून दिसतें, ( पुणे रेसिडेन्सी रेकॉर्डस्, नं २, पानें ८६ व १४१ ). तेव्हांपासून अगदीं आतांपर्यंत मराठ्यांना 'राष्ट्र' मान-

ण्याचा हा क्रम अव्याहत चालू दिसतो. याला पुरावा हवाच तर सन १९४५ मध्यें श्री. शं. द. जावडेकर यांनीं " धनुर्धारी "मध्यें लिहिलेला " महाराष्ट्राच्या संस्कृतीचें भवितव्य " हा लेख पहावा. त्यांत त्यांनी महाराष्ट्राला एक " बाल-राष्ट्र " असें संबोधिलें आहे. ( सन १९४५ चा दिवाळी अंक पहा ).

त्याहून अलीकडचा व अगदीं स्पष्ट असा उल्लेख श्री. माडखोलकर यांच्या लिखाणांत आढळतो. विशेषत: " तरुण भारताच्या " फेब्रुवारी १९४७ च्या विशेषांकामध्यें त्यांनीं आपलें मत अग्रलेखाच्या रूपानें मांडले आहे तें पहाण्यासारखें आहे. ते म्हणतात, " भावि हिंदी संघराज्याचें ' प्रांत ' हे केवळ स्वायत्तच ( ॲटॉनमस् ) नव्हे, तर ' स्वतंत्र ' ( इंडिपेंडन्ट ) आणि ' सार्वभौम ' ( सॉव्हरिन ) घटक होणार, म्हणजेच आज ' प्रांत ' ( प्रॉव्हिन्स ) म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या हिंदुस्थानांतील एकभाषी, एकावयवी प्रदेशांना ' राष्ट्राचा ' ( नेशन ) दर्जा मिळणार हें उघड आहे... महाराष्ट्रांतील हे चारही लोकघटक ( ब्राह्मण, ब्राह्मणेतर, अस्पृश्य आणि वन्य हे चार घटक ) सारखे सुसंस्कृत आणि सामर्थ्यशाली झाल्याशिवाय, आपल्या मराठेपणाची जाणीव त्यांच्या रोमारोमांत भिनून त्यांना राष्ट्रीय एकात्मता आल्याशिवाय व भारतीय संस्कृतीच्या विकासांतील आपल्या इतिहाससिद्ध कार्याच्या स्फूर्तीनें त्यांची अस्मिता उद्दीपित झाल्याशिवाय खरा संयुक्त महाराष्ट्र, सर्वांगीण, स्वयंपूर्ण सार्वभौम मराठी राष्ट्र, निर्माण होणें अशक्य आहे......"

वरील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येतें कीं, महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वासंबंधीं 'संयुक्त महाराष्ट्राच्या' चळवळीचे कांहीं प्रमुख कार्यकर्ते व कांहीं राष्ट्रवादी विद्वान यांच्या मनांत स्पष्ट कल्पना आहेत. तरी भारतीय राजकारणांत ब्रिटिशांच्या भेदनीतीमुळें जे अडथळे व धोके एकसारखे निर्माण होत गेले आहेत त्यामुळें वरील स्पष्ट कल्पनाहि आजपर्यंत एक प्रकारें मूक व दडपलेली राहिली आहे. आज ब्रिटिश सत्ता नाहिशी होत असल्यानें त्या कल्पनेला ' वाचा ' फुटत आहे. म्हणूनच, राष्ट्रीयत्वाच्या या कल्पनेला प्रत्यक्ष

लोकजीवनांत कोणतें अधिष्ठान आहे ? मानवी इतिहासक्रमांत ' राष्ट्र ' कल्पनेचा जन्म कोणच्या वेळीं झाला व तिचा विकास कसा झाला ? वगैरे तात्त्विक प्रश्न भावी घडामोडीच्या दृष्टीनें महत्वाचें ठरणार आहेत.

## राष्ट्रीयत्वाला पुरेसा विस्तार व लोकसंख्या

जास्त तात्त्विक विवेचनापूर्वी एका शंकेचें निराकरण करूं. सर्व हिंदुस्थानाला एक राष्ट्र मानण्याची संवय झाल्यामुळें कांहीं लोकांना असें वाटतें कीं, सध्यांच्यां धकाधकीच्या व महायुद्धांच्या काळांत महाराष्ट्राएवढे लहान प्रदेश ' राष्ट्र ' या दर्जाला नालायक आहेत. परंतु, वस्तुतः, महाराष्ट्र हा इतका लहान प्रदेश नाहीं हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल. ( त्यांतून महाराष्ट्रासारख्या हिंदी राष्ट्रांनीं एक संयुक्त राज्य बनविल्यास या राज्याचें सामर्थ्य केवढें मोठें होईल ? असें राज्य बनवावें, हीच विचारसरणी महाराष्ट्राला राष्ट्र मानणारे लोकहि मांडतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. )

| | क्षेत्रफळ चौ. मैल | लोकसंख्या |
|---|---|---|
| महाराष्ट्र | १,५०,००० | ३,००,००,००० |
| तामिळनाड | | २,०४,००,००० |
| आंध्र | | २,६३,००,००० |
| नेपाळ | ५४,००० | ५६,००,००० |
| अफगाणिस्तान | २,५०,००० | ६३,८०,५०० |
| ताजिकिस्तान | ५५,००० | १४,८५,००० |

वरील राष्ट्रांपैकीं नेपाळला स्वतंत्र राष्ट्र मानण्यास बॅ. सावरकर, पंडित नेहरू प्रभृति पुढारी तयार आहेत. आंध्र, तामिळनाड वगैरे ' प्रांत ' स्वतःला 'राष्ट्रें' म्हणवून घेऊं लागले आहेत. आसाम, पठाणिस्तान वगैरे चिमुकले 'प्रांत'हि सार्वभौम ( सॉव्हरिन ) मानण्यास महात्माजींनीं संमति दिली आहे.

( महात्माजींचें श्री. महेंद्रमोहन चौधरी या आसामी पुढाऱ्यास, ता. १५–१२–४६ रोजीं पाठविलेलें पत्र पहा. ) ताजिकिस्तान हें चिमुकलें सोव्हिएत राष्ट्र 'सोव्हिएट युनियन' या संयुक्त राज्याच्या अजस्र बळावर हिटलरसारख्या बलाढ्य शत्रूशीहि सामना देऊं शकलें. या सर्व गोष्टी एकत्र घेऊन विचार केला तर असें म्हणतां येईल कीं महाराष्ट्र हा राष्ट्र बनण्यास अपात्र नाहीं व इतर राष्ट्रांच्या बरोबर सहकार्यानें राहिल्यास त्याच्या अस्तित्वावर बाहेरून गदा येण्याचेंहि भय नाहीं.

## राष्ट्रीयत्वासंबंधीं विचार

केवळ विस्तार व लोकसंख्या एवढ्यापुरतें पाहिलें तर महाराष्ट्राला राष्ट्राचा दर्जा मिळणें अशक्य नाहीं; परंतु राष्ट्रीयत्व हें अशा अगदीं भौगोलिक व शिरगणतीच्या पायावर उभारणें हास्यास्पद ठरेल. "राष्ट्र" ही एक सामाजिक संस्था आहे व प्रत्येक सामाजिक संस्थेला एक निश्चित जन्मकाळ व विकासक्रम असतो. 'राष्ट्र' या संस्थेचेंच उदाहरण घेतलें तर अगदीं रानटी लोकांत 'राष्ट्रें' आढळत नाहींत. नंतरच्या सुसंस्कृत समाजांत 'राष्ट्रें' आढळतात, पण शब्द तोच असला तरी त्या प्राचीन 'राष्ट्रा'चें स्वरूप अर्वाचीन राष्ट्रांपेक्षां आमूलाग्र वेगळें होतें. प्राचीन भारतांत गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र वगैरे राष्ट्रांचा उल्लेख येतो. पण हीं राष्ट्रें म्हणजे गोप, मल्ल इत्यादि नांवाच्या क्षत्रियकुलांचीं चिमुकलीं राज्यें होतीं, असें आढळतें. सारांश अर्वाचीन 'राष्ट्र' ही संस्था कशी आहे, हें पाहण्यासाठीं ब्रिटन, फ्रान्स इत्यादि अर्वाचीन राष्ट्रांच्या उत्पत्तीचा व विकासाचा क्रम शोधून पाहिला पाहिजे. या पद्धतीनें, म्हणजे प्रत्यक्ष ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीनें, राष्ट्राची व्याख्या केली पाहिजे.

ती व्याख्या कोणची हें आपण क्रमाक्रमानें पाहूं, कारण अर्वाचीन 'राष्ट्र' या संस्थेबद्दल रूढ विचारप्रवाह काय आहेत ह्याचा तपास घेत शास्त्रशुद्ध व्याख्येकडे पोचणें विवेचनाच्या दृष्टीनें अधिक सोपें होईल असें वाटतें.

प्रथमच एक गोष्ट ह्यासंबंधीं लक्षांत येतें ती अशी कीं "राष्ट्रीयत्व ही मानवी अंतःकरणांतील अदृश्य अशी स्नेहभावना आहे" अशी उपपत्ति कांहीं विद्वानांकडून स्वीकारली जाते. उदाहरणार्थ, वरील उद्गार श्री. शं. द. जावडेकर यांनीं "राजनीति शास्त्रपरिचय" ह्या ग्रंथांत काढलेले आढळतात. (पान ४५ पहा). ह्या उद्गारांमध्यें "मानवी अंतःकरणांतील स्नेहभावना" हा शब्दप्रयोग लक्षांत घेण्यासारखा आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं राष्ट्रीयत्वाच्या भावनेला एक स्वयंभू किंवा नैसर्गिक भावना मानण्याकडे अशा लेखकांचा कल असतो.

परंतु राष्ट्रीयत्वाची भावना अशी नैसर्गिक किंवा सर्व मानवांच्या मनांत उद्‌भवणारी स्नेहभावना आहे हा सिद्धांत अनुभवाच्या कसोटीवर टिकत नाहीं. तेव्हां यांतच थोडा बदल करून असा सिध्दान्त मांडण्यांत येतो कीं राष्ट्रीयत्वाची भावना नैसर्गिक नसून कांहींतरी कारणानें प्रेरीत होते. ती भावना असते व मानवांच्या हृदयाच्या घडणींतच तिचें अधिष्ठान असतें, ही कल्पना या नव्या सिध्दांताच्या बुडाशींहि कायम आहेच. या मताची मांडणीहि श्री. जावडेकर यांनीं केलेली आहे, ती अशी:—

"कोणत्याही लोकांना 'राष्ट्र' ही पदवी प्राप्त होण्यापूर्वी त्यांच्या अंतःकरणांत कांहींतरी उच्च ध्येयाचा उदय झालेला असला पाहिजे किंवा जगाच्या संस्कृतींत कांहींतरी विशिष्ट भर टाकण्याची महत्वाकांक्षा त्या लोकांनीं धरलेली असली पाहिजे असें मॅझिनीचें मत होतें. राष्ट्र हें एक मानव-सेवा धर्माची दीक्षा घेतलेल्या लोकांचें मिशन (धार्मिक संप्रदाय) आहे अशी त्याची समजूत होती." (वरील ग्रंथ पान ६१).

'राष्ट्र' ह्या संस्थेसंबंधीं मॅझिनीचें वरील मत श्री. जावडेकर प्रभृति विद्वानांनीं स्वीकारलेलें आहे. अशा रीतीनें राष्ट्रीयत्वाच्या भावनेला एका आध्यात्मिक व धार्मिक भावनेचें स्वरूप त्यांनीं दिलेलें आहे. राष्ट्रीयत्व ही मानवाला निसर्गतः सहज प्राप्त अशी एक भावना आहे या मतापेक्षां वरील

" आध्यात्मिक " उपपत्ति जास्त पुढें गेलेली आहे. कारण प्रगल्भ अशा विशिष्ठ लोकसमूहाला विशिष्ट काळांत व परिस्थितींतच राष्ट्रीयत्वाचा साक्षात्कार होतो असें मानणें वस्तुस्थितीला जास्त धरून आहे. परंतु या उपपत्तीनेंहि आपल्या मूळ प्रश्नाला खरें उत्तर मिळत नाहींच. राष्ट्रीयत्वाची व्याख्या करतांना " कोणच्या तरी उच्च ध्येयाशीं " किंवा " मानवसेवाधर्माशीं " त्याची सांगड घालून कोणताच निर्णायक सिद्धान्त मांडतां येत नाहीं. बौद्धधर्मीयांनीं किंवा अलीकडच्या काळांतील विश्वकुटुंबवादी क्रांतिकारकांनीं उच्च ध्येयवाद पत्करलेला नव्हता काय? मानवसेवाधर्म हेंच त्यांचें ब्रीद नव्हतें काय? परंतु त्यांच्या कार्याला राष्ट्रीयत्वाचें स्वरूप नव्हतें. उलट, असेंहि दाखवतां येईल कीं राष्ट्रीयत्वानें भारलेले राष्ट्रीय पुढारी व लोकसमूह अत्यंत क्रूर महत्त्वाकांक्षेच्या आहारीं जाऊन साऱ्या मानवजातीला गुलाम बनविण्यासाठीं भयानक युद्धें करतांना आढळतात. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याच्या मगरमिठीतून सुटण्यासाठीं धडपडणाऱ्या इटलीसारख्या परतंत्र राष्ट्रांतील स्वातंत्र्यवादी व लोकसत्ताक राष्ट्रवाद हा " आध्यात्मिक " असला तरी आसुरी राष्ट्रवादाची उदाहरणेंही अगणित आहेत.

यावरून असें म्हणतां येईल कीं, मॅझिनीप्रणीत राष्ट्रवादाची उपपत्ति परतंत्र भारताच्या राष्ट्रीयत्वाशीं आज जुळणारी असली तरी ' राष्ट्र ' या सामाजिक संस्थेच्या स्वरूपाचा सर्वांगीण उलगडा करून दाखविण्यास ती अपुरी व म्हणून चुकीची आहे.

## संस्कृति व राष्ट्रीयत्व

मानवसेवाधर्माची भावना किंवा अशी कोणतीहि नैतिक भावना राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान किंवा उगमस्थान होऊं शकत नाहीं. त्यामुळेंच, दुसऱ्या एखाद्या भूमिकेचा आधार शोधण्याकडे हिंदी राष्ट्रवाद्यांची प्रवृत्ती आढळते. ही भूमिका त्यांना ' संस्कृति ' या व्यापक कल्पनेंत सांपडते. कॉंग्रेस, हिंदुसभा, लीग वगैरे

# राष्ट्रीयत्वाची आधुनिक कल्पना

वेगवेगळ्या व परस्परविरोधी पक्षांचे लेखक व पुढारी आपल्या राष्ट्रवादाला संस्कृतीचा आधार घेतात.

'संस्कृति' या शब्दामध्यें कांहीहि सामावूं शकतें व कांहीहि वगळतां येतें, अशी ढोंगळ व लवचिक प्रकृति या शब्दाला लाभली आहे. या शब्दाचा अर्थ वेळ पडेल त्याप्रमाणें बदलून प्रतिपक्षावर मात करणें शक्य असतें. वाटाघाटींच्यावेळीं व अनुयायांत प्रचार करण्याचेंवेळीं या सोइस्कर शब्दाचा आधार घेऊन राष्ट्रवादाचे अनेकरंगी स्वरूप आजपर्यंत आपल्याकडील राजकीय पक्षांनीं मांडलें आहे. त्या राजकारणाशीं आपल्याला कर्तव्य नसून फक्त तात्त्विक भूमिकेवरून 'संस्कृति' व 'राष्ट्रीयत्व' याचा काय संबंध आहे तें पाहूं.

'संस्कृति' म्हटलें कीं रोमन, युरोपियन, हिंदु, मुसलमानी, चिनी वगैरे संस्कृतींचीं नांवें डोळ्यांसमोर उभीं राहतात. या सर्व संस्कृतींमध्यें सामान्य असें काय आहे ? समानधर्मत्व म्हटलें तर युरोपियन व चिनी संस्कृतींत तें नाहीं. रोमन संस्कृतीचा अर्थहि त्या काळांतल्या केवळ धार्मिक व वैचारिक सिद्धान्तापुरता मर्यादित नाहींच. मुसलमानी 'संस्कृति' म्हणजेहि इस्लामी धर्म नसून शतकानुशतकें कांहीं लोकसमूहांनीं बनविलेला राजकीय, सामाजिक व इतर सांस्कृतिक अंगानीं युक्त असा जीवनप्रवाह आहे. तीच गोष्ट हिंदू संस्कृतीची व हिंदी संस्कृतीची.

कॉंग्रेस व हिंदुसभा यांच्या परस्परविरोधामुळें व पॅनइस्लामिझमच्या बाहेरील आघातानें आज असें भासतें कीं 'हिंदी' संस्कृति ही एक व्यापक व धर्मनिरपेक्ष कल्पना असून 'हिंदु' संस्कृति ही मात्र संकुचित व धार्मिक कल्पना आहे. पण वस्तुस्थिति मात्र अशी नाहीं. आधीं तर 'हिंदू' या नांवानें ओळखला जाणारा एक धर्मपंथ नसून तें एका बहुजिनसी धर्ममतांचें व सामाजिक संस्थांच्या व्यापक संप्रदायाचें व इतिहासाचें नांव आहे. कुराण किंवा बायबल असे धर्मग्रंथ मानणाऱ्या व जाज्वल्य पंथाभिमान असणाऱ्या

इस्लामी व ख्रिस्ती धर्मपंथीयांनीं बनविलेल्या संस्कृतीचें स्वरूपहि धार्मिक नसून व्यापक व सामाजिक आहे; मग हिंदूंच्या बहुविध धार्मिक कल्पनांशीं संबंध असणारी हिंदू संस्कृति अशीच व्यापक असावी यांत नवल नाहीं. आज खरी स्थिति तर अशी आहे कीं 'आर्य', 'अनार्य', हिंदू, मुसलमान वगैरे अनेक वंशांच्या व धर्मांच्या लोकांनीं बनविलेल्या भारतीय समाजजीवनाचा प्रवाह घेतला तर तो हिंदुहि आहे व हिंदीहि आहे असें म्हणावें लागेल. याची प्रचीती दोन तऱ्हेनीं येते; एकीकडे आपल्याला असें दिसतें कीं धर्मपंथांच्या धार्मिकतेशीं फारकत करून घेऊन निर्मळ (म्हणजेच धर्मनिरपेक्ष) हिंदी राष्ट्रवादाची भूमिका घेणारे कॉंग्रेसवादी हिंदू पुढारीहि वेळोवेळीं हिंदूधर्माभिमानाची घोषणाहि करतांना आढळतात. लो. टिळक व श्री. अणे इत्यादि पुढाऱ्यांनीं हिंदी व हिंदू या दोन भूमिकांचा समन्वय अनेकदा केलेला आढळतो. तीच गोष्ट सर इक्बाल प्रभृति मुसलमान पुढाऱ्यांची. त्यांनाहि हिंदी संस्कृति व मुसलमानी धार्मिक परंपरा याच्यांत विरोध वाटला नाहीं. म्हणून त्या काळांत धार्मिक राहूनहि राष्ट्रीय बाणा राखणें हिंदू व मुसलमान पुढाऱ्यांना शक्य झालें. दुसरीकडे, हिंदुत्वावरच राष्ट्रीयत्वाची उभारणी करणाऱ्या हिंदुसभावादी पुढाऱ्यांकडे पाहिलें तर दिसतें कीं त्यांच्या हिंदू राष्ट्रवादांतहि धर्माला निर्णायक स्थान नाहीं. "खरा राष्ट्रवाद कोणता ?" हा लेख सह्याद्रिच्या एप्रिल १९४७ च्या अंकांत श्री. ग. वि. केतकर यांनीं लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात, "हिंदूमहासभेच्या ध्येयवाक्यांत हिंदु धर्माचा उल्लेख नसून हिंदु राष्ट्राचा उल्लेख आहे." त्यांनीं सर्व विवेचनांत याच गोष्टीवर भर दिला आहे कीं 'हिंदुत्व' ही धार्मिक कल्पना नसून व्यापक सांस्कृतिक कल्पना आहे. श्री. गो. र. काळे या हिंदुसभेच्या पुढाऱ्यानें, एप्रिल १९४३ मध्यें, 'काळ'च्या खास अंकांत "पाकिस्तान यानें स्वयंनिर्णय मतखंडन" या नांवाचा एक विस्तृत लेख लिहिला आहे व त्यांत असें स्पष्टच म्हटलें आहे कीं "धर्मकल्पनेवर राष्ट्रकल्पना बसूंच शकत नाहीं" आणि ज्या हिंदूराष्ट्राच्या ध्येयासाठीं आपल्याला झगडावयाचें आहे, त्याच ध्येयाच्या महत्त्वाकांक्षेनें "चंद्रगुप्त,

अशोक, यशोधर्मन्, बाप्पा रावळ, अकबर व औरंगजेब " हे सर्व प्रेरित झालें होतें. हीच गोष्ट हिंदुत्वाभिमानी श्री. के. एम्. मुनशी यांनी नुकतीच एका लेखांत मांडली आहे, ती अशी, " राजकीयदृष्ट्या अखंड राष्ट्र बनविण्याचा पहिला प्रयत्न अकबरानें केला. दुसरा प्रयत्न बाळाजी बाजीरावानें केला." ('लोकशक्ति', दिवाळी अंक, २५–१०–१९४७).

राष्ट्रवादाची उपपत्ति हिंदू व हिंदी संस्कृतीच्या आधारानें लावण्याच्या बाबतींत कट्टर हिंदुत्ववादी व कॉंग्रेसवादी विद्वानांत मूलभूत फरक नाहीं, हें वरील विवेचनावरून दिसेल. फरक आहे तो फक्त अहिंदूधर्मीयांशीं कमीअधिक उदार धोरण ठेवण्याचा ! तो फरक तत्त्वाचा नाहीं. आतां आपल्यापुढें प्रश्न आहे तो हा कीं हिंदू, हिंदी, किंवा अशा इतर संस्कृतींच्या आधारानें 'राष्ट्र' या संस्थेची व्याख्या करतां येते काय ? या प्रश्नाचें उत्तर अगदी नकारार्थीं द्यावें लागेल. जसे एका धर्माचे लोक एका राष्ट्राचे ठरत नाहीत, त्याप्रमाणेंच एका संस्कृतीचे लोकहि एका राष्ट्राचे होत नाहीत, हीच गोष्ट अर्वाचीन युरोपकडे पहातां दिसून येते. हिंदुस्थानांतील शतकानुशतकें चालत आलेली सांस्कृतिक परंपरा भारतीय लोकसमाजांत एक स्नेहभाव कायम ठेवीत आहे हें खरें. पण त्याचा अर्थ सर्व हिंदी लोक एका राष्ट्राचे झाले आहेत असें नाहीं. भारतीय संस्कृतीच्या एकछत्राखालीं प्राचीन व मध्ययुगीन काळांत जवळजवळ सर्व आशियाखंड नांदत होतें, परंतु त्यानंतरच्या काळांत खुद्द भारतीय समाजांतहि महाराष्ट्र, आंध्र, बंगाल इत्यादि वेगवेगळे लोकसमूह उदयास आले व आज अशीं अनेक राष्ट्रें हिंदी संस्कृतीच्या छायेंत नांदत आहेत, असा सिद्धान्त इतिहासाचार्य राजवाडे, श्री. अणे प्रभृति हिंदुत्वाभिमानी विद्वानांनींच मांडला आहे. त्यांचीं मतें मी पुढील प्रकरणांत तपशीलवार दिलीं आहेत. तूर्त एवढेंच सांगणें शक्य आहे कीं भाषा, ऐतिहासिक परंपरा व राष्ट्रीय अभिमान इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत बहुजिनसी असलेल्या हिंदी समाजास केवळ समानसंस्कृतीच्या बंधनामुळें एकराष्ट्रीय मानणें बरोबर ठरणार नाहीं.

मग एका भारतीय संस्कृतींत अनेक राष्ट्रें नांदत आहेत, ही उघड गोष्ट

सर्वसंमत कां होत नाहीं ? राजनैतिक कारणें सोडलीं तरी असें होण्याला एक 'तात्त्विक' कारणहि आहे तें असें; हिंदी संस्कृतीसारखी एक प्राचीन संस्कृति व प्रत्येक अर्वाचीन राष्ट्राला लाभलेली 'राष्ट्रीय संस्कृति' यांच्यातला मूलभूत फरक एकराष्ट्रीयत्वाच्या पुरस्कर्त्यांपैकीं बऱ्याच जणांना उमगलेला नसतो. ब्रिटन व फ्रान्स हीं राष्ट्रें घ्या. यांची विशिष्ट अशी 'ब्रिटिश' व 'फ्रेंच' संस्कृति आहे, आणि शिवाय या सर्व राष्ट्रांना गुरुस्थानीं असणारी ग्रीक–रोमन संस्कृति व सर्वांना व्यापणारी युरोपियन संस्कृति आहेच ! इंग्लिश, फ्रेंच वगैरे राष्ट्रभाषा आहेत, परंतु ग्रीक व लॅटिन या भाषांचें वंशबंधन त्या राष्ट्रभाषांना आहेच. याच्या जोडीला 'खिश्चन संस्कृति' म्हणून एक सर्वव्यापक स्नेहबंध आहेच. खिश्चन, युरोपियन, ग्रीक-रोमन इत्यादि संस्कृति ब्रिटन, फ्रान्स वगैरे राष्ट्रांचा उदय होण्यापूर्वीच्या व या सर्व राष्ट्रांना आपल्या व्यापक छत्राखालीं सामावणाऱ्या संस्कृति आहेत; उलट, ब्रिटिश राष्ट्राची 'राष्ट्रीय संस्कृति' हीं त्या राष्ट्राच्या उदयाबरोबरच जन्मली असून तिचें कार्यक्षेत्रहि या राष्ट्रापुरतेंच आहे. 'राष्ट्रीय संस्कृति' ही राष्ट्ररचनेला **कारणीभूत** होणारी गोष्ट नसून राष्ट्ररचना झाल्याचा तो एक **परिणाम** आहे. परंतु प्राचीन संस्कृति व राष्ट्ररचना यांच्यामध्यें कार्य अथवा कारण या स्वरूपाचा कोणताच संबंध नाहीं.

'राष्ट्रीय' संस्कृतीचें व प्राचीन संस्कृतिचे वर स्पष्ट केलेलें भिन्न स्वरूप न ओळखल्यानें प्राचीन भारतीय संस्कृतीला किंवा हिंदु संस्कृतीलाच 'राष्ट्रीय' संस्कृति समजण्याचा घोटाळा होतो व त्यामुळें 'महाराष्ट्रीय संस्कृति' 'आंध्र संस्कृति' या अर्वाचीन संस्कृतींचें उदयोन्मुख 'राष्ट्रीय' स्वरूप उमगत नाहीं. आपल्याकडे राष्ट्रवादाबद्दल होणाऱ्या वादांत जो गोंधळ उडतो त्याचे मूळ वरील आंधळेपणांत आहे असें मला वाटतें.

## राज्य व राष्ट्रीयत्व

एका स्नेहभावनेनें, ध्येयवादानें, धर्मानें किंवा संस्कृतीनें बांधले गेलेले लोक केवळ या बंधनाच्या जोरावर स्वतःचें एक राष्ट्र बनवूं शकणार नाहींत,

उलट अशा लोकांचीं अनेक राष्ट्रें बनलेलीं आपण युरोपमध्यें व हिंदुस्थानांतहि पहात आहोत, असें येथवर पाहिलें. आतां 'राज्य' या सामाजिक संस्थेचा 'राष्ट्र' या संस्थेशीं संबंध काय तें संक्षेपानें पाहूं. श्री. जावडेकर यांचीं या बाबतींत म्हटलें आहे कीं " राष्ट्रें हीं सजीव राज्यें आहेत " ( वरील ग्रंथ, पान ४५ ). 'राष्ट्र' व 'राज्य' यांतील फरक स्पष्ट करण्याठीं ते यापुढेंच म्हणतात कीं " प्रत्येक राष्ट्राला आत्मा असतो, अहंकार असतो, त्याला भावना असतात व त्याचा विशिष्ट स्वभाव असतो. राज्याला यापैकीं कोणत्याहि गोष्टींची आवश्यकता नाहीं...उदाहरणार्थ ब्रिटिशसाम्राज्य हें राज्य आहे परंतु तें राष्ट्र नाहीं. " अर्वाचीन राष्ट्रांकडे पाहिलें तर असें दिसतें कीं यापैकीं बहुतेक राष्ट्रें एकात्म एकराष्ट्रीय राज्येंहि ( युनिटरी नॅशनल स्टेटस् ) आहेत. अमेरिका हें राष्ट्र एकराष्ट्रीय राज्य आहे परंतु एकात्म नसून संयुक्त ( फेडरल ) आहे. या राज्याची घटक-संस्थानें हीं संघटित राष्ट्रें नसून वसाहतीच्या काळांतलीं स्वतंत्र राज्यें आहेत. स्वित्झर्लंडमध्यें वेगळी अपवादात्मक स्थिति आढळते. तेथें एकराष्ट्रीय राज्य आहे परंतु तेंहि संयुक्त असून त्याचे तीन घटक-विभाग वेगवेगळया भाषा बोलणारे आहेत. ब्रिटन, अमेरिका, स्वित्झर्लंड याच्यांमध्यें वरील अपवादात्मक फरक असले तरी अर्वाचीन राष्ट्रांच्या बाबतींत नियम मात्र असा सांगतां येईल कीं हीं सर्व राष्ट्रें एकात्म एकराष्ट्रीय राज्यें आहेत.

श्री. जावडेकर यांनीं या अर्वाचीन एकराष्ट्रीय राज्यांना सजीव राज्यें म्हणून गौरविलें आहे व अनेक राष्ट्रांना गुलामगिरींत डांबणाऱ्या साम्राज्यांना 'निर्जीव' राज्यें म्हटलें आहे. परंतु 'निर्जीव' ह्या विशेषणानें 'राज्य' व 'राष्ट्र' यांतील फरक स्पष्ट होत नाहीं. 'संस्कृति'च्या बाबतींत जो वैचारिक गोंधळ आपण मागें पाहिला तोच 'राज्य' या बाबतींतहि होत आहे असें दिसून येईल. अर्वाचीन एकराष्ट्रीय राज्यें हीं 'राष्ट्रीय संस्कृती' प्रमाणेंच राष्ट्रांच्या **उदयानंतरचीं** आहेत व त्या **उदयाचीं फळें** आहेत. हीं एक-राष्ट्रीय राज्यें निर्माण होण्यापूर्वी मध्ययुगीन युरोपांत लहान लहान राजसत्ता होत्या. जर्मन राष्ट्र आज आहे तेथें प्रुशियन, बव्हेरियन वगैरे अनेक स्वतंत्र

राज्यें होतीं व हाच प्रकार सगळीकडे होता. या अनेक स्वतंत्र राज्यांतून प्रथम मोठीं एकात्म राज्यें निघालीं व मग या एकात्म राज्यांच्या चौथऱ्यावर राष्ट्रांच्या इमारती रचल्या गेल्या असें मात्र घडलेलें नाहीं; किंबहुना याच्या उलट क्रमानें राष्ट्रें व राष्ट्रीय राज्यें बनलीं आहेत.

श्री. जावडेकर यांची कल्पना वेगळी दिसतें. एका मोठ्या राज्याच्या पायावर परिणाम म्हणून राष्ट्रीय भावना उत्पन्न होऊं शकते असें ते समजतात व दुर्दैवानें भारताच्या परतंत्र अवस्थेचें उदाहरण देतात. हिंदुस्थानांत अर्वाचीन राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास ब्रिटिश अंमलाचा अप्रत्यक्षपणें पुष्कळ उपयोग झालेला आहे हें कबूल केलें पाहिजे असें त्याचें मत आहे. ( राज्यनीतिशास्त्र-परिचय, पा. ५८ ). 'राज्य' या संस्थेला राष्ट्रीय भावनेचा व राष्ट्ररचनेचा पाया व उगम मानण्याच्या या चुकीमुळें ब्रिटिशांच्या अंमलाविषयीं जसें वरील विधान त्यांनीं केलें आहे तसेंच आश्चर्यकारक विधान ते हिंदुस्थानांतल्या प्राचीन साम्राज्यांबद्दल करतात. "सर्व हिंदुस्थानला एका छत्राखालीं आणणें ही महत्त्वाकांक्षा" ठेवणारे अनेक भारतीय सम्राट झाले; रामचंद्रांनीं अश्वमेध केले, अशोक व समुद्रगुप्त यांनींहि सर्व भरतखंड ताब्यांत आणलें, मोंगल बादशहांनीं, शिवछत्रपतींनीं व पेशव्यांनीं हीच महत्त्वाकांक्षा ठेवली होती; हें सर्व सांगितल्यावर नाना फडणवीसांना लिहिलेल्या गोविंदराव काळे वकीलांच्या प्रसिद्ध पत्रांतील उतारा देऊन श्री. जावडेकर सांगतात कीं "सार्वभौमत्व हातीं लागण्यासाठीं" ही सम्राटांची जी धडपड होती तिचा पाया "हिंदुस्थान हें एक राष्ट्र असून तें एकाच राज्याखालीं असावें" या राष्ट्रीय भावनेंत होता ! !

'राज्य' ही संस्था 'राष्ट्र' निर्मितीला प्रेरक आहे या अपसिद्धान्तामुळें केवढी दिशाभूल होऊं शकते याचें दुसरें उदाहरण श्री. गोविंदराव काळे या हिंदुसभावादी लेखकाच्या लेखांतून देतां येईल. "पाकिस्तान याने स्वयंनिर्णय मतखंडन" या वर उल्लेखिलेल्या लेखांत ते म्हणतात, हिंदुस्थानच्या "एकराष्ट्रीयत्वाचा पाया श्री रामचंद्रानें वाली रावणासारख्या बलाढ्य राजांचा

पराभव करून घातलेला आहे. सम्राट चंद्रगुप्त, अशोक, यशोधर्मन्, बाप्पा रावळ, अकबर, औरंगजेब व त्यामागून आलेले इंग्रजहि हिंदुस्थान एक राष्ट्र आहे असें मानीत आलेले आहेत.''

आजच्या एकराष्ट्रीय राज्यांपैकीं इटली, आयर्लंड, पोलंड वगैरे अनेक राज्यांचा उदय तेथील राष्ट्रीय चळवळीच्या उदयानंतरचा आहे, ही परिस्थिति काँग्रेसवादी व हिंदुसभावादी लेखकांस अवगत असते; तसेंच मध्ययुगीन व प्राचीन साम्राज्यें एकेका प्रदेशावर दोनतीनशें वर्षें टिकून देखील त्या प्रदेशामध्यें अर्वाचीन तऱ्हेचीं राष्ट्रें जन्मलीं नाहींत हेंहि त्यांना माहित असतें. असें असून 'राज्य' या संस्थेला 'राष्ट्र' ची प्रेरणा व उगमस्थान त्यांनीं मानावें हें आश्चर्य आहे. 'संस्कृति' या कल्पनेशीं 'राष्ट्र' या संस्थेची अशीच चुकीची सांगड घालण्याचा असाच प्रयत्न होतो त्याचें परीक्षण मागें केलेलें आहेच.

## प्रदेश, भाषा, आर्थिक सहजीवन

धर्म, संस्कृति, राज्य वगैरे कल्पनांशीं व संस्थांशीं 'राष्ट्र' या संस्थेचें नातें जोडूं पाहिल्यास शेवटीं राष्ट्राचें निर्णायक व बिनचूक वर्णन देणारी व्याख्या लाभणें शक्य नाहीं, उलट गोंधळच पदरीं येतो, हें पाहिल्यावर ऐतिहासिक शास्त्रीय दृष्टीनें 'राष्ट्र' या संस्थेची व्याख्या कोणची तें पाहूं. ती व्याख्या करतांना ब्रिटन, फ्रान्स वगैरे अर्वाचीन राष्ट्रांचा ऐतिहासिक विकास व या विकासांतील प्रेरणा लक्षांत घेतलेल्या आहेत. **सलंग मायभूमि, एक लोकभाषा, आर्थिक सहजीवन व एका राष्ट्रीय संस्कृतीच्या आधारानें नांदणारी राष्ट्रीयत्वाची भावना या चार बाबतींत विकास होत जाऊन ज्या लोकसमुहाला राष्ट्रीय लोकसमूहाचें स्वरूप आलें त्यांनी** आजचीं राष्ट्रें बनविलीं आहेत अशी व्याख्या केली पाहिजे. यांपैकीं बहुतेक लोकसमूहांना एकराष्ट्रीय राज्येंहि बनवितां आलीं, परंतु कांहींना अशीं राज्यें बनविण्यासाठीं आपल्या देशावर अंमल बजाविणाऱ्या प्रबळ साम्राज्यवादी राष्ट्रांशीं सामना द्यावा लागला. वरील व्याख्येंत धर्म, व्यापक व प्राचीन अशा अतिराष्ट्रीय संस्कृति व

राज्य यांचा अंतर्भाव नाहीं. ही व्याख्याच थोड्याफार फरकानें मान्य असणारे कांहीं जुने महाराष्ट्रीय लेखक व पुढारी महाराष्ट्राला 'राष्ट्र' म्हणत असत. केसरीच्या ता. १८ एप्रिल १९४७ च्या अग्रलेखांत वरील राष्ट्र-कल्पनेचाच पुरस्कार संपादकानीं केलेला आढळतो व अशा अर्वाचीन ऐतिहासिक व्याख्येच्या आधारें महाराष्ट्रीय राष्ट्रीयत्वाच्या पायावरच आज संयुक्तीकरणाची चळवळ उभारली पाहिजे, असें त्यांनीं प्रतिपादन केलेलें दिसतें.

प्रदेश, भाषा व आर्थिक सहजीवन वगैरे घटकांचा आधारानेंच राष्ट्रीयत्वाची इमारत रचली जाते ही गोष्ट जास्त तपशीलवार पाहणें जरूर आहे. कारण मुख्यतः या तीन घटकांसंबंधीं आपल्याकडील राष्ट्रवादी तत्वविचारांत निश्चयात्मक धोरण आढळून येत नाहीं. प्रथम 'राष्ट्रभूमि' हा घटक घेऊं.

## राष्ट्रभूमीचा आधार

'राष्ट्रीयत्व' हें प्रादेशिक असलेंच पाहिजे, आणि ज्या लोकसमूहाला एक स्थिर, सलग राष्ट्रभूमि नसेल तो 'राष्ट्र' ही संस्था निर्माण करूं शकणार नाहीं, ही गोष्ट पटणें अवघड नाहीं. अस्पृश्य, मुसलमान यांसारखी एखादी जमात किंवा कामगार वर्गासारखा एखादा वर्ग आखिल भारतीय संघटनेनें एकजिनसी व एकाच खंबीर ध्येयानें प्रेरित असा होऊं शकतो. परंतु अशा जमातींचें किंवा वर्गांचें 'राष्ट्र' बनत नाहीं व या लोकांना आपापलीं ध्येयें गांठण्यासाठीं सर्व वर्गांनीं बनविलेल्या 'राष्ट्र' या संस्थेमध्यें नांदावें लागतें.

प्रदेशाशिवाय किंवा राष्ट्रभूमीशिवाय राष्ट्र नाहीं, ही साधी गोष्ट आपल्याकडील राष्ट्रवादी विचारांत मात्र महत्त्वाची गणली गेलेली नाहीं. "राजनीति शास्त्र परिचया "मध्यें श्री. जावडेकर यांनीं या प्रादेशिक घटकाचा वेगळा व स्पष्ट विचार केलेला आढळत नाहीं व त्यांच्या एकंदर विवेचनावरून असा निष्कर्ष काढावा लागतो कीं, मुख्यतः एका राज्यांत वस्ती असण्यानें व एका संस्कृतीचें छत्र असण्यानें राष्ट्रें उदयाला येतात. एकंदरींत, कॉंग्रेसवादी तत्वज्ञांच्या राष्ट्रवादांत हिंदू, मुसलमान, पारशी वगैरे सर्व हिंदी जमातींची राजकीय

व सांस्कृतिक एकात्मता हाच मुख्य पाया धरलेला आढळतो. या राष्ट्रवादाला विरोधी म्हणून जन्माला आलेला मुस्लीम राष्ट्रवाद हा "पाकिस्तान"वर, म्हणजे प्रादेशिकत्वावर, आधारलेला आहे, असें भासतें. या पाकिस्तानला उत्तर म्हणून कॉंग्रेसवादी राष्ट्रीयत्वानेंहि भौगोलिक अखंडत्वाची कास धरलेली आहे असें वरवर दिसतें. वस्तुस्थिति मात्र वेगळी आहे. पाकिस्तान ही एका संदिग्ध व दुतोंडी राष्ट्रवादाची घोषणा आहे. एकीकडे, सर्व मुसलमान तेवढे 'पाकिस्तानी' राष्ट्राचे नागरीक अशी धार्मिक 'पॅनइस्लामी' राष्ट्रवादाची घोषणा करावयाची व दुसरीकडे सिंध, पंजाब वगैरे प्रादेशिक लोकसमूहांना वेगवेगळीं राज्यें व राष्ट्रें माना असेंहि सांगावयाचें असें पाकिस्तानवाद्यांचें दुहेरी धोरण आहे. त्यांच्या अशा राष्ट्रवादाला उत्तर देण्यासाठीं हिंदी संस्कृतीच्या धर्मनिरपेक्ष सर्वसंग्राहक स्वरूपाची मीमांसा कशी पुरी पडणार! आणि भारताचें भौगोलिक अखंडत्व सांगून काय होणार!

'पाकिस्तान'ची प्रतिक्रिया म्हणून उदयास आलेला 'हिंदुत्व' निष्ठ राष्ट्रवाद हा मुळापासूनच प्रादेशिकत्वाच्या विरुद्ध आहे या राष्ट्रवादाची भूमिका हिंदुसभेच्या सन १९३९ च्या कलकत्ता येथील अधिवेशनांत स्वा. सावरकर यांनीं मांडली. "प्रादेशिक राष्ट्रकल्पनेच्यां भुसभुशीत नी लटपटींत वाळूच्या आधारावर विभिन्न समाजांची खिचडीप्रमाणें राष्ट्रें बनविण्याचा उद्योग करणारांना" ते बजावून सांगतात कीं राष्ट्रें हीं 'स्वयंभू व स्थायी' असतात. ते पुढें म्हणतात "आम्ही हिंदू स्वयमेव एक राष्ट्र आहोत. प्रादेशिक एकता म्हणजे एकाच प्रदेशांतील वस्ती हेंच एकमेव राष्ट्रीयत्वाचें घटकसाधन म्हणून मानण्यांत राष्ट्रीय सभेच्या ध्येयवादामध्यें मुळापासूनच दोष उत्पन्न झाला आहे." (भाषण, पान १७)

वरील उद्गारांत एकीकडे 'हिंदू' या नांवानें ओळखतो येणाऱ्या मध्ययुगीन धार्मिक संस्कृतीच्या आधारानें 'राष्ट्रा'ची व्याख्या करण्याचा प्रयत्न आहे, पण त्याचबरोबर अशी व्याख्या करणें अर्वाचीन राष्ट्रीयत्वाच्या

कल्पनेशीं विसंगत असल्याची जाणीव आहे. या जाणीवेमुळें प्रादेशिकत्वाला 'एकमेव' घटक मानूं नका, एक गौण घटक हवे तर माना, असा उपदेश स्वा. सावरकरांनीं कॉंग्रेसवाद्यांना केला आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं 'प्रदेश' हा **एकमेव** घटक कोणीच मानीत नाहीं; पण 'प्रदेश' हा एक **आवश्यक** घटक मानणें जरूर असून हिंदु-राष्ट्रवादी, पाकिस्तानवादी व कॉंग्रेसचे अखंड 'हिंदी-संस्कृति' वादी यापैकीं कोणीहि 'राष्ट्रभूमीचें' हें महत्व मान्य करीत नाहींत.

'प्रदेश' या घटकाबद्दल या सर्व राष्ट्रवाद्यांची धरसोड कशी होते व त्यामुळें अनवस्था कशी होते, तें नेपाळच्या उदाहरणानें नीट सांगतां येईल. हिंदुसभावादी लेखक नेपाळला कांहीं वेळीं हिंदुराष्ट्राचा "राष्ट्रीय भौगोलिक विभाग" मानतात, कांहीं वेळीं नुसता 'प्रांत' मानतात, आणि इतर वेळीं नेपाळ हें "उदयशाली राष्ट्र" असून भारताचें, म्हणजे हिंदुराष्ट्राचें, "मित्र राष्ट्र" मानतात, (बॅ. सावरकर यांचें वरील भाषण, पानें ३५–३७). अशीच धरसोड कॉंग्रेसवादी राष्ट्र-कल्पनेंत होते. कधीं 'प्रांतांचा' राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क कबूल करण्यांत येतो तर कधीं स्वयंनिर्णय असणाऱ्या घटक-राष्ट्रांना फक्त स्वायत्तता आहे, फुटून निघण्याचा अधिकार नाहीं, असें ठरविण्यांत येतें. याचें एक कारण असें कीं राज्य, संस्कृति इत्यादि अतिराष्ट्रीय कल्पनांवर राष्ट्रीयत्वाची इमारत उभारण्याचा या सर्व राष्ट्रवाद्यांचा प्रयत्न असतो व त्यामुळें या अतिव्यापक भूमिकेवर उभें राहणारें 'राष्ट्र' किती मोठ्या प्रदेशावर नांदावें व हा प्रदेश राष्ट्रभूमीच्या स्वरूपाचा आहे कीं नाहीं, या गोष्टींची दखल त्यांच्याकडून घेतली जात नाहीं.

## राष्ट्रभाषेचें महत्व

नुसतें 'राज्य' व 'संस्कृति' या आधारांवर अर्वाचीन राष्ट्रीयत्वाची स्थापना करण्याच्या आधुनिक भारतीय विद्वानांचा प्रयत्न अयशस्वी ठरणें अपरिहार्य आहे; आणि प्रादेशिकत्वाला महत्त्व न दिल्यामुळें त्यांना हा वैचारिक

गोंधळ पत्करावा लागणारच. आतां अर्वाचीन राष्ट्रीयत्वाला राष्ट्रभूमि व्यतिरिक्त आणखी कोणत्या गोष्टींची गरज असतें तें पाहूं. प्रदेशाइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका राष्ट्रांत राहणाऱ्या लोकांची एक राष्ट्रभाषा असावी लागतें, व ती लोकभाषाहि असावी लागतें. आज इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांकडे पाहिलें तर ही गोष्ट सहज दिसून येईल. अर्वाचीन काळामध्यें समाजाचें राजकीय जीवन एखाद्या राजघराण्यावर किंवा एखाद्या वर्गावर अवलंबून नसतें. उलटपक्षीं सामान्य लोकांच्या राजकीय सामर्थ्यावर व राजकीय जागृतीवर अर्वाचीन राष्ट्रांतील राजकीय जीवन उभारलेलें आहे. सामान्य लोकांच्या राजकीय जीवनाचें वाहन म्हणजे त्या राष्ट्राची लोकभाषा. यामुळें लोकभाषा ही अर्वाचीन राष्ट्रीयत्वाचा एक आवश्यक घटक आहे. सबंध युरोपखंडांत स्वित्झर्लंडचें एक अपवादात्मक उदाहरण आहे कीं जेथें एका राष्ट्रामध्यें तीन लोकभाषा रूढ आहेत. परंतु त्यामुळें सर्वसाधारण नियमाला बाध येत नाहीं. दुसरा एक अपवाद इंग्रजी बोलणाऱ्या इंग्लंड व अमेरिका ह्या दोन राष्ट्रांचा. भाषा तीच असुन भौगोलिक कारणांमुळें त्यांना वेगवेगळें राष्ट्रीयत्व प्राप्त झालें आहे. समान भाषा असूनहि यांची जरी राष्ट्रीय एकात्मता साधत नसली तरी आपापल्या ठिकाणीं या दोनहि राष्ट्रामध्यें इंग्रजी भाषेला राष्ट्रभाषेचें स्थान आहे.

अर्वाचीन राष्ट्रीयत्वाच्या 'प्रदेश' या घटकासंबंधीं जो गोंधळ भारतीय विद्वानांच्या मतांत आपण पूर्वी पाहिला तोच भाषेसंबंधींहि दिसून येतो. श्री. जावडेकर यांनीं स्पष्टच म्हटलें आहे कीं, "एक भाषा व एक वाङ्मय या संबंधीं विचार केला तरी यापैकीं कोणतीहि एक गोष्ट राष्ट्रीयत्वाला अगदीं अवश्य आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं......

......हिंदुस्थानचेंच उदाहरण घेतल्यास निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या अनेक लोकांत विचारविनिमयास साधनीभूत होऊन इंग्लिश भाषेनें त्यांच्यांत राष्ट्रीय भावना निर्माण करण्यास बरीच मदत केलेली दिसून येते. या पुढें हें कार्य

हिंदी भाषेमार्फत व्हावें याबद्दल देशभक्त पुढाऱ्यांचे प्रयत्न चालू आहेत. हिंदी राष्ट्रीय भावनेस केवळ इंग्लिश भाषेचाच आधार आहे असें मानणें मात्र चुकीचें आहे. ह्या भावनेला खरा आधार संस्कृत व अरबी भाषांचा आहे." (पान ५७) ह्या उताऱ्यावरून बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतात. इंग्लिश भाषा किंवा संस्कृत व अरबी भाषा कांहीं लोकांच्या विचारविनिमयाला साधनीभूत झाल्या आहेत, ह्यांत शंका नाहीं. परंतु विविध प्रांतांतील एकंदर लोकसमूहांमध्यें संस्कृत व अरबी बोलणाऱ्या लोकांचें प्रमाण पूर्वीच्या काळींहि अत्यन्त अल्प होतें व आज इंग्रजी बोलणारांचें प्रमाणहि हिंदी जनतेमध्यें तसेंच खिसगणतींत न घेण्याइतकें आहे. प्राचीन काळचे क्षत्रिय, मोंगल किंवा मराठे राज्यकर्ते आपल्या दरबारांमध्यें संस्कृत व फारशीचा उपयोग करीत व लोकभाषांकडे दुर्लक्ष करीत. शिवकालाच्या सुमारास मराठी मुत्सद्यांच्या पत्रांत मराठी शब्द नांवाला असत. हे मुत्सद्दी व राज्यकर्ते आणि सामान्य जनता ह्यांची नेहमींच फारकत झालेली होती व त्यामुळेंच लोकभाषा व राजभाषा ह्या वेगवेगळया होत्या. हिंदुस्थानावर ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यानें प्राचीन समाजव्यवस्थे-मुळें असलेली ही फारकत एका वेगळ्या कारणानें चालूच राहिली. राज-भाषा व लोकभाषा ह्यांच्यांत पूर्वीचेंच अंतर राहिलें. मूठभर आंग्ल-शिक्षित सुशिक्षित वर्गाला अर्वाचीन राष्ट्रीयत्वाचा साक्षात्कार झाला व त्याला असें वाटूं लागलें कीं आपण मूठभर सुशिक्षित म्हणजेच राष्ट्र व आपल्या विचारविनिमयाला साधनीभूत झालेल्या संस्कृत, अरबी व इंग्रजी या भाषा म्हणजेच राष्ट्रभाषा ! यांतच आतां संस्कृतनिष्ठ हिंदी व अरबीनिष्ठ उर्दू या नव्या " राष्ट्रभाषा "ची भर पडूं पहात आहे. आधुनिक सुशिक्षित वर्गाच्या ह्या कृत्रिम 'राष्ट्रभाषा' च्या अभिमानावर चिडून इतिहासचार्य राजवाडे म्हणतात, " एक भाषा असणें हें जर राष्ट्राच्या एकीचें व प्रगतीचें मुख्य कारण आहे तर अनेक भाषांचा संचार एकाच राष्ट्रांत करूं पाहणें सर्वथा त्याज्य होय, कारण तसें करण्यानें राष्ट्रत्वाचा भंग होतोच होतो." परंतु शिक्षित वर्गाला हें पटत नाहीं आणि " इंग्रजींत विचार करणाऱ्या पुढारी

मंडळींचें एक निराळेंच राष्ट्र बनण्याचा रंग दिसतो." (ऐ. ले. संग्रह, भाग ३, पानें १२३-२४.)

अर्वाचीन राष्ट्रीयत्वाला लोकभाषेच्या अधिष्ठानाची जरूर नाहीं असें अलिकडच्या काँग्रेसवादी व हिंदुसभावादी विद्वानांना वाटत असलें तरी सन १९२० च्या आधींच्या काळांतील विद्वानांचें मत काय होतें हें श्री. राजवाडे यांच्या-वरील उद्गारांवरून दिसेल. लोकनायक अणे वगैरे विचारवंतांनीं याच मताचा पुरस्कार केलेला आढळतो. या बाबतींत सन १९११ मध्यें श्री. न. चिं. केळकर यांनीं "भाषा व राष्ट्रीयत्व" या नांवाची एक लेखमाला केसरींत लिहलेली आढळतें. या लेखांत श्री. केळकर यांनीं महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा पुरस्कार केला आहे व ह्या संयुक्तीकरणाला महाराष्ट्राचें राष्ट्रीयत्व हा पाया असल्याचें म्हटलें आहे. महाराष्ट्राला राष्ट्र कां म्हणतां येतें याचें विवेचन करतांना त्यांनीं असें दाखविलें आहे कीं राज्य, धर्म किंवा संस्कृति यांचें राष्ट्रीयत्वाला पुरेसें अधिष्ठान असूं शकत नाहीं; उलट "भाषेचा मळलेला मार्गच राष्ट्रीयत्वाच्या अधि-देवतेस अधिक सोपा व श्रेयस्कर वाटतो." (केळकर समग्र वाङ्मय, संस्कृति-खंड, पानें ५३९ ते ५६९.)

## राष्ट्राचें आर्थिक सहजीवन

'प्रदेश' व 'भाषा' या घटकांइतकीच महत्वाची बाब म्हणजे राष्ट्रां-तील जनतेच्या सर्व आर्थिक व्यवहारांत उत्पन्न झालेलें परस्परसहकार्य किंवा परस्परावलंबित्व. आपण मागें हें पाहिलेंच आहे कीं महाराष्ट्रीयांसारखे बहुतेक हिंदी लोकसमूह 'प्रदेश' व 'भाषा' या दृष्टीनें गेलीं सातआठ शतकें एक-जीव व एकजिनसी बनत गेले आहेत. परंतु आधींच्या दीर्घ काळांत त्यांच्या-मध्यें राष्ट्रीत्वाचा उदय झाला नाहीं व तो फक्त गेल्या दीडदोनशें वर्षांतच झाला असें दिसतें, याचें कारण काय? किंवा युरोपांतहि मध्ययुगीन दीर्घ काल-खंडांत राज्यें होतीं पण राष्ट्रें नव्हतीं याचें कारण काय? याचें उत्तर मध्य-युगीन समाजव्यवस्थेंत सांपडेल. त्या काळामध्यें एक भाषा बोलणारे लोकहि

खेड्यांतून स्वयंपूर्ण आर्थिक जीवन कंठीत होते. या काळांतील भारतीय समाजाचें वर्णन करतांना इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, हे ग्रामीण समाज "बाहुल्यानें मुक्तद्वारीं, संन्यस्त, व्यक्तिनिष्ठ, समाजपराङ्मुख व राष्ट्रपराङ्मुख" होते व 'पंचायत, महार व कुत्रा याहून जास्त भानगडीचें दिव्य किंवा भयंकर सरकार हिंदू ग्रामसंस्थेला नको असें." (महिकावतीची बखर, प्रस्तावना, पान ९२-९३)

वरील उताऱ्यांत मध्ययुगीन समाजाचें जें वर्णन आहे तें युरोपलाहि लागू पडतें. तेथील समाजांतहि लोकांना राज्याची उठाठेव नको होती. ती उलाढाल राजे व सरदार करीत व त्यांनाहि राज्यापलीकडे 'राष्ट्रा'ची कल्पना नव्हती. राष्ट्रें उदयास आली तीं या मध्ययुगाच्या अंतानंतर. एक समाजक्रांति होऊन 'राज्य' विषयक उलाढाली करणाऱ्या सरदारांना व राजांना सिंहासनावरून खालीं ओढू शकणारा व्यापारी व कारखानदार वर्ग सत्ताधारी झाला. या क्रांतीनें दुसरें असें झालें कीं "संन्यस्त, उदासीन" वगैरे विशेषणांनीं वर्णन केलेला ग्रामीण समाज ग्रामसंस्थांच्या कोषांतून बाहेर पडला व आर्थिक दृष्टीनें नव्या भांडवलदारी अर्थव्यवहाराच्या चक्रांत सांपडला. सर्व लोकांना पैशाच्या सूत्रानें एकजीव केलें. देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रत्येकाचे श्रम, कौशल्य व मालमत्ता एका सलग बाजारपेठेंत आली. युरोपांत हें दोनचार शतकाच्या स्वतंत्र विकासानें घडलें आणि भारतांत केवळ अर्ध्याअधिक शतकांत ब्रिटिशांनीं तेंच क्रूर पद्धतीनें घडविलें एवढाच फरक!

अर्वाचीन राष्ट्रें अशा रीतीनें भांडवलदारी युगांत निर्माण झालीं आहेत व त्यांच्यामध्यें संघटित झालेला लोकसमूह आर्थिक दृष्टीनें स्वयंपूर्ण व तुटक ग्रामसंस्थांचा राहिलेला नसून परस्परालंबी झालेला आहे, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. ही गोष्ट श्री. जावडेकर यांनीं 'राजनीतिशास्त्र परिचयांत" पान ११८ वर, पुढील शब्दांत मांडली आहे: "रोमन साम्राज्य मोडून गेल्यावर सुमारें हजार वर्षेपर्यंत याच ध्येयाच्या पाठीमागें लागून युरोपियन लोकांनीं

अनेक राज्यें व साम्राज्यें स्थापन केलीं व तीं मोडून गेलीं. यानंतर अर्वाचीन राष्ट्रीय राज्यांचें युग सोळाव्या शतकापासून सुरू झालें." अशा रीतीनें आर्थिक सहजीवनाशिवाय, म्हणजे जुना तुटकपणा जाऊन भांडवलदारी अर्थव्यवहार सुरू झाल्याशिवाय, राष्ट्रांचा उदय होत नाहीं ह्याची जाणीव कधींकधीं आपल्या तत्वज्ञांना होते; परंतु सर्वसाधारणपणें त्यांची भिस्त 'संस्कृति' व 'राज्य' या मध्य युगीन बाबींवर असते, हें मागें आपण पाहिलेंच. यामुळेंच महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाचा विचार करतांना ज्या एका प्रश्नाची तपशीलवार चर्चा करणें मला जरूर वाटतें तो असा: ब्रिटिश अंमलापूर्वीच्या महाराष्ट्रीय इतिहासाला राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान आहे कीं नाहीं? शिवकालामध्यें व पेशवाईच्या काळांत झालेल्या उलाढालींना राष्ट्रीयत्वाची बैठक होती व त्या वेळींच महाराष्ट्र हें राष्ट्र बनलें होतें अशी भावना आधुनिक काळांत मराठी राष्ट्रीयत्वाची जाणीव झालेल्या कित्येक लेखकांच्या मनांत आहे. ती भावना वस्तुस्थितीला धरून आहे काय? या प्रश्नाचें उत्तर "मराठ्यांचा इतिहास व राष्ट्रीयत्व" यापुढील प्रकरणांत मी दिलें आहे. तेथें आर्थिक सहजीवनाच्या या घटकासंबंधीं जास्त स्पष्टीकरण मी केले आहे.

## आयर्लंडच्या राष्ट्रीयत्वाचा विकास

प्रदेश, भाषा व आर्थिक जीवन यांच्या एकात्मतेमुळें व ही एकात्मता कांहीं शतकें टिकल्यामुळें राष्ट्रीय अशी एक संस्कृति निर्माण होते असें आपल्याला ब्रिटन, फ्रान्स वगैरे राष्ट्रांच्या उदाहरणांवरून दिसतें. ह्या प्रत्येक राष्ट्राची 'राष्ट्रीय संस्कृति' ग्रीक-रोमन संस्कृतीशीं संलग्न असूनहि स्वतःपुरती स्वतंत्र व वैशिष्ठ्यपूर्ण आहे, तशीच ख्रिश्चन धर्माशी संलग्न असूनहि धर्मनिरपेक्ष आहे. ह्या राष्ट्रीय संस्कृतीचाच परिपाक म्हणून राष्ट्रीय स्वभाव व स्वाभिमान ह्याचा उदय आपल्याला दिसतो व ह्या सर्व मनोव्यापारात्मक बाबींची राष्ट्रीयत्वाचे घटक म्हणून गणना करावयास हरकत नाहीं; पण या बाबींनाच राष्ट्रीयत्वाचें उगमस्थान मानणें मात्र चूक ठरेल. उलटपक्षीं, **प्रदेश, भाषा,**

**आर्थिक सहजीवन, राष्ट्रीय संस्कृति, राष्ट्राभिमान** या सर्व घटकांची राष्ट्रीयत्वाला आवश्यकता असून यापैकीं कोणत्याहि एका बाबीचा अभाव असेल तर तो लोकसमूह 'राष्ट्र' या दर्जाला पोचूं शकत नाहीं, हें आपण येथवर पाहिलें. आता परिचित असें एक उदाहरण घेऊं.

इटली व आयर्लंड या देशांपासून भारतीयांनीं पुष्कळच प्रेरणा मिळविली आहे, आणि या राष्ट्रांच्या इतिहासांत वरील सिद्धान्ताचा खरेपणा पडताळतां येतो. आयर्लंडची परिस्थिति लक्षांत घेतली तर असें दिसतें कीं, आयर्लंडवर इंग्लंडचें आधिराज्य सुरूं झाल्यापासून असा बराच मोठा काळ गेला कीं तेथें ब्रिटिश सत्तेविरुद्ध आयरिश जनतेची राष्ट्रवादी चळवळ उठूं शकली नाहीं. ह्या काळांमध्येंहि आयरिश भाषा व संस्कृति दडपून टाकण्यासाठीं ब्रिटिशांचे अव्याहत प्रयत्न चालू होते व त्याच्याविरुद्ध आयरिश जनतेची कांहीं प्रतिक्रियाहि सुरूं होती. उदाहरणार्थ, आयर्लंडच्या जुन्या लोकगीतांचें व पोवाड्यांचें जतन करणें हें कार्य कांहीं आयरिश संस्कृतीच्या अभिमान्यांनीं तेव्हा चालविलें होतें. पण त्यांच्या प्रयत्नांना यश येऊं शकलें नाहीं. व सन १७८२ पर्यंतच्या या काळांत आयर्लंडचा कॅथॉलिकपंथीय शेतकरी वर्ग सांस्कृतिक व आर्थिक सर्वच दृष्टींनीं मृतवत राहिला. सन १७७२ मध्यें आयरिश पार्लमेंट निर्माण करण्यांत आलें व तेथें आयर्लंडचें जे प्रतिनिधि बसले ते खरेखुरे आयरिश नसून आयर्लंडमध्यें शासक म्हणून आलेले ब्रिटिश जमीनदारच होते व धर्मानें प्रॉटेस्टंटपंथीय होते. अर्वाचीन आयरिश राष्ट्रवादाची मुहुर्तमेढ या परक्या व भिन्नपंथीय शासकवर्गानें घातली. कारण या जमीनदारवर्गामध्यें आयर्लंडच्या व्यापारी व औद्योगिक विकासाची महत्वाकांक्षा लवकरच उत्पन्न झाली व युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणें एक अर्वाचीन भांडवलदारी राष्ट्र बनण्याचें ध्येय या आयर्लंडमधील परक्या वरिष्ठ वर्गानें पुढें ठेवलें. या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं खुद्द ब्रिटनमधील वरिष्ठ वर्गाशीं वैर करणें व त्यांच्यापासून स्वतंत्र होणें आवश्यक होतें. या लढ्यांत आयरिश कॅथॉलिक

शेतकरी व आयरिश मध्यमवर्ग ह्यांच्याशीं या मूळच्या ब्रिटिश जमीनदार वर्गानें संपूर्ण ऐक्य केलें.

अर्वाचीन आयरिश राष्ट्रवाद हा भाषा, प्रदेश, आर्थिक सहजीवन, राष्ट्रीय संस्कृति व राष्ट्राभिमान या पांचहि घटकांच्या दृष्टीनें परिपूर्ण व एकात्म असा आज दिसत असला तरी त्याची कुळकथा ही अशी आहे. सन १७८२ नंतरच्या काळांत १७९८ व १८०३ सालीं आयरिश राष्ट्रवाद्यांनीं स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं मोठें उठाव केले व या उठावांना १७८९ च्या फ्रेंच क्रांतिकारकांकडून तात्त्विक व प्रत्यक्ष अशी पुष्कळ मदत झाली. परंतु खुद्द आयर्लंडमधील आर्थिक जीवन अजून बऱ्याच अंशीं मध्ययुगीन स्वरूपाचेंच राहिलेलें असल्यामुळें ह्या उठावांना मूठभर दहशतवाद्यांचें बंड एवढेंच स्वरूप आलें. आयरिश शेतकरी आपापल्या जमीनदारांच्या जोखडाखालीं निपचित पडून होता. त्यामुळें आयरिश राष्ट्रवादामध्येंहि कमकुवतपणा दिसून येत होता. सन १८४८ पर्यंत मात्र ही परिस्थिति बदलली होती. खुद्द आयर्लंडमध्यें व्यापार व औद्योगिक विकास एवढा झाला होता कीं खेडेगांवाचा तुटकपणा व विस्कळीतपणा नाहींसा होऊन भांडवलदारी विकासाच्या पाशांत शेतकरीहि गोवला गेला. अर्थातच आयरिश राष्ट्रवादाचें पूर्वीचें अर्धकच्चें स्वरूप जाऊन त्याला सर्व राष्ट्राच्या, म्हणजेच आयर्लंडच्या परक्या व मूळच्या अशा सर्व रहिवाश्यांच्या, एकजिनसी आकांक्षेचें रूप आलें. प्रॉटेस्टंट मध्यम वर्ग व कॅथॉलिक बहुसंख्य शेतकरी हाच यापुढील राष्ट्रवादी चळवळीचा मोठा आधार बनला. शेतकऱ्यांच्या स्थितींत आमूलाग्र क्रांति करणें हें ध्येय मानणारें राष्ट्रवादीच एकंदर चळवळीला पुढें नेऊं शकत होते. लॅलॉर, पिअर्स, कोनोली प्रभृति जहाल राष्ट्रवाद्यांनीं जुन्या आयरिश राष्ट्रवादाला शेतकरी वर्गाच्या आकांक्षांची जोड देण्याचें हें कार्य केलें. तेव्हांपासून आयरिश लोकसत्तेच्या ध्येयाला व चळवळीला शेतकरी वर्गाच्या विस्तृत व भक्कम राष्ट्रवादाचें अधिष्ठान मिळालें.

आयरिश राष्ट्रवादाच्या चळवळींत आयरिश भाषेचा अभिमान या गोष्टीला मोठें स्थान आहे हें खरें. परंतु एवढ्याच आधारावर उभारलेला व 'स्वयंभू'

**आर्थिक सहजीवन, राष्ट्रीय संस्कृति, राष्ट्राभिमान** या सर्व घटकांची राष्ट्रीयत्वाला आवश्यकता असून यापैकीं कोणत्याहि एका बाबीचा अभाव असेल तर तो लोकसमूह 'राष्ट्र' या दर्जाला पोचूं शकत नाहीं, हें आपण येथवर पाहिलें. आता परिचित असें एक उदाहरण घेऊं.

इटली व आयर्लंड या देशांपासून भारतीयांनीं पुष्कळच प्रेरणा मिळविली आहे, आणि या राष्ट्रांच्या इतिहासांत वरील सिद्धान्ताचा खरेपणा पडताळतां येतो. आयर्लंडची परिस्थिति लक्षांत घेतली तर असें दिसतें कीं, आयर्लंडवर इंग्लंडचें आधिराज्य सुरूं झाल्यापासून असा बराच मोठा काळ गेला कीं तेथें ब्रिटिश सत्तेविरुद्ध आयरिश जनतेची राष्ट्रवादी चळवळ उठूं शकली नाहीं. ह्या काळांमध्येंहि आयरिश भाषा व संस्कृति दडपून टाकण्यासाठीं ब्रिटिशांचे अव्याहत प्रयत्न चालू होते व त्याच्याविरुद्ध आयरिश जनतेची कांहीं प्रतिक्रियाहि सुरूं होती. उदाहरणार्थ, आयर्लंडच्या जुन्या लोकगीतांचें व पोवाड्यांचें जतन करणें हें कार्य कांहीं आयरिश संस्कृतीच्या अभिमान्यांनीं तेव्हां चालविलें होतें. पण त्यांच्या प्रयत्नांना यश येऊं शकलें नाहीं. व सन १७८२ पर्यंतच्या या काळांत आयर्लंडचा कॅथॉलिकपंथीय शेतकरी वर्ग सांस्कृतिक व आर्थिक सर्वच दृष्टींनीं मृतवत राहिला. सन १७७२ मध्यें आयरिश पार्लमेंट निर्माण करण्यांत आलें व तेथें आयर्लंडचें जे प्रतिनिधि बसले ते खरेखुरे आयरिश नसून आयर्लंडमध्यें शासक म्हणून आलेले ब्रिटिश जमीनदारच होते व धर्मानें प्रॉटेस्टंटपंथीय होते. अर्वाचीन आयरिश राष्ट्रवादाची मुहुर्तमेढ या परक्या व भिन्नपंथीय शासकवर्गानें घातली. कारण या जमीनदारवर्गामध्यें आयर्लंडच्या व्यापारी व औद्योगिक विकासाची महत्वाकांक्षा लवकरच उत्पन्न झाली व युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणें एक अर्वाचीन भांडवलदारी राष्ट्र बनण्याचें ध्येय या आयर्लंडमधील परक्या वरिष्ठ वर्गानें पुढें ठेवलें. या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं खुद्द ब्रिटनमधील वरिष्ठ वर्गाशीं वैर करणें व त्यांच्यापासून स्वतंत्र होणें आवश्यक होतें. या लढ्यांत आयरिश कॅथॉलिक

शेतकरी व आयरिश मध्यमवर्ग ह्यांच्याशीं या मूळच्या ब्रिटिश जमीनदार वर्गानें संपूर्ण ऐक्य केलें.

अर्वाचीन आयरिश राष्ट्रवाद हा भाषा, प्रदेश, आर्थिक सहजीवन, राष्ट्रीय संस्कृति व राष्ट्राभिमान या पांचहि घटकांच्या दृष्टीनें परिपूर्ण व एकात्म असा आज दिसत असला तरी त्याची कुळकथा ही अशी आहे. सन १७८२ नंतरच्या काळांत १७९८ व १८०३ सालीं आयरिश राष्ट्रवाद्यांनीं स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं मोठें उठाव केलें व या उठावांना १७८९ च्या फ्रेंच क्रांतिकारकांकडून तात्त्विक व प्रत्यक्ष अशी पुष्कळ मदत झाली. परंतु खुद्द आयर्लंडमधील आर्थिक जीवन अजून बऱ्याच अंशीं मध्ययुगीन स्वरूपाचेंच राहिलेलें असल्यामुळें ह्या उठावांना मूठभर दहशतवाद्यांचें बंड एवढेंच स्वरूप आलें. आयरिश शेतकरी आपापल्या जमीनदारांच्या जोखडाखालीं निपचित पडून होता. त्यामुळें आयरिश राष्ट्रवादामध्येंहि कमकुवतपणा दिसून येत होता. सन १८४८ पर्यंत मात्र ही परिस्थिति बदलली होती. खुद्द आयर्लंडमध्यें व्यापार व औद्योगिक विकास एवढा झाला होता कीं खेडेगांवाचा तुटकपणा व विस्कळीतपणा नाहींसा होऊन भांडवलदारी विकासाच्या पाशांत शेतकरीहि गोवला गेला. अर्थातच आयरिश राष्ट्रवादाचें पूर्वीचें अर्धकच्चें स्वरूप जाऊन त्याला सर्व राष्ट्राच्या, म्हणजेच आयर्लंडच्या परक्या व मूळच्या अशा सर्व रहिवाश्यांच्या, एकजिनसी आकांक्षेचें रूप आलें. प्रॉटेस्टंट मध्यम वर्ग व कॅथॉलिक बहुसंख्य शेतकरी हाच यापुढील राष्ट्रवादी चळवळीचा मोठा आधार बनला. शेतकऱ्यांच्या स्थितींत आमूलाग्र क्रांति करणें हें ध्येय मानणारें राष्ट्रवादीच एकंदर चळवळीला पुढें नेऊं शकत होते. लॅलॉर, पिअर्स, कोनोली प्रभृति जहाल राष्ट्रवाद्यांनीं जुन्या आयरिश राष्ट्रवादाला शेतकरी वर्गाच्या आकांक्षांची जोड देण्याचें हें कार्य केलें. तेव्हांपासून आयरिश लोकसत्तेच्या ध्येयाला व चळवळीला शेतकरी वर्गाच्या विस्तृत व भक्कम राष्ट्रवादाचें अधिष्ठान मिळालें.

आयरिश राष्ट्रवादाच्या चळवळींत आयरिश भाषेचा अभिमान या गोष्टीला मोठें स्थान आहे हें खरें. परंतु एवढ्याच आधारावर उभारलेला व ‘ स्वयंभू ’

व 'स्थायी' स्वरूपाचा राष्ट्रवाद आयर्लंडमध्यें निर्माण झालेला नाहीं, उलट त्याचा विकास आयरिश जनतेतील भिन्न वर्गांच्या आर्थिक विकासाबरोबर व सहजीवनाबरोबर होत गेला; व हें सहजीवन व हा विकास आधुनिक भांडवलदारी स्वरूपाचा आहे हें वरील इतिहासावरून दिसून येईल.

## हिंदी 'प्रांतां'च्या राष्ट्रीयत्वाची वाढ

आधुनिक राष्ट्रवादाला भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा पाया आवश्यक आहे ही गोष्ट आणखी एका तऱ्हेनें लक्षांत येऊं शकेल. खुद्द हिंदुस्थानातच आज आपण असें पाहतों कीं वेगवेगळ्या 'प्रांतां'मध्यें राष्ट्रवादाची जाणीव कमी-अधिक तीव्र आहे व त्या जाणीवेचा जन्म व विकासहि वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या वेळीं झाला आहे. असें होण्याचें कारण काय? यावर असें उत्तर दिलें जातें कीं कांहीं प्रांत राष्ट्रवादाच्या दृष्टीनें मागासलेले राहिले कारण तेथें साक्षरता इत्यादि आधुनिक सुधारणांचा व शिक्षणाचा प्रसार उशिरानें झाला; किंवा दुसरें असें कारण देण्यांत येतें कीं, कांहीं प्रांतांतील जनतेला राष्ट्रीय स्वाभिमानाची पूर्वपरंपरा होती म्हणून तेथें प्रथम राष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न झाली. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय जागृतीची अशी ऐतिहासिक उपपत्ति देण्यांत येते. परंतु भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या विकासाचा वेगवेगळ्या प्रांतांतील इतिहास घेतला तर असें दिसून येतें कीं ब्रिटिशपूर्वकालांतील राज्याभिमानाची परंपरा महत्वाची नसून वेगवेगळ्या प्रांतांत आधुनिक उद्योगधंद्यांची वाढ जसजशी कमीजास्त झाली त्यामानानें सुशिक्षित वर्गाची कमीजास्त वाढ झाली व राष्ट्रीय जाणीवेची तीव्रता त्यामानानें वाढत गेली. कलकत्ता व मुंबई हीं शहरें म्हणजे निव्वळ ब्रिटिश अमदानींत जन्माला आलेलीं व परंपरेच्या दृष्टीनें उपटसुंभ असलेलीं आधुनिक भांडवलदारी शहरें आहेत. पण या दोन शहरांनींच बंगाल व महाराष्ट्र या दोन प्रांतांतील आरंभीच्या राष्ट्रवादाला प्रेरणा दिली. मराठी साम्राज्याचा अभिमान या राष्ट्रीय चळवळीमध्यें आणला गेला तो नंतरच्या काळांत! बंगालमध्यें तर साम्राज्याची परंपराच नव्हती; परंतु तेथील राष्ट्रवाद

महाराष्ट्रांतील राष्ट्रवादापेक्षां आधींचा, जास्त प्रखर व जास्त विस्तृत पाया-वरचा होता. या राष्ट्रवादाचा मुख्य आधार असलेला बंगाली जमीनदार वर्ग व सुशिक्षित वर्ग यांना ब्रिटिशपूर्वकालांतील परंपरा नव्हती. बंगाली जमीन-दाराचें तर पूर्वी अस्तित्वच नव्हतें. कंपनीला सांपडलेल्या रेव्हेन्यू कलेक्टरांतून व मक्तेदारांतून हा जमीनदार वर्ग अगदीं नव्यानें ब्रिटिशांनींच उत्पन्न केला होता. आयर्लंडमध्यें खुद्द ब्रिटिश व्यक्तींनाच जमीनदार बनविण्यांत आलें; बंगालमध्यें एतद्देशीयांतूनच जमीनदार बनविण्यांत आलें, एवढाच फरक! ब्रिटिश सत्तेनें दोन्हीकडे एकच धोरण स्वीकारलें व त्याला फळेंहि सारखींच आलीं. आयर्लंडमधला ब्रिटिश जमीनदार शेवटीं मायदेशाविरुद्ध लढण्यासाठीं उठला व आयरिश राष्ट्रवादाचा निर्माता बनला; इकडे बंगालमध्यें बंगाली जमीनदार आपल्या जन्मदात्याविरुद्ध उठले व सबंध भरतखंडाच्या राष्ट्रवादाचें बिनीचें पुढारी बनले.

बंगालच्या मागोमाग महाराष्ट्र हा भारतीय राजकारणांत पुढें आला. बंगालमध्यें ज्याप्रमाणें व्यापारांत पडलेलीं टागोर घराण्यासारखीं जमीनदार घराणीं अग्रभागीं होतीं, त्याप्रमाणें इकडेहि दादाभाई नौरोजी यांच्यासारखें व्यापारीच प्रथम पुढें आले व राष्ट्रवादाचीं पहिलीं पाऊलें मुंबईनेंच उचललीं. सन १८८५ च्या राष्ट्रसभा-संघटनेच्या काळापासून तों सुरतेच्या कॉंग्रेसपर्यंत मुंबईचा हा वरचष्मा चालूच होता. त्यानंतर मात्र जहाल राष्ट्रवाद्यांकडे कॉंग्रेसचीं सूत्रें येऊं लागलीं; परंतु त्याचें कारणहि असेंच द्यावें लागेल कीं सन १९०७ पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्गहि भांडवलदारी पद्धतीच्या समाजव्यवस्थेंत ओढला गेला होता. या पद्धतीचा महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्गाशीं व शेतकरी वर्गाशीं जो संबंध आला तो अर्थातच औद्योगिक विकास व प्रगति ह्यांच्या अनुभवाचा नव्हता. हिंदुस्थानामध्यें एकंदरींतच भांडवलदारी समाजव्यस्थेच्या दिशेनें जी घडामोड झाली ती साम्राज्यवादानें आखून दिलेल्या दिशेनें झाली. उद्योगधंद्याचा नीट विकास न होतां साम्राज्यवादाच्या व्यापारी स्वार्थासाठीं शेतकरी वर्गाची पिळवणूक करण्यांत आली व सुशिक्षित

मध्यम वर्गासहि वाढत्या दारिद्र्याचे चटके बसूं लागले. या दिशेनें समाजाच्या स्थितींत ज्या वेगानें फरक पडत गेला त्याच वेगानें महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्ग जहाल राष्ट्रवादी बनत गेला. महाराष्ट्र व बंगाल या दोन प्रांतांतील समाजस्थिति इतर प्रांतांतील स्थितीच्या मानानें आधीं बदलली व त्यामुळें राष्ट्रवादाचा प्रादुर्भावहि येथें आधीं झालेला दिसतो.

अर्वाचीन राष्ट्रीयत्वाचे घटक कोणते ? या प्रश्नाचें उत्तर या प्रकरणांत दिल्यानंतर आतां महाराष्ट्राला या राष्ट्रीयत्वाच्या कसोटीनें 'राष्ट्र' म्हणणें शक्य आहे कीं नाहीं तें सहज ठरवितां येईल. परंतु हा प्रश्न नुसता व्याख्या ठरविण्याचा व ती लागू करण्याचा नाहीं. महाराष्ट्रीय राष्ट्रीयत्वाचा विकास खुद्द मराठी राजकीय पुढाऱ्यांच्या व विचारवंतांच्या मनांत कसकसा होत गेला हें आपण पाहिलें पाहिजे. तेंच विवेचन पुढील दोन प्रकरणांतून केलें आहे व नंतर महाराष्ट्राचें संयुक्त भारताच्या राज्यघटनेंत व नव्या राज्यव्यवस्थेंत स्थान काय असावें हा महत्वाचा प्रश्न घेतला आहे. त्याशिवाय, मराठ्यांच्या राष्ट्रीयत्वाचा भारतीय स्वातंत्र्याच्या व समाजक्रांतीच्या चळवळीशीं प्रत्यक्ष संबंध काय आहे तें कळणार नाहीं. 'राष्ट्र' ही एक अर्वाचीन संस्था आहे व तिचा उगम भांडवलदारींत झाला असला तरी भांडवलदारीच्या नाशानंतरच्या म्हणजे समाजवादी अर्थव्यवस्थेशीं संलग्न असें नवें लोकसत्तावादी व क्रांतिकारक स्वरूप राष्ट्रवादाला धारण करतां येतें; ही गोष्ट मराठी राष्ट्रीयत्वाच्याच भविष्याच्या दृष्टीनें मांडण्याचा प्रयत्न मी शेवटच्या प्रकरणांत करणार आहे तूर्त, पुढील दोन प्रकरणांतून, मराठी राष्ट्र कल्पनेच्या विकासाचे कांहीं टप्पे पाहूं.

★

# महाराष्ट्रामध्यें राष्ट्रवादाचा विकास : ४ :

## ( सन १९२० पर्यंत )

राष्ट्रवाद ही एक आधुनिक भावना आहे व तिचा उगम आधुनिक युगांत बनलेल्या 'राष्ट्र' या सामाजिक संस्थेंत आहे; सलंग प्रदेश, लोकभाषा, अर्वाचीन (भांडवलदारी) आर्थिक सहजीवन, राष्ट्रीय संस्कृति व तिला अनुरूप अशी राष्ट्रीय भावना या सर्व आवश्यक घटकांचा लाभ ज्या लोकसमूहांना ऐतिहासिक विकासामुळें होतो त्यांनाच 'राष्ट्र' ही संघटना बनवितां येते; अशीं 'राष्ट्रें' हळूंहळूं बनत जातात व 'महाराष्ट्र' नांवाचें राष्ट्र देखील असेंच बनत आहे, असें आज आपण म्हणूं शकतो. आजहि महाराष्ट्रामध्यें एकजिनसी आकांक्षा व एकसूत्र जीवन नाहीं व त्यामुळें पुष्कळ विचारवंतांना असें वाटतें कीं, "महाराष्ट्राला संघटित व केंद्रित राष्ट्र म्हणतां येत नाहीं," (प्रा. श्री. व्यं. पुणतांबेकर, 'महाराष्ट्राचें केंद्र', प्रतिभा, १५ एप्रिल १९३६, पहा). आजच्या विस्कळित, असंघटित व विभागलेल्या महाराष्ट्रांतील राजकीय विचारांच्या प्रवाहांचें जर नीट

निरीक्षण केलें तर मात्र असें दिसतें कीं, इंग्रजी अंमलानंतरच्या साठसत्तर वर्षांतच महाराष्ट्राच्या राष्ट्रवादाचा उदय व त्याचा विकास सुरू झाला आहे. अनेक रूपें घेत घेत तो राष्ट्रवाद आजच्या "संयुक्त महाराष्ट्रीय" चळवळीपर्यंत येऊन ठेपला आहे.

या दीर्घ विकासक्रमाचा तपशील अभ्यासणें हें मोठें संशोधनाचें काम आहे व तें या लहान पुस्तकांत करणें शक्य नाहीं. परंतु या विकासाच्या कांहीं ठळक अवस्था पाहणें जरूर आहे; त्याशिवाय आजच्या महाराष्ट्रीय राष्ट्रवादांतील कमकुवतपणा व सामर्थ्य या दोहोंची अथवा त्यांच्या परिणामांची उपपत्ति लावितां येणार नाहीं.

ज्या राजकीय परंपरेंत महाराष्ट्रांतील हा राष्ट्रवाद उदयास आला तिची ऐतिहासिक पार्श्वभूमि कशा प्रकारची होती हें प्रथम थोडक्यांत पाहूं. प्रथम पेशव्यांचें राज्य सन १८१८ मध्यें गेलें, नंतर सन १८४९ मध्यें सातारची गादी गेली व सन १८५४ सालीं नागपूरकर भोसल्यांचें राज्य बुडालें. बाकीचीं ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा इत्यादि राज्यें 'संस्थानें' झालीं म्हणजे राजकीयदृष्ट्या बुडालींच; परंतु राजवंशाचें पोकळ वैभव मात्र मागें उरलें. सन १८५७ च्या राजेरजवाड्यांच्या उठावांत पेशवे, झांशीची राणी, तात्या टोपे वगैरे व्यक्ती आपल्या गुणांनीं व पराक्रमांनीं चमकल्या, पण या उठावाचें कार्यक्षेत्र महाराष्ट्राबाहेर व दिल्लीच्या केंद्राभोंवतीं होतें. महाराष्ट्राच्या जुन्या शासक व वरिष्ठ वर्गाच्या राजकारणाचीं सूत्रें अशा रीतीनें दिल्लीच्या तख्ताशीं गुंतलेलीं असणें ही परंपरा जुनीच होती. सन १८५७ मध्यें त्या परंपरेला अखेरचा प्राणघातक घाव बसला.

याच वेळीं दुसरीकडे एक नवी राजकीय शक्ति उदयाला आली होती; ती म्हणजे मुंबईच्या नव्या व्यापारी वर्गाची. दिल्लीची जागा मुंबईनें घेतली. या मुंबईची ओळख महाराष्ट्राला झालेली नव्हती. तिचें राजकारण नवें होतें. या नव्या राजकारणाचा— नव्या राष्ट्रवादाचा— उपदेश मुंबईकरांकडून

घेणें महाराष्ट्राला प्राप्त होतें. हा उपदेश निमूटपणें जशाचा तसा घेतला जाणें अशक्य होतें, कारण महाराष्ट्रांतला सुशिक्षित वर्ग नवाच असला तरी त्याला जुन्याचें थोडें आसन होतें. अगदीं सुरुवातीच्या काळांतच मुंबई व पुणें यामधील फरकाचें प्रतिबिंब राजकारणांत व राष्ट्रीय विचारांत पडूं लागलें. श्री. जांभेकर ( १८१०–१८४६ ), लोकहितवादी ( १८२३–१८९२ ) हे मुंबईचे महाराष्ट्रीय पुढारी व चिपळूणकर, टिळक, आगरकर प्रभृति पुण्याचे पुढारी व त्यांचे अनुयायी यांच्यातली तफावत केवढी मोठी आहे! या तफावतीचें कारण व्यापारी मुंबई व बिनव्यापारी सुशिक्षित महाराष्ट्र यांच्यांतील फरक हें होय.

## नव्या सुशिक्षित वर्गाचा राष्ट्रवाद

महाराष्ट्रांतले चिपळूणकर प्रभृति पुढारी जुन्या संस्कृतीचा, वैभवाचा व साम्राज्याचा विचार आपल्या राष्ट्रवादाशीं जोडीत, पण जुने मराठी राज्यकर्ते व त्यांची उच्चवर्णीय संस्कृति जशी मराठी बहुजन समाजापासून तुटलेली व तरंगणारी होती, तसाच हा नवा वर्ग व त्यांचा नवा राष्ट्रवादहि तरंगता होता. या महाराष्ट्रीय राष्ट्रवादाचा शेतकरी वर्गाच्या ब्रिटिशराज्यविरोधी लढ्यांशीं संबंध नव्हता यावरून हें स्पष्ट होईल. सन १८२६ व सन १८४४ मधले रामोश्यांचे उठाव, सन १८३० व सन १८४६ मधले कोळ्यांचे उठाव, सन १८७५ मधले कर्जबाजारी शेतकरी लोकांचे महाराष्ट्रव्यापी दंगे आणि सन १८७८ मधले वासुदेव बळवंताचें "प्रजासत्ताकाचें बंड" या सर्वांपासून "वाघीणीचें दूध" प्यालेला नवा महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्ग तत्वतः अलिप्त होता.

बहुजनसमाजाच्या सुखदुःखांपासून दुरावलेला व त्यांच्या बंडखोरीपासून अलिप्त राहिलेला हा महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्ग सन १८५७ मध्यें दिल्लीच्या राजकारणाला जसा कायमचा मुकला तसा नंतरच्या मुंबईच्या व्यापारी राजकारणाशींहि समरस होऊं शकला नाहीं व त्याची हीच स्थिति निरनिराळ्या स्वरूपांत व अवस्थांत पुन्हापुन्हा व आजतागायत आपल्याला दिसेल. राष्ट्रीयत्व,

व्यक्तिस्वातंत्र्य, सुधारणा वगैरे गोष्टींचा विचार करीत असतांना या सुशिक्षित वर्गाला म. जोतीबा फुले प्रभृति बहुजनसमाजांतील सुधारकांची बरोबर होती तेवढी तत्त्वेंहि आत्मसात करतां आलीं नाहींत; त्यामुळें जहाल राष्ट्रवादाचीं तत्त्वें भरीव सामाजिक प्रगतीला प्रेरक व पोषक अशा तऱ्हेनें विस्तारून त्यांना मांडतां आली नाहींत व जहाल राजकीय मतांचा प्रसारहि व्यापक लोकसंघटनेच्या दृष्टीनें करतां आला नाहीं; त्यामुळें नुसती असंतोषाला धार देणें एवढेंच कार्य त्या काळांत होऊं शकलें. त्या वेळच्या राष्ट्रवाद्यांची समाजांतली ही प्रत्यक्ष स्थिति पाहिली म्हणजे राष्ट्रीयत्वासंबंधीं त्यांची तात्त्विक भूमिकाहि अस्पष्ट, तरंगणारी व भावनात्मक असेल असा अंदाज करतां येतो. हा अंदाज खरा आहे याचा पडताळा त्या-वेळच्याच एका महाराष्ट्रीय विद्वानाच्या पुढील उद्गारांवरून घेतां येईल. इंग्रजी शिकून राष्ट्रीयत्वाविषयीं विचार करूं लागलेल्या वर्गासंबंधीं श्री. वि. का. राजवाडे म्हणतात, "इंग्रजी जाणणाऱ्यांच्या, विचारांचा, विकारांचा व उत्साहाचा गंधहि ती भाषा न जाणणाऱ्यांना नाहीं." ( राजवाडे–लेख–संग्रह, भा. ३, पा. १२४). आयर्लंड, पोलंड, इटली वगैरे राष्ट्रांच्या विकासालाहि सुशिक्षितांच्या अशा भावनात्मक राष्ट्रीयत्वापासूनच सुरुवात झाली असल्याचें दिसून येईल.

महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्गाची सर्वसाधारण वैचारिक घडण वर सांगि-तली. या भूमिकेच्या अनुषंगानें त्यांच्या 'राष्ट्र' विषयक कल्पनांचा विकास कसा होत गेला हे आतां संक्षेपानें पाहूं. सन १८४८ च्या सुमारास पुणें व मुंबई येथील अनेक मराठी विद्वानांनीं केलेलें लिखाण बारकाईनें तपासून त्यामध्यें राष्ट्रवादासंबंधीं काय मांडणी होती, हें पहावयास पाहिजे; पण इतक्या मागें न जातां सन १७८२ व सन १८८३ मध्यें लिहिलेले दोन उतारे आपण विचारांत घेऊं.

सन १८८२ मध्यें, श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं "देशोन्नति" या विषयावर लिहिलेले पुढील विचार पहा :

"आमच्या **देशांत जन्मभूमीचा** अभिमान शिथिल होण्यास या **राष्ट्राचें** विस्तीर्णत्व व जातिभेद ही दोन मोठीं कारणें झालीं आहेत. सिंधु-नदीकडचा मुलूख व त्रावणकोर किंवा कोंकण आणि बंगाल हे **प्रांत** परस्परांच्या संबंधानें म्हटले म्हणजे आम्ही व आमचे पाताळवासी अमेरिकन यांच्यासारखेंच होत. दोघांची बहुधा अगदींच फुटाफूट म्हटली तरी चालेल. विद्या, देशाचार, रीतिरिवाज, वगैरेंच्या संबंधानें पहातां, असले परस्पर विप्रकृष्ट **प्रांत** म्हटले म्हणजे दोन भिन्नभिन्न **देशच** होत! मग अशांच्यामध्यें ऐक्य तें कितीसें उत्पन्न होणार?" (अधोरेखन माझें).

वरील उद्गारांवरून दोन गोष्टी दिसतात. एक अशी कीं सर्व भरतखंड हा एक **देश** किंवा **राष्ट्र** आहे असें श्री. चिपळूणकरांना वाटत होतें; दुसरीकडे या '**राष्ट्रांतच**' भिन्नभिन्न **देश** आहेत हें त्यांना धडधडीत दिसत होतें.

भरतखंडाला एकराष्ट्रीय देश समजणें परंतु त्यांतच अनेक देश आहेत ह्याची जाणीव ठेवणें, अशी परस्परविरोधी विचारांचा समन्वय केलेली भूमिका श्री. चिपळूणकर यांनीं घेतलेली येथें दिसून येते. महाराष्ट्रादि देशांना 'प्रांत' म्हणणें अयोग्य आहे याची अस्पष्ट जाणीव अमेरिकेचा उल्लेख करून त्यांनीं दाखविली आहे, परंतु लगेच असा युक्तिवाद केला आहे कीं, भारताच्या विस्तीर्णत्वामुळें येथील लोकांत खंबीर राष्ट्रवाद उरलेला नाहीं. 'विस्तीर्णत्वा'चा हा युक्तिवाद असा आहे कीं त्याला राष्ट्रवादाच्या दृष्टीनें कांहींच महत्त्व नाहीं व याची थोडी जाणीव श्री. चिपळूणकरांना आहेच. पण त्या युक्तिवादाचा कमकुवतपणा ओळखून खऱ्या राष्ट्रवादी भूमिकेकडे वळण्याऐवजीं ते उलट दुसऱ्याच एका चुकीच्या कल्पनेकडे वळतात. ती कल्पना म्हणजे प्राचीन व ऐतिहासिक काळांतील भारतीय एकराष्ट्रीयत्वाची! 'विस्तीर्णत्व व जातिभेद' या दोन कारणांनीं पूर्वी कधीं खंबीर असलेला जन्मभूमीचा अभिमान सध्यां 'शिथिल' झाला असा श्री. चिपळूणकरांचा अभिप्राय आहे, आणि केव्हांतरी (अशोक चंद्रगुप्ताच्या काळीं!) हा देशाभिमान शिथिल नव्हता असें त्यांनीं सुचविलें आहे. 'विस्तीर्णत्व व जातिभेद' हीं कारणें प्राचीनतम काळापासून आहेतच, याची

आठवण शास्त्रीबोवांना कोणी करून दिली असती तर त्यांनीं काय उत्तर दिलें असतें कोण जाणें !

अशीच द्विधा वृत्ति व गोंधळाची भूमिका लोकहितवादींनीं घेतलेली आढळते. "ग्रामरचना, त्यांतील व्यवस्था आणि त्यांची हल्लींची स्थिति" हें पुस्तक लोकहितवादींनीं सन १८८३ मध्यें लिहिलें. पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेंत महाराष्ट्राला **देश** असें संबोधिलेलें आहे व पान ५९ वर असें म्हटलें आहे कीं भारताच्या "अफाट राज्योदधींतील **नानाराष्ट्ररूप** गलबतांची कालरूप महावातानें वाताहत झाल्यामुळें त्यामध्यें प्रस्तुत सरकारसारखा आश्रयभूत ओंडा सांपडला असून......" वगैरे. (अधोरेखन माझें)

यावरून दिसतें कीं, ब्रिटिश अमदानीपूर्वी भरतखंडामध्यें **नानाराष्ट्रें**, म्हणजेच महाराष्ट्रासारखीं राष्ट्रें, होतीं असें लेखकाला वाटत होतें. परंतु, याच पुस्तकांत, पान ६ वर, हिंदुस्थानलाच **राष्ट्र** म्हटलेलें आढळतें. ब्रिटिश अंमलामुळें हिंदुस्थानांत कित्येक चांगल्या गोष्टी आल्या, असें लोकहितवादींच मत होतें. त्यामुळें, असा अंदाज करतां येईल कीं पूर्वी बहुराष्ट्र असलेला हिंदुस्थान ब्रिटिश सत्तेमुळें एकराष्ट्र झाला, असा लोकहितवादींचा विश्वास असावा.

आपल्याकडील जुन्या विद्वानांपैकीं सनातनी जहाल वृत्तीचे श्री. चिपळूणकर व सुधारक मवाळ पंथाचे लोकहितवादी यांच्या राष्ट्र-कल्पनेमध्यें किती मूलभूत साम्य आहे, तें वरील उद्गारांवरून कळून येईल. हीच प्रवृत्ति किंवा राष्ट्रीयत्वाची कल्पना 'केसरी' च्या पुढील दोन अग्रलेखांतील उताऱ्यांत दिसून येते. ता. १-५-१८८८ च्या अग्रलेखांत म्हटलें आहे कीं "हिंदुस्थान हा **स्वरूपतः** एक देश आहे परंतु **वस्तुतः** तो युरोपप्रमाणें महाद्वीप आहे." (केसरी प्रबोध, पान १४८); तसेंच ता. २३-४-१९०० च्या "राष्ट्रीयत्वाची कल्पना" या अग्रलेखांत म्हटलें आहे कीं, "एकवेळीं **निरनिराळे राष्ट्रीयत्व** अनुभविलेल्या लोकांची सांगड घातली एवढ्यावरून त्यांचे **राष्ट्रीयत्व** एक झालें असें मानणें

बरोबर नाहीं." (अधोरेखन माझें). हे दोनहि अग्रलेख लोकमान्यांच्या हातचे आहेत; त्या काळांत सर्व प्रवृत्तींच्या विद्वानांची राष्ट्र-कल्पनेच्या बाबतींत सामान्य भूमिका व एकच मनःस्थिति होती, हें यावरून दिसेल.

ब्रिटिश राज्य व त्याच्याविरुद्ध भारतीय स्वातंत्र्याचा लढा ही गोष्ट त्या-वेळच्या सर्व विचारांना वळण देत होती, व तें आवश्यकच होतें. हिंदी स्वातंत्र्याचा असा विचार करणारा सुशिक्षित लोकांचा वर्गहि ब्रिटिशांच्या राजवटींत नव्यानें उत्पन्न झालेला होता. मेकालेसाहेबासारख्या कट्टर साम्राज्यवादी अधिकाऱ्यानें भारतीयांच्या स्वाभिमान खच्ची करण्यासाठीं निर्माण केलेल्या 'इंग्रजी शिक्षण पद्धतीला' परकीय असूनहि गुरुस्थानी मानणारा हा वर्ग इंग्रजींत बोलत व विचार करीत होता. जुन्या इतिहासाकडे पाहण्याची या नव्या वर्गाची दृष्टि शास्त्रीय संशोधनात्मक अशी तर नव्हतीच, उलट इंग्रजी विचारानें आलेली ती दृष्टि एकांगी व प्रतिकारात्मक राष्ट्रवादी अशी होती. त्यामुळें जुन्या भारतीय इतिहासावर राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें वेगवेगळीं अनुमानें त्या वेळच्या विद्वानांनीं लादलेलीं आपल्याला दिसतात. वरील उताऱ्यांवरून राष्ट्रीयत्वासंबंधीं त्या काळांतली लवचिक, बहुजिनसी व अनिश्चित विचारपद्धति दिसून येतें.

सन १८८२ नंतरच्या काळांतहि भारताला **एकराष्ट्र** मानून त्याचवेळीं त्याला एक **बहुराष्ट्र** खंड मानण्याची प्रथा चालूच होती, याचीं अनेक उदाहरणें देता येतील: परंतु मधलीं वर्षें सोडून आपण सन १९०४ मधील एक ठळक उदाहरण घेऊं. या वर्षी भरलेल्या कॉंग्रेसमध्यें मुख्य ठराव "वंगभंगा" संबंधींचा होता. कॉंग्रेस ही संस्था स्थापन होऊन वीस वर्षें झालीं होतीं व या दीर्घ काळांत बंगाल व महाराष्ट्र यांच्या नेतृत्वाखालीं जहाल राष्ट्रवादी राजकारणाची प्रवृत्ति देशभर फैलावली होती. कर्झनशाहीच्या स्वरूपांत उभ्या राहिलेल्या साम्राज्यसत्तेला सर्व भारतीयांनीं एकजुटीनें टक्कर दिली पाहिजे ही जाणीव भिन्न धर्मांच्या व प्रांतांच्या लोकांत दृढमूल झाली होती. बंगालचे व महाराष्ट्राचें पुढारी एकाच व्यासपीठावरून एका जहाल राष्ट्रवादाचा संदेश सर्व भारतीय जनतेला देत होतें.

भारतासंबंधीं एकराष्ट्रीय व बहुराष्ट्रीय अशा दोनहि परस्परविरोधी राष्ट्रकल्पना यावेळीं कशा रूढ होत्या हें पाहण्यासारखें आहे. एकराष्ट्रीय भारताच्या कल्पनेचें प्रतीक म्हणून सन १९०४ मध्यें बंगालध्यें साजरा झालेला शिवाजीमहाराजांचा उत्सव दाखवितां येईल. या उत्सवाला एक भारतीय राष्ट्रीय उत्सव म्हणून मानण्यास बंगाली पुढाऱ्यांनीं तयार व्हावें ही एक महत्वाची व अनपेक्षित घटना होती; कारण ऐतिहासिक काळांत मराठ्यांचा बंगालशीं आलेला संबंध फार वेगळा होता. मराठ्यांच्या स्वाऱ्यामुळें ' बारगी ' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या मराठ्यांबद्दल बंगालमध्यें भीति व तिरस्कार वाटत होता, व खेड्यांपाड्यांतूनहि मराठ्यांच्या फौजेबद्दल ही वृत्ति होती. पण, सन १९०४ मध्यें, मराठी साम्राज्यसंस्थापक शिवाजीमहाराजांना भारतीय राष्ट्रीयत्वाचे आद्यजनक मानायचें बंगाली सुशिक्षितांनीं ठरविलें, यांत काय दिसून येतें ? या आधुनिक घटनेचा अर्थ असा कीं इतिहासांत काय घडलें याचा विचार त्या वेळीं गौण मानला गेला व परकीय सत्ताधाऱ्यांशीं लढून महाराष्ट्रांत मराठी राज्य स्थापणारा महापुरुष या नात्यानें शिवाजी महाराजांना सर्व भारतीयांकडून आदराचें स्थान मिळूं शकलें. या आदराचें आणखी एक कारण होतें तें असें कीं या काळांतला भारतीय सुशिक्षिताचा राष्ट्रवाद बहुतांशीं हिंदू संस्कृतीच्या अभिमानावरहि आधारलेला होता. ( याला अपवादहि होते. उदाहरणार्थ सन १९०४ मध्यें बंगालमध्यें साजऱ्या झालेल्या शिवजयंत्युत्सवामध्यें जहाल राष्ट्रवादी असलेल्या रविंद्रनाथ टागोरांनीं भाग घेतला, पण उत्सवामध्यें करण्यांत आलेली भवानी देवीची पूजा राष्ट्रीयत्वाच्या भावनेशीं विसंगत आहे असें म्हटलें. ) एकराष्ट्रीयत्वाबरोबरच हिंदुत्वाची जोपासना त्या काळांत होत होती. राष्ट्रीयत्वाच्या विकासामध्यें धार्मिकतेचें हें अंग कसें प्रभावी होतें व पुढेंहि तें कसें प्रबळ होत गेलें, हें नंतर पाहूं.

बंगाल, महाराष्ट्र, पंजाब इत्यादि सर्वच प्रांतांतून शिवजयंत्युत्सव, स्वदेशी संमेलनें, मेळे, वगैरे राष्ट्रीय चळवळी एकजुटीनें चालल्या होत्या व त्यामुळें सर्व भारतीय जनता एका एकजिनसी राष्ट्रीयत्वानें भारली गेली आहे, अशी कल्पना

त्यावेळीं चांगलीच पसरली होती. या कल्पनेचा पुरस्कार खुद्द ब्रिटिश साम्राज्यवाद्यांपैकीं कांहीं उदारमतवाद्यांनीं कसा केला, हें पुढें मी सांगणार आहे. पण भारतीय एकराष्ट्रीयत्वाला विरोधी असें भारताच्या बहुराष्ट्रीयत्वाचें तत्वहि त्यावेळीं कसें प्रभावी होतें तें आधीं पाहूं. महाराष्ट्र व बंगाल हे त्यावेळचे आघाडीवरचे प्रांत व त्या प्रांतांतच बारकाईनें पाहिल्यास 'बंगाली' व 'महाराष्ट्रीय' राष्ट्रीयत्वाची उघड व प्रबळ वृत्ति आपल्याला दिसून येईल. श्री. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांना त्या काळच्या बंगालचे पुढारी म्हणतां येईल. त्यांनीं सन १८७९ सालीं सुरू केलेल्या "बंगाली" नांवाच्या पत्रांत बंगाली राष्ट्राभिमानाचें स्वरूप स्पष्ट दिसतें व आपल्याकडेहि या सुमारास निर्माण झालेल्या सर्व राजकीय लिखाणांत, काव्यांत व ऐतिहासिक संशोधनांत मराठी राष्ट्रीयत्वाचा अभिमान ठळकपणें दिसतो.

या वेगवेगळ्या राष्ट्रीय अभिमानांमुळें त्यावेळच्या भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत फुटीरपणा किंवा हेवेदावे उत्पन्न होत नव्हते, उलट आपण सर्व एकाच प्रबळ शत्रूविरुद्ध लढत आहोंत ही भावना सर्वांना एकत्र आणीत होती. भावि स्वतंत्र भारतामध्यें महाराष्ट्र, बंगाल इत्यादि घटक राष्ट्रांची जी एकजूट निर्माण झालेली दिसेल, तिचें साधें प्राथमिक स्वरूप त्यावेळच्या भारतीय व 'प्रांतिक' भावनांच्या अविरोधी समन्वयांत दिसून येतें. राष्ट्रीय, म्हणजे तथाकथित 'प्रांतीय', भावनांचें व शक्तींचें केंद्रीकरण कॉंग्रेसच्या व्यासपीठावर होत होतें व ही गोष्ट सन १९०४ च्या अधिवेशनांत पास झालेल्या "वंगभंगा" वरील ठरावांतच स्पष्ट होते. तो ठराव असा:—

"बंगालची फाळणी करण्याचें धोरण ब्रिटिश सरकारनें योजिलें आहे; कोणत्याहि स्वरूपांत तें अवलंबिलें गेलें तरी त्याचा ही कॉंग्रेस तीव्र निषेध जाहीर करते. या फाळणीमुळें **बंगाल या राष्ट्राचें** वेगवेगळे तुकडे पडतील व त्यामुळें त्याच्या सामाजिक, बाद्धिक व भौतिक प्रगतीला भयंकर अडथळा होईल......" ( ॲनी बेझंट यांचा "हाऊ इंडिया रॉट फॉर फ्रीडम" हा ग्रंथ पा. ४१२. अधोरेखन लेखकाचें )

या ठरावामध्यें बंगालला स्पष्टपणें राष्ट्राचा दर्जा दिलेला आहे. वंग-भंगाच्या या संकटाविरुद्ध सर्व हिंदुस्थान खवळून उठला व ब्रिटिश सत्तेविरुद्ध सर्व हिंदी जनतेची एकजूट घडून येण्यास " वंगभंग " हें एक मोठें कारण झालें, परंतु त्या एकजुटीमुळें हिंदी जनतेमध्यें केवळ एकराष्ट्रीय एकजिनसी-पणाची जाणीव उत्पन्न झाली असें म्हणतां येत नाहीं. उलट कॉंग्रेसच्या ठरावांत बंगालचा 'राष्ट्र' म्हणून निर्देश आहे यावरून बहुराष्ट्र हिंदुस्थानची कल्पना तेव्हां पुष्कळच रूढ असल्याचें स्पष्ट दिसतें. त्यावेळच्या एकंदर विचा-रांचा ओघहि तेंच दाखवितो उदाहरणार्थ, वंगभंगाच्या ठरावावर कॉंग्रेसच्या अधिवेशनांत भाषण करतांना महाराष्ट्रीय प्रतिनिधी रा. मुधोळकर यांनीं खालील उद्‌गार काढले :

बंगालची परिस्थितीच विशिष्ट आहे असें सांगून ते म्हणतात, " एका वंशाचें रक्त ज्यांच्या नसांतून वहात आहे व ज्यांची मातृभाषा एक आहे अशा एका राजवटीखालीं तो एकवटला गेला आहे." ( अधिवेशनाचा अधिकृत इंग्रजी अहवाल, पानें २२४–२५ )

वरील उद्‌गारांत बंगालच्या **वांशिक** एकजिनसीपणाचा उल्लेख आहे, व त्याला प्रत्यक्ष वंशशास्त्रीय आधार नाहीं, पण हा मुद्दा येथें गैरलागू आहे. कॉंग्रेसच्या वक्त्यांचें व श्रोत्यांचे मनोगत काय होतें एवढेंच आपणास पहा-वयाचें आहे. हिंदुस्थानसारख्या " विस्तीर्ण खंडामध्यें " अनेक वंशाचे लोक-समूह आहेत, असें श्री. मुधोळकर यांनीं पुढेंहि आपल्या व्याख्यानांत म्हटलें आहे. त्यावरून, बंगाल, महाराष्ट्र, ओरिसा वगैरे लोकसमूहांचें परस्पर–भिन्नत्व त्यावेळच्या हिंदी पुढाऱ्यांना स्पष्टपणें दिसत होते व तें मान्य करण्याची त्यांची वृत्ति होती, असा निष्कर्ष निघतो.

याच ठरावावरील चर्चेत आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी घडली. आसामतर्फे बोलणारे प्रतिनिधी रा. विनयकुमार रॉय म्हणाले कीं आम्हालाहि बंगालची फाळणी नको, परंतु " आसामला बंगालमध्यें समाविष्ट करण्याच्याही

आम्ही विरुद्ध आहोंत.' यावरून आसामच्या वेगळेपणाचा सूर त्यावेळीं कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून स्पष्टपणें काढला जात होता, व त्यामध्यें कांहीं गैर किंवा "अराष्ट्रीय" आहे असें मानलें जात नव्हतें.

बंगालच्या फाळणीबद्दल खुद्द बंगालमध्यें जी प्रखर प्रतिकाराची लाट उसळली तिचें स्वरूपहि जितकें ब्रिटिशविरोधी तितकेंच "वंगीय"हि होतें. आपल्या राष्ट्रभूमीची चिरफाड सहन न झाल्यामुळें बंगाली सुशिक्षित समाज सनदशीर तसेंच क्रांतिकारक मार्गांनीं कर्झनशाहीविरुद्ध खवळून लढत होता. सन १९११ पर्यंत हा लढा चालला व फाळणी रद्द करण्यांत आली, त्यावेळीं त्या दीर्घ व यशस्वी लढ्याचें समालोचन करतांना रा. न. चिं. केळकर यांनीं पुढील उद्गार काढले आहेत :

एकभाषीय लोकांना "राष्ट्र या नात्यानें एकात्मता रहावी असें स्वाभाविक रीतीनें वाटत असतें, हें दिसून आलें...तीच गोष्ट बंगालच्या फाळणीनें सिद्ध केली." "बंगाली लोकांना आपण एक राष्ट्र आहेत असें नेहमीं वाटतें व या राष्ट्राचीं विनाकारण दोन राष्ट्रें केलीं म्हणून त्यांना राग आला." *

सन १९०४ च्या सुमारास बंगाल, महाराष्ट्र वगैरे प्रदेशांत एकीकडे राष्ट्रीय स्वाभिमानाचा उदय झालेला होता, व दुसरीकडे स्वातंत्र्याच्या आंदोलनांत एकराष्ट्रीय भारताची कल्पना रुजूं लागली होती असें म्हणतां येईल. परंतु बारकाईनें पाहिल्यास एकराष्ट्रीय भारताची भावना कमजोर होती व याचें कारणहि आपल्याला सांपडतें तें असें : बहुराष्ट्रीयत्वाच्या भावनेला बंगालमधील किंवा महाराष्ट्रामधील सुशिक्षित वर्गाचा तसेंच इतर सधन वर्गांचा व कांहीं प्रमाणांत जनतेचाहि पाठिंबा होता, आणि आपापल्या लोकभाषांचें व इतिहासांचें अधिष्ठान कायम धरून हा प्रादेशिक राष्ट्रवाद प्रबळ होत होता. याच्या

* "भाषा व राष्ट्रीयत्व," (लेखनकाल, डिसेंबर १९११) केळकर-समग्र ग्रंथ, संस्कृति-विभाग, पानें ५४५ व ५५४-५५५

उलट भारतीय एकराष्ट्रीयत्वाला असा लोकभाषेचा किंवा एकजिनसी लोकसमूहाचा पाठिंबा नव्हता. साम्राज्यसत्तेनें लादलेली राजवट, इंग्रजी भाषा, पिळवणुकींत उत्पन्न झालेला दलालीचा व्यापार व मूठभर कारखानदारी एवढांचि काय ती बैठक या एकराष्ट्रीयत्वाला होती. या एकराष्ट्रीयत्वाचा पुरस्कार मोठ्या दिमाखानें व हिरीरीनें करणारे त्यावेळीं कोण होते ! तर भारताच्या गुलामगिरीविषयीं सहानुभूति बाळगणारे उदारमतवादी ब्रिटिश मुत्सद्दी ! वरचा " वंगभंगाचा " ठराव ज्या अधिवेशनांत पास झाला, त्या सन १९०४ च्या बैठकीचें अध्यक्ष सर हेन्री कॉटन होते. त्यांनीं एकराष्ट्रीय भारताच्या कल्पनेचा पुरस्कार अध्यक्षीय भाषणांत कसा केला तें पाहण्यासारखें आहे. ते म्हणतात.

" आपल्या डोळ्यासमोर राजकीय क्षेत्रांतील एक क्रांतिकारक घटना घडून येत आहे, ती म्हणजे हिंदुस्थान या राष्ट्राचा उदय होत आहे."*

हिंदुस्थान हें एकात्म व राष्ट्ररूप कसें होत गेलें याचा तपशील सर कॉटन यांनीं याच भाषणांत दिला तो असा :

" हिंदी जनतेमध्यें असलेल्या वेगवेगळया शक्तींचा समन्वय शिक्षणानें झाला. पाश्चात्य संस्कृतीच्या अनुरोधानें व इंग्रजी पद्धतीनें दिलेलें हें शिक्षण होतें. आज एकाच व्यासपीठावर तुम्ही सर्व जमला आहांत व आपल्या सामान्य हितांची व आकांक्षांची घोषणा करीत आहांत. या अभिव्यक्तीचें वाहन इंग्रजी भाषाच आहे.

...हिंदुस्थानचें वेगवेगळे प्रांत आजवर एकमेकांपासून विलग पडलेले

---

* कॉंग्रेसच्या अधिवेशनाचा, सन १९०४चा अधिकृत अहवाल, पान ३३ पहा. इंग्रजींत 'ग्रोथ ऑफ ऍन् इंडियन नॅशन' असें शब्द येथें आहेत. "ग्रोथ" या शब्दाचा अर्थ " विकास " असा न करतां मी " उदय " असा केला आहे याचें कारण संदर्भावरून व " इंडियन नॅशन " ला " ऍन् " हें उपपद लावलें आहे व त्यावरून " उदय " हाच अर्थ अभिप्रेत आहे.

होते. परंतु, आगगाड्या, जहाजें, पोस्ट-खातें, तारखातें वगैरे साधनांमुळें हा विलगपणा नाहींसा झाला आहे.

...आपण राष्ट्र आहोंत अशी स्पष्ट आकांक्षा व्यक्त करणारी वृत्तपत्र-संस्था आज अस्तित्वांत आहे.

...आजच्या स्वरूपाची ब्रिटिश राजवट चालू राहणें अशक्य आहे, कारण **ब्रिटिश सत्तेमुळेंच जन्माला आलेल्या राष्ट्रीय प्रवृत्तींची** पूर्तता या स्वरूपाच्या राजवटींत शक्यच नाहीं." (अधिकृत अहवाल, पानें ३२-३६.)

सर कॉटन यांच्या दृष्टीनें हिंदी एकराष्ट्रवाद ही पाश्चात्य संस्कृतीची व यांत्रिक सुधारणेची देणगी आहे. हा विचार हिंदी राष्ट्रधुरीणांच्या मेळाव्यापुढें त्यांनीं उघडपणें बोलून दाखविला व त्या मेळाव्यांमध्यें लोकमान्य टिळक, श्री. सुरेंद्रनाथ बानर्जी, पंडित मालवीय प्रभृति थोर व्यक्ती होत्या. हिंदु संस्कृति व बंगाल, महाराष्ट्र इत्यादि राष्ट्रांचा उज्वल इतिहास याबद्दल जाज्वल्य अभिमान असणाऱ्या या विभूती होत्या. त्यांच्यापुढें सर कॉटन यांनीं हिंदी राष्ट्रीयत्वाची ही जन्मकहाणी मांडली व तिला कोणी विरोध दर्शविला नाहीं, असें दिसतें.

जुन्याचा प्रखर अभिमान असणारे श्री. चिपळूणकरांसारखे विचारवंतहि त्या काळांत इंग्रजी शिक्षणाचें व पाश्चात्य संस्कृतीचें ऋण प्रांजलपणें मानीत असत व या "वाघिणीच्या दुधामुळें" आमच्यामध्यें नव्या विचारांना आत्मसात करण्याची ताकद आली असें म्हणत. लोकहितवादी, न्यायमूर्ति रानडे प्रभृति पुढारी तर स्पष्टच म्हणत कीं राष्ट्रीय स्वातंत्र्याची व लोकसत्ताक राज्याची कल्पना आपल्याला इंग्रजांकडून मिळाली व आमच्या प्रगतीला एक प्रकारें इंग्रजी अंमलच कारणीभूत झाला. अगदीं अलीकडेदेखील ही कल्पना कट्टर राष्ट्रवाद्यांकडून मांडली जाते. उदाहरणार्थ, सन १९४५ मध्यें लिहिलेल्या एका लेखांत श्री. शं. द. जावडेकर यांनीं म्हटलें आहे कीं, " धर्मजातिभेदांतील

उलट भारतीय एकराष्ट्रीयत्वाला असा लोकभाषेचा किंवा एकजिनसी लोकसमूहाचा पाठिंबा नव्हता. साम्राज्यसत्तेनें लादलेली राजवट, इंग्रजी भाषा, पिळवणुकींत उत्पन्न झालेला दलालीचा व्यापार व मूठभर कारखानदारी एवढीच काय ती बैठक या एकराष्ट्रीयत्वाला होती. या एकराष्ट्रीयत्वाचा पुरस्कार मोठ्या दिमाखानें व हिरीरीनें करणारे त्यावेळीं कोण होते! तर भारताच्या गुलामगिरीविषयीं सहानुभूति बाळगणारे उदारमतवादी ब्रिटिश मुत्सद्दी! वरचा "वंगभंगाचा" ठराव ज्या अधिवेशनांत पास झाला, त्या सन १९०४ च्या बैठकीचें अध्यक्ष सर हेन्री कॉटन होते. त्यांनीं एकराष्ट्रीय भारताच्या कल्पनेचा पुरस्कार अध्यक्षीय भाषणांत कसा केला तें पाहण्यासारखें आहे. ते म्हणतात.

"आपल्या डोळ्यासमोर राजकीय क्षेत्रांतील एक क्रांतिकारक घटना घडून येत आहे, ती म्हणजे हिंदुस्थान या राष्ट्राचा उदय होत आहे."*

हिंदुस्थान हें एकात्म व राष्ट्ररूप कसें होत गेलें याचा तपशील सर कॉटन यांनीं याच भाषणांत दिला तो असा:

"हिंदी जनतेमध्यें असलेल्या वेगवेगळ्या शक्तींचा समन्वय शिक्षणानें झाला. पाश्चात्य संस्कृतीच्या अनुरोधानें व इंग्रजी पद्धतीनें दिलेलें हें शिक्षण होतें. आज एकाच व्यासपीठावर तुम्ही सर्व जमला आहांत व आपल्या सामान्य हिताची व आकांक्षांची घोषणा करीत आहांत. या अभिव्यक्तीचें वाहन इंग्रजी भाषाच आहे.

...हिंदुस्थानचें वेगवेगळे प्रांत आजवर एकमेकांपासून विलग पडलेले

---

* कॉंग्रेसच्या अधिवेशनाचा, सन १९०४चा अधिकृत अहवाल, पान २३ पहा. इंग्रजींत 'ग्रोथ ऑफ ऍन् इंडियन नेशन' असे शब्द येथें आहेत. "ग्रोथ" या शब्दाचा अर्थ "विकास" असा न करतां मी "उदय" असा केला आहे याचें कारण संदर्भावरून व "इंडियन नेशन" ला "ऍन्" हें उपपद लावलें आहे व त्यावरून "उदय" हाच अर्थ अभिप्रेत आहे.

होते. परंतु, आगगाड्या, जहाजें, पोस्ट-खातें, तारखातें वगैरे साधनांमुळें हा विलगपणा नाहींसा झाला आहे.

...आपण राष्ट्र आहोंत अशी स्पष्ट आकांक्षा व्यक्त करणारी वृत्तपत्र-संस्था आज अस्तित्वांत आहे.

...आजच्या स्वरूपाची ब्रिटिश राजवट चालू राहणें अशक्य आहे, कारण **ब्रिटिश सत्तेमुळेंच जन्माला आलेल्या राष्ट्रीय प्रवृत्तींची** पूर्तता या स्वरूपाच्या राजवटींत शक्यच नाहीं." (अधिकृत अहवाल, पानें ३२-३६.)

सर कॉटन यांच्या दृष्टीनें हिंदी एकराष्ट्रवाद ही पाश्चात्य संस्कृतीची व यांत्रिक सुधारणेची देणगी आहे. हा विचार हिंदी राष्ट्रधुरीणांच्या मेळाव्यापुढें त्यांनीं उघडपणें बोलून दाखविला व त्या मेळाव्यांमध्यें लोकमान्य टिळक, श्री. सुरेंद्रनाथ बानर्जी, पंडित मालवीय प्रभृति थोर व्यक्ती होत्या. हिंदू संस्कृति व बंगाल, महाराष्ट्र इत्यादि राष्ट्रांचा उज्वल इतिहास याबद्दल जाज्वल्य अभिमान असणाऱ्या या विभूती होत्या. त्यांच्यापुढें सर कॉटन यांनीं हिंदी राष्ट्रीयत्वाची ही जन्मकहाणी मांडली व तिला कोणीं विरोध दर्शविला नाहीं, असें दिसतें.

जुन्याचा प्रखर अभिमान असणारे श्री. चिपळूणकरांसारखे विचारवंतहि त्या काळांत इंग्रजी शिक्षणाचें व पाश्चात्य संस्कृतीचें ऋण प्रांजलपणें मानीत असत व या "वाघिणीच्या दुधामुळें" आमच्यामध्यें नव्या विचारांना आत्मसात करण्याची ताकद आली असें म्हणत. लोकहितवादी, न्यायमूर्ति रानडे प्रभृति पुढारी तर स्पष्टच म्हणत कीं राष्ट्रीय स्वातंत्र्याची व लोकसत्ताक राज्याची कल्पना आपल्याला इंग्रजांकडून मिळाली व आमच्या प्रगतीला एक प्रकारें इंग्रजी अंमलच कारणीभूत झाला. अगदी अलीकडेदेखील ही कल्पना कट्टर राष्ट्रवाद्यांकडून मांडली जाते. उदाहरणार्थ, सन १९४५ मध्यें लिहिलेल्या एका लेखांत श्री. शं. द. जावडेकर यांनीं म्हटलें आहे कीं, " धर्मजातिभेदातीत

समतावादी राष्ट्रसंघटन" करण्याचें तत्त्व भारतीयांना युरोपकडून शिकावें लागलें.

येथपर्यंत भारतीय राष्ट्र-कल्पनेचें दुहेरी स्वरूप आपण पाहिलें त्यावरून असा सर्व सामान्य निष्कर्ष काढतां येईल कीं, सन १९०४ मध्यें राष्ट्रीयत्वासंबंधीं दोन वेगवेगळे सिद्धान्त हिंदुस्थानच्या राजकारणी पुरुषांना मान्य झालेले होते; ते सिद्धान्त असे :

( १ ) हिंदुस्थान **बहुराष्ट्र** आहे व बंगाल, महाराष्ट्र इत्यादि राष्ट्रें आहेत, आणि ( २ ) हिंदुस्थान **एकराष्ट्र** आहे. या पैकीं, पहिल्या सिद्धान्ताच्या मागें महाराष्ट्र इत्यादि प्रदेशांत राहणाऱ्या लोकसमूहांची भाषा, इतिहास वगैरे एकजिनसी बाबींचा विचार होता. त्यांतल्यात्यांत लोकभाषा हें राष्ट्रीयत्वाचें मुख्य साधन धरलें गेलें होतें. दुसऱ्या म्हणजे एकराष्ट्रीयत्वाच्या, सिद्धांताच्यामागें ब्रिटनविरोधी लढ्याची समान भूमिका होती व इंग्रजी शिक्षणानें व कल्पनांमुळें नव्यानें उत्पन्न झालेली एकराष्ट्रीयत्वाची भावना होती.

## सन १९०४ नंतरचा राष्ट्रवादाचा विकास.

या दुहेरी भूमिकेंत गोंधळत न राहतां आपण कोणचें तरी एक मत ग्राह्य धरलें पाहिजे, असा विचार सन १९०४ नंतर सुरू झाला. त्यांतच राष्ट्रीयत्वासंबंधींच्या आणखी एका भूमिकेची भर पडली. ती म्हणजे हिंदू तसेंच मुसलमान राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची. या **धार्मिक राष्ट्रीयत्वाचा** जन्म केव्हां व कसा झाला यासंबंधीं श्री. न. चिं. केळकर यांच्या एका लेखांतील उतारा असा * :

" राष्ट्रीय सभा सर्व ' हिंदी ' लोकांबद्दल बोलणार, तेथें हिंदू व मुसलमान असा भेद मुळांत नव्हता व आजहि नाहीं. पण इकडे खुद्द सरकारनेंच

* " हिंदू राष्ट्राचें एकीकरण " ( ता. २९ ऑक्टोबर १९१२ ), केळकर-समग्र ग्रंथ, संस्कृति-खंड, पानें ५५९–५६१.

राजकीय सुधारणांचा पाया जातिभेदावर तीन वर्षांपूर्वी रचला व झाली ही चूक तेवढ्यापुरतीच नसून ती यापुढें कायमहि होऊं पहात आहे! अर्थात राष्ट्रीय सभेवर सर्व भिस्त न ठेवतां हिंदू लोकांनीं मुसलमानांप्रमाणेंच आपल्या हक्कांचें संरक्षण करण्यासाठीं आपणच पुढें झालें पाहिजे.... परंतु मुसलमान बंधूंनीं सर सय्यद अहमद यांच्या वेळेपासून राष्ट्रीय सभेपासून करारीपणानें तुटक राहून, अखेर धर्म व जाति यांच्या योगानें आधींच पडून राहिलेल्या दुहींत राजकीय भेदभावाची पाचर ठोकून राष्ट्राचीं शकलें पुरीं पाडल्यावर, अजूनहि नुसत्या राष्ट्रीय सभेची कास धरून राहणें व हिंदी या नांवाच्या मोहक पण **पोकळ राष्ट्र–कल्पनेशीं** खेळत बसणें, हेंच उलट अदूरदर्शी-पणाचें लक्षण ठरूं पहात आहे.

हिंदु राष्ट्राचें एकीकरण करणें म्हणजे हिंदु म्हणविणाऱ्या लोकांच्या सर्व प्रकारच्या हितसंबंधाचें एकीकरण करणें होय. ... ... पंजाबांतील हिंदु-समाजानें तेवढें एकत्र जमून फक्त सामाजिक विषयाची तेवढी वाटाघाट करावी आणि राष्ट्रीय गोष्टींचा विचार राष्ट्रीय सभेकडे सोंपवावा असें ना. शादीलाल यांचें मत नाहीं. कारण राष्ट्रीय सभा करूं शकेल त्याहीपेक्षां राज-कीय गोष्टींचा अधिक सूक्ष्म विचार हिंदूंनीं आपल्यापुरतां करण्याची वेळ आली आहे." ( अधोरेखन माझें )

वरील उताऱ्यांत, "एकराष्ट्र हिंदुस्थानाची" कल्पना 'मोहक पण पोकळ' ठरविली असून, "हिंदू" राष्ट्रीयत्वाची कल्पना श्री. केळकरांनीं पुढें मांडली आहे. या "हिंदूराष्ट्र" कल्पनेला सन १९०९ पर्यंत राजकारणांत स्वतंत्र स्थान नव्हतें, परंतु त्यावर्षी मोर्ले–मिंटो सुधारणा आल्या व जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व घुसडलें गेलें. त्यामुळें जुनी "हिंदी" राष्ट्राची कल्पना "फोल" ठरून "हिंदू" राष्ट्राची कल्पना जास्त पुढें आली. हिंदुत्वाचा पुकारा राजकारणाच्या क्षेत्रांत असा होऊं लागला त्याची "बरीच जबाबदारी मुसलमान बंधूंकडे व कांहींशी सरकारकडे येते" असें त्याच लेखांत श्री. केळकर यांनीं म्हटलें आहे.

श्री. केळकर यांनीं हिंदुराष्ट्रीयत्वाची स्पष्ट घोषणा करून या कल्पनेच्या

जन्माची जबाबदारी मुसलमान पुढाऱ्यांवर व सरकारवर ढकलली आहे. यांत धार्मिक राष्ट्रवादासंबंधीं आधुनिक आंग्लशिक्षितांना वाटणारी " लाज " दिसून येते. या लाजेचें खरें मूळ दोन गोष्टींत आहे. पहिली गोष्ट अशी कीं, धार्मिक भेदांच्या आधारांवर आपली भेदनीति चालवून ब्रिटिशलोक आपली सत्ता चालू ठेवतात, तेव्हां भारतीयांचा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष असलाच पाहिजे, तसा तो नसेल तर आपल्याच धार्मिक राष्ट्रवादाच्या आधारानें भारताचीं छकलें पाडायला ब्रिटिश सत्ताधारी मागेंपुढें पहाणार नाहींत, याची जाणीव श्री. केळकर प्रभृति पुढाऱ्यांना होती. दुसरी गोष्ट अशी कीं बंगाल, महाराष्ट्र इत्यादि देशांतील जहाल राष्ट्रवाद पूर्वीपासूनच हिंदुत्वावर पुष्कळ आधारलेला आहे, याची जाणीव त्यांना होती. मुसलमान समाज या दोनहि प्रांतांत एकतर दरिद्री व मागासलेला होता व त्याला राष्ट्रीयत्वाच्या चळवळींत ओढण्यापुरता जनतेच्या, विशेषत: गरीब शेतकऱ्यांच्या, जीवनाशीं समरस होणारा कार्यक्रम राष्ट्रसभेजवळ नव्हता. बंगाली " देशभक्तांची समिती " या संस्थेनें सन १८६५ पासून 'हिंदुमेळा' हा वार्षिक मेळा भरविला होता. 'गणपती उत्सव', स्वदेशी प्रदर्शन वगैरे राष्ट्रीय चळवळी, हिंदूंचे धार्मिक उत्सव आहेत असें मुसलमानांना वाटणें स्वाभाविक होतें. ही सर्व वस्तुस्थिति असल्यानें, हिंदुराष्ट्रवादाचा जन्म खरोखर सन १९०९ नंतरचा मानणें योग्य नाहीं व त्या राष्ट्रवादाच्या उत्पत्तीची जबाबदारी हिंदु सुशिक्षित लोकांवर टाकणेंच रास्त आहे. हा हिंदूराष्ट्रवाद नकळत परंतु प्रभावी तऱ्हेनें सन १८८५ च्या पूर्वीपासूनच विकास पावत होता. ही सर्व उपपत्ति उघडपणें स्वीकारली तर या आधींच्या हिंदुराष्ट्रवादाला प्रतिकार म्हणून आम्ही 'मुसलमानी राष्ट्रवाद' काढला असें मुसलमान पुढारी म्हणतील व हिंदु व मुस्लीम अशा धार्मिक राष्ट्रवादांचा परस्परांशीं झगडा लावून देणें ब्रिटिशांना आणखीच सोपें होईल, म्हणून श्री. केळकर प्रभृति राष्ट्रीय पुढारी त्यावेळीं अशी 'लाजे'ची व प्रतिकारात्मक हिंदुराष्ट्रवादाची भूमिका घेत असावेत.

हिंदुराष्ट्रीयत्वाच्या या कल्पनेला त्यावेळीं बराच पाठिंबा मिळाला व

पंजाब, महाराष्ट्र, बंगाल इत्यादि प्रांतांतील सुशिक्षितांचा बराच मोठा विभाग हिंदुस्थानला **एकराष्ट्र** किंवा **बहुराष्ट्र** न मानतां एक **धर्मराष्ट्र** मानूं लागला, आणि त्याच्या उलट मुस्लीम सुशिक्षित वर्ग पॅनइस्लामी धार्मिक राष्ट्रवादाकडे घसरत चालला.

हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीमध्यें या तीन तऱ्हेचा राष्ट्रवाद सन १९०४ नंतर मानला जात होता हें यावरून दिसून येईल. यापैकीं अमूक एक तऱ्हेचें राष्ट्रीयत्व शास्त्रशुद्ध आहे व दुसऱ्या कल्पना अराष्ट्रीय आहेत असा आग्रहहि याच सुमारास उत्पन्न होऊं लागला होता. या तीन कल्पनांपैकीं कोणची कल्पना श्रेष्ठ ठरते याची चढाओढच आपल्या राजकीय जीवनांत त्यानंतर लागलेली दिसते.

सन १९२० नंतरच्या हिंदी राजकारणांत, 'राष्ट्र' या कल्पनेची काय अवस्था होती ते पुढील प्रकरणांत पाहण्यापूर्वी या तीन " राष्ट्र " कल्पनांची छाननी करण्याचा व या तीन कल्पनांतील विसंवाद स्पष्ट करण्याचा प्रयत्न या आधींच्या कालखंडांत कोणी केला होता काय, तें पाहूं.

हें कार्य करणारे दोन महाराष्ट्रीय विद्वान आपल्याला दिसतात. एक म्हणजे त्यावेळचे अग्रगण्य राष्ट्रीय पुढारी श्री. मा. ह. अणे व दुसरे गृहस्थ म्हणजे जहाल राष्ट्रवादी इतिहास-संशोधक श्री. वि. का. राजवाडे.

" हिंदुस्थान बहुराष्ट्र कीं एकराष्ट्र ? " या प्रश्नाची चर्चा श्री. अणे यांनीं खालील उताऱ्यांत केली आहे.

" ...याचें कारण भरतखंड हें एक राष्ट्र आहे या चुकीच्या कल्पनेचा पगडा त्यांच्या मनावर बसला आहे. भरतखंड हा पांचसहा राष्ट्रांचा एक संघ असून या सर्व राष्ट्रांना एकत्र आणण्याकरितां सामान्य विद्या, सामान्य संस्कृति, सामान्य धर्म एवढीं बंधनें आहेत. या तीन साधनांनीं सर्व भरतखंड एकत्र झाला आहे. परंतु, वस्तुतः विस्तार, ऐतिहासिक परंपरा, ज्ञातींचा संकर, मनोरचना या दृष्टीनें पाहिलें असतां भरतखंडांतर्गत निरनिराळ्या राष्ट्रांची उन्नति

भिन्न भिन्न दिशेनें झाली आहे. ह्या सर्व प्रगतींचा एकवटून एकच प्रवाह करण्याचा प्रयत्न यशस्वी होणें कठीण आहे. समान विद्या, समान धर्म आणि समान संस्कृति या सर्वसामान्य धर्मास हल्लीच्या काळांत आणखी एका नवीन आणि अत्यंत महत्त्वाच्या बंधनाची जोड मिळाली आहे. एका छत्राखालीं सर्व राष्ट्रें आलीं असल्यामुळें सुखदु:खाचा समान अनुभव सर्वांना येत आहे. यामुळें सर्व भरतखंड एकराष्ट्र पूर्वी नसलें तरी आतां ते एकराष्ट्र होण्याच्या तयारींत आहे अशी आशा आमच्या पुढाऱ्यास वाटत आहे; परंतु हा त्यांचा भ्रम आहे.

विश्वबंधुत्वाची कल्पना उराशीं बाळगणारा ज्याप्रमाणें प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत निरूपयोगी ठरतो, तसेंच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची योग्य मर्यादा ज्यांना समजलीं नाहीं असल्या माणसांच्या सदुक्तींचा व सत्कृत्यांच्या स्थायिक परिणाम लोकांच्या शीलावर होत नाहीं. बंगालचे विद्वान लोक बंगाल हें एक राष्ट्र समजतात, आणि कांहीं विशेष सुखदु:खांचा अनुभव आपल्या संस्कृतींल असलेल्या दुसऱ्या राष्ट्रांबरोबर घेणें आपल्या नशिबीं आलें आहे तेव्हां या समान आपत्तींच्या निरासासाठीं सर्वांनीं एकत्र होऊन विचार करणें जरूर आहे, ही गोष्ट त्यांना पूर्णपणें पटली आहे. बंगालला राष्ट्रगीत आहे. बंगालनें राष्ट्रीय वाङ्मय तयार केलें आहे, बंगाली लिपींत ग्रंथरचना केली नाहीं असा एकहि विद्वान त्या भागांत मिळणें मुष्किल आहे. मला माझ्या राष्ट्रानें म्हणजे बंगालनें थोर म्हणावें, अशी महत्त्वाकांक्षा तिकडील विद्वानांत आहे. आणि त्यामुळें बंग वाङ्मयानें इतर सर्व वाङ्मयाला मागें टाकलें आहे.

महाराष्ट्रांतील मासिकांनीं जें धोरण ठेवलें पाहिजे तें हें कीं महाराष्ट्र हें एक राष्ट्र आहे आणि भारत संस्कृतींत कांहीं विशेष तऱ्हेचा भाग महाराष्ट्रीयांनीं पार पाडावा असा ईश्वरी संकेत आहे.'' *

तसेंच, "संस्कृति, धर्म व राष्ट्रीयत्व" या लेखांत ते म्हणतात,

---

* लोकनायक अणे यांचें लेख व भाषणें, संग्राहक रा. जतकर, सन १९१५, पान १०८.

" संस्कृति ही प्राचीन काळापासून धर्माशीं संलग्न होती. धर्मभेदावरून संस्कृतीची भिन्नता ओळखली जात असे. पण गेल्या तीनचारशें वर्षांपासून युरोपमध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना उद्‌भूत झाली आहे. राष्ट्रीयत्व म्हणजे स्थळविषयक अभिमान. एका संस्कृतीच्या पोटांत दहापांच राष्ट्रांचा अंतर्भाव होऊं शकतो. एकाच संस्कृतीचा अभिमान धारण करूनहि स्थलविशेषांत राहणाऱ्या लोकसमुदायाचें आपापल्या उन्नतीचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

धर्माभिमानापेक्षां राष्ट्रीयत्वाचा अभिमान संकुचित खरा, पण धर्माचें ध्येय जें विश्वबंधुत्व त्यांच्या पाठीस लागण्यापेक्षां आपापल्या देशविभागांतील जनसमुदायाचें कल्याण करणें बरें, हें संकुचित ध्येय निश्चित करून युरोपमधील राष्ट्रें गेल्या चारपांचशें वर्षांपासून आपल्या उन्नतीच्या मार्गास लागलीं आहेत...

जगाचें कसेंहि असो पण माझ्या देशाचें कल्याण झालें पाहिजे, या विचारास प्राधान्य मिळालें, व आपलें राष्ट्र सर्वांत बलिष्ठ व्हावें अशी महत्वाकांक्षा प्रत्येकाच्या मनांत उत्पन्न झाली.

या उत्कर्षाबरोबरच आपल्या राष्ट्रांची संस्कृति इतरांच्या माथीं मारण्याची हांव त्यांना सुटली व व्यापाराचा फैलाव, राज्याचा विस्तार, या बरोबरच ही युरोपियन राष्ट्रें आपल्या संस्कृतीचा प्रसार करीत सुटलीं. संकुचित ध्येय असल्यानें व्यवहारांत तीं जास्त कार्यक्षम व समर्थ ठरलीं." *

वरील उताऱ्यामध्यें बहुराष्ट्र हिंदुस्थानची कल्पना स्पष्ट मांडली आहे, इतकेंच नव्हे तर ब्रिटिश अंमलामुळें नव्यानेंच एकराष्ट्र हिंदुस्थान निर्माण होत आहे या सिद्धांताचें खंडन केलें आहे. त्याचप्रमाणें धर्म व धार्मिक संस्कृति यांच्या एकछत्रीपणामुळें हिंदुस्थानला एकजिनसी हिंदुराष्ट्र म्हणणे बरोबर नाहीं ही गोष्ट मांडली आहे.

एकराष्ट्र, बहुराष्ट्र व धर्मराष्ट्र अशा तीनहि प्रकारच्या राष्ट्रीयत्वाचा

* तोच ग्रंथ, पान २४६

विचार श्री. अत्रे यांनीं केलेला असून स्वतःचें निश्चित मत साक्षेपानें दिलें आहे. आणखी लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं ज्या धर्मनिरपेक्ष आधुनिक राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार त्यांनीं केलेला आहे त्या युरोपियन राष्ट्र-कल्पनेची साम्राज्यवादी राष्ट्रीयत्वामध्यें झालेली दुष्ट परिणतिहि त्यांच्या नजरेंतून सुटलेली नाहीं.

आतां, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या संशोधक व मर्मग्राही दृष्टीला या राष्ट्रीय प्रश्नाचें स्वरूप कसें दिसलें पहा * :

" भरतखंडाचा प्राचीन इतिहास ' या नांवाचा ग्रंथ रा. म. वि. काथवटे यांनीं लिहला. त्यावर टीका करतांना श्री. राजवाडे यांनीं आपले राष्ट्रविषयक विचार मांडले आहेत. ते म्हणतात :

" भारतवर्ष म्हणजे कुमारीपासून हिमाचलापर्यंतचा देश एक राष्ट्र आहे, अशा भ्रामक पूर्वसमजुतीनें काथवट्यांनीं पुस्तक जुळविण्यास प्रारंभ केला. परंतु पांचपंचवीस संस्थानांचे राजवंश - देण्यापलीकडे त्यांच्या ग्रंथांत जास्त कांहीं आलेलें नाहीं. ह्या पंचवीस वंशावळीपासून बोध होतो तो एवढाच होतो कीं, हा इतिहास एका देशाचा नाहीं, अनेक देशांचा ऊर्फ संस्थानांचा आहे. हें सबंध खंड एक राष्ट्र असतें तर काथवट्यांच्याहि भ्रामक पुस्तकांत इतिहासाचा एकच एक राष्ट्रीय धागा दिसला असता. परंतु मुळांतच जर एक राष्ट्रीय धागा नाहीं, तर तो दिसेल कोठून ? आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ काथवट्यांनीं प्रो. राधाकुमुद मुकर्जींच्या 'फंडामेंटल युनिटी ऑफ इंडिया' ह्या निबंधाचा हवाला दिला आहे. परंतु ह्या हवाल्यानें एकदेशत्वाची किंवा एकराष्ट्रत्वाची सिद्धी होत नाहीं. ह्या हवाल्यानें फक्त एकसंस्कृतित्वाची व एकखंडत्वाची तेवढी सिद्धि होते. ( १ ) दुर्भेद्य चतुःसीमात्व, ( २ ) समान देवपूजात्व, ( ३ ) समान प्राचीनेतिहासकथात्व, ( ४ ) गोवधपराङ्मुखत्व, ( ५ ) समान स्त्रीधर्मत्व,

---

* " इतिहास व ऐतिहासिक ", वर्ष २, अंक १४, सन १९१७, " इतिहाससंशोधनाची अलीकडील प्रगति " ह्या टिपणांत, पानें १–५.

( ६ ) समानाचारधर्मत्व, व ( ७ ) संस्कृतोत्पन्नभाषात्व, ह्या मुकर्जीप्रणीत सप्तविध गुणसामान्यांवरून भारतवर्षीय एकदेशत्व किंवा एकराष्ट्रत्व यांची सिद्धि होत नाहीं; फक्त एकसंस्कृतिकत्व व एकखंडत्व यांची सिद्धि होत्ये. ह्या किंवा ह्यासारख्याच गुणसामान्यांवरून इतर खंडासंबंधानें अशीच सिद्धि होते. सिद्धीची प्रणालिका येणेंप्रमाणें. सध्यां जगांतील सर्व प्रमुख मानवजातीचे पांच वर्ग होतात. ( १ ) ख्रिश्चन संस्कृतीचे लोक, ( २ ) मुस्लीम संस्कृतीचे लोक, ( ३ ) हिंदू संस्कृतीचे लोक, व ( ५ ) रानटी लोक. ".

यानंतर या प्रत्येक संस्कृतीखालीं असणाऱ्या विविध राष्ट्रांची नामावळी रा. राजवाड्यांनीं दिली आहे. त्यांत " हिंदू संस्कृतीखालीं ( १ ) काश्मीर, ( २ ) पंजाब, ( ३ ) काफरिस्तान, ( ४ ) मथुरा, ( ५ ) भोजपूर, ( ६ ) बंगाल, ( ७ ) गुजराथ, ( ८ ) सिंध, ( ९ ) ओढ्या, ( १० ) तैलंगण, ( ११ ) महाराष्ट्र, ( १२ ) कर्नाटक, ( १३ ) मलयवान्, ( १४ ) तामिळ, ( १५ ) सिंहल, ( १६ ) नेपाळ वगैरे निरनिराळ्या भाषा बोलणारीं २०।२५ राष्ट्रें आहेत. "

या नामावळीनंतर, एकसंस्कृतिकत्वामुळें एकराष्ट्रत्व कां येत नाहीं, याबद्दल श्री. राजवाडे म्हणतात :

" सर्व ख्रिश्चन राष्ट्रांना ख्रिस्त पुराणाची परंपरा आहे, सर्व मुस्लीम राष्ट्रांना महंमदी पुराणाची परंपरा आहे, सर्व बौद्ध राष्ट्रांना बुद्ध पुराणाची परंपरा आहे, आणि इतकेंहि असून सर्व ख्रिश्चन राष्ट्रांच्या भूमीला किंवा सर्व बौद्ध राष्ट्रांच्या भूमीला आपण एक राष्ट्र किंवा एक देश म्हणत नाहीं, राष्ट्र-समूह किंवा देशसमूह म्हणतो. तोच न्याय हिंदुस्थानांतील हिंदू राष्ट्रांना लावणें अपरिहार्य आहे. पांचपंचवीस हिंदू राष्ट्रें मिळून हिंदुस्थान हें एक खंड झालें आहे. ख्रिश्चन किंवा मुस्लीम किंवा बौद्ध संस्कृतीखालील अनेक राष्ट्रांचे देवधर्म, प्राचीन कथा, गोवधाप्रियता, स्त्रीधर्म, आचार इत्यादि गुणसामान्य सारखें असून त्यांना एकदेश किंवा एकराष्ट्र ही संज्ञा जशी लावीत नाहींत

तशींच अनेक हिंदू राष्ट्रें ज्यांत आहेत त्या खंडाला एकदेश किंवा एकराष्ट्र म्हणणें अयुक्त आहे."

एका साम्राज्याखालीं असल्यामुळें पूर्वी नसलेलें एकराष्ट्रत्व मध्यानें उत्पन्न होत आहे व म्हणून हिंदुस्थान एकराष्ट्र आहे असें मत प्रतिपादन करणाऱ्यांना ते उत्तर देतात :

"एका साम्राज्याखालीं असलें म्हणजेहि सबंध खंड एकराष्ट्र होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानच्या एकराष्ट्रीयत्वाचें हें खूळ कित्येक इंग्रज लेखकांनीं पिकविलें आहे. परंतु त्यावर विश्वसून निभाव लागणार नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रज लोक दोन जिव्हांनीं बोलत असतात. हिणवावयाचें असेल तेव्हां हिंदुस्थान एकराष्ट्र नाहीं, राष्ट्रसमूह ऊर्फ खंड आहे अशी भाषा वापरली जाते. चुचकारावयाचें असेल व भलत्याच ध्येयाच्या पाठीमागें लावावयाचें असेल तेव्हां हिंदुस्थान हें एकराष्ट्र आहे व किंचितसें नसलें तरी इंग्रजी भाषा सामान्य झाली म्हणजे एकराष्ट्र होण्याची त्याची योग्यता आहे अशी भाषा वापरली जाते."

इतिहास–संशोधन व इतिहास–रचना करतांना कोणची दृष्टि ठेवावी लागेल, हें वरील अनुसंधानानें ते सांगतात :

"वस्तुतः हिंदुस्थान हें खंड आहे, एकराष्ट्र नाहीं. तेव्हां ज्या अर्थानें ख्रिस्त खंडाचा इतिहास लिहला जातो त्याच अर्थानें तेवढा हिंदुस्थानचा उर्फ हिंदूखंडाचा इतिहास लिहिला जाणें शक्य आहे. ज्या अर्थानें जर्मनी, फ्रान्स इंग्लंड या राष्ट्रांचा इतिहास लिहिला जातो, त्या अर्थानें हिंदुस्थानचा इतिहास लिहिला जाणें शक्य नाहीं. त्या अर्थानें महाराष्ट्राचा, गुजराथेचा, बंगालचा किंवा पंजाबचा इतिहास लिहला जाणें शक्य आहे. हिंदुस्थान हें खंड आहे, त्यांत अनेक हिंदु राष्ट्रें आहेत. त्यांच्या भाषा, स्वभाव, हवापाणी, इतिहास अन्योन्यभिन्न आहेत, हा सिद्धान्त स्पष्ट ध्यानांत ठेऊन ख्रिस्तखंडाप्रमाणें हिंदू खंडाचा इतिहास लिहावयाला गेलें म्हणजे हिंदू राष्ट्रांराष्ट्रांमधील लढ्यांचा उलगडा होईल व ह्या खंडाच्या इतिहासांत धागा दिसूं लागेल"

वरील विस्तृत अवतरणांवरून स्पष्ट दिसेल कीं श्री. अणे यांच्याप्रमाणेंच रा. राजवाडे देखील या एकंदर प्रश्नाच्या मुळाशीं जाऊन विचार करतात. त्यांना हिंदुस्थान एकराष्ट्र किंवा धर्मराष्ट्र न वाटतां बहुराष्ट्र खंड वाटतें. आपल्या मताच्या पुरस्कारासाठीं त्यांनीं एकराष्ट्रत्व व धर्मराष्ट्रत्व या कल्पनांची चांगलीच छाननी केलेली व हजेरी घेतलेली आढळते.

सन १८८२ पासून सन १९१७ पर्यंतच्या कालखंडांतले कांहीं प्रमुख राजकारणी पुरुष व ठळक विद्वान घेऊन त्यांच्या राष्ट्रविषयक मतांची आपण ओळख करून घेतली. त्यावरून एकच निष्पन्न होतें कीं त्या काळांतील सुशिक्षितांमध्यें हिंदी राष्ट्रीयत्वासंबंधानें एकच एक अशी सुस्पष्ट, शास्त्रशुद्ध व ठाम समजूत नव्हती. हिंदुस्थानला एकराष्ट्र मानून महाराष्ट्रादि प्रदेशांना केवळ प्रांत मानणारे, धर्मराष्ट्र मानून महाराष्ट्रासारख्या देशांना केवळ हिंदुराष्ट्राचे अवयव मानणारे व बहुराष्ट्र मानून महाराष्ट्र, बंगाल वगैरेंना राष्ट्रें मानणारे असे तीनहि पंथ त्यावेळीं होते. त्यांतून घोंटाळयाची बाब अशी की, श्री. अणे व श्री. राजवाडे यांच्यासारखे निर्णयात्मक वृत्तीनें मूलगामी विचार करणारे व स्पष्टवक्ते असे कांहीं विद्वान सोडले तर बाकीच्या पुढाऱ्यांमध्यें अशीच वृत्ति होती कीं, वरील तीनहि प्रकारच्या राष्ट्र–कल्पना परस्परांशीं सुसंगत समजून स्वीकारावयाच्या ! हिंदी राजकारणाच्या तत्कालीन स्थितीमध्यें या सर्वच कल्पनांना थोडेंफार अधिष्ठान सांपडतें असें त्यांच्या अनुभवास आलें असल्यास नवल नाहीं. कारण, रा. राजवाडयांनीं म्हटल्याप्रमाणें इंग्रज राज्यकर्ते दुहेरी तऱ्हेनें वागत होते. त्यांच्या सिद्धान्तांना व कृतींना प्रत्युत्तर म्हणून वरील तीन राष्ट्रकल्पनांपैकीं ही नाहीं ती उपयोगी व लागू पडत असे. जी लागू पडेल ती तेवढ्यापुरती सत्यच आहे असा निष्कर्ष काढून या तीन कल्पनांच्या जास्त तात्त्विक विचारांत व छाननींत त्यावेळीं कोणी पडलें नाहीं.

राष्ट्रीयत्वासंबंधीं ही अनिर्णित तिरंगी भूमिका रूढ असतांनाच अचानक पहिल्या महायुद्धाचें संकट कोसळलें. त्या महायुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्याच्या लढयाला पुन्हा लवकरच तोंड लागलें व लढ्याचें सामुदायिक तंत्र महात्मा

मांधींनीं पुढें आणलें. आंतरराष्ट्रीय राजकारणांत सोव्हिएत क्रांतीनें एक नवी समाजवादाची लाट उत्पन्न केली. तिच्या आघातामुळेंच साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या दडपणाखालील परतंत्र राष्ट्रांवर हुकूमत चालविणें कठीण होणार हें भविष्य दिसूं लागलें. युरोपमधील छोट्या राष्ट्रांना आपल्या पंखाखालीं घेण्या-साठीं राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचें तत्त्व ब्रिटिश, फ्रेंच प्रभृति साम्राज्यवाद्यांनीं मान्य केलें व राष्ट्रसंघाचा डोलारा उभा केला. या राष्ट्रसंघामध्यें परतंत्र हिंदुस्थानलाहि एका राष्ट्राचा दर्जा मोठ्या उदारपणें पहाल करण्यांत आला ! ह्या सर्व कार-स्थानांमुळें जगांतील गुलाम राष्ट्रांची खरीखुरी स्वयंनिर्णयाची मागणी अर्थातच मागें पडूं शकली नाहीं व या राष्ट्रांतील राष्ट्रीय चळवळींना लवकरच उग्र व सामुदायिक स्वरूप येत चाललें. भारतीय चळवळीलाहि अशीच भरती आली व त्यामुळें लोकांच्या राष्ट्रकल्पनेंत फार बदल होऊं लागले. त्याबद्दलचें विवेचन पुढील प्रकरणांत करूं.

★

# महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास : ५ :

## ( सन १९२० नंतर )

राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेसंबंधीं सन १९२० च्या आधीं एक प्राथमिक अवस्था होती; भारताला एकराष्ट्र, बहुराष्ट्र किंवा धर्मराष्ट्र मानण्यास लोक तयार असत; किंबहुना या तीनहि प्रकारच्या राष्ट्रकल्पना एकमेकींशी अविरोधी अशा समजल्या जात. परंतु ही प्रथमावस्था सन १९२० नंतर संपली व सन १९२७ पर्यंतच्या काळांत एकराष्ट्र भारताची कल्पना सार्वभौम होत गेली. सर्वपक्षीय नेहरू रिपोर्टांत ही कल्पनाच मांडलेली आढळते. त्यानंतर सन १९३७ पर्यंत ही एकराष्ट्रीयत्वाची कल्पना सार्वभौम राहिली पण तेव्हांपासून तिला शह देणाऱ्या बहुराष्ट्रीय व धर्मराष्ट्रीय भारताच्या कल्पना पुन्हा बळावत चालल्या. आज घटकेला, पाकिस्तान, ' हिंदुओंका हिंदुस्थान ', अखंडभारत, स्वतंत्र पठाणीस्तान, स्वायत्त आसाम, स्वायत्त सिंध, संयुक्त महाराष्ट्र, अशा अनेक घोषणा आपण ऐकत आहोंत. या घोषणांमध्यें जुन्या एकराष्ट्रीय, बहुराष्ट्रीय व धर्मराष्ट्रीय

राष्ट्रीयत्वाचे कमीअधिक तीव्र व स्पष्ट पडसाद आपल्याला ओळखतां येतील. सन १९२० च्या आधींची बहुरंगी स्थिति आज जणूं काय पुन्हां नव्यानें अवतरली आहे; पण सन १९२० तों सन १९४७ पर्यंतच्या २७ वर्षांत राष्ट्रीयत्वाच्या-संबंधीं भारतीयांच्या विचारांत जो विकास झाला तो लक्षांत घेतला तरमात्र आज आपण नव्या पातळीवर विचार करीत आहोत, हें कळून येईल.

महाराष्ट्रांतील विचारांच्या विकासक्रमाच्या अनुरोधानें सन १९२० तों १९४७ या काळांतील राष्ट्रीयत्वाचा हा इतिहास पाहणें जरूर आहे. त्यासाठीं पहिल्या महायुद्धानंतरच्या भारतीय राजकारणांतील कांहीं निर्णायक नव्या घटकांची दखल घेतली पाहिजे. सन १९२० नंतरच्या दहा वर्षांत राजकारणांत नव्यानें प्रभावी झालेल्या बाबी पुढील प्रमाणें सांगतां येतील :

१ भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याचा वेगवेगळ्या सामाजिक वर्गांमध्यें व जमातींमध्यें विस्तार झाला व या वर्गांच्या व जमातींच्या विशिष्ठ, वेगवेगळ्या व कमीअधिक परस्परविरोधी अशा भूमिकांचा विकास व संघर्ष भारतीय लढ्याच्या चौकटींत सुरूं झाला.

२ आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत, तसेंच हिंदुस्थानच्या बाबतींत, ब्रिटिश साम्राज्य-सत्तेला पूर्वीचें निरंकुश सार्वभौमत्वाचें स्थान उरलें नाहीं; त्यामुळें भारतांतील भिन्न वर्गांच्या व जमातींच्या या नव्या परस्परविरोधाच्या पायावर भेदनीतीचा अवलंब करणें व भारतीय जनतेच्या शक्तीला विभागणें ही साम्राज्यवादी राज-नीतीची दुसरी अवस्था सुरूं झाली.

वरील ढोबळ विधानांचा वेगवेगळा तपशील संक्षेपानें पाहूं.

भारतीय लढ्याचा विस्तार सन १९२० सालीं झाला व त्या लढ्यांत गांधींजींच्या नव्या नेतृत्वाखालीं सामुदायिक परंतु निःशस्त्र अशा प्रतिकाराचा मार्ग जनतेला खुला झाला. तोंपर्यंतच्या राजकारणांत असंतोष सामुदायिक होता, पण प्रतिकार केवळ वरिष्ठ वर्गांतील व्यक्तींपुरता मर्यादित होता,–तोही फक्त

सनदशीर होता. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं जनतेच्या क्षोभाला प्रत्यक्ष प्रतिकाराचें रूप आलें. या सामुदायिक लढयाला सर्ववर्गीय, सर्वजातीय व व्यापक स्वरूप येण्यास एकीकडे खिलापत चळवळीसारखी कट्टर धार्मिक ध्येयावर चाललेली मोहीम उपयोगी पडली तर दुसरीकडे मुंबई, कलकत्ता वगैरे शहरांतील कामगार वर्गाची धर्मनिरपेक्ष समतावादी चळवळ पोषक ठरली. या नव्या चळवळींचे ओघ कॉंग्रेसच्या त्यावेळच्या राजकारणांत मिसळले खरें, पण त्यांचें नेतृत्व कॉंग्रेसकडे किंवा गांधीजींकडे नव्हतें. या दोन्ही चळवळींना सहकारी शक्ति म्हणून संभाळणें कॉंग्रेसला शक्य झालें. कारण कॉंग्रेसच्या व गांधीजींच्या त्यावेळच्या एकंदर तत्वज्ञानांत धार्मिकता व समतावाद यांच्याशीं तडजोड व मिळतें घेण्याची संग्राहक वृत्ति होती. ही तडजोड अर्थातच चिरकाल टिकणारी किंवा मूलभूत अशी नव्हती, हें पुढील इतिहासावरून दिसून आलेंच आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत एकीकडे असा विस्तार व संग्राहकपणा वाढत असतानाच दुसरीकडे सनदशीर वृत्तीच्या वरिष्ठ वर्गांचें वर्चस्व त्या लढयांत वाढत होतें. सन १९२० नंतर, राष्ट्रीय जीवनांत व राजकारणांत भांडवलदार वर्गाचें वर्चस्व फार मोठें वाढलें व या वर्गानें भारतीय राजकारणातील प्रांतिक व धर्मप्रेरित विचारप्रवाहांचें महत्त्व कमी करण्यांत यश मिळविलें. हा वर्ग धर्मनिरपेक्ष एकराष्ट्र भारताची कल्पना भारतीय राजकारणांत दृढ करूं लागला. या वर्गाला ही भारतीय एकराष्ट्रीयत्वाची कल्पना कां स्वीकारावीशी वाटली ? या वर्गानें अनेकराष्ट्रीय व धार्मिक राष्ट्रवादाला नेटानें व यशस्वी विरोध कां केला ? या प्रश्नांचीं उत्तरें प्रथम पाहिलीं पाहिजेत.

सन १९२० नंतरच्या राजकारणांत महत्वाचें स्थान प्राप्त झालेला हिंदी भांडवलदार वर्ग यापूर्वी राजकीय दृष्टीनें जागृत होताच; परंतु राजकीय असंतोषाला धार आणण्याचें कार्य सुशिक्षित वर्गानें चालविलें होतें व त्याच्याकडे कॉंग्रेसच्या व इतरहि राजकीय आणि सामाजिक चळवळींचें नेतृत्व होतें. त्या सुशिक्षित वर्गाला कधीं बहुराष्ट्रीय किंवा धार्मिक राष्ट्रवाद अंगिकारावासा

वाटे तर कधीं कधीं एकराष्ट्र भारताची कल्पनाहि ग्राह्य वाटे. सन १९२० नंतर मात्र ही स्थिति पालटली. नव्यानें राजकारणांत अग्रेसरत्व पावूं लागलेला हिंदी भांडवलदार वर्ग कोणच्याहि प्रांतिक व धार्मिक परंपरेला मानणारा नव्हता. या भांडवलदार वर्गाचा जन्म व विकास ब्रिटिश सत्तेनंतरच्या व्यापारी व औद्योगिक उलाढालींतून झालेला होता. ब्रिटिशांच्या दृष्टीनें सर्व भरतखंड हा एक सलंग बाजारपेठ व कच्चा माल पिकविणारी शेतकीप्रधान वसाहत होती. त्यांनी जें रेल्वेचें जाळें पसरलें त्याची आखणी या शोषणाच्या कार्याला उपयोगी अशी केली. मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे कांहीं बंदरें ब्रिटिश मालाच्या आयातीला व कच्चा मालाच्या निर्यातीला उघडण्यांत आलीं व या बंदरांकडे लक्ष ठेऊन रेल्वे, रस्ते वगैरेंची वाढ करण्यांत आली. वऱ्हाड-सारखे प्रदेश कापसाच्या नव्या पिकांसाठीं उपयोगांत आणण्यांत आले व ह्या सर्व नव्या पिकांची निर्यात मुंबईसारख्या बंदरांतून होऊं लागली.

ब्रिटिशांनीं नव्यानें उत्पन्न केलेली ही अर्थव्यवस्था भारताच्या राक्षसी शोषणासाठीं होती व तिचा व्याप अखिलभारतीय अखंड स्वरूपाचा होता. या अर्थव्यवस्थेमध्यें हिंदुस्थानांतील कांहीं ठराविक जमातींनीं आधींपासून पुढाकार घेतला. पारशी, बोहरी, मारवाडी व गुजराथमधील कांहीं वर्ग यांनीं या व्यापारांत प्रथमपासून हात घातला. याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर असें दिसतें कीं, मुंबईचा व कलकत्त्याचा व्यापार व कारखानदारी महाराष्ट्रीयांच्या किंवा बंगाल्यांच्या हातीं नसून या उपऱ्या जमातींच्या हातीं गेली आहेत. मुंबई हें बोलूनचालून ब्रिटिश अमदानींतच बसलेलें उपटसुंभ बंदरी शहर आहे. तेथें या अमदानींत नव्यानें पुढें आलेले वर्गच मक्तेदार झालें हें क्रमप्राप्त होतें. पण हाच प्रकार महाराष्ट्राच्या अंतर्गत व्यापारी जीवनांतहि झाला व सोलापूर, नागपूर, खानदेश येथील व्यापार व उद्योगधंदेहि असेच 'परकीयां'च्या हातीं गेलेले दिसतील. वऱ्हाडच्या कापसाची लागवड व पैदास तेथील शेतकऱ्यानें केली तरी त्या कापसाचा व्यापार मात्र मराठेतरांच्या हातीं आहे. हाच प्रकार इतर प्रांतांतून आढळतो. कलकत्त्यांत बंगाली कारखानदारी थोडी आहे पण खरें आर्थिक वर्चस्व स्कॉटिश

भांडवलदारांचें व अलीकडे मारवाडी कोट्याधीशांचें आहे. आंध्रमध्यें तामिळ चेट्टीयारांचें, सिंधमध्यें पंजाबी भांडवलदारांचें व ब्रह्मदेशांतहि चेट्टींचें जें आर्थिक वर्चस्व दिसून येतें तें भारतीय अर्थव्यवस्थेच्या वर सांगितलेल्या साम्राज्यवादी स्वरूपामुळें आहे.

या घटनेचा राजकीय परिणाम काय झाला ? तर अखंड भारताच्या सलंग बाजारपेठेंत ब्रिटिशांच्या शोषण–व्यवस्थेमुळें जन्मलेला व पोसलेला नवा व्यापारी व कारखानदार वर्ग आपापल्याला मूळ प्रदेशांऐवजीं सर्व भारताला आपलें अखंड कार्यक्षेत्र मानण्यास शिकला. मारवाडी, बोहरी किंवा पारशी भांडवलदाराला भारतांतील कोणत्याहि एका विशिष्ठ, एकभाषी, एकजिनसी राष्ट्रभूमीविषयीं आस्था किंवा प्रेम वाटणें शक्य नव्हतें.

साम्राज्यवादी अर्थव्यवस्थेंत हा वर्ग जन्मला तरी तिच्या शोषक स्वरूपाविरुद्ध त्यालाहि लवकरच लढावें लागलें व दादाभाई नवरोजी, तय्यबजी प्रभृति पुढाऱ्यांनीं ज्या हिंदी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला तो राष्ट्रवाद या व्यापक आर्थिक लढ्यावर उभारलेला होता. तो राष्ट्रवाद ब्रिटिश शोषणाविरुद्ध होता व म्हणूनच त्याची बैठक व भूमिका अखंडभारतीय स्वरूपाची होती. तिच्यांत महाराष्ट्रीय, बंगाली, हिंदू, मुसलमान इत्यादि प्रांतिक व धार्मिक अभिनिवेश नव्हते. कोणच्याहि प्रादेशिक व सांस्कृतिक जीवनाचें अधिष्ठान त्या राष्ट्रवादाला नव्हतें, उलट अशा प्रत्यक्ष अधिष्ठानांवर आधारलेला महाराष्ट्रीय व बंगाली सुशिक्षित वर्गांचा राष्ट्रवाद "कोता प्रांताभिमान" आहे असें या पुढाऱ्यांचें मत होतें.

ब्रिटिश अमदानीनंतरचा भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास एकभाषी, एकजिनसी प्रदेशांच्या नियोजित विकासासारखा नव्हता, उलट अखंडभारतीय स्वरूपाचा व तोहि ब्रिटिशांच्या शोषणाला सोईस्कर अशा पद्धतीनें झालेला होता. या विकासामुळें एकेका विशिष्ट भारतीय प्रदेशाच्या अधिष्ठानावर त्या त्या प्रदेशाचा सर्वांगीण राष्ट्रीय विकास होणें

अशक्य होतें. ब्रिटिशांनीं जो कांहीं तुटपुंजा आर्थिक विकास येथें होऊं दिला तो अशा मूठभर लोकांकडून झाला कीं त्यांच्या कार्याला भरभक्कम प्रादेशिक अधिष्ठान नव्हतें. एखाद्या वृक्षावरचें कलम जसें जमिनीपासून अधांतरी असतें तसा प्रादेशिक संस्कृति व लोकजीवन यांपासून अधांतरी असा हा नवा हिंदी भांडवलदार वर्ग होता. ब्रिटन, फ्रान्स वगैरे देशांत तीनचार शतकांच्या सर्वांगीण व मूलगामी विकासामुळें सत्तारूढ झालेले तद्देशीय भांडवलदार वर्ग व त्यांची भरभक्कम सर्वंगामी राष्ट्रीय संस्कृति व परकीय शोषणयंत्राचा भाग म्हणून बांडगुळी कलमाप्रमाणें वाढलेल्या हिंदी भांडवलदार वर्गाची कृत्रिम व अधांत... ी अवस्था यांची तुलना केली म्हणजे माझ्या म्हणण्याचा अर्थ आणखी स्पष्ट होईल; पण या तुलनेच्या तपशीलांत आपल्याला जावयाचें नाहीं. या अखंडभारतीय परंतु परंपराशून्य वर्गाच्या राष्ट्रवादाला सन १९२० नंतरच्या काळांत महत्त्व आलें, व या वर्गाचा राष्ट्रवादच पुढील हिंदी राजकीय जीवनांत सार्वभौम ठरत गेला असें आपल्याला दिसतें. या घटनेचें महाराष्ट्रीय राष्ट्रवादावर काय परिणाम होत गेले तें आपल्याला आतां पाहिलें पाहिजे.

सन १९२० पर्यंतच्या महाराष्ट्रीय राष्ट्रवादाचें महाराष्ट्रीय ( म्हणजे पर्यायानें 'बहुराष्ट्र भारता'ची दृष्टि ठेवणारें ), हिंदुराष्ट्रवादी व कधींकधीं एकराष्ट्रीय भारताची कल्पना ठेवणारें तिरंगी व संमिश्र स्वरूप, मागच्या प्रकरणामध्यें आपण पाहिलें आहे. राष्ट्रवादाच्या या संमिश्र कल्पनेंत सुशिक्षित महाराष्ट्रीय वर्ग घोंटाळत असतांना वर सांगितलेली भांडवलदारी अखंडभारताची राष्ट्रवादी कल्पना एकदम पुढें येऊं लागली. साहजिकच महाराष्ट्रीय राष्ट्रवादावर हें एक अनपेक्षित संकट आल्यासारखें कांहीं जुन्या पुढाऱ्यांना वाटलें. उलट कांहीं महाराष्ट्रीय पुढारी जहाल राष्ट्रवाद, दहशतवाद व समाजवाद यांपैकीं एखाद्या मार्गानें या अखिलभारतीय राष्ट्रवादाशीं व राजकारणाशीं समरस झाले व कांहीं गांधीवादाशीं समरस झाले. तरुण महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांमधून श्री. न. वि. गाडगीळ, श्री. जावडेकर, श्री. भुस्कुटे यांच्यासारखे लोक पहिल्या कोटींतील व श्री. शंकरराव देव प्रभृति पुढारी दुसऱ्या कोटींतील समजतां येतील. यांच्या

नव्या भारतीय राष्ट्रवादाला जुन्या टिळकपक्षीय लोकांचा प्रखर विरोध नव्हता, पण एकप्रकारचा असंतोष मात्र मनांतून उत्पन्न होत होता. याचीं कारणें सन १९२० पूर्वीच्या महाराष्ट्रीय विचारभूमीतील संमिश्र राष्ट्र-कल्पनेंत दिसून येतील.

"भारतीय राष्ट्रवादानें" प्रेरित झालेल्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं ब्रिटन-विरोधी राजकारणाच्या उग्रतर होत चाललेल्या लढ्यांत सतत व धडाडीनें भाग घेतला, तसेंच मराठा शेतकरी व कामकरी यांच्या जीवनाशीं समरस होण्याचा प्रयत्न केला, त्यामुळें त्यांच्या राष्ट्रवादाला "महाराष्ट्रीय" परंपरा व प्रादेशिक जीवन यांचे सर्वगामी अधिष्ठान नसूनहि त्यांना सार्वत्रिक पाठिंबा व राजकीय वर्चस्व मिळत गेलें; उलट सनदशीर राजकारणाकडे झुकणाऱ्या पुढाऱ्यांना महाराष्ट्राच्या या नव्या राजकीय जीवनांत आपलें स्थान गमवावें लागलें. ह्या सर्व राजकीय घडामोडींमध्यें तपशीलवार शिरणें प्रस्तुत ठिकाणीं जरूर नाहीं. परंतु या सर्व घडामोडींचा निष्कर्ष असा सांगतां येईल कीं, सन १९२० ते सन १९२८ पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांतील जुने महाराष्ट्राभिमानी पुढारीदेखील भारतीय राष्ट्रवादाच्या वर्चस्वाखालीं गेलेले आपल्याला आढळतात. श्री. न. चिं. केळकर व श्री. अणे यांनीं नेहरु रिपोर्टाच्या कार्यामध्यें महत्वाचा हातभार लावला असून त्यावेळीं भारतीय एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं पूर्णपणें मान्यता दिल्याचें स्पष्ट दिसून येतें.

नेहरू रिपोर्टामध्यें हिंदी राज्यघटनेचा जो आराखडा मांडण्यांत आलेला आहे तो पूर्णपणें एकराष्ट्र भारताच्या भूमिकेवर आधारलेला आहे आणि असें होणें अपरिहार्य होतें, कारण ब्रिटनविरोधी लढ्याला त्यावेळीं फारच उग्र व सर्वगामी भारतीय स्वरूप आलें होतें. या लढ्यांत सर्व भारतीयांची एकजूट राखणें व भारतीय स्वातंत्र्याच्या सर्व शक्तींना एकसूत्र बनविणें त्यावेळीं आवश्यक होते. या भावनेनें त्यावेळच्या पुढाऱ्यांनीं एकात्म एकराष्ट्रीय भारताची कल्पना हिंदुस्थानापुढें ठेवली. आज आपल्याला जरी असें दिसत असलें कीं बहुराष्ट्रीय संयुक्त भारताची कल्पना हीच भारतीय जनतेच्या अंतिम हिताला व

एकजुटीला उपकारक आहे तरी सन १९२८ मध्यें ही बहुराष्ट्रीयत्वाची दृष्टि नव्हती याचें आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं. त्यावेळची राजकीय लढ्याची अवस्था पाहिली म्हणजे नेहरू रिपोर्टांत आग्रहानें मांडलेली एकराष्ट्र भारताची भूमिका चुकीची असूनहि तेव्हांपुरती उपकारक होती, असें म्हणावें लागतें.

या रिपोर्टाच्या वेळीं महाराष्ट्रीय पुढाऱ्यांची भूमिका दाखविणाऱ्या एकदोन घटना घडल्या त्यांचा आतां विचार करूं. पहिला प्रश्न प्रांतिक पुनर्घटनेचा घेऊं. या बाबतींत नेहरू रिपोर्टाची भूमिका काय होती हें प्रथम नीट समजावून घेतलें पाहिजे. मोर्ले-मिंटो सुधारणा व मॉंटफर्ड सुधारणा यांचा रोख हिंदुस्थानांत प्रांतिक व धार्मिक मतभेदांना चालना देऊन वाढत्या भारतीय एकजुटीची व लढ्याची शक्ति खची करण्याचा होता. या ब्रिटिश भेदनीतीला तोंड कसें द्यावयाचें हाच प्रश्न हिंदी मुत्सद्यांपुढें त्यावेळीं होता. सन १९२८ पर्यंत हा प्रश्न चांगलाच तीव्र झाला होता व एकराष्ट्र भारताची भूमिका मांडतांना 'प्रांतिक' व 'धार्मिक' वेगळेपणाची कांहीं तरी सोय लावणें आवश्यक आहे, हें सर्व पुढाऱ्यांना दिसत होतें. प्रांतिक वेगळेपणाच्या बाबतींत सन १९२० मध्येंच एक अशी तरतूद कॉंग्रेसनें केली होती कीं भावि हिंदुस्थानचे **प्रांत भाषावार** रचण्यांत यावेत. कॉंग्रेसनें याबाबतींत प्रत्यक्ष एक पाऊल टाकलें व भाषावार लोकसमूहांच्या पायावर कॉंग्रेस कमिट्या बनविल्या. अर्थात, हें करतांना सलग एकभाषी विभागांची ब्रिटिश सत्तेमुळें व संस्थानांमुळें झालेली फाळणी कॉंग्रेसला मानावी लागली व व्यवहार्यतेच्या दृष्टीनें तें आवश्यक होतें. परंतु केवळ भाषावार प्रांतरचनेच्या या तत्वाच्या पलीकडे जाणें नेहरू रिपोर्टाच्या वेळीं कसें आवश्यक झालें तें पुढें पाहूं.

आज महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाच्या चळवळीमध्यें प्रमुख कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं लक्ष घातलें तेव्हां साहित्याच्या किंवा इतर व्यासपीठांवरून हें कार्य करीत राहणारे जुने कार्यकर्ते म्हणूं लागले कीं "आतां आलांत तें उत्तमच, पण इतकीं वर्षें उपेक्षा कां केलींत?" त्यावर सन १९२० चा भाषावार प्रांतरचनेचा कॉंग्रेसचा ठराव कॉंग्रेसवाल्यांनीं बचावासाठीं पुढें केलेला

आढळतो. याबाबतींत मला दोन गोष्टी मांडणें जरूर वाटतें: (१) भाषावार प्रांतरचनेच्याहि पुढें जाऊन निव्वळ **प्रांतरचनेहून** वेगळें व राष्ट्रवादाच्या दृष्टीनें तात्त्विक महत्त्वाचें असें **राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचें** (नॅशनल सेल्फ डिटरमिनेशन) तत्व नेहरू रिपोर्टाच्यावेळीं कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं बव्हंशी स्वीकारलेलें आढळतें, आणि (२) हें स्वयंनिर्णयाचें तत्व स्वीकारीत असतांनाच **एकराष्ट्र भारताची** कल्पनाहि त्यावेळीं कॉंग्रेसवाले प्रतिपादित होते, असें दिसतें.

भाषावार प्रांतरचना म्हणजे सांस्कृतिक **स्वायत्ततेचा** (कल्चरल ऑटॉनमी) एक प्रमुख भाग आहे. परंतु या **स्वायत्ततेंतून स्वयंनिर्णयाचा** जन्म किंवा विकास होऊं शकत नाहीं; स्वायत्तता व स्वयंनिर्णय ह्या तत्वांना वेगळें समजलें पाहिजे व स्वायत्ततेंत स्वयंनिर्णयाचा समावेश होत नाहीं हें स्पष्टपणें लक्षांत घेतलें पाहिजे. मागील प्रकरणांतून या गोष्टीचा उहापोह केलेला आहेच. याठिकाणीं त्याची जास्त प्रत्यक्षपणें फोड करणें शक्य आहे. तसें केल्यानें नेहरू रिपोर्टाच्या वेळची भारतीय व महाराष्ट्रीय पुढाऱ्यांची भूमिका आपल्याला नीट स्पष्ट होईल.

केवळ भाषावार प्रांतरचनेपेक्षां वेगळी अशी स्वयंनिर्णयाची भूमिका नेहरू रिपोर्टामध्यें कशी घेतली आहे तें प्रथम पाहूं. रिपोर्टांत, पान ६३ वर, म्हटलें आहे :

" एका व्यापक दृष्टीनें आपण स्वयंनिणर्याची (सेल्फ–डिटरमिनेशन) घोषणा करतो. तें तत्व एखाद्या लहान क्षेत्राला लागूं करण्यास आपण सिद्ध झालेंच पाहिजे. अर्थात, ही मान्यता देतांना दुसऱ्या एखाद्या महत्वाच्या तत्वाशीं किंवा जिव्हाळयाच्या प्रश्नाशीं विसंवाद येऊन उपयोगी नाहीं. एखाद्या प्रदेशांतील लोकांना आपण एकजिनसी आहोंत व आपल्या विशिष्ट संस्कृतीची जोपासना केली पाहिजे, असें वाटणें हेंच महत्त्वाचें आहे व त्यांच्या मागणीचा विचार झालाच पाहिजे. या मागणीच्या बुडाशीं ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेचें पुरेसें पाठबळ नाहीं, असें म्हणून चालणार नाहीं. वस्तु-

स्थिति कांहींहि असली तरी एका लोकसमूहाची भावना ही या बाबतींत जास्त महत्त्वाची ठरते. ''

वरील उताऱ्यांत एकभाषिक लोकांचा प्रश्न चर्चिलेला नाहीं, उलट "एकजिनसी" व "एका विशिष्ट संस्कृतीच्या" लोकसमूहांचा प्रश्न घेतला असून त्याबद्दल स्पष्ट भूमिका घेतली आहे. या भूमिकेला एकीकडे **राष्ट्रीय स्वयंनिर्णयाची** भूमिका म्हणावयास पाहिजे, पण दुसरीकडे तसें म्हणावयास एकदोन अडचणी आहेत. ही भूमिका निव्वळ प्रांतिक व भाषिक स्वायत्ततेची नाहीं असें कां म्हणावयाचें? तर उताऱ्यांतील पहिल्या वाक्यांतच असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, ब्रिटिश सत्तेपासून व ब्रिटिश साम्राज्यांतून मुक्त होण्याच्या ज्या "व्यापक दृष्टीनें", म्हणजेच **राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या** दृष्टीनें, भारतीय स्वातंत्र्याची मागणी आपण करतो त्याच दृष्टीनें व तेंच तत्व मान्य करून भारतांमधील अनेक "लहान क्षेत्रांतील" लोकसमूहांच्या एकजिनसीपणाच्या भावनेला आपण मान्यता दिली पाहिजे. दुसऱ्या जास्त व्यापक प्रश्नांशीं राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्वाचा विसंवाद आल्यास नीट विचार केला पाहिजे हें मत रिपोर्टांत नमूद केलेलें आहे. या इषाऱ्यामध्यें काय गर्भित आहे? राष्ट्रीय स्वयंनिर्णय हा लोकशाहीच्या व्यापक ध्येयाचा एक भाग आहे व अगदीं विशिष्ट बाबतींत असें संभवतें कीं राष्ट्रीय स्वयंनिर्णयाची अमूक एकप्रकारची अंमलबजावणी केली तर एकंदर लोकशाहीचा त्यांत घात होण्याची शक्यता असते. अशावेळीं राष्ट्रीय स्वयं-निर्णयाच्या तत्वाला सार्वभौम, निरपवाद व स्वयंसिद्ध मानणें लोकशाहीशीं विसंगत ठरेल. रिपोर्टांतील इषाऱ्यामध्येंहि वर सांगितलेला संभव सूचित केलेला आहे, असें मानणें संदर्भावरून सयुक्तिक ठरेल.

उताऱ्याच्या अर्थावरून वरील विवेचन केल्यावर मग रिपो-र्टाच्या एकंदर वातावरणाचा व कलाचा विचार करावा लागतो, व मग असें दिसूं लागतें कीं पहिल्या महायुद्धानंतर सर्वमान्य झालेलें व महत्त्व पावलेलें 'राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचें' तत्वच रिपोर्टकाराच्या समोर आहे

हें जरी खरें तरी त्या तत्वाचें मूलभूत स्वरूप व सर्वच्या सर्व आशय त्यांनीं आत्मसात केलेला नाहीं. 'राष्ट्रीय स्वयंनिर्णय' या तत्वापैकीं 'स्वयंनिर्णय' शब्दच त्यांनीं महत्वाचा ठरविला आहे व भारतांतील विविध लोकसमूहांनाहि स्वयंनिर्णयाचा हक्क आहे ही मूलभूत गोष्ट एकीकडे मान्य करीत असतांना त्यांनीं 'राष्ट्रीय' या विशेषणाला संक्षेप देऊन स्वयंनिर्णयाचा व आशय लवचिक ठेवला आहे, असें दिसतें. स्वयंनिर्णय कोणाला द्यावयाचा व किती द्यावयाचा हें राजकीय सोयीप्रमाणें पुढें वेळ पडेल तेव्हां ठरवूं अशी भूमिका रिपोर्टकारांनीं घेतलेली आहे, आणि राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या मूलभूत हक्कापासून तों निव्वळ प्रांतिक व भाषिक स्वायत्ततेच्या संकुचित हक्कापर्यंत सर्व प्रमाणांत विविध लोकसमूहांचें समाधान करण्याची योजना त्यांच्या मनांत होती, असें यावरून दिसून येतें.

स्वयंनिर्णयाच्या या लवचिक व ऐसपैस भूमिकेबरोबरच रिपोर्टकारांनीं एकराष्ट्रीय भारतीय राज्याबद्दल किती खंबीर धोरण ठेवलें होतें तेंहि ध्यानांत घेतलें म्हणजे असें दिसून येईल कीं सन १९२० नंतरच्या काळांत राजकीय अग्रेसरत्व पावलेल्या अखिलभारतीय वृत्तीच्या भांडवलदार वर्गाचें वजन सन १९२८ पर्यंतच्या राजकारणावर व मुख्यांच्या राजकीय विचारांवर नकळत परंतु बेमालूमपणें पडलेलें होतें. नेहरू रिपोर्टांत एकराष्ट्रीय भारताची राज्यघटना बनविण्याचाच प्रयत्न आहे व तिला फेडरल किंवा संयुक्त राज्यघटनेचा पेहराव दिला असला तरी गाभा एकात्मतेचाच आहे. हिंदुस्थानचें राज्य संयुक्त स्वरूपाचें असावें पण ही संयुक्तता अमेरिकन राज्यघटनेप्रमाणें एकात्मतेच्या पोटीं असावी, असें त्यावेळच्या कॉंग्रेसच्या मुख्यांचें मत होतें, उलट आगाखानप्रभृति लोकांनीं घटकांना पूर्ण सार्वभौमत्व व स्वयंनिर्णयाचा हक्क असावा असें मांडलेलें आढळतें. रिपोर्टांमध्यें आगाखान यांना दिलेल्या उत्तरांवरून स्पष्ट होतें कीं एकात्म राज्याची कल्पनाच रिपोर्टकारांपुढें होती.

रिपोर्टांमध्यें दोन कलमें अशीं आहेत कीं त्यावरून भारताच्या एकात्म एकराष्ट्रीय राज्याबद्दलचा रिपोर्टकारांचा आग्रह स्पष्ट दिसूं लागतो. सेक्शन १३ (अ) मध्यें "आणीबाणीच्या वेळीं" मध्यवर्ती सत्तेला किती अमर्याद

सत्ता वापरतां येईल याचा तपशील दिलेला आहे, ( रिपोर्ट, पान ३६ पहा ). मुळांत हें कलम नव्हतें परंतु " एन्लार्जड कमिटीनें " ही खास तरतूद करून ठेवली.

दुसरें असें कलम म्हणजे हिंदुस्थानी भाषेसंबंधींचें सेक्शन ४ अ हें कलम. हेंहि लखनौ परिषदेनंतर मागाहून जोडण्यांत आलें. सेक्शन ४ मध्यें पूर्वी असें होतें कीं शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक लोकभाषाच राहील, त्याला अशी पुस्ती जोडण्यांत आली कीं, " कॉमनवेल्थची भाषा " सर्व ठिकाणीं शिकविलीच पाहिजे असा दंडक केंद्रीय सरकारला घालतां येईल. ही " कॉमनवेल्थची भाषा " म्हणजेच राष्ट्रभाषा असें सेक्शन ४ अ मध्यें ठरविण्यांत आलें, आणि हिंदुस्थानीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यांत आला.

हिंदीला 'राष्ट्रभाषा' हें विशेषण चूक आहे असें श्री. शंकरराव देव यांनीं नुकतेंच म्हटल्याचें मागील एका प्रकरणांत मी दिलें आहेच; आणि सन १९२८ मध्येंहि अनेक पुढाऱ्यांना ही राष्ट्रभाषेची अभिनव निर्मिति चमत्कारिक वाटली असेल. उदाहरणार्थ, श्री. बापूजी अणे व श्री. तात्यासाहेब केळकर या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना रिपोर्टाच्या या कलमाची निर्मिति होत असतांना आपल्या जुन्या कल्पनांना धक्का मिळत आहे असें वाटलें असेल. पण रिपोर्टाच्या एकराष्ट्रीय वातावरणाचें दडपण इतकें मोठें होतें व भारताच्या एकराष्ट्रीयत्वाबद्दलचा आग्रह त्या वातावरतांत इतका भरलेला होता कीं कोट्यावधि बहुभाषी सुसंस्कृत लोकसमूहांना कृत्रिमपणानें व कागदी ठरावांनीं, एखादी राष्ट्रभाषा " नेमून देण्याचा " हा प्रकारहि आपल्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना आक्षेपार्ह वाटला नाहीं.

सन १९२० च्या भाषावार प्रांतरचनेच्या योजनेच्या पुढें जाऊन एकजिनसी, एकभाषी व एकसंस्कृतीच्या लोकसमूहांना राष्ट्रीय स्वयंनिर्णय देण्याची घोषणा नेहरू रिपोर्टांत प्रथम अभिप्रेत आहे; परंतु या घोषणेतील ' राष्ट्रीय ' शब्दाला पुढें संक्षेप दिला गेला असून भारताच्या एकराष्ट्रीयत्वाची भूमिका

खंबीरपणानें मांडली गेली आहे, ही गोष्ट येथवर आपण पाहिली. या दुहेरी भूमिकेंत विसंगति, धरसोड किंवा राजकीय तत्वांची सोइस्कर तऱ्हेनें ओढाताण आहे, असें आज आपल्याला म्हणतां येतें. " राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा " आशय जर स्पष्टपणे तेव्हांच जनतेसमोर मांडला गेला असतां तर पॅनइस्लामी पाकिस्तानाची कल्पना कधीं उत्पन्नहि होऊं शकली नसती, निदान रुजूं व वाढूं शकली नसती. उलट, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला तेव्हांपासूनच राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान मिळून गेल्या २० वर्षांत केवढी तरी प्रगति झाली असती. परंतु, हें आजचें विश्लेषण करतांना आपण हें विसरून चालणार नाहीं कीं नेहरू रिपोर्ट बनविणाऱ्या पुढाऱ्यांना जी विसंगति पत्करावी लागली ती ब्रिटिश मुत्सद्यांच्या भेदनीतीवर तोड म्हणून होती. प्रांतिक व जातीय फाटाफुटीला ब्रिटिशांनीं सारखें खतपाणी घातलें होतें, त्या डावपेचांना उत्तर म्हणून रिपोर्टकारांनीं एकराष्ट्र भारताची घोषणा पुढें केली.

या परिस्थितीमध्यें, बहुतेक महाराष्ट्रीय पुढाऱ्यांची वृत्ति एकराष्ट्र भारताच्या ध्येयाशीं पूर्णपणें समरस झाली, हें मागें सांगितलेंच आहे. महाराष्ट्रीय गांधीवादी व नव्यानेंच समाजवादाकडे वळलेले तरुण जहाल राष्ट्रवादी यांच्या त्यावेळच्या मनोवृत्तींचें चित्र पुढील शब्दांत देतां येईल : " तामिळ संस्कृति किंवा आंध्र संस्कृति अशी कांहीं चीज नाहीं. दाक्षिणी व उत्तरी, हिंदु–मुस्लीम अशी संस्कृतींची वर्गवारीहि फोल आहे. संस्कृति आहे ती एकच व ती म्हणजे भारतीय संस्कृति." ( राष्ट्राध्यक्ष आचार्य कृपलानी यांचें ता. २१ मार्च १९४७ रोजीं मद्रास येथें केलेलें भाषण ). परंतु, टिळक संप्रदायांतील जुने पुढारी या भारतीय एकराष्ट्रीयत्वाशीं तितकेसें समरस झाले नाहींत. त्यांनीं एकराष्ट्रीयत्वाच्याऐवजीं बहुराष्ट्र अशा संयुक्त भारतीय राज्याची कल्पना व त्याला अनुरूप कार्यक्रम मांडला असतां तर काय झालें असतें ? भारतीय राजकारणाला किती चांगली दिशा मिळाली असती ? परंतु हे प्रश्न आज मांडणें व्यर्थ आहे. प्रत्यक्ष असें घडलें कीं एकराष्ट्रीयत्वाकडून पाठ फिरवून हे पुढारी धार्मिक हिंदुराष्ट्रीयत्वाकडे वळले. सन १९२० च्या आधींच्या राष्ट्र

वादाची तीन–पदरी तत्वभूमिका मागील प्रकरणांत मी वर्णन केली आहेच. त्यापैकीं बहुराष्ट्रवाद अगदींच मागें पडला व एकराष्ट्रवाद वरचढ झाला; टिळक संप्रदायांतील जुन्या पुढाऱ्यांना प्रादेशिक संस्कृतीच्या अभिमानाची बैठक असल्यामुळें ते बहुराष्ट्रवादाकडे वळावे, पण ब्रिटिशांच्या जातीय भेदनीतीच्या प्रहारानें त्यांची दिशाभूल झाली व ते जातीय किंवा धार्मिक राष्ट्रीयत्वाकडे फिरले.

या अनिष्ट घटनेचा तपशील म्हणून एक उदाहरण नमूद करण्यासारखें च महत्वाचें आहे. नेहरू कमिटीपुढें सिंधच्या विभक्तीकरणाचा प्रश्न आला तेव्हां 'स्वयंनिर्णयाच्या' तत्वाचें कितीहि मर्यादित पालन करण्याचें ठरविलें तरी सिंधला निदान प्रांतिक स्वायत्तता दिलीच पाहिजे, ही गोष्ट रिपोर्ट तयार करणाऱ्या सर्व पुढाऱ्यांनीं मान्य केली. श्री. बापूजी अणे यांनीं मात्र कसून विरोध केला व असंमतीचें शिक्कामोर्तब रिपोर्टांतहि करून ठेवलें. मागील प्रकरणांतच मी बापूजींचा एक उतारा दिला आहे, त्यांत भारताच्या बहुराष्ट्रीयत्वाची स्पष्ट भूमिका त्यांनीं घेतलेली आहे. मग बारा वर्षांनंतर सिंधच्या निव्वळ मर्यादित स्वायत्ततेला श्री. अणे यांनीं विरोध कां केला ? पण राजकारणांत तत्वच्युतीचीं अशीं अनेक आश्चर्यें घडतात ! बहुराष्ट्रीयत्वाचें तत्व उराशीं धरलें तर सिंधमधल्या हिंदूंचें हितरक्षण होत नाहीं, असें दिसतांच श्री. अणे यांनीं या प्रांतिक पुनर्घटनेसहि विरोध केला.

महाराष्ट्राच्या दृष्टीनें या प्रकाराला जास्तच महत्त्व आहे, कारण श्री. अणे यांच्या या नवीन धोरणामुळें महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा प्रश्न रिपोर्टाच्या वेळीं समोरहि येऊं शकला नाहीं. एकराष्ट्रवादी मराठी पुढाऱ्यांना 'महाराष्ट्र' अशी कांहीं वस्तूच तेव्हां फारशी प्रिय नव्हती तेव्हां महाराष्ट्राची कड घेऊन लढण्याला जुने पुढारी तयार व्हावयाचे, पण ते श्री. अणे यांच्याप्रमाणें धार्मिक राष्ट्रवादाकडे घसरले. त्यामुळें नेहरू रिपोर्टाच्या सेक्शन '७२ (सहा)'मध्यें महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा उल्लेखहि नाहीं. ह्या सेक्शनमध्यें कर्नाटक, आंध्र, ओरिसा व केरळ यांच्या एकीकरणाचा उल्लेख आहे. कर्नाटकाच्या प्रांतिक काँग्रेस समितीनें व इतर राजकीय व सामाजिक संस्थांनीं नेहरू कमिटीला एक

फार विस्तृत अहवाल सादर केला होता व त्यांत एकीकरणाची आवश्यकता मोठ्या व्यापक व तपशीलवार पद्धतीनें प्रतिपादन केली होती. तसा कांहीं देखील प्रयत्न महाराष्ट्रांतून कोणीच केला नाहीं.

सन १९२० पूर्वीच्या 'राष्ट्र' विषयक संमिश्र भूमिकेपैकीं एकराष्ट्रीयत्व व धार्मिक राष्ट्रीयत्व यांनींच सन १९२८ नंतरच्या महाराष्ट्राचें विचारक्षेत्र व्यापलें व बहुराष्ट्रीयत्व फार मार्गे पडलें व दिसेनासें झालें, असा निष्कर्ष येथवरच्या इतिहासावरून काढतां येतो.

## सन १९३५ नंतरच्या घडामोडी

सन १९२८ मध्यें राष्ट्रवादासंबंधीं एकंदर भारतीय पुढाऱ्यांची व महाराष्ट्रीय नेत्यांची भूमिका काय होती तें पाहिल्यावर सन १९३५ नंतरच्या परिस्थितीची थोडक्यांत ओळख करून घेतली पाहिजे. सन १९२८ नंतरच्या सात वर्षांच्या काळांतील भारतीय जीवनात एक मोठी क्रांतीच होऊन गेली. तिचें स्वरूप थोडक्यांत असें सांगतां येईल : सन १९२८ सालीं, कॉंग्रेस या सर्ववर्गीय प्रबळ संस्थेला ब्रिटनकडून पुरेशा सवलती मिळण्याची आशा दिसेना व देशांतील सुशिक्षित तरुणांतील व सर्वव्यापी शेतकरी वर्गांतील असंतोष अगदीं कांठोकांठ भरून ओसंडत चालला. यांतूनच सन १९३०-३२ ची प्रचंड चळवळ झाली व निष्ठुर दडपशाहीनंतर ती थंड झाली. पण या अग्निदिव्यामुळें कायम स्वरूपाचा फरक झाला तो असा कीं यापुढील सर्व राजकीय लढ्यांत व घडामोडींत शेतकरी वर्गाला व गरीब पांढरपेशा वर्गाला मोठें महत्त्व लाभलें. या वर्गांमधील लढाऊ वृत्तीबरोबरच त्यांच्यामधील परंपरागत धार्मिक संस्कृतीविषयींची आपुलकी राजकारणांत प्रभावी ठरण्याची शक्यता यापुढें निर्माण झाली.

सन १९३५ मध्यें ब्रिटिशांनीं एक फेडरल, म्हणजे संयुक्त, घटना देऊं केली व भारतीय नेत्यांनीं तिच्या चौकटींत कार्य करण्याचें ठरविलें. या घटनेच्या छायेमध्येंच त्यानंतरचें राजकारण वाढलेलें आहे. प्रांतिक स्वायत्ततेचा

विकास व त्या विकासाच्या अनुषंगानें जातीय तेढीच्या विषवृक्षाची वाढहि या काळांत झाली. राष्ट्रवादाच्या दृष्टीनें या घटनेचें परिणाम काय झालें तेवढें आपल्याला तपासलें पाहिजे.

सन १९३५ ची फेडरल राज्यघटना बनवितांना ब्रिटिशांनीं मुख्य दृष्टि अशी ठेवली होती कीं घटनेचें फेडरल स्वरूप शक्य तेवढें कमकुवत ठेवावयाचें, केंद्रीय सरकारकडे खूप अधिकार ठेवावयाचें व या केंद्रीय सरकारमध्यें संस्थानिकांना हाताशीं धरून सर्व सत्ता आपल्या कवजांत ठेवावयाची. प्रांतिक स्वायत्तता देण्यांत आली होती ती काँग्रेसला थोडी सवलत देऊन या नव्या सांपळयांत तिला ओढण्यासाठीं आमिष म्हणून. या धोरणावर तोड म्हणून प्रांतिक सरकारें बनवून आपलें बळ संघटित करण्याची काँग्रेसची दृष्टि होती. या डावपेंचाच्या आखाड्यांत एक तिसरा पक्ष तयार होत होता, तो म्हणजे केंद्रीय सत्तेला विरोधी असणाऱ्या स्वायत्ततावादी मुस्लीम लीगचा.

नेहरू रिपोर्टासंबंधींच्या चर्चेत आपण पाहिलेंच कीं "फेडरेशन" या शब्दाचा उपयोग काँग्रेसनें जरी केला तरी तिला खरेंखुरें हवें होतें तें म्हणजे एकात्म एकराष्ट्रीय भारतीय राज्यच. सन १९३५ मध्येंहि काँग्रेसची भूमिका एकराष्ट्रीय राज्याचीच होती. तीच भूमिका सन १९४२ मध्यें गांधीजींनीं एका लेखांत स्पष्ट मांडली व सन १९४४ मध्यें जीनांशीं वाटाघाटी करतांना त्यांनीं सुरवातीलाच तिचा उच्चार केला. जून १६, १९४४ रोजीं, अ. भा. कॉं. कमिटीनें पास केलेल्या ठरावांतदेखील हीच भूमिका घेऊन माऊंटबॅटन-योजनेनुसार झालेल्या फाळणीला काँग्रेसनें राष्ट्र-विच्छेदन मानलें आहे. यावरून दिसून येईल कीं सन १९२८ नंतर आजतागायत काँग्रेसची भूमिका सुसंगतपणें व खंबीरपणें एकराष्ट्रीय भारताचीच आहे. सन १९३२ पर्यंत हिंदू व मुसलमान भांडवलदार एकराष्ट्रीयत्वाच्याविरुद्ध नव्हते व वरिष्ठ पांढरपेशा वर्गहि विरुद्ध नव्हता. इंग्रजी शिक्षण, पाश्चात्य लोकसत्तावादाच्या कल्पना व ब्रिटनविरोधी चळवळींत परस्पराविषयीं उत्पन्न झालेला स्नेहभाव यामुळें हे सर्व वर्ग एकराष्ट्रीयत्वाच्या झेंड्याखालीं नांदू शकत होते. पण सन १९३५ मध्यें स्थिति

पालटली होती; इंग्रजी शिक्षण, धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या कल्पना व राजकीय अनुभव हा तोंपर्यंत मूठभर वरिष्ठवर्गीय लोकांना लाभला होता व बहुसंख्य शेतकरी व गरीब पांढरपेशा वर्ग जुन्या धार्मिक कल्पना, एकंदर भीतिग्रस्तपणा व नुसताच आंधळा असंतोष यांनीं दिग्मूढ असे होते. सन १९३०–३२ च्या चळवळीनंतर ते हलविल्यासारखे झाले व मुसलमानांतील या नव्या वर्गाच्या जोरावर एकराष्ट्रीयत्वाला विरोध करण्याचें मुस्लिम लीगनें ठरविलें.

लीगची भूमिका एकभाषी लोकसमूहांच्या राष्ट्रीयत्वावर कधींच आधारलेली नव्हती. लीगला बहुराष्ट्र हिंदुस्थान नको होतें व बहुराष्ट्र पाकिस्तानहि नको होतें. १९४४ मध्यें जीनांनीं याबाबतींत गांधीजींना असें स्पष्ट उत्तर दिलें कीं पाकिस्तानमधील घटक हे प्रांत राहतील, राष्ट्रें असणार नाहींत. जीनांच्या या भूमिकेमुळेंच पठाणीस्तान, काश्मीर व सिंध या सर्व प्रदेशांमध्यें जीनांच्या पाकिस्तानला विरोधी वातावरण आहे व सार्वभौम व स्वतंत्र पठाणीस्तानची, सिंधची व काश्मीरची स्थापना करण्याचा प्रयत्न आज होत आहे. याला कसें उत्तर द्यावयाचें व पठाणांसारख्या एकभाषिक व एकजिनसी लोकसमूहाची स्वयंनिर्णयाची रास्त मागणी कशी डावलून लावावयाची हा आज जीनांच्यापुढें प्रश्न आहे.

सारांश, एकराष्ट्रवाद व लीगचा पाकिस्तानवाद या दोन प्रकारच्या राष्ट्रवादांचा जरी परस्परांशीं अटळ व तीव्र विरोध होता तरी दोघांची एका बाबतींत एकवाक्यता होती; ती बाब अशी : भारतासारख्या खंडप्राय देशांतील एकभाषिक, एकजिनसी लोकसमूहांना राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क देऊन बहुराष्ट्र व संयुक्त भारताचें खऱ्याखुऱ्या अर्थानें संयुक्त राज्य बनविण्यास कॉंग्रेस व लीग या दोघांचाहि विरोध होता व आजहि तो कायम व तीव्र आहेच.

कॉंग्रेसचा एकराष्ट्रवाद व लीगचा द्विराष्ट्रवाद यांच्या वाढत्या संघर्षामुळें ब्रिटिशांच्या भेदनीतीचें मात्र चांगलेंच फावलें. त्यांनीं असें दुटप्पी धोरण आंखलें कीं एकराष्ट्रवादाचा आधार घेऊन प्रांतिक स्वायत्ततेवर व लीगच्या राजकारणावर

मात करावयाची आणि उलट लीगच्या द्विराष्ट्रवादाचा आधार घेऊन कॉंग्रेसच्या एकराष्ट्रवादाला शह द्यावयाचा! सन १९३५ पासून सन १९४७ पर्यंत त्यांनीं या दुटप्पीपणाच्या जोरावर भारतीय जनतेच्या ब्रिटनविरोधी लढ्याची व सामर्थ्याची कशी दुर्दशा केली व शेवटीं आजची भीषण स्थिती कशी निर्माण केली, हें कोणालाहि दिसण्यासारखें आहे. ही भेदनीती इतक्या सहजासहजी यशस्वी कां होऊं शकली? हिंदु, मुसलमान इत्यादि जमातींचें हित भारतीय संयुक्त राज्याची स्थापना होण्यानें साधणार होतें ही गोष्ट सर्व पुढाऱ्यांना कळत असून असें संयुक्त राज्य कां बनूं शकलें नाहीं? या प्रश्नांची उत्तरें देतांना राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें ज्या कांहीं महत्वाच्या गोष्टी लक्षांत येतात, त्यांचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

सन १९३०–३२ च्या आंदोलनामुळें महाराष्ट्रामध्येंहि गरीब पांढरपेशा वर्ग व शेतकरी वर्ग ढवळून निघाला. शेतकरी समाजांतील सुखवस्तु वर्ग यापूर्वी ब्राह्मणेतर चळवळीच्या कक्षेंत होता व ब्रिटिशांच्या भेदनीतीमुळें पुष्कळसा राजनिष्ठ राहिला होता. तो आतां लढ्यांत सामील झाला व श्री. जेधे प्रभृति ब्राह्मणेतर पुढारी कॉंग्रेसवादी झाले. गरीब पांढरपेशा वर्गांतील तरुण पिढीहि अशीच कॉंग्रेसवादी झाली. एकीकडे असें घडत असतांना दुसरीकडे गरीब पांढरपेशा वर्गापैकीं दुसरा एक भाग हिंदुराष्ट्रवादाकडे वळला. एकराष्ट्रवादाला पोषक अशी पहिली घटना होती तर दुसरी तिला विरोधी होती. ब्रिटिश भेदनीतीच्या ज्या पविञ्यामुळें लीगचा द्विराष्ट्रवाद बळावत गेला त्याच पविञ्यामुळें हिंदुराष्ट्रवादहि बळावला. लीगच्या द्विराष्ट्रवादाला प्रत्युत्तर व प्रतिकार म्हणून हा हिंदुराष्ट्रवाद वाढला असें दिसतें तरी महाराष्ट्रांत खरा सामना होता तो कॉंग्रेसचा एकराष्ट्रवाद व हिंदुराष्ट्रवाद यांच्यांतच. महाराष्ट्रापुरता तरी हाच विरोध प्रमुख होता व यापुढेंहि महत्वाचा राहील. या हिंदुराष्ट्रवादाला गरीब पांढरपेशा वर्गांत अधिष्ठान मिळालें व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या शेतकरी वर्गांतहि त्याचे हातपाय पसरण्याची शक्यता आज निर्माण झाली, आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

काँग्रेसचा एकराष्ट्रवाद व लीगचा द्विराष्ट्रवाद किंवा 'पाकिस्तानी फुटीरपणा' हिंदुराष्ट्रवादी लोकांना नको होता. त्यांच्या राष्ट्रवादाची भूमिका बॅ. सावरकर यांनी फार स्पष्टपणें व अभिनिवेशानें हिंदु समाजापुढें मांडली. त्या भूमिकेच्या इतर तपशिलांत न जातां सध्यां एवढेंच पाहणें जरूर आहे कीं हिंदुराष्ट्रवादालाहि भारताचें बहुराष्ट्रीयत्व पूर्णपणें अमान्य होतें. त्यांनीं ज्या " अखंड भारता "चा पुरस्कार केला त्या भारतांत महाराष्ट्र, बंगाल इत्यादि प्रदेशांना केवळ प्रांतांचा दर्जा आहे. हिंदु संस्कृतीच्या एकछत्राखालीं नांदणाऱ्या एकभाषी, एकजिनसी लोकसमूहाचें परस्परभिन्नत्व हिंदुराष्ट्रवाद्यांना जाणवतें, पण त्या भिन्नत्वाला अगदीं गौण लेखण्याकडे त्यांची साहाजिक प्रवृत्ति आहे. " फुटीरपणा " विषयीं पाकिस्तानच्या प्रचारामुळें वाढू लागलेली दहशत हें या प्रवृत्तीचें अलीकडचें मुख्य कारण आहे, हें खरें. परंतु मुळाशीं गेल्यास असें दिसेल कीं हिंदुराष्ट्रवादाची मूलभूत भूमिका, 'राज्य' व 'राष्ट्र' यांच्यांतील फरकाच्या अज्ञानावर, तसेंच प्राचीन, व्यापक, धर्मप्रधान संस्कृति व आधुनिक राष्ट्रीय संस्कृति यांच्यांतील फरकाच्या अज्ञानावर, आधारलेली आहे. हा मुद्दा " राष्ट्रीयत्वाची आधुनिक कल्पना " या प्रकरणांत मी जास्त विशद केलेला आहेच.

सन १९४५ नंतरच्या काळांतील एकराष्ट्रवाद, पाकिस्तानवाद व हिंदुराष्ट्रवाद यांचा परस्परांशीं झालेला संघर्ष, त्याचा आधार घेऊन जनतेच्या क्रांतिकारक शक्तींमध्यें फाटाफूट करण्याची ब्रिटिश भेदनीति व त्यामुळें भारतामध्यें वाढत गेलेला धार्मिक तेढीचा विषवृक्ष या सर्वांचें विस्तृत विवेचन प्रस्तुत पुस्तकांत अनाठायीं होईल, परंतु एकदोन गोष्टी नमूद करणें आवश्यक आहे. आजचे धार्मिक दंगे हे जरी वरवर पाहतां सन १९२० च्या आधींच्या दंग्यासारखे आहेत तरी त्यांचें खरें स्वरूप अगदीं वेगळें आहे. मशीदीवरून किंवा अशा खरोखरीच्या **धार्मिक** कारणांवरून आतांचे हे दंगे पेटलेले नसून यांच्यामागें **राष्ट्रीयत्वाच्या** भावनांचें पाठबळ आहे. राष्ट्रीयत्व ही मूठभर धर्मवेड्यांच्या माथेफिरूपणापेक्षां वेगळी भावना आहे. त्या भावनेच्या भरांत सुशि-

क्षित व सभ्य माणसेंहि भयंकर अमानुष क्रौर्य करूं शकतात आणि अशिक्षित बहुजनसमाजहि पशुतुल्य वर्तन करतात, हें सत्य आज भारतांत अनुभवास येत आहे. पण हें सत्य गेलीं कित्येक शतकें युरोपांत अनुभवास आलेलें नाहीं काय?

सन १९३५ नंतरच्या राजकारणांत दुसरी एक प्रवृत्ति वाढूं लागलेली दिसते. तिच्याकडे आतां वळूं. ही प्रवृत्ति प्रांताभिमानाची. प्रांतिक स्वायत्ततेची सवलत पदरीं पाडून घेण्याचें कॉंग्रेसनें ठरविल्यानंतर महाराष्ट्रामध्यें ह्या प्रवृत्तीला चांगलाच जोर येत चालला व आंध्र, कर्नाटक इत्यादि प्रांतांतूनहि प्रांताभिमानाचें वारें वाहूं लागलें. वरवर पाहतां या प्रांताभिमानाला जुन्या, सन १९२९ पूर्वीच्या, प्रांताभिमानाचें स्वरूप आहे, पण खरें पाहतां हा नवा अभिमान राष्ट्रीय स्वरूपाचा आहे. प्रांताभिमानाच्या कवचांतच प्राथमिक व बाल्यावस्थेंतील हा राष्ट्राभिमान उदयास येऊं लागला आहे. जुन्या व आजच्या धार्मिक अभिनिवेशांत जो मूलभूत फरक वर आपण पाहिला तोच या प्रांतिक अभिनिवेशाच्या बाबतींत लक्षांत घेतला पाहिजे. महाराष्ट्रामध्यें हा नवा प्रांतिक, वस्तुतः राष्ट्रीय, अभिमान वाढीला लागण्यास कांहीं विशेष कारणें होतीं तीं अशीं: ( १ ) जुन्या प्रांताभिमानाच्या बाबतींतच बंगालप्रमाणें महाराष्ट्र हा इतर प्रदेशांपेक्षां जास्त पुढें गेलेला होता व त्याला जुन्या मध्ययुगीन मराठी इतिहासाची एक पूर्वपीठिका लाभलेली होती, ( २ ) मुंबई प्रांतांतील भिन्न लोकसमूहांपैकीं कानडी लोकांवर वरचष्मा गाजविण्याची संधि मराठी लोकांना मिळत असली तरी एकंदरींत त्याला कुचंबावें लागत होतें आणि महाराष्ट्रांतील साधनसंपत्ति, श्रम आणि बुद्धिकौशल्य यांचा उपयोग मारवाडी, गुजराथी, पारशी वगैरे "परक्या" जातींनीं केलेला पाहण्याचें मराठी समाजाच्या नशीबीं आलेलें होतें; ( ३ ) कॉंग्रेसच्या राजकीय नेतृत्वामध्यें, भारतीय व प्रांतिक क्षेत्रांतहि, मराठ्यांना कांहीं स्थान उरलें नव्हतें.

वरील कारणें लक्षांत घेतलीं म्हणजे सन १९३७ नंतरच्या महाराष्ट्रीय विचारक्षेत्रांत प्रांतिक अभिमानाची झपाट्यानें वाढ होत गेली याचें मूळ उमगून येईल. या अभिमानाला नागपूरच्या खरे–प्रकरणामुळे व इतर कारणांमुळे

वेगवेगळीं रूपें आलीं. गुजराथी समाजाचा द्वेष, काँग्रेसशीं वैर, मराठी–हिंदी वादांत उत्पन्न झालेला कडवटपणा हीं त्या अभिमानाचीं वाईट रूपें आहेत व या वादांमुळें महाराष्ट्रीय राष्ट्रवादाला कोणचीच इष्ट दिशा मिळाली नाहीं, हें खरें; परंतु प्रांताभिमानाची प्रवृत्ति ही मूलभूत स्वरूपाची, इष्ट व राष्ट्रीयत्वाच्या खऱ्या लोकशाहीप्रधान ध्येयाकडे नेणारी होती, हें नाकारतां येणार नाहीं. याच काळांत "महाराष्ट्राचें केंद्र कोणचें?" अशासारखें वाद निर्माण झाले. सन १९३६ मध्यें महाराष्ट्रीय 'प्रांतिक' अभिमानाला राष्ट्रीय स्वरूप कसें येत चाललें होतें हें दाखविणारी एक घटना पाहूं. एप्रिल २४-२५, ( १९३६ ) रोजीं नागपूर येथें भारतीय साहित्य परिषद भरली. त्या परिषदेच्या निर्णयांवर टीका करतांना समाजवादी पुढारी श्री. पु. य. देशपांडे यांनीं असें प्रतिपादन केलें कीं, हिंदी भाषेला 'राष्ट्रभाषा' म्हणून सर्व भारतीयांच्या डोक्यावर लादणें योग्य नाहीं. इंग्रजी भाषेच्या जागीं हिंदीची स्थापना करण्यांत ब्रिटिशांचें आंधळें अनुकरण राष्ट्रभाषावाद्यांकडून होत आहे. "हिंदुस्थान हा भूविभाग देश अथवा राष्ट्र नसून अनेक राष्ट्रें असलेलें खंड आहे. या खंडांतील प्रत्येक राष्ट्राची भाषा व संस्कृति समाजशास्त्रदृष्ट्या भिन्न आहेत. युरोपांतील सर्व राष्ट्रांची एक भाषा झाली पाहिजे हें म्हणणें जसें हास्यास्पद आहे तसेंच हिंदुस्थानची एक भाषा झाली पाहिजे. असें म्हणणें हास्यास्पद आहे." ( "प्रतिभा," मे १, १९३६, पान १८ ). श्री. देशपांडे यांच्या वरील भूमिकेंत बहुराष्ट्रवादाची मांडणी अगदी स्पष्ट आहे व इतिहासाचार्य राजवाडे यांच्या जुन्या उद्गारांचीच ती आवृत्ति आहे. परंतु श्री. देशपांडे यांना बहुराष्ट्र भारताचा झालेला हा 'साक्षात्कार' भाषिक प्रश्नापुरताच मर्यादित राहिला. त्यांनीं किंवा इतर समाजवाद्यांनीं आणि कम्युनिस्टांनीं बहुराष्ट्रीयत्वाचा व्यापक दृष्टीनें पुरस्कार त्यावेळीं केला नाहीं. सन १९४३ मध्यें कम्युनिस्टांनीं बहुराष्ट्रीयत्वाची कल्पना जनतेपुढें मांडली, परंतु तोंपर्यंत त्यांनाहि एकराष्ट्रीयत्वच मान्य होतें. सारांश श्री. देशपांडे यांच्या वरील उद्गाराला शास्त्रीय प्रमेयाच्या मांडणीचें स्वरूप नसून ती एक तरंगती

धूमकेतूसारखी परंतु बरोबर कल्पना आहे. अशी कल्पना एखाद्याला आपोआप स्फुरावी यांतच त्यावेळच्या महाराष्ट्रीय समाजाच्या अंतरंगांत वाढत चाललेल्या 'प्रांतिक' (महाराष्ट्रीय) राष्ट्रवादाची साक्ष पटण्यासारखी आहे.

सन १९३५ पासून सन १९३९ पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांत या नव्या राष्ट्रवादाची वाढ होत गेली व तिला लवकरच प्रत्यक्ष मूर्त स्वरूप आलें. जानेवारी २८, १९३९ रोजीं "संयुक्त महाराष्ट्र सभा" स्थापन झाली. पुढें मे २४, १९४० रोजीं डॉ. केदार यांच्या अध्यक्षतेखालीं, पुणें येथें "संयुक्त महाराष्ट्र परिषद" भरली. परंतु महायुद्धाच्या काळांत लोकजीवनाच्या सर्वच प्रगतीवर दडपशाहीचा वरवंटा फिरत होता, त्यामुळें ही संयुक्तीकरणाची चळवळ तेथेंच थंडावली. वैयक्तिक दृष्टीनें श्री. माडखोलकर प्रभृती लोक या प्रश्नाचा विचार करीत होते, परंतु सामुदायिक रीतीनें चळवळ होण्याचा मार्गच खुंटला होता. सन १९४२ मध्यें श्री. माडखोलकरांनीं यासंबंधींचें एक पत्र गांधीजींना लिहिलें. या पत्राचें उत्तर देतांना आगामी लढयामुळें महाराष्ट्र-संयुक्तीकरणाच्या प्रश्नाला सध्यां गौण समजावें असें गांधीजींनीं सुचविलें. ऑगस्ट १९४२ च्या लढयापासून सन १९४५ पर्यंतचा काळ अंधाऱ्या रात्रीसारखाच गेला. परंतु दडपशाहीचें वजन कमी होतांच सन १९४६ च्या प्रारंभापासून "संयुक्त महाराष्ट्रा"च्या चळवळीनें पुन्हां उचल खाल्ली. यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, सन १९३५ नंतरच्या भारतीय राजकारणांत एक-राष्ट्रवाद व पाकिस्तानी द्विराष्ट्रवाद यांच्या संघर्षानें जरी व्यापक व स्फोटक असें रूप धारण केलेलें आहे तरी, वरपांगीं 'प्रांतिक' स्वरूपाच्या, परंतु मूलतः एकभाषी, एकजिनसी लोकसमूहांच्या राष्ट्रीय स्वयंनिर्णयासाठीं चाललेल्या चळवळी याच दहाबारा वर्षांच्या कालखंडात जोमानें वाढीला लागल्या आहेत. या चळवळींच्या आधारावर अखंड, प्रबळ व संयुक्त असें भारत निर्माण होण्याची शक्यता होती, परंतु क्रिप्स योजनेपासून माऊंटबॅटन योजनेपर्यंत घडलेल्या सर्व प्रकारांमुळें आज विभागलेल्या भारताचें चित्र आपल्यासमोर

आहे. ही परिस्थिति बदलून एक प्रबळ संयुक्त राज्य सर्व भारतीयांना निर्माण करतां येईल काय? हा प्रश्न पठाण, सिंधी, बंगाली, मराठी, कानडी इत्यादि सर्व लोकसमूहांना सोडवावयाचा आहे. हाच प्रश्न पुढील प्रकरणांत चर्चेला घेतला आहे.

★

# एकात्म महाराष्ट्र व संयुक्त भारत : ६ :

एकात्म एकराष्ट्र भारताचा किंवा हिंदुराष्ट्राचा केवळ एक अवयव व प्रांत असा दर्जा महाराष्ट्राला न देतां त्याला एक आधुनिक उदयोन्मुख राष्ट्र समजणें वस्तुस्थितीला धरून आहे. महाराष्ट्राच्या या राष्ट्रीयत्वावरच "संयुक्त महाराष्ट्रा"ची चळवळ उभारली पाहिजे. असा एकात्म **राष्ट्ररूप** महाराष्ट्र संयुक्त **बहुराष्ट्रीय** भारतीय राज्याचें एक घटक-राष्ट्र राहील व अशाच तऱ्हेनें भारतांतील सर्व घटक-राष्ट्रें आपखुषीनें या संयुक्त राज्यांत सामील झाल्यानें या राज्याला स्थिर, लोकसत्तात्मक व एकसूत्र स्वरूप येईल. गेल्या पांच प्रकरणांतील विवेचनावरून हा सर्वसाधारण निष्कर्ष निघतो.

वरील निष्कर्ष आज सर्वमान्य होण्यासारखा मात्र नाहीं. कॉंग्रेस व हिंदुसभा या दोन्ही राजकीय पक्षांना बहुराष्ट्रीय भारताचें तत्व "अराष्ट्रीय" वाटत आहे. कॉंग्रेसनें एकराष्ट्रीय भारताची भूमिका सन १९२८ मध्यें घेतली. सन १९४६ मधल्या निवडणुकीमध्यें व नंतरहि तीच भूमिका तिनें पुनःपुन्हा

आग्रहानें मांडलेली आढळते. ( उदाहरणार्थ, श्री. शंकरराव देव यांची "किर्लोस्कर"च्या फेब्रुवारी १९४६ च्या निवडणूक-अंकांतील मुलाखत पहा : ते म्हणतात, "हिंदुस्थानचें एकराष्ट्रीयत्वच कॉंग्रेस मानतें. द्विराष्ट्र किंवा अनेक राष्ट्रें या कल्पनाच मुळांत अराष्ट्रीय आहेत." ) हिंदुसभेलाहि अनेक-राष्ट्रीय भारताचें तत्व किती वावडें आहे तें त्याच अंकांतील श्री. ग. वि. केतकर यांच्या लेखावरून दिसून येईल. ते म्हणतात, "नेपाळ, ब्रम्हदेश, सिलोन यांना महासभा स्वयंनिर्णय देण्यास तयार आहे काय? या प्रश्नाचें उत्तर 'नाहीं' असेंच आहे.......ब्रम्हदेश, सिलोनच काय पण एडन आणि अंदमान हीं सुद्धां बृहत्तर भारताच्या अभिन्न राष्ट्रसीमाच होत." या मूलभूत तात्विक कारणाव्यतिरिक्त आजची, म्हणजे जून १९४७ मधील, प्रत्यक्ष परिस्थितिहि अशी आहे कीं बहुराष्ट्रीय भारताच्या तत्वाला फारच मोठा धक्का बसला आहे.

एकात्मक राष्ट्ररूप महाराष्ट्राचें व भारतीय संयुक्त राज्याचें चित्र आज स्वप्नासारखें ठरलें आहे. आज भारताचें दोन, किंवा खरें पाहतां अनेक, तुकडे करण्यांत आले आहेत. त्यामुळें चाळीस कोटी जनतेला स्वातंत्र्य व लोकसत्ता-त्मक सुखी जीवन लाभण्याचा संभव दुरावला आहे. उलट, जनतेची शक्ति नुसती विभागली गेली आहे एवढेच नव्हे तर तिला धार्मिक यादवीच्या दुष्ट मार्गानें वळविली गेली आहे.

या भीषण परिस्थितीमध्येंहि कांहीं जणांना असें समाधान वाटत आहे कीं फाळणी झाली हें वाईट झालें, पण "संयुक्त महाराष्ट्राचा" प्रश्न सुटण्याला आतां अनुकूल काळ आला आहे. हिंदुस्थान विभागांत भाषावार प्रांतरचना करण्यास फाळणीच्या प्रश्नाचा अडथळा उरलेला नाहीं, वगैरे! थोडा विचार केला तर या समाधानाला किंवा आशावादाला जागा नाहीं असें दिसेल. महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा प्रश्न खऱ्या लोकसत्ताक पद्धतीनें सुटण्यासाठीं महाराष्ट्रांतील, शेजारच्या हैद्राबादसारख्या संस्थानांतील व एकंदर भारतांतील जनतेचें सामर्थ्य एकवटलेलें पाहिजे व जनतेच्या शत्रूंचें सामर्थ्य खच्ची झालेलें

पाहिजे. फाळणीमुळें नेमकें त्याच्या उलट झालें आहे. खुद्द महाराष्ट्रांतील जनतेचें मन आज हताश किंवा गोंधळलेलें तरी आहे किंवा जातीय द्वेष-भावनांनीं बिथरूं लागण्याच्या स्थितींत तरी आहे.

फाळणीमुळें दुसरीहि एक प्रवृत्ति निर्माण झाली आहे. तिचें स्वरूप दाखविणारा पुढील उतारा पहा : " राष्ट्रीयत्वाची वाढ होणें अगर करणें याचाहि नाद आपण सोडला पाहिजे......राष्ट्रीयत्वामुळें राज्याची मागणी केली जाते. संघराज्याबद्दलच्या भावना वाढण्याऐवजीं संघांत समाविष्ट असलेल्या स्वतंत्र राष्ट्रांच्या भावना वाढणें घातुक आहे. जोंपर्यंत जगांत राष्ट्र व राज्य हें समव्याप्त होतें तोंपर्यंत हें ठीक होतें. आतां अनेक राष्ट्रें संघराज्यांत येऊं लागलीं आहेत......राष्ट्राला मान्यता दिली कीं राष्ट्रीय स्वयंनिर्णयालाहि मान्यता द्यावी लागते. राष्ट्रीय स्वयंनिर्णय याचा अर्थ शेवटीं स्वतंत्र सार्वभौम राज्यें असा होतो......तेव्हां यापुढें राष्ट्र हा शब्द आपण सोडून द्यावा. तो शब्द सुटला कीं त्याच्या मागच्या भावनाहि सुटतील व नव्या भावना जन्माला येतील.........राष्ट्राऐवजीं लोकराज्य हा शब्द चांगला नाहीं कां ? " ( श्री. देवगिरीकर यांच्या " अल्पसंख्याक " या ग्रंथांत पान १३०–१३१ ). या उताऱ्यांत राष्ट्र व स्वयंनिर्णय या तत्त्वावर घेतलेले आक्षेप जवळजवळ याच शब्दांत प्रा. पुणतांबेकर यांनीं घेतलेलें आहेत. ( " मराठा "च्या ऑगस्ट १९४६ च्या 'लोकमान्य' खास–अंकांतील लेख पहा). या लेखकांना राष्ट्रीयत्वाबद्दल आलेली उबग तळमळीची आहे. तिचा उगम कशांत आहे ? तर भारतीय समाजाला संयुक्त राज्य स्थापावयाचें असेल तर पाकिस्तानच्या खोट्या राष्ट्रवादाशीं व महाराष्ट्रादि प्रदेशांच्या खऱ्या राष्ट्रीयत्वाची वाट कशी लावावयाची हा प्रश्न त्यांना भेडसावीत आहे. नुसता जातीयतेचा प्रश्न असतां तर धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचें जुनें ध्येय या लेखकांनीं पुढें ठेवलें असतें. पण जातीय किंवा प्रांतिक आवरणाखालीं आजपर्यंत दडलेलें भारताचें बहुराष्ट्रीय स्वरूप त्यांना उमगलें आहे आणि बहुराष्ट्रीय संयुक्त राज्याची कल्पना त्यांना माहित नाहीं. सोव्हिएट यूनियन या बहुराष्ट्रीय संयुक्त राज्याचें

उदाहरण त्यांना " परकीय " व अव्यवहार्य वाटत आहे. सारांश, बहुराष्ट्रीय भारताचें राज्य बनविण्यासाठीं तोडगा म्हणून राष्ट्रीय भावनेचाच उच्छेद करावा असें ते म्हणत आहेत ! !

ही प्रवृति महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाच्या चळवळीला विरोधी आहे. म्हणून याबाबतींत जास्त बारकाईनें विचार केला पाहिजे. ही प्रवृत्ति ज्यांच्या मनांत आज उत्पन्न झाली आहे ते वस्तुतः राष्ट्रवादाच्या परंपरेंतच अनेक वर्षें वाढलेले राजकीय कार्यकर्ते व विद्वान आहेत. परंतु त्यांच्या राष्ट्रवादी विचाराला अजूनपर्यंत केवळ भावनात्मक बैठक होती; " राष्ट्र " ही सामाजिक संस्था समाजाच्या औद्योगिक विकासांतील एका अवस्थेंत उत्पन्न होणें अपरिहार्य आहे, हें त्यांना संपूर्णपणें पटलेलें नव्हतें. त्यामुळें स्वयं-निर्णयाच्या हक्काबद्दलहि त्यांना मनोमन आदर नव्हता. सन १९२० च्या आधींच्या सुशिक्षित विचारवंताचा तिरंगी व लवचिक राष्ट्रवाद आपण मागील प्रकरणांतून पाहिला आहेच. सन १९२८ मध्यें एकराष्ट्रवादाच्या पूर्णपणें आहारीं गेलेला हा वर्ग या कल्पनेशीहि पूर्णपणें समरस झाला नाहीं. सन १९३५ नंतर धार्मिक राष्ट्रवाद व 'प्रांतिक' पेहरावाचा राष्ट्रवादहि या सुशिक्षितांनीं नीट आत्मसात केला नाहीं. या एकंदर धरसोडीचें कारण एकच ! 'राष्ट्र' या सामाजिक संस्थेचें वस्तुनिष्ठ, समाजाच्या जीवनावर आधार-लेलें स्वरूप, त्यांना मान्य नव्हतें. सर्व इमारत भावनेवर रचलेली होती. याचें प्रत्यंतर श्री. देवगिरीकरांच्या उद्गारांत दिसतें. 'राष्ट्र' हा शब्द सोडला कीं भावना सुटतील, स्वयंनिर्णय देण्याची आपत्ति टळेल, छोटीं राज्यें निर्माण होण्याचा धोका नाहिसा होईल व एक अराष्ट्रीय संघराज्य निर्माण होईल, असा त्यांचा आशावाद आहे !

पण 'राष्ट्र' हा हवा तेव्हां धरतां व सोडतां येणारा 'शब्द' नसून ती एक सामाजिक संस्था आहे. साहजिकच राष्ट्रीयत्वाला सोडचिठ्ठी देण्याचा या लोकांचा संकल्प म्हणजे फाळणीमुळें आलेलें क्षणिक वैराग्य व वैताग आहे, असें म्हटलें पाहिजे.

## राष्ट्रवादाचें प्रगतिशील स्वरूप

'राष्ट्र' ह्या कल्पनेला वैतागलेल्या महाराष्ट्रीय विचारवंतांना अ-राष्ट्रीय अशीं संघराज्यें हवीं आहेत व तीं लोकराज्यें असलीं पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. लोकराज्यासंबंधींचा हा आग्रह प्रगतिशील आहे, परंतु या लोक-राज्याचा आधार कोणचा? या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. नाहीं तर हीं लोकराज्यें म्हणजे विश्वकुटुंबाच्या कल्पनेसारखीं मनोराज्येंच ठरतील!

लोकराज्यांचा आधारहि धार्मिक किंवा जातीय भावना असावी; किंबहुना प्राचीन भारतीय समाजामध्यें धार्मिक भावनेवर व धर्मप्रधान संस्कृतीवर उभारलेलीं ग्रामराज्यें व गणराज्यें नांदलेलीं आहेत, असें मानणारें कांहीं लोक आहेत. त्यांच्या मताशीं तूर्त आपल्याला कर्तव्य नाहीं. त्यांच्या मताला वास्तविक किती आधार आहे हा इतिहास-संशोधनाचा प्रश्न आहे. आजच्या राजकारणांत धार्मिक भावनेवर लोकराज्याची उभारणी करावी असें हिंदुराष्ट्रवादीहि म्हणत नाहींत. तेव्हां लोकराज्याला दुसरा कोणचा तरी आधार असला पाहिजे. आर्थिक समतेचें तत्त्व व समाजवाद यांची भारतीय राजकारणांत ओळख झाल्यापासून लोकराज्याबद्दल अशी कल्पना रूढ होऊं पहात आहे कीं लोकराज्य म्हणजे कामकरी-शेतकरी राज्य! कामकरी व शेतकरी यांच्यापुढें एकच प्रश्न असतो व तो म्हणजे भाकरीचा!! त्यांना धर्माप्रमाणें 'राष्ट्र' कल्पना या 'वायफळ वस्तूची' जरूरी नसते! राष्ट्रीयत्वाला पूर्ण काट मारून कामकरी-शेतकरी राज्य स्थापन करणें हेंच खरें आधुनिक अर्थव्यवस्थेला अनुरूप आहे व समाजवादाची शिकवण हीच आहे, असें आज कांहीं जणांना वाटत आहे. श्री. देवगिरीकर प्रभृति लोकांनाहि आज अ-राष्ट्रीय संघराज्याची कल्पना व्यवहार्य वाटत आहे ती या तथाकथित समाजवादी लोकराज्याच्या ध्येयामुळें!

समाजवाद्यांची संघराज्यासंबंधींची खरी कल्पना मात्र अगदीं वेगळी आहे. संघराज्य अ-राष्ट्रीय असावें हें समाजवादी सांगतात हें खरें. त्यांच्या तत्त्वानुसार स्थापन झालेलें सोव्हिएट युनियन हें एक अ-राष्ट्रीय संयुक्त राज्यच आहे. पण

संघराज्य अ-राष्ट्रीय असलें तरी त्याचें घटक कोणचे असावेत? सोव्हिएत युनियन या अ-राष्ट्रीय संघराज्याचे घटक कोणचे आहेत? मार्क्सवादी याबाबतींत काय भूमिका घेतात?

या सर्व प्रश्नांचें निःसंदिग्ध उत्तर असें कीं संघराज्याचे घटक स्वतंत्र, समान, सार्वभौम व परस्परांशीं सहकार्य करणारी राष्ट्रेंच असलीं पाहिजेत. पूर्वीपासून, म्हणजे गेल्या शंभर वर्षांपासून, मार्क्सवादी हीच भूमिका घेत आले आहेत. मार्क्सवाद्यांना जेथें क्रांति यशस्वी करतां आली तेथें, म्हणजे रशियांत, त्यांनीं अशा सार्वभौम राष्ट्रांचेंच युनियन बनविलें आहे. अशाच तऱ्हेनें युगोस्लाव्हियन संघराज्य बनविण्यांत आलें आहे. चीनमध्येंहि अनेक राष्ट्रें असून त्यांचेंहि असें संघराज्य बनवावें अशी चिनी कम्युनिस्टांची घोषणा आहे. चिनी लोकसत्ताकाचे जनक डॉ. सन-यत्-सेन यांनांहि मोंगोल, माओ इत्यादि विविध राष्ट्रांचें चीनमधील अस्तित्व ठाऊक होतें व त्यांच्या सार्वभौमत्वावर व स्वयंनिर्णयावर आधारलेलें संघराज्यच त्यांना हवें होतें. "थ्री प्रिन्सिपल्स" ह्या ग्रंथांत ते म्हणतात, "कोमिंटाग (चीनचा राष्ट्रीय पक्ष) च्या राष्ट्रवादांत दोन गोष्टींचा समावेश होतो, (१) चीनला राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळालें पाहिजे, व (२) चीनमधील विविध राष्ट्रांना समानतेचा दर्जा मिळाला पाहिजे." उलट चँग-कै-शेक यांच्यापुढें असें संघराज्याचें चित्र नसून त्यांना चीनचें एकात्म एकराष्ट्रीय राज्य हवें आहे.

मार्क्सवाद्यांना राष्ट्रवाद मान्य नसतो असा रूढ समज आहे. वस्तुस्थिति मात्र उलट आहे. साम्राज्यवादाच्या विरुद्ध परतंत्र वसाहतींतील राष्ट्रांच्या राष्ट्रवादाला खराखुरा पाठिंबा मार्क्सवाद्यांनीं दिला व गेल्या महायुद्धानंतर राष्ट्रीय स्वातंत्र्याचें, समानतेचें व स्वयंनिर्णयाचें तत्व त्यांनींच नेटानें पुरस्कारिलें, आणि गंमत अशी कीं स्वतःला राष्ट्रवादी म्हणविणाऱ्या युरोपियन मुत्सद्यांनीं स्वयंनिर्णयाच्या या तत्वाला धाब्यावर बसविलें! या मुत्सद्यांमध्यें मार्क्सवादी नसलेल्या समाजवादी लोकांचाहि समावेश होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

राष्ट्रवादाचा पुरस्कार मार्क्सवाद्यांनीं करावा, उलट परंपरागत राष्ट्रवाद्यांनीं

स्वयंनिर्णयाला हरताळ फांसावा, असें विरोधगर्भ दृश्य पाहून मन गोंधळून जाणें स्वाभाविक आहे. राष्ट्रवादाविषयींचा विचार आपल्याकडे बाल्यावस्थेंत आणि खुरटलेल्या, कुंठलेल्या व धरसोडीच्या अवस्थेंत आहे. त्यामुळें तर हिंदी विचारवंतांची वरील विरोधगर्भ दृश्यामुळें चांगलीच दिशाभूल होण्याची खात्री आहे, म्हणून थोडी तात्त्विक चर्चा पुढें केली आहे.

राष्ट्रवादाच्या **दोन वेगवेगळया अवस्था** लक्षांत घेतल्या कीं, हा सर्व घोंटाळा दूर होईल. पहिली अवस्था युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स प्रभृति राष्ट्रांच्या जन्मापासून सन १९१८ पर्यंतच्या भांडवलदारी, आक्रमक, साम्राज्यवादी राष्ट्रवादाची; दुसरी अवस्था साम्राज्यवादाला विरोधी अशा परतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्यवादी राष्ट्रवादाची. या दुसऱ्या अवस्थेंतील राष्ट्रवादाला आयर्लंड, इटली, पोलंड, अमेरिका इत्यादि देशांत प्रारंभ झाला खरा, परंतु हा नवा राष्ट्रवाद लवकरच पूर्व युरोप, मध्यपूर्वेतील देश, आशियांतील देश, फिलिपाइन्ससारखे देश यांच्यांत पसरला. समाजवादाचा आद्य प्रणेता कार्लमार्क्स यानें आयर्लंड, हिंदुस्थान इत्यादि देशांच्या स्वातंत्र्यवादी राष्ट्रवादाविषयीं सन१८५३पासून केलेलें लिखाण वाचलें तर असें स्पष्ट होईल कीं मार्क्सवाद्यांची तेव्हांपासून आजपर्यंतची भूमिका या नव्या राष्ट्रवादाला पोषकच आहे; किंबहुना लेनिन व स्टॅलिन यांनीं तर असें स्पष्ट प्रतिपादन केलेलें आहे कीं ह्या नव्या राष्ट्रवादी चळवळींची जोड मिळाल्याशिवाय युरोपांतील किंवा जगांतील कामगार-वर्गीय आंतरराष्ट्रीय क्रांति यशस्वी होणें अशक्य आहे. ह्या राष्ट्रवादी चळवळीला एक सामाजिक, क्रांतिकारक व साम्राज्यवादाला विरोधी शक्ति मानणें हें मार्क्सवादाचें एक मूलभूत तत्व आहे.

मार्क्सवादी नसलेले समाजवादी मात्र या नव्या राष्ट्रवादाला विरोधी अशी भूमिका घेत आले आहेत. मॅक्डोनाल्डपासून आजच्या बेव्हिन प्रभृति समाजवाद्यांना नव्या राष्ट्रवादाऐवजीं साम्राज्यवादी जुना राष्ट्रवादच प्रिय आहे हें सांगणें नकोच. दुसरा एक आत्यंतिक मताचा, परंतु मार्क्सवादी नसलेला, समाजवादी पंथ साम्राज्यवादाला विरोधी असूनहि नव्या राष्ट्रवादाला न मानणारा आहे.

या पंथांतील लोकांच्या विचारसरणीचा नमुना म्हणून ट्रॉटस्कीचें उदाहरण घेतां येईल. ट्रॉटस्की व लेनिन यांच्यामध्यें राष्ट्रीयत्वाच्या या प्रश्नावर अनेकदां खडाजंगी उडाली. पोलंड इत्यादि देशांना क्रांतीनंतर राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क राहील, असें मत सन १९०३ पासून लेनिन मांडीत होता. उलट, ट्रॉटस्की वगैरे आत्यंतिक आंतरराष्ट्रीयवाद्यांचें मत होतें कीं कामगारवर्गीय क्रांतीला राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्वाचा अडथळा होईल. राष्ट्रीय भावना ही धर्मांप्रमाणें अफू आहे, असें त्यांना वाटे. कामगारवर्गीय क्रांतीला असें बालिश एकेरी स्वरूप देणाऱ्या ट्रॉटस्की प्रभृति बोल्शेव्हिक सहकाऱ्यांविरुद्ध चिडून सन १९१४ मध्यें लेनिननें असें उद्‌गार काढले आहेत कीं या गृहस्थांना मार्क्सवादाची राष्ट्रवादाविषयीं व इतर प्रश्नाविषयींचीहि भूमिका मुळांतच कळलेली नाहीं. मार्क्सवाद्यांची भूमिका राष्ट्रवादाला जर विरोधी नाहीं तर देशोदेशींचे कम्युनिस्ट पक्ष हे राष्ट्रद्रोही व सोव्हिएत युनियनसारख्या " परराष्ट्राचे पंचमदळी हस्तक " असतात, हा समज कां पसरूं शकतो ? याचें एक तात्विक उत्तर थोडक्यांत असें देतां येईल : आक्रमक राष्ट्रवादाला विरोध करतांना सर्व राष्ट्रांतील जनतेचें हितसंबंध एकच आहेत असें मार्क्सवादी मांडतात. हाच विरोध स्पष्ट करण्यासाठीं " कामगारांनीं या आक्रमक राष्ट्रवादापासून अलिप्त रहावें व जगांतील कामगार वर्गानें व जनतेनें एका बंधुभावानें संघटित व्हावें " असें ते प्रतिपादन करतात. आंतरराष्ट्रीय बंधुत्वाच्या या मार्क्सवादी घोषणेंत फक्त आक्रमक राष्ट्रवादाला कट्टर विरोध अभिप्रेत असतो, परंतु प्रगतिशील नव्या सहकारी राष्ट्रवादाला पूर्ण मान्यता असते. आक्रमक राष्ट्रवादाच्या आहारीं गेलेल्या वरिष्ठवर्गीय लोकांना वरील तारतम्य न उमगल्यामुळें वर सांगितलेला गैरसमज उत्पन्न होतो व यालाच कायम ठेवण्यांत व चेतविण्यांत साम्राज्यवादी मुत्सद्यांना व प्रचारकांना यश येते.

[ या मुद्याच्या स्पष्टीकरणासाठीं, लेनिनचीं " सिलेक्टेड वर्क्स, व्हा. १. ( १९४६ मॉस्को ) " पान ६०५ पहा. तसेंच, पानें ५६४ ते ६११वरील राष्ट्रवादासंबंधींचें विस्तृत विवेचन पहा. " सोव्हिएत कम्यूनिझम " या ग्रंथांत वेब यांनीं

या प्रश्नांची चांगली मांडणी केली आहे, ती पानें १०७-१२३ वर पहा. या विषयावर "मार्क्सिझम ॲन्ड नॅशनल क्वेश्चन" हा स्तालिनचा ग्रंथ महत्त्वाचा आहे. "सोव्हिएत राष्ट्रें व लोक" या माझ्या लहान मराठी पुस्तिकेंत या प्रश्नाचें संक्षिप्त विवेचन असून शेवटीं एक ग्रंथसूचि जोडलेली आहे ती पहावी. ]

राष्ट्रवादाच्या दोन अवस्था व त्यापैकीं दुसऱ्या राष्ट्रवादाचें प्रगतिशील स्वरूप जास्त ठळकपणें लक्षांत येण्यासाठीं जरा आणखी खोलांत जाणें जरूर आहे. पहिल्या आक्रमक अवस्थेंतील राष्ट्रें साम्राज्यवादी झालीं व निर्बळ लोक-समूहांच्या राक्षसी शोषणासाठीं व एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठीं त्यांनीं अनन्वित व अमानुष अत्याचार केले. याच्या बुडाशीं काय आहे? तर समाजाच्या भांडवलदारी अवस्थेंतील अनिर्बंध चढाओढीचें व "बळी तो कान पिळी"चें तत्त्व आहे. इंग्लंड, फ्रान्स इत्यादि राष्ट्रांनाहि स्वातंत्र्याचें व राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचें तत्त्व प्रिय होतें, पण तें स्वतः पुरतें! या स्वार्थी, व्यक्तिनिष्ठ 'राष्ट्र-कल्पने'तून बाहेर पडून मानवतेच्या जास्त विशाल सौख्याची व हिताची कल्पना या राष्ट्रांना अपरिचित होती. दोन राष्ट्रांमध्यें तात्पुरते तहनामे, सलोखे व सहकार्यहि होण्याची शक्यता जुन्या राष्ट्रवाद्यांना मान्य होती. तसें राष्ट्र-संघ वेळोवेळीं, ( उदा. नेपोलियनच्या विरोधी संघ ), युरोपमध्यें निर्माण झालेले दिसतात. पण हें सहकार्य मूलभूत स्वरूपाचें नसे. मध्ययुगीन काळांतील राजे ज्या चाणाक्य-नीतीनुसार शत्रुमित्र जोडीत तोच प्रकार या काळांत राष्ट्रांचे भांडवलदारी शासक करीत. परराष्ट्रीय राजकारण म्हणजे गुप्त करार, विश्वास-घात, हेरगिरी व शेवटीं महायुद्धें यांचा किळसवाणा प्रकार होता. राजनीति ही वेश्येप्रमाणें कुटिल व स्वार्थी असते असें मध्ययुगीन राजनीतीचें वर्णन आहे, तें आक्रमक राष्ट्रनीतीलाहि लागू पडणारें आहे.

नव्या अनाक्रमक राष्ट्रवाद्यांची भूमिका याच्या उलट आहे. **सहकार्य हें** पूर्वी आकस्मिक, तात्पुरतें व चढाईची पूर्वतयारी म्हणून करण्यांत येई. उलट, **सहकार्य ही नव्या राष्ट्रवाद्यांची मूलभूत व कायमची भूमिका आहे.**

आक्रमणाला, म्हणजेच साम्राज्यवादाला, बाद करण्यांत आलें आहे. साम्राज्य-वादी आक्रमक राष्ट्रवादाविरुद्ध लढणारी जनता नव्या सहकारी राष्ट्र-वादाच्या तत्त्वावर जगाची पुनर्घटना करूं शकेल असें मार्क्सवाद्यांचें मत आहे. याच भूमिकेला अनुसरून परवांच्या आशियावासी राष्ट्र-परिषदेंत सोव्हिएट राष्ट्रांनीं उत्साहानें भाग घेतला होता. परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळतांच " विश्वविजय करके दिखलाये " या भावनेला तेथील भांडवलदार व वरिष्ठ वर्ग बळी पडेल हा धोका आहेच. पण जुन्या आक्रमक राष्ट्रवादाकडे झुकण्याची ही हीन आसुरी प्रवृत्ति लोकसत्तावाद्यांनीं मोडून काढली पाहिजे व सहकार्याचें तत्त्व अमलांत आणलें पाहिजे, असें मार्क्सवाद्यांचें मत आहे. साम्राज्यवाद्यांची शक्ति आतां ढासळत असल्यानें नव्या सहकारी राष्ट्रवादाच्या भूमिकेवर राष्ट्रांची उभारणी करणें हें नवोदित राष्ट्रांना सोपें आहे. जुन्या साम्राज्यवादी राष्ट्रांतहि कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट व नव्या राष्ट्रवादाचें इतर पुरस्कर्ते प्रबळ होत गेल्यास तेथेंहि जुन्या आक्रमक भांडवलदारी वृत्तीच्या परंपरेचा शेवट होईल असें सुचिन्ह झेकोस्लाव्हा-किया वगैरे युरोपमधील कांहीं राष्ट्रांतून आजच दिसत आहे. अशा तऱ्हेनें युरोपां-तील व इतर जगांतील जनतेनें व राष्ट्रीय सरकारांनीं नव्या सहकारी राष्ट्र-वादाची भूमिका स्वीकारली कीं जागतिक राष्ट्र-कुटुंब निर्माण होईल. आजच्या " यूनो " मध्येंहि याच ध्येयानें सोव्हिएट राष्ट्रें व इतर कांहीं नवोदित राष्ट्रें आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहेत असें दिसून येईल.

चढाओढीच्या व 'बळी तो कान पिळी' या आसुरी तत्त्वाच्या पायावर जुना राष्ट्रवाद उभारलेला होता, त्याच तत्त्वावर त्यावेळची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पनाहि उभारलेली होती. किंबहुना आक्रमक राष्ट्रवाद व अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या बुडाशीं एकच समाजव्यवस्था आहे व तिचेंच नांव भांडवलदारी समाजरचना. आधींच्या सरंजामदारी व्यवस्थेंत राजापासून रंकापर्यंत प्रत्येकाला हक्कांबरोबर जबाबदाऱ्या व कांहींतरी " धर्म " पाळावा लागे. त्या सर्वांचा नाश करून नागडा, बेजबाबदार व व्यक्तिस्वार्थाच्या एकमेव प्रेरणेला शरण जाणारा आक्रमक व्यक्तिवाद उत्पन्न झाला. त्यानें जीं अनेक रूपें घेतलीं त्यापैकीं एकाचें

नीव आक्रमक राष्ट्रवाद. भांडवलदारीच्या आक्रमक वाढीच्या व उत्कर्षाच्या काळांत प्रत्येक व्यक्ति व राष्ट्र हें स्वतंत्र व सार्वभौम मानलें गेलें होतें. पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र दुर्बळ व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या पिळवणुकीवरच भरभराटीचा सर्व डोलारा रचला जात होता. त्यावेळच्या व्यक्तिस्वातंत्र्याचें हें भयानक स्वरूप पाहून कार्लाइल व टॉलस्टॉय प्रभृति तत्ववेत्ते या व्यक्तिस्वातंत्र्यावर व भांडवलदारी समाजांतील एकंदर ढोंगावर, अन्यायावर व अनीतीवर चिडून गेले. मार्क्सवाद्यांनाहि व्यक्तिस्वातंत्र्याची ही विटंबणा दिसत होती. त्यांनीहि भांडवलदारी व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेवर व व्यवहारावर कडक टीका केली. परंतु वैतागानें दुसऱ्या टोकाला जाऊन व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना मुळांतच वाईट आहे असें त्यांनीं म्हटलें नाहीं. उलट, नव्या सहकारी तत्वावर उभारलेल्या समाजव्यवस्थेंत व्यक्तिस्वातंत्र्याची अपेक्षा पुरी होऊं शकेल असें त्यांचें मत आहे. तीच गोष्ट राष्ट्रीयत्वाच्या बाबतींत खरी आहे. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या किंवा राष्ट्रीयत्वाच्या तत्वांची पायमल्ली होते किंवा कोणी त्यांची विटंबणा करतात म्हणून राष्ट्रेंच नकोत, तो शब्दहि नको, त्या भावनाहि नकोत अशी मार्क्सवाद्यांची दृष्टि नाहीं. उलट, नवीं संघराज्यें व भावि जागतिक राष्ट्र–संघ हा राष्ट्रीयत्वाच्या भक्कम भूमिकेवरच आधारला पाहिजेत, असा त्यांचा ठाम सिद्धांत आहे.

## शेतकरी वर्गाचा "एकात्म महाराष्ट्रा" ला पाठिंबा

'राष्ट्र' या शब्दावर, भावनेवर किंवा स्वयंनिर्णयाच्या मूलभूत हक्कावर वैतागून बहिष्कार टाकण्याऐवजीं राष्ट्रीयत्वावरच नवा एकात्म महाराष्ट्र निर्माण करणें आज जरूर आहे. असें नवें महाराष्ट्र, किंवा मराठ्यांचें राष्ट्र, निर्माण होत असतांनाच दुसऱ्या भारतीय लोकसमूहांतील राष्ट्रवादी लोकसत्तात्मक चळवळींशीं मराठ्यांचा संबंध जुळेल व सर्व जनतेचें शत्रू एकच असल्यानें संयुक्त लढ्यांतून बंधुभाव निर्माण होईल. त्या पायावरच आपखुषीनें व सहकार्यासाठीं हीं नवीं राष्ट्रें एक संयुक्त भारतीय राज्य बनवतील. हा सर्व पोकळ

आशावाद आहे काय ? या सर्व भावि रचनेचें स्वरूप मोहक दिसत असलें तरी हें घडविण्याची शक्ति कोणांत आहे ? 'राष्ट्र' म्हणजे काय हा मोठमोठ्यांना गोंधळांत टाकणारा प्रश्न फाळणीमुळें आणखीच विकट झाला नाहीं काय ? मग महाराष्ट्राला नवें राष्ट्र बनविण्याचें सामर्थ्य कोठून उत्पन्न व्हावयाचें ? त्यापेक्षां हिंदुस्थान विभागाला सध्यां एकात्म समजून चालावें, पाकिस्तानच्या आक्रमणापासून स्वसंरक्षण करावें, व स्वायत्त असे भाषावार प्रांत बनवावें, हें व्यवहार्य नाहीं काय ?

परंतु, राष्ट्रीयत्वाची कल्पना अशी डावलून टाकण्याइतकी कमजोर नाहीं. कारण प्रश्न कल्पनेचा नसून एका आवश्यक सामाजिक संघटनेचा व संस्थेचा आहे. प्राथमिक शिक्षणापासून औद्योगीकरण व परराष्ट्रीय धोरण या मोठ्या प्रश्नापर्यंत सर्व बाबतींत जनतेचें सहकार्य आज लोकसत्ताक सरकारला हवेंच. त्यासाठीं भाषिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवनाबद्दल जनतेमध्यें स्वत्वाची भावना हवी. ती उत्पन्न होण्यास एकजिनसी अशा लोकसमूहाचें जीवन एकात्म केलें पाहिजे. याचाच अर्थ त्यांना 'राष्ट्र' ह्या नव्या प्रगतिशील सामाजिक संघटनेत ओढलें पाहिजे व नव्या सहकारी राष्ट्रवादाचा आशय त्यांच्या मनांत व आचरांत उतरविला पाहिजे.

महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें तर आज येथील तीन कोटी मराठी जनतेपुढें **एकात्म महाराष्ट्र व संयुक्त बहुराष्ट्रीय भारत** यांचें चित्र ठेवलें पाहिजे. या ध्येयासाठीं पाकिस्तानी राष्ट्रीयत्व, हिंदुराष्ट्रीयत्व व एकराष्ट्रीय भारताची कल्पना या सर्वांना विरोध केला पाहिजे. संस्थानांतील मराठी प्रजेनें तात्पुरतें ध्येय म्हणून आज " जबाबदार राज्यपद्धतीचें " ठेवावें व नंतरहि स्वायत्ततेची भूमिका वाटल्यास घ्यावी, परंतु एकात्म महाराष्ट्रांत सामील होण्याचें राष्ट्रवादी ध्येयच शेवटीं त्यांनींहि आपल्यापुढें ठेवलें पाहिजे.

एकात्म महाराष्ट्रासाठीं सर्व मराठी जनतेची अशी जागृति करणें हेंच आज महत्त्वाचें कार्य आहे. या ठिकाणीं मुख्यतः शेतकरी वर्गाचा प्रश्न येतो.

राष्ट्रवादाच्या विकासाच्या बाबतींत शेतकरी वर्गाची भूमिका फारच महत्वाची आहे. राष्ट्रवादाच्या आक्रमक साम्राज्यवादी अवस्थेंतहि शेतकरी वर्ग हाच राष्ट्रांतील बहुसंख्य नागरिक होता व भांडवलदारांनीं जीं आक्रमणें व युद्धें केलीं तीं या वर्गाच्या जोरावरच. जर्मन नात्सींची किंवा जपानी मुत्सद्यांची व कारखानदारांची विश्वविजय करण्याची महत्वाकांक्षा अंशतः सफळ होऊं शकली, व ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका यानीं आपापलीं साम्राज्यें वाढविलीं, तीं आपापल्या राष्ट्रांतील शेतकऱ्यांच्या बळावर. जातीय राष्ट्रवादाला आजचें सामुदायिक कत्तलींचें व उठावाचें भीषण स्वरूप कां आलें? तर ह्या राष्ट्रवादाचें विषारी लोण बंगाली मुसलमान किसान व बिहारी हिंदू किसान यांच्यापर्यंत पोचलें म्हणूनच!

आक्रमक राष्ट्रवादाच्या दडपणामुळें भांडवलदारांच्या महत्वाकांक्षेला बळी पाडणारा हा शेतकरी वर्गच नव्या सहकारी राष्ट्रवादाच्या शिक्षणानें लोकसत्तेचा निर्माताहि बनतो. ह्या नव्या संजीवनीनें, म्हणजेच लोकसत्तेच्या व सहकारी राष्ट्रवादाच्या शिकवणानें, मराठी शेतकरी वर्गाला नव्या सामाजिक ध्येयांकडे वळणें शक्य होईल. ब्राह्मण व ब्राह्मणेतर या वादांतून अजून त्याला पूर्णपणें बाहेर पडावयाचें आहे. अस्पृश्यतेचा प्रश्न अजून सुटलेला नाहीं. महाराष्ट्रांतील मुसलमान समाज, गुजराथी समाज इत्यादि अल्पसंख्याकांचा प्रश्न आहे.; या प्रश्नांवर शेतकरी वर्गाची दिशाभूल करून त्याला अंतर्गत धार्मिक व जातीय यादवीला प्रवृत्त करणें व भारतीय राजकारणांतहि जनतेला यादवीच्या मार्गानें नेणें शक्य आहे. तसा प्रयत्न वरिष्ठ वर्गांकडून होत राहीलच. हा धोका टाळावयाचा तर नुसतें मानवताधर्माचें प्रवचन उपयोगी पडणार नाहीं. नुसता भाकरीचा प्रश्न शेतकऱ्यांपुढें ठेवण्याचा बालिश अवस्थेंतील "समाजवादी" कार्यक्रमहि तितकाच निरुपयोगी ठरेल. शेतकरी वर्गाच्या मनांत धार्मिक द्वेषभावना बळावणें किंवा त्यांच्यामध्यें आक्रमक राष्ट्रवादाचा प्रसार होणें टाळावयाचें असेल तर राष्ट्रवादाला डावलून जाण्यानें भागणार नाहीं. उलट एकात्म महाराष्ट्राची राष्ट्रीय भूमिका व संयुक्त

भारताचें ध्येय शेतकरी वर्गाला नीट स्पष्ट तपशीलवार समजावून दिलें पाहिजे. सन १९३५ नंतरचा मराठी व भारतीय शेतकरी वर्ग नुसती भाकरी मागत नसून संस्कृतीची व राजकीय जीवनाची, म्हणजेच सर्वांगीण राष्ट्रीयत्वाची, मागणी करीत आहे. ती पुरी करणें हें " संयुक्त महाराष्ट्र " परिषदेच्या राष्ट्रीय व सर्व पक्षीय चळवळीचें उद्दिष्ट असलें पाहिजे.

काँग्रेसकमिट्या, किसान सभा, प्राथमिक शिक्षकसंघ, मराठी साहित्य संस्था वगैरे विविध जनसंस्थांच्या मार्फत एकात्म महाराष्ट्राचा राष्ट्रीय संदेश शेतकऱ्यां-पर्यंत पोचला पाहिजे. या कार्यांत सुशिक्षित वर्गानें व शहरी कामगार वर्गानें शिक्षकाचें व प्रचारकाचें काम केलें पाहिजे. काँग्रेस, हिंदूसभा, समाज-वादी व कम्युनिस्ट पक्ष या संस्थांतील कार्यकर्त्यांना जी राष्ट्रवादाची प्रेरणा मिळाली आहे ती आयर्लंड, इटली, फिलिपाइन्स व सोव्हिएट युनियन येथील सहकारी प्रगतिशील राष्ट्रवादाकडून मिळाली आहे. तेव्हां या पक्षांनीं जर मनांत आणलें तर प्रगतिशील व लोकसत्ताक अशा नव्या राष्ट्रवादाचा प्रसार शेतकरी वर्गांत करणें सर्वांना शक्य आहे व हें प्रचंड कार्य सर्वांनीं संयुक्तपणें करणेंहि सोपें आहे.

या कार्यांत मोठी अडचण किंवा अवघड भाग म्हणजे गोवें, निजाम-राज्य व मराठी संस्थानिक यांच्या प्रदेशांतील मराठी शेतकऱ्यांत प्रचार करण्याचा. वऱ्हाडमध्येंहि निजामाच्या आक्रमणाचा प्रश्न उग्र होत जाईल. या प्रश्नांची ताबडतोब व एकदम निकाली सोडवणूक शक्य नाहीं हें खरें. एकात्म महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं शेतकरी वर्गाचें बळ निर्माण करण्याचें कार्य व निजामराज्याच्याविरुद्ध मराठवाड्याच्या स्वायत्ततेसाठीं व जबाबदार राज्यपद्धती-साठीं लढण्याचें कार्य यांच्यांतला संबंध उघड आहे. पहिल्या कार्याचाच एक भाग म्हणून दुसरें कार्य शक्य त्या गतीनें पार पाडावयाचें आहे. आतां हिंदुस्थान विभागाच्या सरकारच्या सत्तेखालील महाराष्ट्राचें एकीकरण सध्यां ताबडतोब साधून घ्यावयाचें व गोवें आणि मराठवाडा यांचा प्रश्न मग क्रमानें सोडवावयाचा, ही भूमिका आज संयुक्त महाराष्ट्र परिषदेंत घेतली जात आहे,

ती रास्तच आहे. क्रम स्वीकारला तरी मूळ भूमिका एकात्म महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाची कायम असली म्हणजे झालें.

## वऱ्हाडचा प्रश्न

याठिकाणीं, वऱ्हाडचा प्रश्न थोड्या तपशीलांत जाऊन पाहिला पाहिजे जुना इतिहास पाहिला तर असें दिसतें कीं बहमनी राजवट, नागपूरकर भोंसल्याची राजवट व त्यानंतर निजामाची राजवट अशा राजसत्ता तेथें नांदल्या असून, अगदीं अलीकडे राज्य ब्रिटिशाचें व मालकी निजामाची असा दोहातीं प्रकार तेथें चालू आहे. वऱ्हाडचे प्रतिनिधी मध्यप्रांताच्या कायदेमंडळात बसतात हें खरें; पण त्यांना "ब्रिटिश खालसा मुलखांतील जनतेचे प्रतिनिधी" मानण्यांत येत नाहीं. वऱ्हाडचा कारभार "मध्यप्रांतांतील कारभाराबरोबर संभाळला जाईल, पण मध्यप्रांताचा एक भाग म्हणून नव्हे.... ... ... प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळांत पास झालेले कायदे 'परराष्ट्रीय मुलुखासंबंधीं कायदा' ( फॉरिन ज्यूरिस्डिक्शन ॲक्ट ) या कायद्यानुसार वऱ्हाडमध्यें लागू केले जातील," असें सन १९३५ च्या फेडरल घटनेंत म्हटलेलें आहे. ( इंग्रजी अहवाल, भाग १, पार्ट १, पानें ३५-३६ पहा. तसेंच, पानें ५६ व ७३ वरील वऱ्हाडसंबंधींचें स्पष्टीकरण पहा. ) वऱ्हाडच्या लोकनियुक्त प्रतिनिधींचा हा दर्जा लक्षांत ठेवला म्हणजे परवांच्या घटनासमितींत त्यांनीं भाग घेतला या गोष्टीलाहि फारसें महत्व नाहीं हें उघड होतें.

मालकी हक्क निजामचा आहे ही गोष्ट अगदीं स्पष्ट असल्यामुळें वऱ्हाडसंबंधीं भूमिका घेतांना कॉंग्रेसला फार अडचणींत पडल्यासारखें झालें आहे. जुने कॉंग्रेस पुढारी यासंबंधानें अशी भूमिका घेत असावेत कीं मालकी निजामाची असली तरी त्यानें आतां वऱ्हाडचा कबजा घेण्याचा प्रयत्न करूं नये व वऱ्हाडी जनतेच्या इच्छेला मान देऊन गप्प बसावें. हीच भूमिका सर्वांनीं घेतली असेल असेंहि नाहीं. उदाहरणार्थ, एका वेळीं कॉंग्रेस अध्यक्ष असलेले हकीम अजमलखान यांनीं अशी भूमिका घेतलेली आढळते कीं, वऱ्हाडी जन-

तेच्या कौलाचा यांत प्रश्नच येत नसून, वऱ्हाड घेण्यांत इंग्रजांनीं जी दडपशाही केली आहे त्या अन्यायाचें परिमार्जन झालें पाहिजे व वऱ्हाड निजामाला मिळाला पाहिजे. राजेरजवाड्यांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध झगडणें हेंहि कॉंग्रेसचें कर्तव्यच आहे असा त्यावेळच्या पुढाऱ्यांचा दृष्टिकोण होता, त्यामुळें हकीमसाहेबांचें हें मत आज विपरीत वाटलें तरी त्या काळांतील कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या मनोवृत्तीशीं सुसंगतच मानावें लागेल. ( श्री. अभ्यंकर, 'प्रॉब्लेम ऑफ स्टेटस्' पा. २१६ पहा. )

अलीकडच्या अगदी ताज्या घटनांवरूनहि असें दिसतें कीं मालकी हक्काच्या प्रश्नांवर कॉंग्रेसच्या कांहीं पुढाऱ्यांची भूमिका हकीमसाहेबांच्या भूमिकेसारखीच आहे. उदाहरणार्थ, काश्मीरी जनतेच्या इच्छेला मान देऊन काश्मीरच्या नरेशांनीं राज्यत्याग करण्याची जरूरी नाहीं असें सांगतांना सध्यांचे कॉंग्रेसचे अध्यक्ष कृपलानी म्हणाले कीं काश्मीरचे नरेश काश्मीर कां सोडतील ? "पन्नास लक्ष रुपये देऊन त्यांनीं काश्मीर खरेदी केलें आहे." अशी भूमिका काश्मीरसंबंधीं घेतली कीं वऱ्हाडसंबंधीं तोच न्याय लागूं होणारच ! इंग्रजांनीं याबाबतींत आणखी एक पवित्रा टाकून ठेवलेला आहेच. 'काश्मीरमधील गिलगित हा प्रांतहि इंग्रजांनीं भाडेपट्टयानें घेतला होता. येथूनच सोव्हिएट ताजि-किस्तान या राष्ट्राची सरहद्द सुरू होते, तेव्हां गिलगितच्या लष्करी ठाण्याचें महत्त्व इंग्रजांना किती वाटत असलें पाहिजे, हें सांगावयास नकोच. असें महत्त्वाचें व मोक्याचें ठिकाण इंग्रजांनीं मोठ्या उदारपणानें आज परत केलें आहे ! यांतलें इंगित काय ? याबाबतींत, "टाइम्स ऑफ इंडियानें" असा शेरा मारला आहे कीं गिलगित परत जाण्यानें वऱ्हाडसंबंधींच्या धोरणाला एक पायंडा पडल्यासारखा झाला आहे. सारांश, राजांच्या मालकीहक्कासंबंधीं आज कॉंग्रेसच्या कांहीं प्रमुख पुढाऱ्यांचें धोरण पाहिलें व इंग्रजांचे आणि निजामाचे डावपेंच पाहिले म्हणजे वऱ्हाडला परत मोंगलाईंत जावें लागण्याचा संभव दिसूं लागतो. प्रत्यक्ष निकराचा क्षण आजच न येतां दोनचार वर्षेंहि

हा प्रश्न घोळत राहील, परंतु त्यामुळें वरील चिंताजनक परिस्थिति बदलते असें नाहीं.

या भीषण संकटाविरुद्ध महाराष्ट्रीय काँग्रेस पुढारीमात्र स्पष्ट व कणखर भूमिका घेत आहेत व हिंदुसभावादी पुढारीहि लढाऊ धोरण स्वीकारीत आहेत. त्यामुळें श्री. देव, श्री. वियानी, श्री. खापर्डे व श्री. वि. घ देशपांडे प्रभृति भिन्नपक्षीय पुढाऱ्यांकडून वऱ्हाडला स्वतंत्र ठेवण्यासाठीं लढा पुकारण्याच्या घोषणा होत आहेत. वऱ्हाड हा संयुक्त महाराष्ट्राचा प्राण आहे अशी ग्वाही दिली जात आहे. परंतु, या संकटाविरुद्ध करावयाच्या संघटनेची व लढ्याची मदार कशावर आहे ? याचा विचार करणें जरूर आहे.

वऱ्हाडवरील संकटाविरुद्ध लढण्याची खरी जबाबदारी व हवें तें बळ वऱ्हाडच्या शेतकऱ्यांमध्यें आहे. तें सुप्त आहे, पण ताबडतोब जागृत होण्यासारखें आहे. त्यासाठीं या प्रश्नाचा जो कायदेशीर कीस काढला जात आहे तो प्रथम थांबवून नीट निःसंदिग्धपणें जाहीर केलें पाहिजे कीं वऱ्हाडवरील मालकीहक्क निजामचाच असूनहि आज वऱ्हाडची जनता निजामराज्यांत सामील होण्यास तयार नाहीं. ही साधी व जनतेच्या सार्वभौमत्वावर आधारलेली घोषणा शेतकऱ्याला किती सहज पटूं शकेल ?

वऱ्हाडच्या शेतकऱ्यांच्या सामर्थ्यावर व संघटनेवर एकदां भर दिला कीं सहजच मराठवाड्याचा शेतकरी व इतर महाराष्ट्राचा शेतकरी जागृत होऊन वऱ्हाडच्या प्रश्नावर विचार करूं लागेल व वेळ येतांच लढ्याला उभा राहील. वऱ्हाडच्या भूमीवर आक्रमण करणाऱ्या निजामाला लक्षावधि मराठी शेतकऱ्यांच्या सामर्थ्याशीं टक्कर द्यावी लागेल व खुद्द त्याच्या राज्यांतच, मराठवाड्यांत, आग उठेल. थोडक्यांत म्हणजे या आक्रमकाभोंवतींच जनतेच्या सामर्थ्यवान् लढ्याचा वेढा पडेल व त्याच्यावर डाव उलटेल.

वऱ्हाड व मराठवाडा येथील कांहीं लोक आज स्वतंत्र व स्वायत्त वऱ्हाडची

व मराठवाड्याची मागणी करीत आहेत. या दोन प्रदेशांतील जनतेचा कौल घेऊन तिनेंच संयुक्त महाराष्ट्रांत यावयाचें नाकारल्यास या प्रदेशांची स्वायत्तता मान्य केलीच पाहिजे, हें खरें. याबाबतींत श्री. देव व श्री. पोतदार यांनीं जळगांवच्या परिषदेंत घेतलेली भूमिका अशा स्वायत्ततेला विरोधी आहे व तरी तिला "लोकसत्तेच्या दृष्टीनें" रास्त भूमिका असें मीं मागें म्हटलें आहे. ( प्रकरण २, पान ३० पहा ). यांत विसंगति नाहीं काय? आहेच. परंतु, जळगांवची श्री. देव यांची भूमिका योग्य आहे असें म्हणतांना वऱ्हाडमधील कांहीं संधिसाधू व लवलिक पुढाऱ्यांच्या "बंडाची" पार्श्वभूमि माझ्या डोळ्यांपुढें होती; उलट, स्वायत्ततेला अनुकूल अशी भूमिका घेतांना जनतेच्या सार्वत्रिक आकांक्षेची व कौलाची बाब मी विचारांत घेत आहे. यावरून स्पष्ट होईल कीं वऱ्हाड, मराठवाडा इत्यादि विभागांचा अंतर्भाव करणारा एकात्म महाराष्ट्र निर्माण करताना सर्वसाधारण जनतेचा कौल व सामर्थ्य हाच आपण मूलभूत आधार घेतला पाहिजे. असा एकात्म महाराष्ट्र निर्माण होण्यापूर्वीं स्वायत्त विभागांचा संयुक्त ( अनेकात्म ) महाराष्ट्र कांहीं काळपर्यंत राहील, निदान तसें होण्याचा संभव आहे, हेंहि आपण विसरून चालणार नाहीं.

याचाच अर्थ असा कीं, वऱ्हाडच्या संकटाविरुद्ध असो किंवा एकंदर महाराष्ट्रीय जीवनाच्या एकीकरणाचा प्रश्न असो, आपण केवळ शहरी लोकांच्या व पांढरपेशा व वरिष्ठ वर्गांच्या आकांक्षांपासून व राष्ट्र-कल्पनांपासून सुरुवात न करता शेतकरी वर्गाच्या जीवनापासून सुरुवात केली पाहिजे. त्यांच्यामध्यें आपल्या "काळ्या आईबद्दल" जी कमालीची निष्ठा व जाज्वल्य अभिमान असतो त्यालाच मातृभूमीच्या प्रेमाचें भव्य व व्यापक स्वरूप दिलें पाहिजे.

शेतकरी वर्गाच्या आधारावर महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा प्रश्न सोडविला म्हणजे गुजराथ, कर्नाटक वगैरे शेजारील राष्ट्रीय लोकसमूहांशी आपलें जे संबंध निर्माण होतील ते आपोआप बंधुत्वाचेच होतील. याचा पुरावा म्हणून एकदोन उदाहरणें देण्यासारखीं आहेत. प्रथम गुजराथचा प्रश्न घ्या. मुंबईतील सधन

गुजराथी वर्गाची मुंबईच्या "विभक्तीकरणाची" चळवळ व तिच्यामुळें सर्वच गुजराथी समाजाविरुद्ध मराठी जनतेंत उत्पन्न होणारा आंधळा रोष, ह्याची आपल्याला ओळख आहेच. परंतु शेतकरी वर्गाकडे पहा ! उंबरगांव-कडील वारली शेतकऱ्यांच्या लढ्यामुळें जागृत होऊन लगतच्या गुजराथी विभागांतील हाली जमातीचे शेतकरी सावकारशाहीविरुद्ध उठत आहेत. त्यांच्या या लढ्यांत त्यांना वारली समाजाची मदत होत आहे व या दोन भिन्नभाषी शेतकऱ्यांमध्यें अभेद्य असा बंधुभाव निर्माण होत आहे. उद्यां महाराष्ट्र व गुजराथ यांच्यामधील सरहद्द काढण्याचा प्रश्न येईल तेव्हां बंधु-भावानें वागावयास शिकलेल्या या दोन समाजाकडे सरहद्द ठरविण्याचें काम दिल्यास तें नीट, समंजसपणानें पार पडणार नाहीं काय ? तीच गोष्ट मराठी व कानडी शेतकऱ्यांमधील व मराठी व तेलगू शेतकऱ्यांमधील सहकार्याची. निजामराज्यांतील आठ जिल्ह्यांतील तेलगू शेतकरी, पांच जिल्ह्यांतील मराठे व तीन जिल्ह्यांतील कानडी शेतकरी एकतंत्री राजसत्तेविरुद्ध लढतांना बंधु-भावानें वागावयास शिकतीलच. या सहकार्यानंतर या तीन राष्ट्रांच्या सरहद्दी ठरविण्याचें कार्य किती सोपें होईल ? याच्याउलट, शेतकऱ्यांना वगळून चाललेलें राजकारण किती आक्रमक असूं शकतें, यांचीं अनेक उदाहरणें देतां येतील. दक्षिणी संस्थानांचा संघ बनवून त्यांत सोंडूरलाही सामील करून घेण्यांत आल्यानें महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यातील वादाला जें अनिष्ट व चिघळतें स्वरूप येऊं पहात आहे, तें अशा राजकारणांतूनच निर्माण होत आहे. शेजारी राष्ट्रांच्या भावि बंधुत्वाच्या दृष्टीनेंहि आज शेतकरी वर्गाकडे सं. म. परिषदेनें वळणें किती जरूर आहे, तें यावरून कळेल.

"संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या" आजपर्यंतच्या कार्यामुळें कॉंग्रेस, हिंदुसभा व इतर कांहीं संस्थांनीं परिषदेची एकीकरणाची घोषणा जनतेपुढें मांडली आहे. हा पुरस्कार मुख्यतः शहरी जनतेंत झाला आहे. मुंबईच्या कामगार वर्गामध्यें या घोषणेचा प्रचार करण्याचें कार्य तेंथील गिरणी कामगार युनियननें नुकतेंच सुरूं केलें आहे. महाराष्ट्रांतील शेतकरी वर्गाला ह्या चळवळीचें

महत्व पटविण्याच्या कार्याला सुरुवात म्हणून करंजी येथें मे ५, १९४६ रोजीं भरलेल्या प्रांतिक किसान सभेच्या अधिवेशनामध्यें यासंबंधींचा एक विस्तृत ठराव करण्यात आला आहे. अर्थात अजून पुष्कळच विस्तृत प्रमाणावर व महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून ह्या चळवळीचें लोण पोचवावयाचें आहे. या संघटनात्मक कार्याचें अधिष्ठान म्हणून एकात्म राष्ट्ररूप महाराष्ट्राचें ध्येय व संयुक्त बहुराष्ट्रीय भारतीय राज्याचें चित्र डोळ्यासमोर ठेवणें जरूर आहे, हें या सहा प्रकरणांतील विवेचनाच्या रूपानें मी मांडलें आहे. या एकंदर विवेचनाला पोषक असा एक प्रश्न पुढील प्रकरणात मी चर्चेला घेतला आहे. ब्रिटिशपूर्व महाराष्ट्रांतील मराठी स्वराज्यस्थापनेचें व मराठी साम्राज्यविस्ताराचें मराठी राष्ट्राच्या उदयाच्या दृष्टीनें काय महत्व आहे? शिवराज्यसंस्थापनेच्या घडामोडींच्यामागें मराठी राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान होतें काय? हे प्रश्न अशासाठीं घेतले आहेत कीं "संयुक्त महाराष्ट्राच्या" चळवळीला जी राष्ट्रीयत्वाची बैठक हवी असें मी प्रतिपादन केलें आहे, त्या राष्ट्रीयत्व चें आधुनिक स्वरूप अगदी स्पष्ट व्हावें.

★

# मराठ्यांचा इतिहास व राष्ट्रीयत्व : ७ :

सन १८८० पासून सन १९२० पर्यंत महाराष्ट्रीय सुशिक्षितांच्या राष्ट्रवादाचें स्वरूप कसें लवचिक, संमिश्र व तिरंगी होतें हें आपण चौथ्या प्रकरणांत पाहिलें आहे. इतर हिंदी प्रदेशांतहि राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेंत हाच गोंधळाचा प्रकार होता. ब्रिटिश भेदनीतीच्या डावपेचांना व हुलकावण्यांना तोंड देत सैरावैरा धांवण्याचें सर्वांच्या नशीबीं आलें होतें. मराठी सुशिक्षितांचें सुदैव मात्र असें होतें कीं मराठी राज्य व साम्राज्य यांच्या पूर्वपीठिकेमुळें त्यांना थोडा आधार मिळाल्यासारखा झाला होता. त्यामुळें मराठी इतिहास–संशोधन, कादंबरी, काव्य व राजकारण यांमध्यें मराठ्यांच्या राष्ट्रीयत्वाचे पडसाद सतत उठत राहिले. विशेषतः इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांत तर या राष्ट्रीय भावनेचा खूपच जोर होता.

मराठी समाजाचें जीवन सन १२०० पासूनच भाषिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्टींनीं एकजिनसी होत गेलेलें असल्यानें या मध्ययुगीन विकासाच्या

पूर्वतयारीमुळें आधुनिक काळांत उदयास आलेल्या मराठी राष्ट्रीयत्वास एक जुना चौथरा मिळाला आहे, हें उघड आहे. मराठ्यांच्या राज्यामुळें व साम्राज्यामुळें मराठी **लोकजीवनाच्या** एकजिनसीपणाबरोबरच **राजकीय** एकात्मतेची व राष्ट्रीयत्वाची भावना येण्यास आधुनिक काळांत मदत झाली आहे हेंहि स्पष्ट आहे. पण एवढ्यावरच थांबत नाहीं. यापुढें जाऊन एक असा सिद्धांत आधुनिक काळांत निर्माण झाला आहे कीं मराठी राष्ट्रीयत्वाचा जन्मच शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेमुळें झाला. हा सिद्धान्त इतिहासाचार्य राजवाडे, न्यायमूर्ती रानडे प्रभृति विद्वानांनीं मांडलेला असल्यामुळें त्याचा विचार करणें जरूर आहे. तो बिनचूक ठरल्यास राष्ट्रीयत्वाच्या आधुनिक जन्मविकासाबद्दल मी तिसऱ्या प्रकरणामध्यें केलेलें विवेचन लटकें पडतें. म्हणून या चर्चेला तात्विक महत्व आहे.

ब्रिटनविरोधी भारतीय लढयाला तोंड लागलें त्यावेळींच पाश्चिमात्य राष्ट्रकल्पनेशीं व ध्येयांशीं समरस झालेले अनेक महाराष्ट्रीय विद्वान ऐतिहासिक व सांस्कृतिक क्षेत्रांत संशोधन करून त्या संशोधनाची राजकीय लढयांत मदत कशी मिळेल या दिशेनें पाहूं लागले. राजकारणाविषयीं तटस्थ किंवा उदासीन राहून केवळ संशोधनासाठीं संशोधन करावें ही कल्पनाच त्यावेळीं नव्हती. उलट राजकीय आणि सामाजिक क्रांतीच्या प्रेरणेनें झालेलें संशोधन किती भरीव व प्रभावी असतें याची साक्ष देणारें कार्य राजवाडे, रानडे प्रभृति विद्वानांनीं केलें. त्यावेळच्या मराठी सुशिक्षितांनीं केलेल्या या सर्व संशोधन–कार्यांत ही राजकीय दृष्टि व राष्ट्रीय भावना उत्कटत्वानें दिसते.

राष्ट्रीयत्वाची कल्पना वस्तुतः आपण युरोपमधून घेतली, परंतु ही उसनवारी करणारा आपला मराठी सुशिक्षित वर्ग हवा तो आकार घेणाऱ्या निर्जीव मेणाप्रमाणें नव्हता तर उदयोन्मुख, जिवंत व सत्ताभिलाषी होता. त्यामुळें साहजिकच असें घडलें कीं ही राष्ट्रकल्पना आधुनिक महाराष्ट्राच्या आशा व आकांक्षा यांचा गाभा तर बनलीच, शिवाय महाराष्ट्रांतल्या इतिहाससंशोधकांनीं असेंहि

प्रतिपादन केलें कीं महाराष्ट्राच्या लोकांत राष्ट्रीय वृत्ती स्वयंभूपणें वसणारी आहे शिवकालीन व नंतरच्या मराठी इतिहासाचें मुख्य प्रेरक सूत्र राष्ट्रीयत्व हेंच आहे.

महाराष्ट्रांत व इतर भारतीय देशांत शिवकालापूर्वी देखील राष्ट्रीय भावना होती असें आपल्या लेखकांनीं मांडलेलें आढळत नाहीं. याचें एक कारण असें कीं आपल्या संशोधकांना महाराष्ट्राबद्दल व शिवकालीन उत्थापनाबद्दल एक विशेष आत्मीयता होती; दुसरें असें कीं जास्त प्राचीन काळांत 'स्वराज्य' व 'राष्ट्र' या शब्दांचें अस्तित्व होतें पण त्यांचा अर्थ वेगळा होता, हें त्यांना जाणवलें असावें. आपल्या पुढील चर्चेच्या दृष्टीनें या शब्दांच्या प्राचीन आशयाबद्दल येथेंच थोडें सांगणें मला जरूर वाटतें.

## 'राष्ट्र' व 'स्वराज्य' यांचे प्राचीन अर्थ

'राष्ट्र' शब्दाचे प्राचीन काळीं तीन अर्थ वेळोवेळीं लागलेले आढळतात. कांहीं वेळीं, 'राष्ट्र' हा शब्द विशिष्ट लोकसमूह या अर्थी वापरला जाई; दुसरा अर्थ प्रदेशवाचक होता, आणि तिसरा अर्थ राज्यवाचक होता. पहिल्या दोन अर्थांचीं उदाहरणें महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांतच मिळतात. रट्ट, भोज, गोप इत्यादि 'राष्ट्रें' महाराष्ट्रांत वसलीं म्हणून त्याला महाराष्ट्र असें नांव मिळालें, किंवा महार या आदिवासी लोकांच्यामुळें तें नांव मिळालें, अशीं वेगवेगळीं मतें आहेत. तसेंच, अपरांत, विदर्भ इत्यादि प्रदेश ज्यांत मोडतात तें 'महंत' म्हणजे मोठें राष्ट्र व म्हणून महाराष्ट्र असाहि एक तर्क आहे. सारांश, इ. स. पूर्व ५०० च्या सुमारास महाराष्ट्रांत वसलेल्या लोकांचीं लोकवाचक व देशवाचक अशीं अनेक राष्ट्रनामें होतीं व या सर्वांचें एकीकरण होऊन पुढें महाराष्ट्राला एक देश मानण्यांत येऊं लागलें हा ढोबळ तर्क खरा मानावयास हरकत नाहीं.

याठिकाणीं, लोकसमूहांवरून पडणाऱ्या राष्ट्र नामांविषयीं एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. हे 'राष्ट्रीय' लोकसमूह आजच्या राष्ट्रीय लोकसमूहांपेक्षा अगदीं वेगळे होते. 'राष्ट्र' शब्दाचा प्राचीन लोकवाचक अर्थ रूढ होता त्या

काळांतहि सुधारलेला व वर्गनिष्ठ समाज होता आणि त्या समाजांत राजसत्ता किंवा राजकुलसत्ता ( क्षत्रियगणसत्ता ) प्रस्थापित झालेली होती. मल्ल, रट्ट, भोज, चोल, लिच्छवी इत्यादि 'राष्ट्रें' म्हणजे या क्षत्रियगणांचीं किंवा कुलांचीं राज्यें होतीं. त्यावेळचीं कांहीं क्षत्रियकुलें, ( किंवा 'राष्ट्रें' ), गणसंघ करून रहात होतीं, त्यामुळें कांहीं वेळीं असा गैरसमज होतो कीं हीं 'राष्ट्रें' आजच्या व्यापक अर्थानें राष्ट्रीय व लोकसत्तात्मक लोकसमूह होते. परंतु, खरी स्थिति काय होती ते लिच्छवी गणसंघासंबंधींच्या पुढील उताऱ्यावरून दिसेल.

इ. स. पूर्व ६०० पासूनच लिच्छवींना क्षत्रिय म्हणून संबोधिलेलें आढळतें असें सांगून लेखक * म्हणतो "......उत्तर हिंदुस्थानांतील ज्या मोठमोठ्या क्षत्रिय लोकांच्या बरोबरीचें स्थान लिच्छवींना होतें, ते म्हणजे वायव्येचे मद्र, मध्यदेशांतील कुरुपांचाल व पूर्वेकडील मल्ल व इतर गण ( ट्राइब ) म्हणजे शस्त्रजीवि लोकांचें संघ ( कार्पोरेशन ) होते व राजे म्हणून ते नांदत होते, याचाच अर्थ असा कीं हे लोक जमीनीचे मालक होते व आपल्या कुळांच्या मेहनतीवर जगत होते." यावरून गणसंघांचीं राज्यें हीं राष्ट्रीय लोकसत्तात्मक राज्यें नसून मध्ययुगीन राजसत्ताकांसारखींच छोटीं राज्यें होतीं, असें दिसेल.

'राष्ट्र' हा शब्द प्राचीनकाळीं आणखी एका अर्थानें वापरला जाई. तो अर्थ असा कीं राजाच्या ताब्यांतील प्रदेशालाच राष्ट्र म्हणत. कांहीं वेळां सर्व राज्याला 'राष्ट्र' न म्हणतां मंडळ नांवाच्या राज्यविभागाला राष्ट्र म्हणत. अशीं 'राष्ट्रें' साधारण सध्यांच्या चार जिल्ह्यांएवढीं लहान असत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत राज्याचीं सात अंगें सांगितलीं आहेत, तीं अशीं : स्वामी, अमात्य, सुहृद, कोश, दुर्ग, बल व राष्ट्र. 'राष्ट्र' यालाच जनपद असेंहि नांव कांहीं ठिकाणीं आढळतें व त्याचा अर्थ राजधानीच्या भोंवतालचा राजाच्या वर्चस्वाखालील प्रदेश. राजाला मिळणारा कर 'राष्ट्र' व 'सीता' यांमधील शेतकऱ्यां-

* श्री. बी. सी. लॉ, " ट्राइब्ज् इन् एन्शन्ट इंडिया " पानें ३०१ ते ३०६.

-कडून मिळत असे व यापैकीं 'सीता' म्हणजे राजाच्या खासगी जमिनी व 'राष्ट्र' म्हणजे राज्यांतील इतर जमिनी, असा उल्लेख आढळतो.*

या तिसऱ्या अर्थावरून 'स्वराज्य' शब्दाचा प्राचीन अर्थहि लक्षांत घेण्यास सोपें पडेल. 'स्वराज्य' याचा प्राचीन अर्थ 'राष्ट्र' किंवा राजाच्या अंमलाखालील प्रदेश असाच होता. ज्ञानेश्वरीच्या पुढील ओव्यांतील 'स्वराज्य' शब्दाचा हाच अर्थ अभिप्रेत आहे :

ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखे
स्वराज्य येतां जवळिके
झळंवित आहे हरिखें
तीन्ही लोक ॥ अध्याय १८, ओवी १०७२ ॥

शिवकालांतहि 'स्वराज्य' व 'मोंगलाई' हे शब्द त्याच अर्थानें वापरले जात होते. 'स्वराज्य' म्हणजे मराठी बोलणारांचे राष्ट्र किंवा त्या प्रदेशावरील स्वतंत्र राज्य असा अर्थ नव्हता. उलट राजाचें राज्य एवढाच मर्यादित अर्थ त्या शब्दाला होता.

'राष्ट्र' व 'स्वराज्य' यांचा शिवकालाच्याहि पूर्वीचा आशय पाहिल्या-वर आपण शिवकालाकडे वळूं.

## शिवकालीन राष्ट्रीयत्वासंबंधीं कांहीं मतें.

शिवकालाविषयीं महाराष्ट्रीय विद्वानांचीं, व पर्यायानें सर्व मराठी समाजाची भावना, ढोबळमानानें अशी आहे कीं शिवाजीमहाराज हे **राष्ट्रपुरुष** व धर्म-संस्थापक होते. या भावनेंत दोन सिद्धांत सामावलेले आहेत :

( १ ) राष्ट्रीयत्वाची कल्पना आपल्याकडे युरोपांतून आलेली नसून ती

---

* श्री. यू. एन्. घोषाल, " हिस्टरी ऑफ हिंदू पोलिटिकल थिअरीज ", पानें ११ व ८०-८१ पहा.

आपल्याकडे आधींपासून होतीच; निदान इतर कोठें भारतांत नसली तरी शिवकालीन महाराष्ट्रांत तरी होतीच, आणि (२) मराठी लोकसमाजामध्यें जी व्यापक राष्ट्रीय भावना होती त्या भावनेचें एक रूप म्हणून त्यावेळची धर्मभावना होती.

न्यायमूर्ती रानडे यांनीं "मराठी सत्तेचा उदय" या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं,

"मी या पुस्तकामध्यें असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे कीं, (१) उगीच चार लोक गोळा झाले व त्यांना अकस्मात यशाचें घबाड सांपडलें अशी उपपत्ति मराठ्यांच्या सत्तेबद्दल देतां येणार नाहीं; उलट असेंच म्हणावें लागेल कीं एका **हिंदुराष्ट्रानें** स्वातंत्र्यप्राप्तीकरतां केलेला तो एक उत्कट प्रयत्न होता; इतकेंच नव्हे तर या **राष्ट्रानें** एक अभूतपूर्व असें कार्य पार पाडण्याचें ठरविलें; एका **सामान्य राष्ट्रभावनेनें** प्रेरित झालेल्या राज्यांचें एक मंडळ स्थापन करणें हें तें कार्य होय, आणि (२) समाजाच्या सर्व थरांच्या लोकांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनांत एक सर्वांगीण क्रांति घडून आली होती व त्यामुळें वरील ध्येय बरेंच पार पडूं शकलें." * (अधोरेखन माझें)

न्यायमूर्तींच्या एकंदर विवेचनांत शिवकालीन स्वराज्यस्थापनेला राष्ट्रीयत्वाचा पाया होता ही गोष्ट वारंवार प्रतिपादन केलेली आढळते. हैदर प्रभृतींच्या राज्यस्थापनेचा पाया वैयक्तिक महत्वाकांक्षा व कर्तबगारी होती, उलट मराठी सत्तेचा पाया राष्ट्रनिर्मितीमध्यें होता, मोठमोठ्या जहागिरी मिळविल्या तरी सरदारांचीं अंतःकरणें आपल्या वतनांत गुंतलेलीं असत कारण त्यांना मायभूमीचें प्रेम होतें, भागवत–धर्मानें राजापासून रंकापर्यंत व ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वांना एका नवीन राष्ट्रधर्माची दीक्षा दिली व सर्वांच्या शक्तीला एकसंध केलें. मोठमोठ्या चार अरिष्टांतून निभावून जाण्याइतका चिवटपणा

* "राइज ऑफ मराठा पॉवर", प्रस्तावना पान ४.

व धैर्य मराठी समाजानें दाखविलें कारण त्यांच्यात स्वामिनिष्ठेपेक्षां प्रखर अशी राष्ट्रनिष्ठा तेवत होती, वगैरे मुद्दे न्या. रानडे यांनीं मांडले आहेत.

न्यायमूर्ती रानडे यांनीं सन १९०० मध्यें मांडलेले हे विचार नंतरच्या पिढींतील संशोधकांनीं व विद्वानांनीं पुरस्कारिलेले आढळतात. श्री. चिं. वि. वैद्य यांचे पुढील उद्गार पहा. *

" राज्य बादशहाचें किंवा राजाचें ही कल्पना नष्ट करून राज्य लोकांचें ही कल्पना लोकांच्या अंतःकरणांत शिवाजी महाराजांस ठसवावयाची होती. त्याप्रमाणें राष्ट्र महाराष्ट्रीयाचें आहे असें तें लोकांच्या मनावर बिंबवीत. याच कल्पनेंत स्वधर्माची कल्पनाहि अन्तर्भूत होती; आणि रामदासांचा महाराष्ट्रधर्म हा शब्द याच अर्थानें भरलेला होता. स्वराज्य व स्वधर्म यांच्या जोडीनें महाराष्ट्रधर्म लोक मानूं लागले आणि महाराष्ट्रांत स्वधर्मयुक्त स्वराज्य असावें ही लालसा लोकांत वावरूं लागली." ( अधोरेखन माझें )

न्या. रानडे व भारताचार्य वैद्य यांच्या वरील मीमांसेवरून जुन्या पिढीच्या विद्वानांच्या राष्ट्रीयत्वासंबंधींच्या कल्पना कळून येतील. या कल्पनांचा एक पर्याय हा होता कीं त्यांना बहुराष्ट्र हिंदुस्थानाची कल्पना जवळची वाटली. उदाहरणार्थ, श्री. वैद्य म्हणतात कीं, " शिवाजी महाराजाची स्वराज्याची व्याप्ति महाराष्ट्रापुरती होती असें आमचें मत आहे. हल्लीं स्वराज्याची व्याप्ति प्रांतभेद उल्लंघून हिंदुस्थानास व्यापून आहे. तशी त्यावेळीं नसणें साहजिक आहे ", ( वरील ग्रंथ पान १२६ ). न्यायमूर्तींनाहि बहुराष्ट्र हिन्दुस्थानची कल्पना महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वामुळें स्वीकारावी लागली हें त्यांच्या पुढील उद्गारावरून दिसेल. ते म्हणतात, " लोकसंख्येची **वेगवेगळया राष्ट्रांत** विभागणी करून बनलेल्या संयुक्त भारताच्या पुढें कोणकोणते उत्कर्षाचे मार्ग मोकळे होतील, यासंबंधींचें भविष्य पाहण्याची दूरदृष्टि असणाऱ्या लोकांना

---

* श्री. द. वि. आपटे व श्री. स. म. दिवेकर यांचा 'शिवचरित्रप्रदीप', पानें १२५–१२६, " शिवाजी महाराजांची स्वराज्य कल्पना " हा लेख.

आजच्या परिस्थितींतहि महाराष्ट्राचा जो प्रभाव आहे, त्याचें महत्व वाटेल." ( अधोरेखन माझें )

शिवकालीन राष्ट्रीयत्वासंबंधीं न्या. रानडे यांच्याच मताचा विस्तार नंतरच्या बहुतेक विद्वानांनीं केलेला आहे व महाराष्ट्रामध्यें सर्वसामान्य जनतेंतहि आज तींच मतें अधिकृत अशीं मानलीं जात आहे. तरी एक गोष्ट दिसून येते कीं मराठी इतिहासांतील घडामोडींना राष्ट्रीयत्वाचा पाया नव्हता असें प्रतिपादनहि कांहीं अधिकारी संशोधकांनीं केलेलें आहे.

न्या. रानडे यांच्या विचारसरणीवर अभिप्राय देण्यासाठीं लिहलेल्या एका निबंधांत न्यायमूर्तींनीं मांडलेल्या राष्ट्रीयत्वाच्या वरील मुद्यावर श्री. आपटे यांनीं कांहीं मत प्रदर्शित केलेलें नाहीं. परंतु अष्टप्रधानपद्धति मोडणें, जातिमत्सर वाढविणें, पदें अनुवंशिक करणें, भाडोत्री सैन्य ठेवणें, भाऊबंदकी वाढणें ही मराठेशाहीच्या नाशाचीं कारणें होतीं असें न्यायमूर्तींचें मत होतें, त्याबद्दल आपला अभिप्राय देतांना मात्र श्री. दत्तोपंत आपटे यांनीं असें म्हटलें आहे कीं वरील सर्व कारणामुळें नाशाची नीट मीमांसा होत नाहीं. + 'मराठी रियासत' या ग्रंथाचें परीक्षण करतांना मराठेशाहीच्या नाशासंबंधींच्या रियासतकार सरदेसाई यांच्या विवेचनांत त्यांनीं असा दोष काढला आहे कीं, "मराठ्यांचें राज्य हें राष्ट्र होतें कीं साम्राज्य होतें याची कल्पना स्पष्ट न करतां रियासतकारांनीं वरेंच विवेचन केलें आहे. वस्तुतः सवाई माधवरावाचेंवेळीं मराठ्यांचें राज्य म्हणजे अनेक राज्यांचा संघ होता. शिंदे, होळकर, गायकवाड व पटवर्धन वगैरे सरदार नावानें पुण्याची गादी मानीत असले, तरी व्यवहारांतः स्वतंत्र होते. त्यांचीं स्वतंत्र अशी राज्येंच होतीं." (वरील ग्रंथ, पान १८२)

या स्वतंत्र सरदारांनीं निजाम, इंग्रज, टिपू किंवा दिल्लीचें बादशहा यांच्याशीं आपापले स्वतंत्र संबंध निर्माण केले, परंतु मराठ्यांचें आपसांतलें संबंध कोणते हें कधींच ठरविलें नाहीं. या मराठे-मंडळाची तशी एकजूट नव्हती

+ "दत्तोपंत आपटे लेखसंग्रह' पानें २३ व २१९.

असेंहि नाहीं. भोपाळ, उदगीर, पानिपत, राक्षसभुवन, तळेगांव, खर्डे वगैरे ठिकाणच्या युद्धांत चांगलीच एकी दिसून आली. रजपूत व मुसलमानी राजे व सरदार याच्यांत अशी एकजूट घडून येत नसे. उत्तरेकडील मुसलमान व रजपूत सरदार आपसांत झगडत राहिल्यामुळेंच मराठ्यांना त्यांच्यापैकीं कांहींना हाताशीं धरतां आलें. सैन्य उभारून उत्तरेकडील भांडत्या सरदारांकडून सैन्याचा खर्च घेतां आल्यामुळें मराठ्याचें राज्य दिवसेदिवस प्रबळ होत गेलें, व "असें होत होत अम्हास मोठेपणें मिळालीं. पातशाई घरांत येऊन श्रीमंतांचें राज्याची व आमचे सरदारांची वृद्धीच आजपर्यंत झाली." (वरील ग्रंथ, पान १८५)

शेवटचे उद्गार श्री. अहिल्याबाई होळकर यांनीं काढले आहेत व इंग्रजाविरुद्ध सर्व मराठे सरदारांची एकजूट कायम ठेवण्याबद्दल नाना व महादजी यांना या पत्रांत तिनें विनंति केली आहे. यावरून दिसतें कीं मराठे सरदारांचें एक मंडळ होतें, त्यांत समविचाराचें व एकाच दिशेनें पाहणारे लोक होते व महत्वाच्या प्रसंगी त्यांची एकजूटहि झाली. परंतु या मंडळाचें मुख्य व मूळ स्वरूप वेगवेगळया राज्यांचा संघ असेंच राहिलें. राष्ट्र असें स्वरूप त्याला कधीं आलें नाहीं. मुसलमानांचीं व रजपूतांचीं आपसांतलीं भांडणें होतीं. त्यांचा मराठ्यांना उपयोग करून घेतां आला व मराठे मंडळाचा दरारा वाढला खरा, परंतु हिंदुस्थानांत जवळजवळ सार्वभौम बनलेल्या मराठ्यांना एक राष्ट्र म्हणून इंग्रजांशीं टक्कर देतां आली नाहीं व साहजिकच हार खावी लागली.

श्री. दत्तोपंत आपटे यांनीं मराठे मंडळाच्या ऐक्याचें बहुराज्यात्मक स्वरूप सांगून त्यामध्यें राष्ट्रीय एकत्वाची भावना नव्हती हें खालील उताऱ्यांत आणखी स्पष्ट केलें आहे: ( वरील ग्रंथ, पान १६६ ),

"हें खरें आहे कीं, युरोपांत राष्ट्र ही जी कल्पना उत्क्रांत झाली व देशभक्तीची भावना फैलावली ती पेशवाईत वावरण्याच्या सरदारांना माहित नव्हती. त्यामुळें देशभक्तीनें अथवा **राष्ट्रबुद्धीनें प्राप्त होणारें ऐक्य मराठी राज्यास आलेलें नव्हतें**.... धर्माच्या नांवाखालीं मराठी राज्यावर चढाई

करण्याचें धोरण औरंगजेबाच्या मृत्यूबरोबर लयास गेलें. त्यानंतर पेशवाईच्या कालांत जो प्रश्न निरनिराळ्या राज्यकर्त्यांना सोडवावयाचा होता तो धार्मिक स्वरूपाचा नसून राजकीय महत्वाकांक्षेचा होता. वसईचा वेढा आणि छत्रसालास मदत या दोन प्रसंगीं धर्माच्या नांवानें मारलेल्या हांकेस मराठ्यांनीं ओ दिली परंतु हे दोन प्रसंग अपवादादाखल होते. इतर सर्व वेळीं त्यांच्या हालचाली राजकीय स्वरूपाच्या होत्या.

हें राजकीय स्वरूप, मागें सांगितल्याप्रमाणें, **राष्ट्रीय** कल्पनेमुळें प्राप्त झालें नसून, **राज्यविस्ताराच्या कल्पनेनें** आलेलें होतें. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांनीं एकमेकाशीं आपलेपणाच्या भावनेनें वागावें आणि मराठी राज्याची मर्यादा मराठी भाषा बोलणाऱ्या प्रांतांना व्यापणारी असावी ही **आजची राष्ट्रीय कल्पना** पेशवाईतल्या लोकांना स्पष्टपणें सुचलेली नव्हती. **त्यांना राज्याची कल्पना समजत होती** व राज्याचें साम्राज्य बनविणें आणि साम्राज्याचीं सूत्रें हातांत घेऊन आपलें बळ वाढविणें या दृष्टीनें मराठ्यांची खटपट सुरू होती." (अधोरेखन माझें)

श्री. दत्तोपंत आपटे यांच्यासारख्या अधिकारी इतिहाससंशोधकानें व राष्ट्रीय बाण्याच्या विद्वानानें शिवकालीन राष्ट्रीयत्वाबद्दल प्रगट केलेले विचार वर दिलें आहेतच. परंतु त्या कालांतील कांहीं गोष्टींबद्दल जास्त खोलांत शिरून विचार केल्याशिवाय सर्वसामान्य मराठी जनतेंत या विषयासंबंधीं पसरलेले गैरसमज दूर होणार नाहींत.

शिवकालांतील "महाराष्ट्र–धर्मा" ची कल्पना, जेधे–करीना नांवाच्या ऐतिहासिक लेखांतील 'म्हराष्ट राज्या' चा उल्लेख, "मराठा तितुका मेळवावा" हें रामदासांचें वचन इत्यादि गोष्टी आतां सर्वसामान्य लोकांना माहीत झाल्या आहेत व या कल्पना शिवकालीन राष्ट्रीयत्वाचें अस्तित्व दाखविणाऱ्या आहेत, असा सिद्धान्त रूढ झालेला आहे. यासाठीं 'महाराष्ट्र–धर्म' इत्यादि कल्पनांबद्दल जास्त विचार करणें आवश्यक आहे.

## महाराष्ट्र-धर्माचा आशय

महाराष्ट्र-धर्म हा शब्द उत्तरकालीन मराठेशाहींत ऐकूं येत नाहीं, आणि पूर्वीच्या कालखंडांतहि या शब्दाचा फारसा उच्चार राजकारणी पुरुषांनीं केल्याचें कागदोपत्रीं आढळून येत नाहीं. मराठेशाहीच्या शेंदोनशें वर्षांत जो प्रचंड पत्रव्यवहार व ग्रंथरचना झाली त्यामध्यें महाराष्ट्र-धर्म या शब्दाचे उल्लेख केवळ हाताच्या बोटांवर मोजण्याइतके अल्प आहेत. ही कल्पना मराठी लोकजीवनाला खरोखरच मार्गदर्शक झालेली असती तर असें कसें घडलें असतें ?

या शब्दाचा सर्वांत जुना उल्लेख गुरूचरित्रांत आहे+ तो असा :

विप्रकुल समस्त देख ।
संतोष करिती अतिकौतुक ।
राजा झाला विप्रसेवक ।
आतां वरत्रे राज्यासी ॥
ऐसा हा राव असता ।
महाराष्ट्र-धर्मीं वर्तता ।
आपुला द्वेष तत्वता ।
न करील जाणपां ॥

( ओव्या १३४ व १३५, अध्याय ५० )

'गुरूचरित्र' या ग्रंथाची रचना सन १५५८च्या सुमारास सरस्वति गंगाधर यांनीं केली व वरील ओव्यांत गौरविलेला विप्रसेवक राजा म्हणजे चरित्रनायक नृसिंहसरस्वति यांचें शिष्यत्व पत्करणारा बेदरचा अहमदशहा बहमनी असावा असा इतिहासतज्ञांचा अंदाज आहे. हा मुसलमान बादशहा " महाराष्ट्र-धर्मा "चें

+ श्री. कामत यांनीं अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या गुरुचरित्राच्या प्रतींत ह्या ओव्या नाहींत. मुळांत नसलेल्या ह्या ओव्या नंतर केव्हां घुसडल्या गेल्या हें कळेपर्यंत माझ्या या मुद्यांत कमकुवतपणा राहतो हें मला नमूद केलें पाहिजे.

पालन करीत होता याचा अर्थ काय करावयाचा ? एकंदर बहमनी राज्याचा त्यावेळचा विस्तार वगैरे पाहतां तें महाराष्ट्रापुरतेंच पसरलेलें होतें असेंहि नाहीं तेव्हां महाराष्ट्र-धर्म म्हणजे मराठी राज्याचा धर्म असाहि अर्थ निघूं शकत नाहीं. तेव्हां त्या शब्दाचा सरळ अर्थ असा लागतो कीं महाराष्ट्रांतल्या वरिष्ठ वर्णाच्या हिंदु लोकांना व साधुपुरुषांना जो धर्म सगळ्यांनीं आचरावा असें वाटत होतें तो महाराष्ट्र-धर्म. गुरुचरित्र ह्या ग्रंथांत वर्णाश्रमधर्म, अवतार-वाद, कर्मसिद्धांत वगैरे तर आहेच, शिवाय ब्राह्मणांचें विशेष महत्व व सर्व-श्रेष्ठत्व वर्णिलें आहे. विजयनगर-स्थापनेची प्रेरणा देणारे विद्यारण्यस्वामी हे आद्य शंकराचार्यांचे नववे शिष्य व नृसिंह सरस्वति हे त्यांचे सहावे शिष्य अशी सनातनधर्मीय गुरुशिष्य परंपरा आहे. त्यावरूनहि स्पष्ट दिसतें कीं 'महाराष्ट्र-धर्म' याचा अर्थ सनातन, वेदशास्त्रोक्त, वर्णाश्रमयुक्त धर्म असा आहे.

मग त्याला 'महाराष्ट्र' हें प्रादेशिक विशेषण कां लागलें ? प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं ख्रिश्चन, मुसलमान, यहुदी वगैरे धर्मांपेक्षां भिन्नत्वानें अस्तित्वांत असणारा असा एक सामान्यलक्षणयुक्त व्यापक हिंदुधर्म आज आपण ओळखूं लागलो आहोत. अशा एका व्यापक हिंदुधर्माची कल्पना पूर्वींहि मुळींच नव्हती असें नाहीं, पण ती जमेस धरूनहि असें म्हणावें लागतें कीं त्यावेळीं "हिंदुधर्म" अशी आजच्यासारखी सामान्य कल्पना रूढ नव्हती. उलट, वैदिकधर्म, भागवतधर्म, इत्यादि सांप्रदायिक परंपरा होत्या, तसेंच गौडदेशीयांचे, दाक्षिणात्यांचे, त्यांतच महाराष्ट्रीयांचे, असे विशिष्ट आचारधर्म प्रादेशिक नांवांनीं ओळखले जात होते. त्यांच्या जोडीला जातवार, म्हणजे ब्राह्मणांचा धर्म, क्षत्रियांचा धर्म असे 'धर्म' होतेच.

सारांश, महाराष्ट्रधर्म या कल्पनेंत आधुनिक अर्थानें देशाभिमानाची भावना नव्हती. तो वैदिक हिंदु धर्माचाच एक देशकालानुरूप प्रकार व प्रादेशिक पोटविभाग होता.

अशा या महाराष्ट्र-धर्मालाच अहमदशहाच्या राजवटींत बरेंच अभय मिळालें. त्यामुळें त्या राजाला "विप्रसेवक" असें गौरवून वर्णिलेलें आढळतें.

सन १५५० च्या सुमारास महाराष्ट्र-धर्माचा अर्थ असा हिंदुआचारधर्मनिष्ठ असला तरी पुढें शिवकाळांत या शब्दाला राष्ट्रीयत्वसूचक नवा अर्थ आला असें कांहींजणांचें प्रतिपादन आहे. श्री. चिं. वि. वैद्यांचे या अर्थाचे उद्गार मागें मी दिले आहेतच. त्यांच्यामतें महाराष्ट्र-धर्म हा जुनाच शब्द घेऊन रामदास-स्वामींनीं त्याला नवा अर्थ दिला.

या बाबतींत इतिहासाचार्य राजवाडे यांचें मत लक्षांत घेण्यासारखें आहे. ते म्हणतात :+

" उत्तर हिंदुस्थानांतून महारट्ट इत्यादि क्षत्रियकुलें महाराष्ट्रांत वसाहती-करितां आलीं व वसाहतींत राहिल्यावर धर्माचें जें स्वरूप महरट्टांमध्यें प्रचलित झालें त्या धर्मरूपाला ' महाराष्ट्र-धर्म ' असें नांव पडलें....

... ' महाराष्ट्र-धर्म ' या शब्दाचें दोन अर्थ आहेत. मराठा क्षत्रियांचा धर्म असा पहिला व पुरातन अर्थ; आणि महाराष्ट्रांतील सर्व आर्यांचा सामान्य धर्म हा दुसरा व अर्वाचीन अर्थ. शिवाजीला उद्देशून समर्थांनीं जें पत्र लिहलें त्यांत पहिला अर्थ अभिप्रेत आहे आणि दासबोधांत दोन्ही अर्थ विवक्षित आहेत. "

वरील उद्गारांवरून असें दिसतें कीं शिवकालीन ' महाराष्ट्र धर्म ' हा हिंदूंच्या वर्णाश्रमयुक्त सामाजिक धर्माचीच एक आवृत्ति होती असें श्री. राजवाडे यांचें मत होतें. शिवकालाच्या आधीं दोन शतकें, म्हणजे सन १४४८ मध्यें, लिहिल्या गेलेल्या ' माहिकावतीच्या बखरी 'ची प्रत प्रसिद्ध करून तिला प्रस्तावना लिहतांना त्यांनीं असाच निष्कर्ष काढलेला दिसतो. बखरीमध्यें उल्लेखिलेले केशवाचार्य समकालीन महाराष्ट्रीय जनतेला पुनरुज्जीवनाची हांक देत होते, परंतु या केशवाचार्यांचा हेतु " धार्मिक व सामाजिक होता, राजकीय नव्हता " *

+ लेखसंग्रह, भाग ३, पानें १८७-१८८.

* ' महिकावतीची बखर ', प्रस्तावना, पान २५.

असा श्री. राजवाडे यांनी स्पष्ट निष्कर्ष काढला आहे. सारांश 'महाराष्ट्र-धर्म' या शब्दाचा उल्लेख अगदी तुरळक असून त्याचा अर्थहि राष्ट्रसूचक नाहीं, उलट आर्यांच्या सनातन धार्मिक आचारांचाच निर्देश त्या शब्दानें पूर्वी झालेला आहे, असा वरील विवेचनावरून निष्कर्ष निघतो. मराठ्यांच्या राजकारणाला राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान होतें असें आग्रहानें प्रतिपादन करणारे श्री. राजवाडेदेखील त्या शद्बांतून राष्ट्रीयत्वाला पोषक असा अभिप्राय काढूं शकले नाहींत, यावरून तो निष्कर्ष जास्तच बळकट होतो.

मग शिवकाळांत व नंतर मराठ्यांच्या कर्तृत्वाला राष्ट्रीय भावनेची प्रेरणा होती असें दाखविणारा दुसरा एखादा पुरावा आहे काय ?

## "मऱ्हास्ट राज्या'ची कल्पना

शिवकालीन राज्यसंस्थापकांना राष्ट्रीयत्वाची अंधुक जाणीव होती असें सूचित करणारा एक जुना ऐतिहासिक उल्लेख जेधे-करीन्यांत आढळतो. अफझलखानाच्या वधाच्या वेळीं मावळच्या देशमुखांची एक सभा घेऊन तेथें कान्होजी जेधे यांनीं आपल्या वतनदार बंधूंना पुढील उपदेश केला असें करीन्यांत आहे :

"आम्ही राजश्री स्वामीच्या पायासी इमान धरून वतनास देखील पाणी सोडिलें. आम्ही व आपले लेक देखील राजश्री स्वामीपुढें खस्त होवे येसा आमचा दृढ विचार आहे. तुमचा मुदा काये तो बोलणें. मुसलमान बेइमान आहे. कार्य जालियावरी नस्ते निमित्त ठेऊन नाश करील. हे मऱ्हास्ट राज्य आहे. अवधियानी हिमत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेनें शेवा करावी" (शिवचरित्रप्रदीप, पान ४३).

हे कान्होजी जेधे शहाजीच्या विश्वासांतले एक मोठे वतनदार होते व शहाजीनेंच 'मऱ्हास्ट' राज्याच्या ह्या महत्वाकांक्षेचें बीज त्यांच्या मनांत रोविलें होतें. मावळप्रांतातील आपल्या जहागिरीच्या पायावर ठाण मांडून हळू-

हळूं राज्यविस्तार करतां येईल ही शहाजीची कल्पना होती. राज्यस्थापनेची पूर्वतयारी म्हणून दादोजी कोंडदेव, कान्होजी जेधे वगैरे पुढाऱ्यांना त्यानें मावळांत जमवून ठेवलें होतें. " मावळप्रांतीं तुम्ही वतनदार जबरदस्त आहांत राजश्री सिवाजीराजे पुणा आहेत त्यांकडे जमेतीनसी तुम्हांस पाठवितो. तेथें इमाने शेवा करावी. कालकलांतरी जिवावरी श्रम करून त्यापुढें खस्त व्हावें " असें सांगून, आणाशपथा करून, शहाजीनें या स्वराज्याच्या मसलतींत कान्होजीला घेतलें होतें.

जेधे प्रभृति वतनदारांनीं वतनाचा लोभहि बाजूला सारून ' मऱ्हास्ट राज्यासाठीं ' प्राण अर्पण करण्याची तयारी केली होती. या भावनेला राष्ट्रीयत्वाच्या अभिमान असें नांव देतां येईल काय ? भोसले घराण्याचा व जेधे देशमुखांचा घरोबा व " एकमेकाच्या वंशाला " अंतर न देण्याच्या आणाभाका लक्षांत घेतल्या व वरील उताऱ्यांत दिसणारी स्वामिनिष्ठेची भावना लक्षांत घेतली म्हणजे ' मऱ्हास्ट राज्य ' याचा अर्थ मराठी राजाचें राज्य एवढाच होतो, महाराष्ट्रांतल्या 'लोकांचें स्वराज्य' असा होत नाहीं. कान्होजीच्या स्वामिभक्तीच्या बुडाशीं आपल्या मायभूमींत परक्याचें राज्य नसावें, स्वकीयाचें असावें, ही स्पष्ट भूमिका आहे. तिला मराठी स्वत्वाची भावना म्हणतां येईल. पण बीजरूपानें कां असेना पण तो राष्ट्रीयत्वाचा अंधुक आविष्कार आहे असें म्हणतां येईल कां ?

तसें समजा मानलें तरी अशा एका उदाहरणावरून त्यावेळच्या सर्व घडामोडींचें स्वरूप ठरविणें मात्र योग्य नाहीं. वसईचा वेढा व छत्रसालाला बाजीरावानें केलेली मदत या उदाहरणांवरून मराठ्यांचें राजकारण धर्मसंरक्षणाच्या एकमेव कल्पनेनें चाललें होतें असें समजतां येत नाहीं, तोच न्याय येथेंहि लागतो.

वतनदारीवर पाणी सोडणारे व मराठी राज्याच्या कल्पनेसाठीं हवा तो त्याग व साहस करण्यास तयार असलेले कान्होजी म्हणजे एक ध्येयवादी, हिंमती व श्रेष्ठ पुरुष होतें, पण त्यांची ' मऱ्हास्ट राज्याची ' कल्पना मुळांत स्वामिभक्तीची होती व तिचें राष्ट्रीय भावनेंत रूपांतर झाल्याचें दिसत

नाहीं. खुद्द शिवाजीमहाराजांच्या हयातींत व नंतरहि 'मऱ्हास्ट' राज्याची कल्पना मराठी समाजानें किंवा वरिष्ठ वर्गानींहि अंगिकारलेली दिसत नाहीं. नुसत्या स्वामिनिष्ठेवर व गादीच्या अभिमानावर सर्व भर दिसतो. शिवाजीमहाराजांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाची व वडिलकीची तमा न धरतां त्यांच्या हयातींतच खुद्द संभाजीनें बंड केलें व उघडउघड मोंगलांना जाऊन मिळण्याचा आततायीपणा केला यावरून त्याकाळच्या राजकारणी पुरुषाची मनोवृत्ति दिसते. राज्यासाठीं सर्व धडपड असल्यामुळें मोंगलाची मनसबदारी पत्करण्यांतहि कांहीं गुन्हा नाहीं, असें संभाजीला वाटलें. शहाजी, शिवाजी किंवा पेशवेकालीन सरदार जहागिरी व राज्यें यांत फरक मानीत नव्हते. हिंदू व मुसलमान राजघराण्यांतील भाऊबंदकीच्या अनेक उदाहरणांवरून असें दिसून येईल कीं त्या काळाचा गुणच असा होता कीं 'राज्य' ही कल्पना सार्वभौम होती. कांहींवेळीं अत्यंत उदात्त भावनाचा ती परिपोष करूं शकत होती; उलट, कांहीं वेळीं, अत्यंत क्रूर भावनांच्या आहारीं चांगली माणसेंहि जावीत असा त्या काळांतील या राज्यलोभाचा महिमा होता.

राज्यासाठीं चाललेल्या त्या काळच्या मसलतींत व धडामोडींत धार्मिक व प्रांतिक भावनाचें सहाय्य केव्हां केव्हां होत असें. उदाहरणार्थ 'आपण सर्व दक्षिणी आहोत', 'आपण मराठे आहोत' अशी प्रादेशिक भावना तेव्हां होती व तिची राज्यस्थापनेच्या खटोटोपाला कांहीं वेळीं मदतहि होई. उदाहरणार्थ, मालोजीराजे घोरपडे यांना पाठविलेल्या पत्रांत शिवाजीनें म्हटलें आहे कीं आदिलशाहीच्या राज्यावर बहलोलखान पठाणानें कबजा केला आहे ही गोष्ट हिंदू व मुसलमान अशा सर्वच दक्षिणी सरदारांना व राजकारणी पुरुषांना घातुक आहे, कारण "पठाण बळावला म्हणजे एक उपरी एक कुली दक्षिणीयांचीं घरें बुडवील". * यावेळीं बहलोलखानाच्याविरुद्ध शिवाजीनें कुतुबशहाशीं तह केला. त्यांत कुतुबशहानेंहि अशी वृत्ति दाखविली कीं, पठाणाची पातशाही नेस्तनाबूद केली

* शिवकालीन-पत्र-सार-संग्रह, खंड २, पान ५६०.

पाहिजे व "दक्षणची पादशाही आम्हा दक्षणियांच्या हातीं राहे तें करावें." पठाणांच्या व मोंगलांच्याविरुद्ध दक्षिणेंतील मराठे व मुसलमान राजांची एकजूट होऊं शकली व ती एकदांच नव्हे तर बरेच वेळीं झाली.

पठाण व दाक्षिणी मुसलमान यांच्यातील ही तेढ समकालीन परंतु परक्या इंग्रजांनाहि सहज दिसण्याइतकी तीव्र होती. मुंबईकरांनीं स्वदेशीं पाठविलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे कीं, 'गोवळकोंडेकर, (विजापुरांतील) दक्षिणीपक्ष आणि शिवाजी या त्रिवर्गांनीं मिळून मोंगलाविरुद्ध एकजूट करून दिलेलखानाला दख्खनमधून हांकून काढण्याचें ठरविलें आहे."+ दाक्षिणी मुसलमानांचें पठाण किंवा परदेशी मुसलमांशीं हें वैर शिवकालापूर्वीचें आहे. उदाहरणार्थ, अलाउद्दीन बहमनीनें, सन १४५३ मध्यें, मलिक-उलतुझार याला कोंकणच्या स्वारीवर पाठविलें; त्याचा शिर्के व विशाळगडकर यांनीं पराभव केला. या पराभवाचें खापर मलिकनें बरोबरचा दाक्षिणी सरदार निजाम उल-मुल्क याच्यावर फोडलें. त्यावरून तंटा होऊन निजामानें २५०० परदेशी मुसलमानांची चाकणच्या किल्ल्यांत कत्तल केली.× बहमनी राज्याच्या प्रारंभापासूनच दक्षिणेंतील मुसलमान स्वतःला येथील रहिवाशी समजूं लागले होते, व मोंगल बादशहांच्या पदरच्या परदेशी मुसलमानांशीं ते इतके वैरभावानें वागत होते कीं श्री. गद्रे या कट्टर हिंदुत्वाभिमानी लेखकानेंहि याबाबतींत असें म्हटलें आहे कीं, बहमनी राजांच्या कारकीर्दींत "उत्तरोत्तर हिंदु आणि मुसलमान हा भेद दाक्षिणी पक्षांत कमी होऊन एका भूमीचीं लेंकरें हा विचार वाढला."+

सारांश, शिवकालाच्या आधींच्या शेंदीडशें वर्षांपासून, दाक्षिणी राज्यकर्त्यांत एक प्रादेशिक अभिमान उद्भवूं लागला होता व त्या अभिमानामुळें मुसलमानी धर्माचें बंधनहि कमजोर ठरत होतें, असें यावरून दिसतें. परंतु,

---

\+ वरील ग्रंथ, पान ६०४.

× गद्रे, 'महाराष्ट्र महोदय पूर्वरंग', पान १३७.

\+ वरील ग्रंथ, पान १३७.

धर्मापेक्षां वलवत्तर ठरणारी ही प्रादेशिक भावना राज्यलोभाच्यापुढें अगदींच दुबळी ठरत असे, अशीच उदाहरणें पुष्कळ सांपडतील. दिलेलखानाविरुद्ध झालेल्या एकजुटीचा उल्लेख वर आहे. त्याचवेळीं, ( सन १६७७–७९ मध्यें ), शिवाजी व दाक्षिणी पक्षाचे मुसलमान यांच्याविरुद्ध संभाजीनें दिलेलखानाला मदत केल्याचें दृश्य आपल्याला दिसतें.+ याचा अर्थ असा कीं, प्रादेशिक भावना ही आकस्मिक व क्षणिक स्वरूपाची होती व त्या एकंदर काळाचा विचार केला तर प्रादेशिक भावनेपेक्षां 'राज्य' हीच मुख्य व प्रेरक बाब होती, असें मानावें लागतें.

'महाराष्ट्र धर्म' ह्या धर्मवाचक कल्पनेवर शिवकालीन राजकारणाची इमारत उभारतां येत नाहीं, त्याचप्रमाणें 'महाराष्ट्र' राज्य किंवा दक्षिणी-पक्षाचें राजकारण या प्रादेशिक बाबींच्या आधारावरहि ती इमारत उभी करणें चूक आहे, असा निष्कर्ष वरील विवेचनावरून निघतो. मग असा प्रश्न पडतो कीं त्यावेळच्या राजकारणाचें केंद्र किंवा प्रेरकशक्ति कोणची? यांचें उत्तर असें : 'राज्य' हें त्या काळांतील सर्व घडामोडींचें मुख्य सूत्र होतें, 'धर्म' हें गौण सूत्र होतें, व प्रादेशिक भावना ही आकस्मिक व अपवादात्मक उद्‌भवणारी गोष्ट होती. राष्ट्रभावनेचा अभावच होता. राजकारणांत उत्पन्न झालेली आधुनिक केंद्रस्थानें पाहिल्यास वरील काळाचें वैशिष्ट्य हें जास्त स्पष्ट होईल. आज '**राष्ट्राला**' सर्वांत जास्त महत्त्व आहे. 'राज्याची' कल्पना राष्ट्रांत सामावून गेली आहे, वर्गकलहाला दुय्यम परंतु वाढतें महत्त्व मिळालें आहे व 'धर्म' 'वंश' इत्यादि बाबी **आकस्मिक** महत्त्वाच्या झाल्या आहेत.

राजकारणांतील राज्य, राष्ट्र इत्यादि बाबींचें महत्त्व तारतम्यानें मांडावयाचें तर कोष्टकरूपानें असें मांडतां येईल :

+ शिवकालीन-पत्र-सार-संग्रह, खंड २, पान ६३४.

| काल | वेगवेगळ्या बाबींचें कमीजास्त महत्त्व | | |
|---|---|---|---|
| | मुख्य | गौण | आकस्मिक |
| शिवकालीन महाराष्ट्र | राज्य | धर्म | प्रदेश, वंश, वर्ग, जनसमाज इत्यादि. |
| सन १५०० ते सन १९१७ चा युरोप | राष्ट्र | वर्ग | वंश, धर्म, जनसमाज इत्यादि. |
| सन १९१७ नंतरचा युरोप | वर्ग (जनसमाज) | राष्ट्र | वंश, धर्म इत्यादि. |
| आधुनिक महाराष्ट्र | राष्ट्र (जनसमाज) | वर्ग | वंश, धर्म इत्यादि. |

सन १८४८ नंतरच्या काळांत, विशेषतः सन १९१८ च्या सोव्हिएत समाजवादी क्रांतीनंतर, 'वर्ग' या राजकारणांतील घटकाला मुख्य स्थान येऊं लागलें आहे. परंतु हा बदल फक्त औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या युरोपीय देशांतून घडलेला आहे. तूर्त हिंदुस्थान पुरतें पहावयाचें म्हणजे राष्ट्रीयत्वालाच प्रधान स्थान असलेल्या काळांत आपण आहोत.

मध्ययुगीन भारतांत, तसेंच युरोपांत, धर्माला राज्यापेक्षां गौण स्थान होतें ही साधी गोष्ट हिंदुराष्ट्रीयत्वाच्या, तसेंच मुस्लीम राष्ट्रीयत्वाच्या, आधुनिक पुरस्कर्त्यांना आज पटत नाहीं, कारण सन १९०८ नंतरच्या भारतीय राजकारणांत ब्रिटिश भेदनीतीमुळें उत्पन्न झालेली "धार्मिक राष्ट्रीयत्वाची" चुकीची कल्पना त्यांनीं स्वीकारलेली असते. मध्ययुगीन भारतीय इतिहासांत "धार्मिक राष्ट्रीयत्वाची" अशी भावना उद्भवली नव्हती, ही गोष्ट थोडी तपशीलवार सिद्ध करणें जरूर आहे.

हिंदुराष्ट्रीयत्वाचें किंवा मुसलमान राष्ट्रीयत्वाचें अभिमानी आज असें समजतात कीं शिवकालांत, किंवा त्याहि पूर्वीच्या काळांत, हिंदू व मुसलमान हे आपापल्या राष्ट्रीय व धार्मिक भावनांनीं प्रेरित होऊन एकमेकांशीं लढत होते, आणि हिंदुच्या विरुद्ध हिंदू किंवा मुसलमानाच्या विरुद्ध मुसलमान अशा लढ्यांचीं उदाहरणें इतिहासांत सांपडत असलीं तरी तीं तुरळक व आकस्मिक आहेत. इतकेंच नव्हें तर स्वजातीयांशी निमकहरामी करणारें असें कांहीं थोडे लोक किंवा व्यक्ति सोडून देऊन हिंदुस्थानच्या एकंदर इतिहासाचें सूत्र " हिंदू व मुस्लीम राष्ट्रांच्या अखंड लढ्यांत " दिसून येते. परंतु वस्तुस्थिति काय आहे ?

प्रथम हिंदूंच्यापुरतें पाहिलें तर असें दिसतें कीं, मुसलमानांच्या स्वाऱ्या, लुटालूट, मूर्तिभंजन, बाटवाबाटवी व राज्यस्थापना हे प्रकार सर्रास चालू झाल्यानंतरहि हिंदूंच्यामध्यें हिंदुराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झालेली दिसत नाहीं. केवळ वैयक्तिक निमकहरामीचा हा प्रकार होता, असें नव्हें तर हिंदू राजघराण्यांची सर्वसाधारण दृष्टिच राज्यापुरतें पाहण्याची होती. हिंदू राजांनीं किंवा सम्राटांनीं आपल्या शेजारील हिंदू राजांविरुद्ध मुस्लीम राजांशीं स्नेहसंबंध ठेवले यांचीं उदाहरणें सर्वत्र आढळतात. इ. स. ८५१ च्या सुमारास दक्षिणेतील राष्ट्रकूट व उत्तरेकडील प्रतिहारी सम्राट यांच्या राज्यांच्या हद्दी एकमेकांशीं भिडल्या व त्यांच्यांत वितुष्ट आलें. यावेळीं मुलतानच्या इस्लामी मांडलिकानें प्रतिहारी साम्राज्यांतून फुटून स्वतंत्र होण्याची धडपड चालविलेली होती. त्याला दक्षिणेंतील राष्ट्रकूटांनीं सहानुभूति दाखविली, एवढेंच नव्हे, तर प्रतिहारी साम्राज्यांशीं राष्ट्रकूटांचें असें शत्रुत्व असल्यामुळें राष्ट्रकूटांच्या राज्यांत इस्लामला मान होता व त्याच्या वाटेस कोणी जात नसत.+

दुसरें उदाहरण विजयनगरच्या राजाचें देतां येईल. सन १४९८ मध्यें पोर्तुगीजांनीं होनावरवर स्वारी करून लुटालूट व भयंकर अत्याचार केले. तेव्हांपासून पोर्तुगीजांचें हें आक्रमण चालूच राहिलें व सन १५६०

+ दत्तोपंत-आपटे-लेख-संग्रह, पान ३३.

पर्यंत त्यांनीं गोव्यापासून सुरतेपर्यंत सर्व समुद्रकिनाऱ्यावर अंमल बसविला. श्री. गद्रे यांच्यासारख्या हिंदुत्वाभिमानी लेखकानें या बाबतींत म्हटलें आहे कीं, पोर्तुगीजांच्या या " विजयाचें अधिष्ठान विजयनगरचा पाठिंबा हेंच होय "+ सन १५०५ मध्येंच पोर्तुगीज व विजयनगरचा राजा यांच्यांत कानन्नूरचा तह झाला—व तेव्हांपासून पोर्तुगीजांना या हिंदु राज्याची मदत मिळत गेली. हा सर्व काळ विजयनगरच्या सामर्थ्याचा व वैभवाचा काळ होता. परंतु, पोर्तुगीजांच्या आक्रमणांत मुसलमानांच्या स्वाऱ्यांपेक्षांहि जास्त अत्याचार, लुटालूट व धर्मच्छळ होत असे तरी " स्वधर्मबांधवांचा छळ व जुलमाचें धर्मांतर एवढया विजयनगरसारख्या सामर्थ्यवान राज्याच्या हिंदु प्रजांनीं उघड डोळयांनीं पाहिल्या. ...... आरमारी लढायांत व इतर धुमाकुळींत पोर्तुगालांबरोबर कानडी तिरंदाज लोक असतच असत. इकडे, मुसलमानांच्या सैन्यांतूनहि आमचे मराठे चमकत. तरी त्यांच्या स्वाऱ्याशिकाऱ्यांतून गोवध, ब्राह्मणांना जुलमानें बाटविणें वगैरे क्रिया प्रत्यहि होत असत.×"

जाज्वल्य हिंदुत्वाभिमानी माधवाचार्य यांनीं स्थापन केलेल्या विजयनगरच्या साम्राज्याचे बलाढय हिंदु सम्राट देखील मुस्लीम व पोर्तुगीज आक्रमकांशीं असा स्नेहभाव ठेवीत, यावरून दिसतें कीं, परधर्मीयांशीं संगनमत करण्याचें धोरण केवळ एखाद्या निमकहराम व्यक्तीचें किंवा भाडोत्री सैनिकांचें नसे. उलट रावांपासून रंकांपर्यंत सर्व समाजच " धार्मिक राष्ट्रीयत्वाच्या " कल्पनेनें भारलेला नव्हता. प्रत्येकाला आपापला धर्म, म्हणजे आचारादि कल्पना प्रिय वाटत नव्हत्या असें नाहीं. वेळप्रसंगीं, हजारों हिंदूंनीं किंवा संभाजीसारख्या हिंदु राजांनीं अमानुष क्रौर्याला तोंड देऊन धर्मासाठीं प्राणहि अर्पिले हें खरें, परंतु धर्माचा हा अभिमान समाजाच्या राजकारणाला प्रेरक किंवा मार्गदर्शक झाल्याचें कोठेंहि दिसत नाहीं. त्या काळच्या जीवनांत धर्माला जरी

+ महाराष्ट्र महोदय पूर्वरंग, पान २०७.

× वरील ग्रंथ, पान २०८

मोठें महत्त्व होतें तरी राजकारणांत कांहीं स्थान नव्हतें. उलट राज्यप्रसाराच्या ध्येयालाच मुख्य स्थान होतें.

राष्ट्रीय एकसंघपणा व धार्मिक एकजूट यांचा हिंदूमध्यें असा अभाव होता, व कांहीं हिंदुराष्ट्रवादी ही गोष्ट मान्य करतात, पण लगेंच असा युक्तिवाद करतात कीं, हिंदूंच्यामध्यें मुसलमानांप्रमाणें किंवा पोर्तुगीजांप्रमाणें धर्मवेडेपणा नव्हता म्हणून राष्ट्रीयवृत्ति नव्हती ! याच्या उलट, मुस्लीम राज्यकर्ते व प्रजाजन धर्मवेडामुळें व क्रौर्यामुळें एकजुटीनें तर वागले शिवाय " धार्मिक राज्याची व राष्ट्राची " कल्पना मुसलमानांमध्यें असल्यामुळें सारें जग मुस्लीम सत्तेच्या कक्षेंत आणण्यासाठीं सर्व मुसलमान लढले.

हिंदूंच्या मनांत आज संघटनेची व प्रतिकाराची भावना उत्पन्न करण्यास वरील युक्तिवाद उपयोगी आहे. दुसरीकडे, आधुनिक हिंदी मुसलमानांच्या "'मुस्लिम राष्ट्राच्या'' किंवा "पाकिस्तानच्या" घोषणेमुळें वरील कोटी-क्रमाला पोषक असें वातावरणहि निर्माण होत आहे, हें खरें. परंतु, इतिहासांत काय घडलें तें आजच्या राजकारणांतील गरजांवरून ठरविणें योग्य नाहीं. जें खरोखर घडलें तोच इतिहास. त्या इतिहासाची साक्ष काय आहे ?

पूर्वग्रह सोडून इतिहासाकडे पाहिलें तर वरील कोटिक्रम चुकीचा आहे असें दिसून येईल. राष्ट्रकूट सम्राट व विजयनगरचें सम्राट परकीयांना मदत करीत होते; तोच प्रकार मुसलमान राज्यकर्त्यांनींहि केलेला आढळतो. पोर्तुगीजांनीं कोंकणपट्टी व्यापल्यामुळें मुसलमानांच्या दर्यावर्दी व्यापारावर गदा आली. साहजिकच सर्व मुसलमानांनीं एकवटून पोर्तुगीजांच्या विरुद्ध लढणें जरूर होतें. परंतु गुजराथचा सुभेदार बहादूरशहा यानें पोर्तुगीज गव्हर्नर कुन्हा याच्याशीं वसईला तह केला व दोघांनीं मिळून दिल्लीच्या पातशाहीला टक्कर द्यावी असें ठरलें. " महाराष्ट्रमहोदयपूर्वरंगाचे " लेखक श्री. गद्रे म्हणतात,

" स्वधर्मी दिल्लीपतीच्या स्नेहापेक्षां विधर्मी पोर्तुगीजांशीं स्नेह जोडण्यास सांगणारी राजनीति आणि धर्मनीति खरोखर मोठी गंमतीची होय ! " +

परंतु, हीच धर्मनिरपेक्ष राजनीति मुसलमान राज्यकर्त्यांनीं प्रथमपासून शेवटपर्यंत अवलंबिली, असें दिसून येईल. मुसलमानी आक्रमणाच्या सुरवातीला, महंमद घोरीचें धोरण घ्या. दिल्लीचें राज्य हस्तगत करण्याच्या बाबतींत " धर्मवेडानें त्याला मदत केली असें मुळींच म्हणतां येत नाहीं. " धर्मापेक्षां राजकारणासच त्यानें आपल्या डोक्यांत प्राधान्य दिलें होतें " असें सांगून श्री. दत्तोपंत आपटे म्हणतात, " तात्पर्य, धर्मवेडानें राज्य मिळवून दिलें नसून राजकीय दृष्टीनें घोरीला दिल्लीचा बादशहा बनविला असें इतिहास सांगतो. " सिंधपासून दिल्लीपर्यंत मुस्लीम राज्य स्थापन होण्यास चारपांचशें वर्षें लागलीं व त्या काळांतल्या " सर्व उलाढालींत हिंदु राजांच्या वीरश्रीचा कमीपणा दिसला नाहीं अगर इस्लामी धर्मवेडाचा प्रभाव यशस्वी झाला नाहीं. राजकीय महत्वाकांक्षा व सावधानता यांनींच राजकीय प्रश्न सोडविला असें दिसतें. " ×

याचा अर्थ हिंदुप्रमाणेंच मुसलमानहि राज्यासाठीं धडपडत होते. या गोष्टीचा आणखी सबळ पुरावा असा कीं शिवकालीन स्वराज्यस्थापना व व नंतरचा पेशवेकालीन साम्राज्यविस्तार मुसलमानांच्या या धर्मनिरपेक्ष राजनीतीमुळेंच होऊं शकला. " शहाजीच्या जन्मापूर्वीची परिस्थिति " या लेखामध्यें श्री. दत्तोपंत आपटे यांनीं असें दाखविलें आहे कीं, " दिल्लीपतीचें अंकितत्व झुगारून देण्यास हरकत नाहीं असें म्हणणाऱ्या पक्षानें दक्षिणेंत बहमनी राज्याची स्थापना केली व दिल्लीपतीचें महत्त्व व सत्ता दक्षिणेंतून हुसकावून लावली. अर्थात् हें बंड शुद्ध राजकीय भावनेचें फळ होतें. " + याचाच परिणाम तुंगभद्रेच्या खालीं विजयनगरचें हिंदु राज्य निर्माण होण्यांत

+ वरील ग्रंथ, पान २०६.

× दत्तोपंत–आपटे–लेखसंग्रह, पानें ३२–३३.

+ वरील ग्रंथ, पान १२६.

झाला. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या सत्तेचे 'उत्तर' व 'दाक्षिण' असे दोन तुकडे एकदां पडल्यावर त्यापैकीं दक्षिणी राज्यांत पुन्हां राज्यविभागणी होऊन शेवटीं निजामशाहीच्या कवचामध्येंच मराठी सरदारांच्या उदयाचें व शिवकालीन राज्यस्थापनेचें बीज रोंवलें गेलें.

मुसलमानांची महाराष्ट्रावर पहिली यशस्वी स्वारी म्हणजे मलिक काफूरची सन १३१८ मधील मोहीम. परंतु त्यावेळीं जरी यादवांची सत्ता नाहिशी झाली तरी लहानसहान हिंदु राजे स्वतंत्रच राहिले. नंतरच्या काळांत मुसलमानांच्या आपसांतील फुटीमुळें हिंदु राज्यें कशीं बळावत गेलीं तें पाहण्यासारखें आहे. सन १३३३ मध्यें महमंद तुघलख दक्षिणेंत शिरला व त्यानें सर्व महाराष्ट्र काबीज केला खरा, परंतु महमंदाचा भाचा बाहुद्दीन हाच त्याच्याविरुद्ध बंड करून उठला व अनागोंदीच्या हिंदु राजाला जाऊन मिळाला. पुढें महमंद परतल्यावर या राज्यांतील हक्क व बुक्क यांना दक्षिणेंतील मुसलमान सरदारानेंच त्या प्रांताची सुभेदारी दिली. तिच्या जोरावर त्यांनीं सन १३३५ मध्ये विजयनगरच्या स्वतंत्र हिंदु राज्याची स्थापना केली. थोड्याच वर्षांनीं, सन १३४७ मध्यें, अल्लाउद्दीन हुसेन या सरदारानें गुलबर्ग्यांत बहमनी राज्य स्थापलें. यावरून स्पष्ट दिसतें कीं सन १३१८ ते सन १३४७ या २९ वर्षांच्या लहानशा अवधींत मुसलमान दक्षिणेंत आले व लगेच दिल्लीविरुद्ध बंड करून स्वतंत्र राज्य बनवून राहूं लागले. या बंडखोरीमुळेंच विजयनगरचें राज्य शेजारीं स्थापन होऊं शकलें व बळावत गेलें.

हें सर्व उघड्या डोळ्यांनीं पहात असूनहि दक्षिणी मुसलमान व परदेशी मुसलमान यांनीं हिंदूंच्या विरुद्ध एकजूट केली नाहीं. उलट त्यांचें आपसांतलें वैर वाढत गेलें. उदाहरणार्थ महंमूद गावान या परदेशी मुसलमान मुत्सद्यानें बहमनी राज्याचा विस्तार खूप वाढविला व त्याला एका साम्राज्याचें रूप आणलें, परंतु दक्षिणी मुसलमानांच्या पक्षानें त्याचा खून करविला. त्यानंतर थोड्याच वर्षांत म्हणजे सन १४८९ मध्यें, बहमनी राज्याचीच शकलें झालीं व मुसलमानांची सत्ता आणखीच क्षीण झाली.

मुसलमान राज्यकर्त्यांमधील ही भाऊबंदकी कधींच थांबली नाहीं, किंबहुना तिचाच फायदा घेऊन विजनगरच्या रामराजाला आपल्या राज्याचा विस्तार करतां आला. सन १५४३ पासून १५६६ पर्यंत निजामशाही व कुतुबशाही विरुद्ध विजापूरच्या आदिलशाहीचा पक्ष घेऊन रामराजानें राजकारण चालू होतें. कुतुबशाही मध्येंच पुढें गादीसाठीं भांडणें लागलीं तेव्हां इब्राहिमला हाताशीं धरून रामराजानें त्याला गादीवर बसविलें. कांहीं वर्षांनीं मुसलमान राजांची रामराजा विरुद्ध एकजूट झाली व तालिकोटच्या लढाईंत रामराजाचा अंत झाला. परंतु त्या लढाईलाहि धार्मिक युद्धाचें स्वरूप मुळींच नव्हतें. दोन्ही बाजुला हिंदू व मुसलमान सरदार व शिपाई होते. मुसलमान राजांच्या सैन्यातील सिवाजी काटे, केरोजी भोसले व बसवाजी हे मोठे सरदार व रामराजाकडील मिरिया जमादार व शेख अली हे सरदार त्या लढाईंत मेल्याचें नमूद आहे. शिवाजीच्या आरमाराचा प्रमुख दौलतखान व पेशव्यांच्या तोफखान्याचा मुख्य इब्राहिमखान हे जसे अखेरपर्यंत स्वामिनिष्ठ व राज्यनिष्ठ होते त्याचप्रमाणें हे जुने सरदारहि आपल्या परधर्मीय धन्यांची इमानानें व प्राण अर्पूनही सेवा करीत होतें, असें स्पष्ट दिसतें.

बहमनी राज्याची स्थापना व त्या राज्याचे तुकडे पडून त्यांत चाललेली भाऊबंदकी यामुळें प्रथम विजयनगरच्या राज्याला बलिष्ठ होतां आलें व पुढें निजामशाहीच्या आसऱ्यानें शहाजीला स्वतःच्या राज्याचे, म्हणजे स्वराज्याचे, मनसुबे रचतां आले. याच प्रकाराची पहिल्या बाजीरावाच्या उत्तरेकडील मोहिमांच्या वेळीं पुनरावृत्ति झाली. सन १७३७ मध्यें बाजीरावानें दिल्लीच्या वेशीवर धडक देऊन उत्तरेमध्यें मराठ्यांचा दरारा बसविला व नंतर खालीं उतरून भोपाळच्या लढाईंत निजामाचा पराभव केला. या दोन कामगिऱ्या पार पाडतांना बाजीरावाच्या अंगचा मुत्सद्दीपणा व धडाडीचें कुशल सेनानायकत्व दिसून आलें, परंतु दिल्लीकर मुसलमान व निजाम यांच्यांतील चालत आलेलें हाडवैर हें त्याच्या यशाचें एक मोठें कारण होतें, हें विसरून चालणार नाहीं. पातशाहा, खानडौरान तसेंच सवाई जयसिंग यांचा एक तट व

सादतखान वगैरे सरदारांचा निजामाला अनुकूल असलेला दुसरा गट अशी फाटा-फूट दिल्लीला होती. बाजीराव उत्तरेंत जाऊन पातशाहीला खिळखिळी करील तर उत्तमच, उलट या साहसांत मराठ्यांना ठोकर बसली तरी आपल्या फायद्याचेंच आहे, असा हिशोब करून निजाम स्वस्थ राहिला. पाठीवर एवढा प्रबळ शत्रू ठेवून दिल्लीपर्यंत भरारी मारण्याचें धाडस करतांना बाजीरावालाहि कल्पना होतीच कीं निजाम असा तटस्थ राहील. मल्हाररावाचा दुआबांत पराभव झाला व सादत-खान दक्षिणची वाट अडवून उभा राहिला तरी देखील बाजीरावानें बेधडक दिल्ली गांठली याचें कारण दक्षिणेंत निजाम तटस्थ राहील असा त्याला भरवंसा वाटला. सादतखानाला विरोध करणारा खानडौरान व पातशाहा याचा गट खुद्द दिल्लींतच आहे. तोसुद्धां आपल्याविरुद्ध निकरानें लढणार नाहीं हा त्याचा अंदाजहि खरा ठरला. नंतर दिल्लींतून परततांना भोपाळच्या लढाईंत त्यानें निजामाला कोंडून धरण्याचें धाडस केलें, कारण "दिल्लीकडील लष्करी मदत निजामास पोचूं न देण्याची खबरदारी खानडौरान घेईल हें बाजीराव जाणून होता."* सारांश, मुसलमानांतील या सर्व दुहीचा फायदा घेऊन दिल्लीकरांना व निजामाला एकेकटे गांठून बाजीरावानें पराभूत केलें. ज्या उत्तर-दक्षिण वैराचा फायदा विजयनगरला, शहाजीला व शिवाजीला मिळाला तोच बाजीरावाला मोठ्या प्रमाणावर मिळाला. यापुढेंहि मराठ्यांनीं त्याच दुहीच्या जोरावर साऱ्या हिंदुस्थानचें राज्य जवळजवळ जिंकलें.

या उत्तर-दक्षिण वैराची मराठ्यांच्या पराक्रमालाच उलट भोंवणारी दुसरी बाजू पानिपतच्या लढाईच्या वेळीं उघडकीस आली. दिल्लीकरांचे दक्षिणचे सुभेदार जसे स्वतंत्र राजे व दिल्लीकरांचे वैरी बनले तसाच प्रकार पुढें पेशव्यांच्या उत्तरेंतील सुभेदारांच्या बाबतींत झाला. सत्तेचें मूळ केंद्र दिल्लीऐवजीं दक्षिणें-तील पुणें झालें, पण स्वतंत्र राज्यें फुटून निघण्याची परंपरा पूर्वीसारखीच कायम राहिली. मराठ्यांचें पानिपतच्या लढाईच्या आधींचें राजकारण व पराभवानंतरचें

* दत्तोपंत–आपटे–लेख–संग्रह, पान १३६.

राजकारण जमेस घेतलें तर दिसून येतें कीं मल्हारराव होळकर व शिंदे प्रभृति सरदार हा जणूं काय " उत्तरेकडील मराठ्यांचा " पक्षच बनला होता. त्यांचें आपसांतहि बनत नव्हतेंच, परंतु दक्षिणेंतील पेशव्यांच्या राजकारणाशीं त्यांच्या धोरणाचा धागा जुळेनासा झाला होता. याबाबतींत श्री. दत्तोपंत आपटे म्हणतात:

" पंजाबपासून श्रीरंगपट्टणापर्यंत व वसईपासून मखसुदाबादेपर्यंत जेव्हां मराठ्यांचा संचार होऊं लागला तेव्हां मध्यवर्ती सत्ता व स्थानिक सरदार यांच्यामधील सेव्यसेवकभावाचें नातें कमी पडलें व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास महत्त्व येऊं लागलें."*

मराठ्यांच्यामध्यें जरी दाक्षिणी व उत्तरी अशा राजकारणाचा उद्भव झाला तरी सन १७९५ पर्यंत मराठ्यांचा दरारा हिंदुस्थानभर कायम होता, याचें कारण श्री. आपटे यांनीं दिलें आहे कीं " मराठ्यांत मतभेद व भांडणें होतीं व ते स्वतःचें बळ वाढविण्यासाठीं झटत तरी, तूलनात्मकदृष्टीनें पाहूं गेल्यास रजपूत व मुसलमान यांच्यापेक्षां मराठ्यांच्या वागणुकींत ऐक्याची भावना बलवत्तर होती. " + अशा एकजुटीनें वागणाऱ्या, एकभाषी व समानधर्मी मराठ्यांत देखील राष्ट्रीय एकात्मता नव्हती मग ती मुसलमान राजांत व सरदारांत कोठून असणार ? म्हणूनच ह्या एकंदर काळांत कर्तृत्वाला व महत्त्वाकांक्षेला राज्यलोभाचीच मुख्य प्रेरणा होती असा निष्कर्ष निघतो.

## मराठी राज्य व मराठी बहुजनसमाज

शिवकालीन राज्यस्थापनेला राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान होतें या सिद्धान्ताला पोषक म्हणून आणखी युक्तिवाद केला जातो तो आतां विचारांत घेऊं. शिवकालीन राजकारणाच्या मागें बहुजनसमाजाची जागृति होती व त्याची राष्ट्रीयत्वाची भावना व सामर्थ्य स्वराज्य-स्थापनेला उपयोगी पडलें असा तो युक्तिवाद

* वरील ग्रंथ, पान १७०.

+ वरील ग्रंथ, पान १७१, १७२.

आहे. न्यायमूर्तींचें मत असेंच आहे हें मागील उद्धृत उताऱ्यावरून दिसेल. संतांनीं उत्पन्न केलेल्या धर्मसुधारणेच्या व समतेच्या जाणिवेंतून राष्ट्रीय जागृति निर्माण झाली असें त्यांनीं म्हटलें आहे. याच युक्तिवादाचा अनुवाद समाजवादी श्री. लालजी पेंडसे यांनीं अलीकडे केला आहे. शिवाजीनें वतनसंस्थेवर प्रहार केला, त्यामुळें मराठा शेतकरी समाज शिवाजीच्या मागें उभा राहिला व स्वराज्य-संस्थापनेच्या कार्याला समाजक्रांतीचें रूप आलें असें श्री. पेंडसे यांचें मत आहे. ते म्हणतातः

" शिवाजीचा मुख्य लढा मिरासदार–वतनदार–विरोधी शेतकरीक्रांतीचा होता. या लढ्याला धार्मिक स्वरूप आलें तें इस्लामी कायद्यामुळें आलें. " +

न्यायमूर्तींना भागवतधर्माचें कार्यच क्रांतिकारक व लोकजागृतीला मुख्यतः उपकारक असें वाटत होतें. उलट धर्मनिरपेक्ष शेतकरी–क्रांति हा शिवक्रांतीचा आत्मा आहे असें श्री. पेंडसे यांना वाटतें. पण, हा फरक असला तरी दोघांचीं मतें परस्परांना पूरकच आहेत, कारण न्या. रानडे शिवकार्याला एका अर्थानें क्रांति समजतात तर श्री. पेंडसेंहि दुसऱ्या तऱ्हेनें पण क्रांतीच समजतात. प्रॉटेस्टंट धर्मानें व लोकसत्ताक क्रांतिवादानें युरोपांत जुन्या मध्ययुगीन राजसत्तांना मूठमाती दिली व इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि नवीं भांडवलदारी राष्ट्रें उदयाला आलीं. तशी क्रांति शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेमुळें झाली, असा न्या. रानडे यांच्या विवेचनाचा कल आहे; आधुनिक युरोपांत इंग्लंड, जर्मनी वगैरे राष्ट्रांतील शेतकऱ्यांनीं तेथील सरंजामदारी वर्गाविरुद्ध जीं बंडें केलीं, त्यासारखी शेतकरी वर्गाची उठावणी शिवकालांत झाली असें श्री. पेंडसे यांचें मत आहे. " शिवाजी " या प्रसिद्ध चारित्रग्रंथाचे लेखक डॉ. बाळकृष्ण यांचेंहि मत श्री. पेंडसे यांच्या मताला पोषक आहे.

या सर्वांच्या प्रतिपादनामध्यें एक महत्वाची गोष्ट गृहीत धरलेली आहे ती

+ ' धर्म कीं क्रांति ? ', पान ५५.

अशी कीं शिवाजीच्या नेतृत्वाखालीं मराठी **बहुजनसमाजानें** स्वराज्य-स्थापना केली व तसें करतांना मध्ययुगीन वतनदारीशीं व एकंदर समाज-व्यवस्थेशी सामना दिला.

न्यायमूर्तींनीं व श्री. पेंडसे यांनीं गृहीत धरलेली ही गोष्ट नीट तपासणें जरूर आहे. शिवकालीन स्वराज्यस्थापनेमध्यें बहुजनसमाजाचा हात किती होता, हें पाहण्यासाठीं त्यावेळची **राजसत्ता, वतनसंस्था** व **ग्रामसंस्था** या तीन सामाजिक संस्थाचा परस्परसंबंध नीट पाहिला पाहिजे.

शिवकालाच्याहि पूर्वींपासून हजारों वर्षें चालत आलेली भारतीय समाज-रचना खालील तीन संस्थावर आधारलेली होता :

( १ ) राजसत्ता: ही कमीअधिक प्रबळ व समाजाच्या दृष्टीनें निरंकुश असे.

( २ ) वतनसंस्था: ही **शाश्वत** देशाधिकाऱ्यांची, ग्रामाधिकाऱ्यांची व गावकामगारांची संस्था होती. ती राजसत्तेपासून अलग व स्वतंत्र होती.

( ३ ) ग्रामसंस्था: जमीनीची मालकी कांहीं ठिकाणीं सामायिक असे किंवा कांहं वेळीं शेतकरी कुटुंबांकडे असे. तसेंच, गांवावरील सरकारी पट्टी सामुदायिक असे किंवा प्रत्येक कुटुंबावर विभागलेली असे. हे फरक असले तरी ग्रामसंस्थामात्र सर्व दूर होतीच. गांवपंचायत ही गांवाच्या आर्थिक व इतरहि सर्व व्यवस्थेचें काम पाही व सर्व गांवकऱ्यांच्या वतीनें देशमुखांशीं व राजांशीं व्यवहार करी. वतनसंस्था व ग्रामसंस्था यांचा संबंध शाश्वत होता.

राजसत्ता, वतनसंस्था व ग्रामसंस्था या तीन संस्थांमध्यें समाजातील राजकीय शक्ति अशी विभागली गेली होती कीं प्रत्येक संस्था स्थिर व अभेद्य अशी बनली होती, तसेंच या संस्था परस्परावलंबी होत्या परंतु एकमेकींना नेस्तनाबूद

करण्याचें सामर्थ्य यापैकीं एकाहि संस्थेंत नव्हतें. त्यामुळें समाज स्थिरावलेला होता व ज्या कांहीं घडामोडी होत त्या वरील तीन संस्थांना मुळापासून धक्का न देतां घडत. आतां यापैकीं एकेका संस्थेचें स्वरूप थोडक्यांत पाहूं.

## राजसत्तेचें स्वरूप

राजसत्ता वंशपरंपरेनें चाले, परंतु राजघराण्यांत दुबळा वारस निघाला कीं सेनापति किंवा शेजारचा राजा राज्य बळकावी. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत राज्याचीं सात अंगें सांगतांना राजा, अमात्य, कोश, दुर्ग वगैरे गोष्टींबरोबर मित्रराजाचें महत्व सांगितलें आहे. कारण राजसत्ता ही समाजाच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या वस्तुप्रमाणें होती व तिला कोष आणि मित्रराजांची मदत अशा गोष्टींवरच तगून राहणें शक्य होतें. या उपऱ्या व तरंगत्या राजसत्तेला कोषाचें किती महत्त्व वाटत होतें हें दाखविणारा एक जुना लेख श्री. राजवाडे यांनीं "महिकावतीच्या बखरी"च्या प्रस्तावनेंत दिला आहे, ( पान १०१ पहा ). भारतीय समाजसागराच्या पृष्ठभागांवर अशा असंख्य राजसत्तारूप ओंडक्यांची एक सांखळी तरंगत असे. यापैकीं एखादा राजा प्रबळ व्हावा व त्यानें बऱ्याच शेजारीं राजांना मांडलीक बनवावें; उलट, अशा एखाद्या साम्राज्य-सत्तेचें सुभेदारच मांडलीक राजांइतके प्रबळ व्हावेत आणि त्या मध्यवर्ति सत्तेविरुद्ध या मांडलिकांनीं बंड करून स्वतंत्र राजे म्हणून नांदूं लागावें, असा अखंड प्रकार शतकानुशतकें चालू होता.

राजसत्तेच्या ह्या कमालीच्या उपरेपणाचें जुन्या काव्यांत सहजगत्या आलेलें एक वर्णन असें :

परि रावो पहुडलिया सुखे
जैसा देशींचा व्यापारु न ठके
प्रजा आपुलालेनि अभिलाखे
करीतचि असती ॥ ज्ञानेश्वरी अ. ८ ओ. १८५

• राजसत्तेचें हें तरंगतें स्वरूप श्री. राजवाडे यांनींहि आपल्या प्रभावी भाषेंत वर्णन केलें आहे. ( "महिकावतीची बखर", प्रस्तावना, पानें ९२ ते १०६ पहा. )

या राजसत्तेकडे राज्यांतील भूमीची मालकी एका अर्थानें होती कारण राजा हा सर्व दृष्टीनें निरंकुश सत्ताधारी व 'भूपति' होता, व आधुनिक अर्थानें त्याच्यावर सनदशीरपणाचें बंधन कोणचेंच नव्हतें. "राजानें मारलें तर फिर्याद कोणाकडे न्यावयाची?" असा अगतिकपणाच जनसमाजाच्या नशिबीं होता. परंतु आधुनिक अर्थानें जसें राजाला बंधन नव्हतें तसेंच आधुनिक काळांत जो जमीनीच्या मालकीहक्काचा अर्थ व उपभोग शक्य असतो तोहि त्या भूपतीला शक्य नव्हता. जमीनीची खरेदीविक्री करण्याची शक्यता तेव्हां नव्हती, कारण ग्रामसंस्था व वतनसंस्था प्रबळ असल्यामुळें जमीनीच्या शाश्वत मालकीहक्कांत फेरबदल करून ते अंमलांत आणण्याची कुवत व शाश्वती राजघराण्यांना नव्हती. राजेलोक फक्त इनामे, जहागिरी, किंवा सरंजाम देत; याचा अर्थ फक्त आपल्याला मिळणाऱ्या कराची रक्कम ब्राह्मणाला किंवा सेनाधिकाऱ्याला देऊन टाकीत.

इनामदार व सरंजामदारहि* राजाइतकेच उपरे होते. जहागिरी याव्यात व काढून घ्याव्यात, असा प्रकार राजाच्या लहरीप्रमाणें चालूं शके; उलट, कर्तृत्ववान पुरुषाला जहागिरीची वाढ करीत राजा बनणें शक्य असे. एकाच सरदाराला वेगवेगळ्या दोन राजांकडून, किंबहुना आपसांत वैर असणाऱ्या राजांकडूनहि, जहागिरी मिळवितां येत. या जहागिरीच्या जोरावर पदरीं सैन्य ठेऊन राज्य स्थापणें व जहागिरीच्या विस्तारांतून राज्यस्थापना व राज्यविस्तार करणें शक्य होई.

---

* 'सरंजामदारी' या संज्ञेबद्दल एक स्पष्टीकरण येथें जरूर आहे. युरोपांतील मध्ययुगीन समाजालाहि '**सरंजामदारी**' वर आधारलेला समाज म्हणतात. परंतु तिकडचा "फ्यूडल लॉर्ड" व इकडील जहागिरदार, तसाच

हीच महत्त्वाकांक्षा शहाजीसारख्या कर्तृत्ववान जहागिदारांत उद्भवली व शहाजीनेंच स्वराज्यस्थापनेचा व्यूह मांडला. शिवाजी लहान बारा वर्षांचा असतांनाच आपल्या जहागिरींतील कर्यात मावळचा भाग शहाजीनें त्याला पोटमोकासा करून दिला व त्यावेळींच स्वतंत्र राजमुद्राहि करून दिली.+ पेशवे, सुरनीस, डबीर वगैरे अधिकारी त्याच्याबरोबर दिले व कान्होजी जेधे प्रभृति जबरदस्त देशमुख या स्वराज्याच्या मसलतींत वळवून घेतले. उत्तरेची मोंगल सत्ता व दक्षिणच्या पातशाह्या यांच्या वैरांत आपल्यासारख्या प्रबळ मराठा सरदाराला स्वराज्य स्थापणें शक्य होईल, ही दूरदृष्टि शहाजीला आली होती.

---

+ शिवचरित्रप्रदीप, पान २९८.

( मागील पानावरून टीप चालू )

वतनदार, यांच्यांत साम्य नाहीं. हिंदी सरंजामदार व वतनदार जमीनीचा मालक कधींच नव्हता. युरोपांतील लॉर्डमात्र नेहमी मालक होता. या फरकामुळें हिंदी सरंजामदार राजाइतकाच उपरा राहिला, व तिकडे युरोपीय समाज मात्र मध्ययुगांतून बाहेर पडूं शकला. येथें राजसत्ता, वतनसंस्था व ग्रामसंस्था यांची तटबंदी अभेद्य ठरली, याचें एक कारण जमीनीच्या मालकीसंबंधींचा हा फरक हें आहे. औरंगजेबाच्या वेळीं इकडे आलेल्या बर्नीयर या प्रख्यात प्रवासी लेखकाच्याहि लक्षांत हा फरक त्याला होता. ( "ट्रॅव्हल्स इन् दी मोंगल एम्पायर", पान ६५ पहा ). जमीनींत उत्पन्न होणारें धान्य हीच त्या युगांतील समाजाची मोठी संपत्ति होती. जमिनीवरील मालकीहक्कांच्या बाबतींत भारतीय मध्ययुगीय समाज व युरोपीय मध्ययुगीन समाज यांच्यांत केवढें महदंतर होतें याची अशी जाणीव करून घेतल्यास "सरंजामदारी युग" हें विशेषण दोन्हीं समाजांना लावण्यानें केवढा गोंधळ उडत आहे, तें कळेल. वरवर पाहतां पारिभाषिक संज्ञेचा हा प्रश्न वाटतो, पण वस्तुतः त्याच्या पोटीं ऐतिहासिक विश्लेषणांत तत्वतः महत्त्वाचा ठरणारा एक "वाद" आहे. परंतु प्रस्तुत ठिकाणीं एवढें त्रोटक स्पष्टीकरण करूनच भागविणें जरूर आहे.

स्वराज्यस्थापनेची इमारत ही अशी जहागिरीच्या पायावर रचली गेली होती. "जहागीर हा स्वराज्याचा पाया दादोजींनें ठरवून टाकला होता" असें श्री. पेंडसे यांनींहि याबाबतींत म्हटलें आहे, ("धर्म की क्रांति ?", पान २८). परंतु, 'जहागीर' या संस्थेचीच 'स्वराज्य' ही एक वाढविलेली आवृत्ति आहे, हें त्यांनीं ओळखलेलें नाहीं. जहागिरीस त्यावेळीं 'राज्य' हा शब्दहि लावीत. जहागिरदार हा राजाचा मांडलीक असे, मोकासदारासारखा नोकर नसे, म्हणजेच जहागिरदारी ही स्वयंनिर्णीत व राजसत्तेसारखीच सत्ता होती. (श्री. शं. न. जोशी यांचा लेख, शिव–चरित्र–निबंधावली, पानें १३० ते १३७ पहा.)

जहागिरदारी किंवा मनसबदारी या संस्थेबद्दल श्री. पेंडसे यांनीं असें म्हटलें आहे कीं ती संस्था प्रथम मुसलमानांनीं सुरू केली. त्यांचें म्हणणें असें कीं मुसलमान येण्यापूर्वी आपल्याकडे फक्त स्वायत्त ग्रामसंस्था होती, परंतु कुराणप्रणीत कायद्याप्रमाणें जमीन व धान्यकोठारें राजाच्या मालकीची ठरली व यांतच असंतोषाचा पाया घातला गेला. लवकरच "मनसबदारीची स्फोटक बोंडगुळें या बीजाला फुटलीं", ('धर्म कीं क्रांति ?', पान २४). श्री. पेंडसे यांच्या मतें, अहमदशहानें मनसबदारीच्या संस्थेला पुढें आणली व तिच्याविरुद्ध खंडकरी शेतकऱ्यांचें बंड होणें साहाजिक होतें. शिवाजीनें त्या बंडाला चेतना दिली व तिचा तो पुढारी बनला, असें ते मानतात.

वरील एकंदर कल्पना मुळापासूनच चूक आहे, कारण ग्रामसंस्था व वतनसंस्था यांच्याइतकीच राजसत्ता व तिचे सरंजामी सरदार ही संस्थाहि प्राचीन व भारतीय आहे. मुसलमानांनीं त्या प्राचीन संस्थेंत ढवळाढवळ न करतां तीच चालू ठेवली. सुरुवातीला त्यांच्या पातशहांचें सरदार नुसते लष्करी नोकरांसारखें असत हें महंमद कासीम व मलिक काफूर यांच्या उदाहरणांवरून दिसतें, पण लवकरच येथील सामाजिक व राजकीय संस्थांशीं त्यांना मिळवून घ्यावें लागलें व त्यांच्या सुभेदारांना येथील सरदारांचें स्थान मिळालें. शिवाजीनें व नंतरच्या मराठ्यांनीं ही पद्धती चालूच ठेवली. राज्यविस्तार मोठा झाला कीं

मनसबदारीशिवाय चालणेंच त्याकाळीं शक्य नव्हतें. श्री. निळकंठशास्त्री यांनीं " चोल साम्राज्या " विषयींच्या आपल्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं ' नायकतन ' किंवा ' नायनकर ' पद्धति या नांवानें जहागीर पद्धति प्राचीन चोलांच्या वेळींहि होती. *

जहागिरदारीच्या संस्थेचें प्राचीनत्व डॉ. चतर्जी + यांनीं लिहिलेल्या एका लेखावरून सूचित होतें. अशोकाच्या वेळीं पिंगल हा 'राजा' व 'तुषास्प' हा 'राष्ट्रीय' एकाच वेळीं सौराष्ट्रावर 'राज्य 'करीत होते. या घटनेचें विवेचन करतांना 'राजा' व 'राष्ट्रीय' यांच्या दर्जाबद्दल त्यांनीं बरीच चर्चा केली आहे. पिंगल हा जहागिरदार किंवा मांडलीक राजा असून तुषास्प हा सम्राटातर्फे नेमला गेलेला 'राष्ट्रीय' किंवा गव्हर्नर होता असें अनुमान त्यांच्या विवेचनावरून निघतें. हें बरोबर ठरल्यास प्राचीन काळापासून ब्रिटिश अंमलापर्यंत भारतीय समाजव्यवस्थेंतील या महत्वाच्या संस्थेचें सातत्य दिसून येईल.

राजाचे व सरंजामदारांचें करवसुलीचें काम करणारे मुलकी नोकर मामलतदार, मोकासदार, कमार्विसदार, मक्तेदार इत्यादि असत. त्यांनीं शेतकऱ्यांकडून किंवा गांवांकडून पीक आलें असेल त्याप्रमाणें धान्यवसुली करावयाची असे. याबाबतींत तोडरमल, मलिकंबर वगैरे अधिकाऱ्यांनीं वसुलीचे नियम केले व राजाच्या कमीअधिक लोभीपणानुसार या नियमांची बरीवाईट अंमलबजावणी होत असे. दादोजी कोंडदेव यांनीं पुणें प्रांतांमध्यें वसुलीच्या या नियमांची चांगली अंमलबजावणी करून रयतेला सुराज्याचें सुख दिलें, व त्यामुळेंच भोसले, जेधे प्रभृति जहागिरदार व वतनदार यांनीं राज्यस्थापनेसाठीं उठाव करतांच मावळेहि त्यांच्यामागें उभे राहिले.

* " चोलाज ", पान ६९३.

+ डॉ. डी. आर भांडारकर कॉमॉमरेशन व्हाल्यूम, " एसे ऑन पिंगल ", पान ३३८.

## वतन-संस्थेचें स्वरूप

राजा, जहागिरदार व राजाचे लष्करी व मुलकी अधिकारी या सर्वांना मिळून आपण राजसत्ता ही संस्था समजूं. तिचें उपरें स्वरूप आपण आतांपर्यंत पाहिलें. तिचा ग्रामसंस्थेशीं संबंध सरळ न येतां वतनदारांच्या मार्फत येत असे ही दुसरी महत्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. हे वतनदार म्हणजे देशमुख देशपांडे यांच्यासारखे प्रबळ पुढारी असत. वतनसंस्थेमध्यें गांवपाटील व गांवचे बलुतेदार यांचाहि समावेश होतो. वतनसंस्थेची वंशपरंपरेची पद्धति व ग्राम-संस्थेशीं तिचा असलेला अभेद्य संबंध लक्षांत घेतां ती अतिप्राचीन संस्था आहे, हें उघड दिसतें. 'देशमुख' ही पदवीच या वतनदारांचे प्राचीनत्व दर्शवितें. 'देसाई', 'पाळेगार', 'ओडियार' अशा नांवानें हे वतनदार सर्व दाक्षिण हिंदुस्थानभर पसरलेलें दिसतात.

वतनसंस्थेच्या प्राचीनत्वाबद्दल रा. राजवाडे यांचें मत असें आहे कीं महा-राष्ट्राच्या मूळ वसाहतकालाइतकी ही संस्था जुनी आहे. ( रा. मा. विलासचंपू, पान १८१ ) तसेंच 'राष्ट्रकूट साम्राज्याचा इतिहास' या पुस्तकांत डॉ. अळतेकर यांनीं राष्ट्रकूटांच्या काळांतील संस्थांचें वर्णन दिलें आहे. राष्ट्रपति, विषय-पति, भोगपति हे राजाचे अधिकारी असत, "त्यांच्या जोडीला देशपांडे, देशमूख यांच्यासारखें वंशपरंपरेनें काम करणारे लोकपक्षामधील अधिकारी असत," असें त्यांचें मत आहे, ( पान ७५ पहा ). वतनदारांना राजाचे नोकर न समजतां "लोकपक्षाचे अधिकारी" ही पदवी डॉ. अळतेकर यांनीं दिली आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. दुसऱ्या कांहीं लेखकांच्या लिखाणांत 'वतनें' व 'सरंजाम' यांच्यांतील फरक स्पष्ट मानलेला दिसत नाहीं, उदाहरणार्थ 'मराठे व इंग्रज' या रा. केळकर यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत इतिहासार्य खरे यांनीं "वतनें म्हणजे लष्करी सरंजामच नव्हेत काय?" असा प्रश्न केला आहे, ( पान १५ पहा ). वतनदार व सरंजामदार यांच्यातील फरक रा. राजवाडे यांनीं मात्र ठिकठिकाणीं स्पष्ट केला आहे. ( उदा. रा. मा. विलासचंपू, पान १०५ पहा ).

वतनदारीबद्दल शिवाजीची धृत्ति काय होती ? या प्रश्नाचें उत्तर आतां पाहूं. श्री. पेंडसे या बाबतींत असें म्हणतात कीं, शिवाजी वतनदार वर्गाच्या विरुद्ध होता व त्यानें वंशपरंपरा वतनें कोणाला दिलीं नाहींत. ('धर्म कीं क्रांति', पान ५३). वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, वतनदारी ही संस्थाच वंशपरंपरेवर भक्कम उभी असल्यानें वतनें नव्यानें देण्याची वेळ राजाला येतच नसे. तसेंच शिवाजीराजाचें झालें. त्यानीं वतनें दिलीं नाहींत आणि चालत आलेली वतनदारी नष्ट करण्याचेंहि त्यांच्या मनांत कधीं आलें नाहीं. मराठी राज्यांत वतनसंस्था अगदीं दृढमूळ होती व समाजाच्या अगदीं अंगवळणीं पडलेली होती. इतकेंच नव्हे तर जहागिरदारीपेक्षां वतनांचा मान शिवकाळांत मोठा होता व म्हणून वतनांचा लोभहि मोठा होता. खुद्द भोसले घराण्यांतील शहाजी, शिवाजी, संभाजी व राजाराम या चार छत्रपतींनीं मसूर व कऱ्हाडच्या देशमुखी वतनासाठीं सारखी धडपड केली व तसें करतांना त्या वतनाच्या मूळ मालकांच्या घराण्यांतील कांहीं पुरुषांचे प्राणदेखील घेतले, यावरून वतनांचें त्या काळांतील महत्त्व लक्षांत येईल.

अशाच तऱ्हेनें, शाहूनेंहि पिसाळ घराण्याकडे वंशपरंपरा असलेली वाईची देशमुखी घशांत घातली. मोरोपंत पिंगळे, रामचंद्रपंत अमात्य प्रभृति शिवाजीच्या अष्टप्रधानांनाहि वतनांचा हा लोभ अनावर होताच. अमात्यांनीं रचलेल्या आज्ञापत्रांत देशमूखांना "स्वल्प परंतु स्वतंत्र देशनायकच" असें गौरविलें आहे व त्यावरून वतनाच्या लोभाचें मूळ उघडकीस येते. "देशांत मुलकाचे पाटील, कुलकर्णी व देशमूख यांचें हातीं कुलरयत" असें सभासदाच्या बखरींत म्हटलें आहे. तेव्हां उपऱ्या राजांना, जहागिरदारांना किंवा अष्टप्रधानांना वतनदारीचे शाश्वत अधिकार श्रेष्ठ वाटावे यांत नवल नाहीं. यासंबंधींचें उत्तम व तपशीलवार विवरण श्री. शं. ना. जोशी यांच्या पुढील लेखांत आढळतें, व तें मला पूर्णतः मार्गदर्शक झालें आहे. 'शिवकालीन व शिवोत्तरकालीन वतनें'

जहागिरी' ( 'प्राथमिक शिक्षण' वर्ष १४, अंक ६ व ७), 'पाटिलकी वतन' ( भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष १३, अंक २ ), 'देशमुखी वतन' ( वरील त्रैमासिक, वर्ष २४ अंक २ ).

एका देशमुखानेंच त्या वेळच्या राजसत्तेचा क्षणभंगुरपणा व उपरेपणा तुच्छ मानून देशमुखीचा गौरव पुढील शद्वांत केला, "पांढरीवरील शतं भीष्म होऊन गेले असतील, सातपांचशें वर्षें वतनांवरी नांहीं तो आजी वतनावरी उभा राहिला. ... ... ऐसी ( काय ) गोष्टी आहे? ... ... वृत्तिवंत म्हणजे वतनदार हे येथील चिरस्थिर होत." ( शिवचरित्र साहित्य, खंड ३ पान ६११ ). हीच गोष्ट पुढील घटनेवरून दिसून येते.

इ. स. १७१८ मध्यें एका देशमुखी वतनाविषयींचें भांडण तोडण्यासाठीं सातारला सभा झाली. तिला शाहूमहाराजांचे अष्टप्रधान, १८३ अधिकारी, २७ सरदार मंडळी व अनेक देशमुख हजर होते. त्या सभेंत शाहूमहाराजांनीं वाईचे देशमूख म्हणून आपलें स्थान देशमुखांमध्यें घेतलें, प्रधान व सरदार मंडळी यांत घेतलें नाहीं. खुद्द सातारला सभा होऊन ही गोष्ट घडली, कारण छत्रपतींना 'पांढरीवरील भीष्म' होण्यापेक्षां 'काळीवरील शाश्वत देशमुख' गौरवाचें वाटलें.

देशमुखीचें व पाटिलकीचें वतन, तसेंच गांवच्या बलुतेदारांचीं बलुतीं, यांचें इतकें महत्व असण्याचें कारण हीं वतनें शाश्वत होतीं. ग्रामसंस्थेइतकींच हीं वतनें टिकाऊ होतीं व म्हणून औटघटकेच्या छत्रचामरांपेक्षां लोकांना तीं मोलाचीं वाटत. तसें पाहिलें तर वतनदारांनाहि जमिनीवर मालकी नव्हती. किंबहुना, त्यामुळेंच युरोपांतील जमीनदारांप्रमाणें प्रबळ होणें व रयतेला गुलाम किंवा भूदास बनवून शेतकऱ्यांच्या श्रमावर गबर होणें देशमुखांना शक्य नव्हतें. सरदारांच्या महत्वाकांक्षेला जशी मर्यादा नव्हती तसें देशमुखांचें नव्हतें, परंतु देशमुखाची शाश्वती सरदाराला नव्हती, मिळून या दोन्ही संस्था ग्रामसंस्थेला चिरडून टाकण्याइतक्या बळावूं शकत नव्हत्या.

ज्या उलाढाली होत त्या फक्त जहागिरदारीमध्यें व राजसत्तेंत होत. एखादा सरंजामदार बळावून स्वतःच्या डोक्यावर राजछत्र धरी, पण पुन्हां तो धुळीला मिळे. या आल्यागेल्या जहागिरदारांशीं व राजसत्तांशीं वतनदार कधीं नमून तर कधीं चढेलपणानें वागत, पण कांहीं झालें तरी तगून रहात. ग्रामसंस्थाहि अशाच चिवट व चिरंजीविच होत्या. आग, पूर, मोठमोठे दुष्काळ किंवा जाळपोळ करणारें सैन्य या सर्व आपत्ति येत व जात. पण गांवें बेचिराग झालीं तरी संकट परतलें कीं पुन्हां गांवठाणावर पंचायत जमे व अगदीं जुन्या पद्धतीनें गांव जसेंच्या तसें वसून चालूं लागे.

## ग्रामसंस्थेचें स्वरूप.

राजसत्ता व वतनसंस्था यांच्या बरोबरीची तिसरी संस्था म्हणजे वरील चिरंजीवि ग्रामसंस्था. या संस्थेचें गौरवपूर्ण वर्णन लोकांना आतां माहीत झालें आहे. एकच गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे झालें कीं गांवांच्या एकंदर कारभारांत आधुनिक पद्धतीची लोकशाही किंवा सामुदायिक जीवन होतें असें मात्र नाहीं. सर्व वंशपरंपरेवर चालत असे व 'पंचायती'ना असलेले अधिकार आजच्या अर्थानें लोकशाही स्वरूपाचे नव्हते. 'पंचाईत करणें' या शब्दालाच जो अर्थ चिकटून बसला आहे त्यावरून पंचायतींची वागणूक बरेच वेळीं त्या काळच्या न्यायालाहि सोडून असे. व गांवांतील पाटील व त्यांतल्यात्यांत सधन शेतकरी यांच्या मुठींत 'पंचायत' होती असें दिसून येतें.

अशा या ग्रामसंस्थेला वतनसंस्था व राजसत्ता यांच्याकडून उपसर्ग पोचे, परंतु ती नाहिशीं होत नसे. बहुजनसमाजाचें आचारधर्म, जातिभेद, धार्मिक कल्पना, लोकभाषा व वाङ्मय वगैरे गोष्टी या ग्रामसंस्थेच्या कवचांतच सुखरूप रहात. उलट, देशमूख व जहागीरदार यांचा मुसलमानांसारख्या परधर्मीयांशीं संबंध येतांच धर्मांतरें घडूं लागल्याचें दिसून येते. राजकर्त्यांशीं संबंध येऊन या वरिष्ठवर्गीय लोकांची भाषाहि लोकभाषेपासून भ्रष्ट झालेली आढळतें. पोषाख, भाषा व धर्म इत्यादि बाबतींत शिवकालीन जहागीरदार व देशमुख यांनीं मुसलमानांचें

पुष्कळच अनुकरण केलें होतें, परंतु बहुजनसमाजमात्र परंपरागत भाषा, संस्कृति इत्यादि गोष्टींशीं अगदीं एकनिष्ठ राहिलेला आढळतो.

शिवकालीन स्वराज्यस्थापनेचें स्वरूप कोणचें होतें ? ती बहुजनसमाजाच्या जागृतीच्या बळावर केलेली राष्ट्रीय लोकसत्तावादी क्रांति किंवा शेतकरी-क्रांति होती कां ? यांचें उत्तर देण्यासाठीं शिवकालीन समाजांतील तीन मुख्य संस्थांचें स्वरूप आपण पाहिलें. त्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं त्या स्वराज्याचा उगम जहागिरदारींत होता. शिवकालीन स्वराज्यस्थापना शहाजींची जहागीर व कान्होजी जेधे यांच्यासारख्या 'जबरदस्त वतनदारांचा' पाठिंबा यावरच उभारली गेली व स्वराज्यस्थापनेच्या सुरवातीपासून जहागिरी व वतनें या पद्धति चालू होत्या. साम्राज्यविस्तारामुळें जहागिरींची प्रथाहि विस्तारली एवढेंच. स्थापन झालेलें 'स्वराज्य' हें 'सुराज्य' होतें, परंतु तें मराठ्यांचें राज्य नसून भोंसले कुळाचें राज्य होतें. 'तुझा तूं वाढवी राजा,' असें देवीच्या स्तवनांत समर्थांनीं म्हटलें आहे. या राजाचें राज्य वाढलें म्हणजे वेदशास्त्रोक्त धर्माच्या आचरणाला, स्नानसंध्येला, उदंड क्षेत्र व मोकळीक मिळेल अशी समर्थांची अपेक्षा होती. या राज्याच्या गादीसाठीं पुढें जे तंटे झाले त्यावरूनहि 'स्वराज्याची' कल्पना मुळांतच कशी 'राज्य' या एकाच केंद्रावर खिळलेली होती, तें दिसून येईल.

## स्वराज्यांतील भाषाशुद्धि

शिवाजीराजांनीं जी भाषाशुद्धि केली तिच्यावरूनहि शिवकार्याचें वरील स्वरूपच स्पष्ट होतें. 'अष्टप्रधानांना' फारशी नांवें रूढ होतीं त्या जागीं संस्कृत नांवें रूढ करण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु एवढ्या पुरतीहि भाषाशुद्धि करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. खुद्द मुख्य प्रधानाचें 'पेशवा' हे फारशी नांव शिवाजीच्या वेळीं व नंतरहि रूढ राहिलें, यावरून भाषाशुद्धीची त्यावेळींच काय कदर झाली तें दिसतें. खरी गोष्ट अशी आहे कीं फारशी शब्द काढून संस्कृत शब्द घालण्याची कल्पनाहि नेटानें कोणीच अंमलांत आणली नाहीं. शिवकालीन व

नंतरच्या मराठी राजकारणी पुरुषांचा पत्रव्यवहार बहुजनसमाजाच्या मराठी भाषेत नसून फारशी शब्दांचा भरणा असलेल्या मराठींत आहे. यावरून उघड दिसतें कीं सत्ताधारी मराठ्यांपैकीं सर्वजणच पूर्णपणें फारशीच्या आहारीं गेलेले होते, व **राष्ट्रीय भावनेनें मराठी भाषेची** जोपासना करण्याचें त्यांच्या मनांतहि आलें नाहीं.

याच्याउलट, बहुजनसमाजाची भाषा पहा! शिवाजीच्या राजकारणाविषयीं उदासीन असणारा तुकाराम अस्सल मराठी भाषेत कवित्व करीत होता व ज्ञानेश्वरांपासून ही शुद्ध मराठमोळा भाषेची परंपरा चालू होती व संतकाव्यानें समृद्ध होत होती. या भाषेला राजाश्रयाची गरज व अपेक्षा नव्हती. मराठी स्वराज्य आलें तरी बहुजनसमाजाच्या भाषेला विशेष आश्रय तो कोणचा मिळाला? खुद्द शिवाजीनें विद्यावृद्धीला उत्तेजन दिलें तें कोणतें? तर गागाभट्टाकडून कुमारिलभट्टांचा श्लोकवार्तिक ग्रंथ पुरा केला, 'राजव्यवहारकोश' रचविला, 'करणकौस्तुभ' नांवाचा ज्योतिषग्रंथ करविला व व्रजभाषेत 'शिवभारत' रचविलें.* हे चारहि ग्रंथ मराठींत नाहींत. उलटपक्षीं, ज्ञानेश्वरी किंवा इतर संतवाङ्मय किंवा महिकावतीच्या बखरीसारख्या बखरी यांना कोणच्याच मराठी राजांकडून खास राजाश्रय मिळाल्याचें दिसत नाहीं.

उपरी राजसत्ता व परंपरागत स्थिर ग्रामीण जीवन यांच्यातील विलगपणा व अंतर यावरून दिसतें. सत्ताधारी व बहुजनसमाज यांच्या वेगवेगळ्या दोन पातळीवर भिन्न दोन भाषा, वाङ्मय, आचारविचार इत्यादि असल्यानें एकराष्ट्रीयत्वाला जरूर असणारा एकजिनसीपणा मध्ययुगीन मराठी समाजांत उद्भवला नाहीं. तशा एकात्मतेची निव्वळ पूर्वतयारी होऊन तेथें समाजाचा गाडा खुंटून राहिला होता, असा एकंदर निष्कर्ष काढणें मला आवश्यक वाटतें.

"संयुक्त महाराष्ट्र"च्या चळवळीला राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान हवें. पण मध्ययुगीन मराठी इतिहासांतील घडामोडींमध्यें या राष्ट्रीयत्वाची पूर्वतयारी

* शिवचरित्र प्रदीप, पान २२४.

असली तरी प्रत्यक्ष बैठक आढळत नाहीं. हें राष्ट्रीयत्व ब्रिटिश अंमलानंतरच्या काळांत उदयास येत चाललें असून या राष्ट्रीयत्वाला लोकसत्तात्मक व प्रगतिशील स्वरूप देणें, हें आजच्या मराठी समाजाचें कर्तव्य आहे. इतिहासांतील घडामोडींचा चुकीचा अन्वयार्थ लागला तर मराठी साम्राज्याची किंवा हिंदुराष्ट्रीयत्वाची पूर्वपरंपरा मराठी राष्ट्रीयत्वाला आहे, असा गैरसमज उत्पन्न होतो म्हणून मराठ्यांच्या इतिहास व आधुनिक राष्ट्रीयत्व यांचा संबंध इतक्या तपशीलवार रीतीनें मी या प्रकरणांत चर्चिला आहे. तो मागील सर्व प्रकरणांतील विवेचनास पूरक ठरेल असें मला वाटतें.

★

परिशिष्ट

# महाविदर्भाचा प्रश्न

: १ :

" मध्यप्रांत व वऱ्हाड " या नांवाचा सध्यांचा प्रांत म्हणजे मुंबई, मद्रास वगैरे प्रांतांप्रमाणेंच भिन्नभाषी लोकांना जबरदस्तीनें एकत्र जखडून बनविलेला प्रांत आहे. सध्यांच्या प्रांताच्या ९८००० चौ. मैल क्षेत्रफळापैकीं ४५,००० चौ. मैल क्षेत्रफळाच्या भागांत मराठी लोकांची वसती आहे. एकंदर १,६८ लक्ष लोकसंख्येपैकीं ७४ लक्ष लोक मराठी बोलणारे आहेत. या प्रांतांतील हिंदी व मराठी लोकांची आपसांतील चुरस सन १९२१ पासून चांगलीच तीव्र होत गेली आहे. मराठी व हिंदी विभागांतील लोकांनाहि या प्रांताचे दोन स्वतंत्र प्रांत करून ही यादवी थांबवावी असें पूर्वीपासून वाटत आहे. सन १९२८ मध्यें हिंदी लोकांचा वेगळा " महाकोशल " नांवाचा प्रांत बनवावा अशी त्यांची मागणी नेहरू कमिटीनें मान्य केली. परंतु ब्रिटिशांनीं जुना प्रांतच कायम ठेवला. त्यामुळें व्यापार, शिक्षण, नोकऱ्या वगैरे सर्व बाबतींत हिंदी–मराठी वाद चांगलाच विकोपाला गेल्याचें दृश्य आतां दिसत आहे.

आर्यांचे प्रयत्न सोडले तर मराठी विभागाच्या वेगळेपणासाठीं महत्वाचा प्रयत्न म्हणजे सन १९३८ च्या ऑक्टोबरमध्यें मध्यप्रांतीय कायदेमंडळांत पास झालेला ठराव. या ठरावांत असें म्हटलें आहे कीं मध्यप्रांतांतून मराठी लोकांचा विभाग वेगळा करून त्याला " महाविदर्भ " हें नांव द्यावें व त्याला स्वतंत्र " गव्हर्नरचा प्रांत " मानण्यांत यावें.

या ठरावानंतर श्री. बापूजी अणे, बॅ. देशमुख व डॉ. खरे प्रभृति पुढायांच्या प्रयत्नानें सर्वपक्षीय अशी " महाविदर्भ सभा " ता. १८ ऑगस्ट १९४० रोजीं स्थापन झाली. या सभेचें कार्य चालू झालें त्याचवेळीं इकडे महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाची चळवळहि मूळ धरूं लागली होती. ता. २८ जानेवारी १९४० रोजीं मुंबई येथें "संयुक्त महाराष्ट्र सभेची" स्थापना झाली होती. साहाजिकच, एकीकडे मध्यप्रांतीय राजकारणांत लढा देत असतां महाविदर्भ सभेला संयुक्त-महाराष्ट्राच्या प्रश्नाशीं आपला संबंध काय तें ठरविण्याची वेळ आली.. मध्यप्रांतांतून वेगळा काढलेला " महाविदर्भ " प्रांत महाराष्ट्रांत सामील न होतां वेगळाच संसार थाटून राहील असें म्हणणें त्यावेळीं महाविदर्भ सभेला शक्य होतें, पण सुरवातीपासून अशी सवत्या सुभ्याची भूमिका महाविदर्भाच्या पुढाऱ्यांनीं घेतलेली आढळत नाहीं. उदाहरणार्थ, मुंबई येथील " संयुक्त महाराष्ट्र " सभेचें अध्यक्षस्थानच बॅ. रामराव देशमुख या महाविदर्भीय नेत्यानें स्वीकारलें होतें. आपल्या अध्यक्षीय भाषणांत बॅ. रामराव यांनीं स्पष्ट म्हटलें कीं, " ... तथापि या संघटनेचा ( महाविदर्भ—सभेचा ) अर्थ आम्हा वऱ्हाड नागपूरच्या महाराष्ट्रीयांना सर्व सलग महाराष्ट्राचें संयुक्तीकरण मान्य नाहीं असा जर कोणी लावीत असतील तर ती त्यांची चूक

आहे असें मी बिनदिक्कत म्हणूं शकतों. " अत्यंत बिकट परिस्थितींत अडकून पडलेल्या महाराष्ट्राच्या विविध भागांचें "एका झटक्यांत परीट-घडी थाटाचें एकीकरण " अव्यवहार्य आहे असें सांगून त्यांनीं असें सुचविलें कीं, " संयुक्त महाराष्ट्रांतील ( १ ) महाविदर्भ, ( २ ) मराठ-वाडा, ( ३ ) मध्यमहाराष्ट्र, ( ४ ) कोंकण व ( ५ ) मुंबई या पांच मुख्य उपप्रांतांना त्यांचें वैशिष्ट्य कायम ठेवतां येईल व त्यांच्या स्थानिक अडचणींचा परिहार स्थानिक साधनांनींच मुख्यतः करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडेल अशा पद्धतीनें या सभेचें कार्य एका प्रकारच्या छोट्या फेडरेशनच्या धर्तीवर सुरुवातीपासून करण्यांत येणार आहे. "

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस महाविदर्भ सभेचा पाठिंबाच आहे ही गोष्ट सभेनें ता.१८ ऑगस्ट१९४०रोजीं वर्धा येथें पास केलेल्या एका ठरावांतहि दिसून येते. ( ठराव ४ कलम ११ मध्यें ही भूमिका घेतलेली आहे. ) " महाविदर्भाची रूपरेखा " या श्री.मोहनी यांच्या पुस्तकांतहि अशीच भूमिका घेतली आहे कीं, "महाविदर्भ प्रांतरचना हें संयुक्त महा-राष्ट्राच्या प्रांतीय एकीकरणाचें ताबडतोब हातीं घेण्यासारखें एक व्याव-हारिक अंग आहे. " ( पान ४ पहा ). " संयुक्त महाराष्ट्रा "ची चळवळ व " महाविदर्भाची " चळवळ यांच्यांत विरोध असण्याचें कारण वस्तुतः नाहींच व प्रत्यक्षांतहि नेत्यांच्या उद्गारांवरून तसा विरोध आढळत नाहीं. परंतु अशा तऱ्हेचा विरोध कोठें कोठें सुप्त व प्रगटहि आढळतो हें नाकारून चालणार नाहीं. उदाहरणार्थ, " मातृभूमि " या प्रमुख वैदर्भीय पत्राच्या संपादिका सौ. प्रमिलाबाई ओक यांचे जळगांव येथील परिषदेतील उद्गार असे आहेत. " वऱ्हाडच्या जनतेचें शोषण होणार नाहीं अशा रीतीनें जर संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण झाला तर वऱ्हाडांतील भगिनींचा त्याला पाठिंबा राहील. " ( अधिकृत अहवाल,

पान २८ ) या उद्गारांत जी अविश्वासाची व वेगळेपणाची भावना आहे तिच्यामुळेंच श्री. देव, श्री. पोतदार व कांहीं वैदर्भीय पुढारी यांच्यांत खटके उडण्याचे प्रसंग आले आहेत.

महाविदर्भ व महाराष्ट्र यांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न यामुळें बराच अवघड झालेला होता व या प्रश्नाची नीट सोडवणूक होण्यावर संयुक्त महाराष्ट्र चळवळीचें भविष्य बरेंचसें अवलंबून होतें. या प्रश्नाचें महत्त्व सर्वांनाच जाणवलें असल्यामुळें याबाबतींत अकोल्याच्या, ता. ७–८–१९४७ च्या बैठकींत एक सर्वमान्य योजना निघूं शकली ही सुदैवाची गोष्ट आहे.

अकोला येथें मान्य झालेला ठराव मागें सन १९४० मध्यें बॅ. रामराव यांनीं सुचविलेल्या उपप्रांताच्या योजनेवर आधारलेला आहे, तो असाः—महाविदर्भ व पश्चिम महाराष्ट्र असे दोन उपप्रांत मिळून संयुक्तमहाराष्ट्र हा " गव्हर्नरचा प्रांत " होईल, प्रत्येक उपप्रांताला स्वतंत्र कायदेमंडळ व मंत्रिमंडळ राहील व त्यांच्याकडे कांहीं खातीं सोंपविलीं जातील, या दोन उपप्रांतांशिवाय आणखी उपप्रांतहि बनविण्याचा अधिकार प्रांताकडे राहील; प्रांताला एक गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर असेल, तसेंच प्रांतिक कायदेमंडळ व मंत्रिमंडळ राहील. सर्व प्रांतांतील लोकसंख्येंतून संख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधि निवडून प्रांतिक कायदेमंडळ बनविलें जाईल व उपप्रांतिक मंडळासाठीं वेगळ्या निवडणुका होतील. उपप्रांतांची वेगवेगळीं हायकोर्टें असतील, परंतु विशिष्ट अधिकार असलेले एक प्रांतिक ट्रायब्यूनल राहील. सर्व प्रांतांसाठीं एकच पब्लिक सर्व्हिस कमिशन असेल.

वरील ठरावांत उपप्रांताचा जो दर्जा मान्य केला आहे तो नीट लक्षांत घेतला पाहिजे. उपप्रांतांना जीं खातीं व जे अधिकार देण्यांत येणार

आहेत त्यांचें स्वरूप स्थानिक व दैनंदिन राज्यकारभाराचें राहील. उदाहरणार्थ, सार्वजनिक शांतता व आरोग्य तसेंच प्राथमिक व दुय्यम शिक्षण वगैरे बाबी अशा स्वरूपाच्या आहेत. परंतु, मोठाल्या इरिगेशनच्या कामें, खाणी, शेतकीचें संशोधन कार्य व पिकांच्या बाबतींत जमिनीची वांटणी, व्यापार व औद्योगिक योजना, बेकारीचें निवारण व अशाच सामाजिक योजना वगैरे गोष्टी उपप्रांतिक राज्यकारभाराच्या आंवाक्यांतील नसून त्यांत प्रांतिक सत्तेनेंच सर्व पाहिलें पाहिजे. अशी " प्रांतिक योजना " करणें महाराष्ट्राला शक्य आहे, कारण सर्व महाराष्ट्र हा नुसता भाषिकच नव्हे तर इतरहि सर्व दृष्टींनीं एकजिनसी आहे. " राजकीय एकात्मता " (पोलिटिकल होमोजिनिएटी) ही कसोटी प्रथम लावून महाराष्ट्राला एकात्म समजणें जरूर आहे, व मग अशा एकात्म महाराष्ट्रांत दोन किंवा जास्त उपप्रांत पाडणें शक्य आहे, ही तात्विक भूमिका आपण विसरून चालणार नाहीं.

उपप्रांताच्या योजनेचा वरील पाया नीट लक्षांत येण्यासाठीं कोल्हापूर व मुंबई या संभाव्य उपप्रांतांचा विचार करूं. अकोल्याच्या बैठकींत महाराष्ट्रांतील उपप्रांताची योजना प्रा. ध. रा. गाडगीळ यांनीं विस्तृतपणें मांडली. त्यांनीं " कॉन्स्टिटयूशन ऑफ फेडरेटिंग युनिटस् " या पत्रकांत शेवटीं मुंबईच्या प्रश्नावर आपलें मत दिलें आहे, तें असें कीं, मुंबईसारख्या शहराला महाराष्ट्रापासून वेगळें तोडून त्याचा 'प्रांत' बनविणें चूक आहे. मोठमोठ्या शहरासाठीं स्वायत्त अशा कॉरपोरेशन्स स्थापन करण्याची प्रथा आहे. तिचाच येथेंहि अवलंब करावा. मुंबईचा वेगळा उपप्रांत बनविण्यासंबंधीं मात्र त्यांनीं आपलें अनुकूल मत दिलें आहे. सारांश, उपप्रांतांचा दर्जा मुंबईला दिल्यानें मुंबई हा महाराष्ट्राचाच एक अवयव राहून तेथील दैनंदिन कारभारांत स्थानिक लोकांना स्वायत्तता मिळू

शकते. श्री. डाह्याभाई पटेलप्रभृति लोकांची मागणी मात्र अशा स्वायत्ततेची नसून महाराष्ट्रापासून विलग व स्वतंत्र राहण्याची आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

कोल्हापूर व शेजारचीं कांहीं संस्थानें यांना संयुक्तमहाराष्ट्रांत सामील कशीं करावयाचीं हा नवा प्रश्न आहे. या संस्थानांतील राजसत्तेचा नाश न होतां जवळजवळ निरंकुश राजसत्ताक पद्धतीचीं हीं राज्यें महाराष्ट्रांत येत आहेत. यांनाहि उपप्रांताचा दर्जा देणें आवश्यक होणार आहे. त्यांतल्यात्यांत सुदैवाची गोष्ट अशी कीं, महाराष्ट्रांत या राजसत्ताक उपप्रांताचें स्थान फार गौण राहणार आहे. उलट, केरळच्या संयुक्त राज्यामध्यें पाहिलें तर तेथें कोचीन, त्रावणकोर व मलबार या तीन उपप्रांतांचा मिळून " संयुक्त केरळ " बनणार, व तेथील दोन राजसत्ताकांना मिळून एकंदर केरळवरच वरचष्मा ठेवणें सोपें होणार आहे. भाषावार लोकसमूहांचीं संयुक्त राज्यें बनवावयाचीं ठरलीं कीं, आजच्या परिस्थितींत हा प्रश्न कसा उद्भवेल हें केरळ, कर्नाटक, गुजराथ वगैरे सर्व लोकसमूहांच्या बाबतींत स्पष्ट दिसतें. केरळ, गुजराथ इत्यादि राज्यांना " उपसंघ " मानून या सर्वांचें संघराज्य म्हणजे हिंदी संघराज्य, असें प्रतिपादन डॉ. पट्टाभिसितारामय्या यांनीं केलेलें आहे. (" सरिता ", सितंबर १९४६, " प्रांतों का पुनर्विभाजन " हा लेख पहा. ) अशा या उपसंघांनाच आपण " संयुक्त " महाराष्ट्र, केरळ, गुजराथ म्हणत आहोंत. या उपसंघाचे घटक म्हणजेच उपप्रांत. आजचीं संस्थानें हीं अशा तऱ्हेनें, उपप्रांतांचें रूप घेऊन, नव्या प्रांतांमध्यें टिकून राहूं पाहतील. या भविष्यकालीन धोक्याकडे पाहून आपल्याला उपप्रांतांचा दर्जा व त्यांचें संयुक्त प्रांताशीं ( राष्ट्राशीं ) नातें नीट खंबीरपणानें व कांटेकोरपणानें ठरविलें पाहिजे.

महाविदर्भसभेचा मध्यप्रांतीय राजकारणांतील लढा संपला व तेथून वेगळें निघतां आलें कीं, उपप्रांत म्हणून तावडतोब संयुक्तमहाराष्ट्रांत सामील होतां येईल व मग महाराष्ट्रापुढील लोकशाहीच्या विकासाचे व प्रगतीचे सर्व प्रश्न सर्वांना एकत्र बसून सोडवावे लागतील. आज त्या सहकार्याचा पाया अकोला येथें घातला गेला आहे. परंतु, गोवें, मराठवाडा, कोल्हापूर वगैरे भावि उपप्रांतांचा व मुंबईचा प्रश्न आपल्यापुढें आहे. या सर्व विभागांतील जनतेमध्यें स्वायत्ततेसंबंधीं जी आकांक्षा असेल ती पुरी झालीच पाहिजे, तेंच लोकशाहीला धरून आहे; पण स्वायत्ततेच्या नांवाखालीं या विभागांतील संस्थानिक किंवा नवे मिरासदारवर्ग नुसती स्वतःची मिरास बाळगून ठेवूं पाहतील, हा धोका लक्षांत ठेवला पाहिजे. तो धोका टाळण्याचा खरा मार्ग म्हणजे संयुक्तमहाराष्ट्राच्या लोकशाही-प्रधान ध्येयाचें व राज्याचें स्वरूप या सर्व विभागांतील शहरीं व ग्रामीण जनतेंत झपाट्यानें समजावून दिलें पाहिजे. हें कार्य सं. म. परिषदेकडून न झालें, तर अकोल्यास मान्य झालेल्या उपप्रांतयुक्त संयुक्त महाराष्ट्राच्या योजनेची फुटीरपणामुळें वाताहात होईल.

★

परिशिष्ट

# महाराष्ट्रांतील अल्पसंख्याक

: २ :

एकात्म व एकराष्ट्रीय भारतीय राज्याचें ध्येय ज्या लोकांच्यापुढें होतें, आणि आजहि आहे, त्यांना अल्पसंख्याकाचा प्रश्न मोठा बिकट वाटणें साहजिक आहे. अल्पसंख्याक जमाती राष्ट्रीय एकात्मतेला घातुक ठरतात असें त्यांना वाटतें. आज ब्रिटिशांनीं लादलेल्या फाळणीमुळें तर अल्पसंख्याक लोकांचें अस्तित्व ही एक आपत्ति व धोका आहे असें अनेकजणांना वाटत आहे.

पण खरें पाहतां एखाद्या राष्ट्रांत अल्पसंख्याक लोक असणें हें त्या देशाचें सुदैव आहे. त्या राष्ट्राच्या संस्कृतीला त्यामुळें बहुविधपणा येतो. अल्पसंख्याक लोक मूळचे ज्या परराष्ट्रांतील असतील किंवा ज्या परकीय संस्कृतींतील असतील त्या राष्ट्रांशीं व संस्कृतीशीं बंधुभाव वाढविण्यास त्यामुळें मदत होते. तसेंच, राष्ट्रांतील अंतर्गत व्यवहार लोकसत्तेच्या पद्धतीनें कितपत चालले आहेत याचें मोजमाप करण्याचें तें एक साधन उपलब्ध होतें.

महाराष्ट्रांतच पहा ! येथील अल्पसंख्याक लोकांचा मराठी समाजापासून वेगळेपणा आहे तो किती विविध प्रकारचा आहे ! मराठी बहुजनसमाजापेक्षां धर्मानें अगदीं वेगळे असे खिश्चन व मुसलमान लोक आहेत; हिंदू जातिभेदामुळें ज्यांना एका अल्पसंख्य जमातीचें स्वरूप आलें आहे असा महार समाज आहे; सह्याद्रीच्या जंगलांतला दीड लाख वारली समाज व असेच इतर वन्य समाज आहेत; मराठी राजांच्या सत्तेखालील ७ लक्ष कानडी समाज मूळ कर्नाटकांत जाऊं शकला तरी महाराष्ट्रांत बराच कानडी समाज उरेलच; खानदेशमध्यें अहिराणी भाषिकांचा समाज मोठा आहे; तसाच कोंकणी भाषिकांचा प्रश्न आहे. या सर्व धार्मिक, भाषिक इत्यादि वेगळेपणाच्या जोडीला नागपूर, वऱ्हाड, गोवें व मराठवाडा येथील समाजांमध्यें वेगळ्या राजवटींमुळें आलेल्या तुटकपणाच्या व स्वायत्ततेच्या भावनेचा प्रश्न आहे.

शिवाय अल्पसंख्याक लोकांपैकीं संख्येनें अगदींच अल्प परंतु आर्थिक व राजकीय जीवनांत फार मोठें स्थान असलेले कांहीं समाज आहेतच. गुजराथी, पारशी वगैरे लोकांचा प्रश्न या दृष्टीनें महत्त्वाचा आहे.

या सर्व अल्पसंख्याक लोकांनीं महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवनांत विविधपणा आणलेला आहे. तो टिकवावयास पाहिजे. एकजिनसीपणापेक्षांहि अशी विविधता राष्ट्राला जास्त बळकटी आणूं शकते. तसेंच या सर्व अल्पसंख्याक जमातींशीं मराठी समाजानें योग्य वागणूक ठेवली तर महाराष्ट्राबाहेरील कानडी, गुजराथी वगैरे राष्ट्रीय लोकसमूहांशीं व खिश्चन, मुसलमान वगैरे धार्मिक लोकसमूहांशीं स्नेह ठेवणें आपल्याला अगदीं सुलभ होईल.

अल्पसंख्याकांच्या बाबतींत योग्य असें धोरण ठेवणें महाराष्ट्राला शक्य

होईल. पण त्यासाठीं आधुनिक, लोकसत्तात्मक व धर्मनिरपेक्ष राष्ट्रीयत्वाच्या पायावर " संयुक्त महाराष्ट्रा "ची उभारणी झाली पाहिजे. हें ध्येय उच्चारण्यास सोपें आहे, पण अंमलांत आणावयाचें म्हणजे स्वतःच्या पूर्वग्रहांची हकालपट्टी करणें जरूर आहे. शिवाय आपल्याच समाजांत लोकसत्तात्मक धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला विरोधी असे विचारप्रवाह व सामाजिक वर्ग आहेत. सतत व निकराचा मारा करून या विचारांचा पगडा नाहींसा केला पाहिजे.

अल्पसंख्याकांच्या बाबतींत लोकशाहीचें धोरण कोणचें हें जास्त विशद करणें व महाराष्ट्रांतील सर्व अल्पसंख्याकांच्या बाबतींत तपशीलवार विचार करणें जागेच्या अभावीं मला शक्य नाहीं. ढोबळमानानें असें म्हणतां येईल कीं, या जमातींचा वेगळेपणा व वैशिष्ट्य टिकवून धरण्याची दृष्टि लोकशाहीच्या अभिमान्याची असते, उलट त्यांचा वेगळेपणा नाहींसा करून त्यांना आपल्यासारखे बनविण्याची वृत्ति लोकशाहीच्या विरोधकांची असते. वेगळेपणा नाहींसा करण्यासाठीं जुलूम केला नाहीं व हळूंहळूं वेगळेपणाला संक्षेप देत गेलें तरी लोकशाहीच्या तत्त्वाशीं प्रतारणा होतेच. मुख्य तत्त्व असें कीं अल्पसंख्याकांचे शासक किंवा पालक बनण्याऐवजीं त्यांचे मित्र बनणें जरूर असतें आणि त्यांच्या स्वायत्त जीवनाची हमी राष्ट्रानें घ्यावी लागते.

दोन लक्ष अहिराणी भाषिकांचा प्रश्न घ्या. ही भाषा नाहींशी झाली व हे सर्व मराठी बोलूं लागले तर काय हरकत आहे ? त्यामुळें त्यांचे मराठी समाजाशीं दळणवळण वाढेल व फायदाच होईल ! हा युक्तिवाद वरवर चांगला दिसतो, पण यांतच दडपशाहीच्या वृत्तीचीं बीजें नकळत लपलेलीं आहेत. उलट लोकसत्तावादी म्हणतील कीं, या विभागांतील

लोकांना आपली भाषाच बोलूं द्यावी, तिचें वाङ्मय आज नाहीं तर उद्यां निर्माण होईल, सर्व शिक्षण लोकभाषेंतूनच द्यावें, वगैरे.

असाच कोंकणी भाषिकांचा प्रश्न आहे. यासंबंधीं अलीकडे जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून कोंकणविभागाच्या स्वायत्ततेविषयीं तेथील भाषाभिमान्यांच्या मनांतील तळमळ दिसून येते. उदाहरणार्थ, श्री. विंत्रय हा लेखक म्हणतो कीं, चाळीस लक्ष कोंकणी भाषिकांना "महाराष्ट्रांत व कर्नाटकांत वांटून घेणें" अन्यायाचें होईल. त्यांना स्वतंत्र बनूं दिलें पाहिजे. ("भारतज्योति," जुलै ६, १९४७ चा अंक पहा). दोन लक्ष अहिराणी भाषिकांपेक्षां चाळीस लक्ष कोंकणी भाषिकांचा प्रश्न बराच वेगळा आहे. एवढ्या मोठ्या समाजाला महाराष्ट्रांत सामील होतांना उपप्रांत म्हणून स्वायत्त रहावयाचें असल्यास तें महाराष्ट्रीयांनीं मान्य केलें पाहिजेच. मागें, सहाव्या प्रकरणांत, वऱ्हाड व मराठवाडा येथील लोकांबद्दल जो न्याय सांगितला तोच या मोठ्या लोकसमूहाबद्दलहि मानावा लागेल. कांहीं काळानें कोंकणी समाजालाच महाराष्ट्रांत पूर्णतः सामील व्हावें असें वाटेल व तसा निर्णय त्यांनीं शक्य तेवढ्या लवकर घ्यावा असें मात्र आपण म्हटलें पाहिजे. कोंकण व घाटावरील महाराष्ट्र यांच्यातील संबंध एकात्मतेचे असणें कां जरूर आहे हें दाखविणाऱ्या कांहीं घटना आजच घडत आहेत तिकडे कोंकणी लोकांचें लक्ष वळणें जरूर आहे. मुंबईबद्दल निघालेला वाद घ्या. या वादांत मुंबईला "सार्वजनिक" बनवूं पहाणाऱ्या मुत्सद्यांना उत्तर देतांना कोंकण व देश येथील सर्व लोकांची एकजूट होत आहे व तें रास्तच आहे. मुंबईच्या वैभवाची इमारत कोंकणी मजुरांच्या श्रमावर उभी आहे, तसाच तिला सातारा, नगर, नाशिक इत्यादि घाटावरील जिल्ह्यांतील लोकांच्या श्रमाचा आधारहि आहेच. सारांश, मुंबईची गरज व तिचें महत्त्व कोंकण व घाटावरील महाराष्ट्र या दोन्ही

विभागांना आहे. या बाबतींत जो विचार व कदाचित् लढा करावा लागेल त्यांत समभागी झाल्यानें एकात्म, निदान, संयुक्त, महाराष्ट्रांत सामील होणें कोंकणी लोकांना आवश्यक वाटेल.

दुसरा प्रश्न मालवण व कोल्हापूर यांच्या संबंधाचा घ्या. या प्रश्नाला श्री. अण्णासाहेब लट्ठे यांनीं नुकतीच चालना दिली आहे. मालवणचा कबजा कोल्हापूरकरांना मिळावा या मागणीला कोणाकोणाचा, कसा व कां पाठिंबा मिळेल तें सांगवत नाहीं. परंतु, सामान्य जनतेला ही सूचना कधींच मान्य होणार नाहीं. संस्थानी मुत्सद्यांकडून ज्या अनेक हालचाली यापुढें होणार आहेत, त्यांची ही सलामीची चुणूक आहे. या बाबतींत संस्थानाबाहेरील कोंकणी व इतर मराठी जनतेनें एकजुटीनें प्रतिकार करणें निकडीचें आहे, व या सहकार्यामुळेंहि कोंकणी समाजाला महाराष्ट्राविषयीं आत्मीयता वाटूं लागणें साहजिक आहे. वऱ्हाड व मराठवाडा येथील जनतेप्रमाणेंच कोंकणी समाजहि खऱ्याखुऱ्या एकात्मतेच्या भावनेनें महाराष्ट्रांत सामील होणें हें "संयुक्तमहाराष्ट्र परिषदेच्या" चळवळीला लोकशाहीचें उदार स्वरूप येण्यावर सर्वस्वी अवलंबून आहे.

वारली समाजाचा प्रश्न घ्या. त्यांना वेगळें न समजणें व त्यांच्या जीवनाची स्वायत्त अशी वाढ करण्याबद्दल उदासीन राहणें योग्य नाहीं. महाराष्ट्रांत समजा व्यापक परंतु भोंगळ लोकशाही नांदत राहिली व सर्वांना एकसारखें मानण्यांत आलें तर काय होईल? वारल्यांच्या प्रदेशांत पुढारलेले मराठी लोक घुसतील व त्यांच्यावर कुरघोडी करतील. ही अनुमानाची गोष्ट नाहीं, कारण गेल्या पांचपन्नास वर्षांत हें प्रत्यक्ष घडलेंच आहे.

मराठी मुसलमान समाजाचे कांहीं प्रश्न आतां बिकट झाले आहेत.

पाकिस्तानच्या प्रचारामुळें केवळ धार्मिकच नाहीं तर ' राष्ट्रीय ' वेगळे-पणाची जाणीव त्यांच्यांत आली आहे. मुसलमान तेवढे एका राष्ट्राचे असा चुकीचा सिद्धान्त त्यांच्यांत पसरला आहे. त्यांच्या या गैरसमजाचें उच्चाटन झालेंच पाहिजे. त्यासाठीं मुसलमानांना समानता किंवा धार्मिक अभय देऊन भागणार नाहीं. " पोटापाण्याच्या " प्रश्नाकडे त्यांचीं मनें वळवून त्यांना पाकिस्तानी राष्ट्रवादापासून परावृत्त करण्याचा प्रयत्नहि पुरे पडणार नाहीं. ह्या गोष्टी केल्या पाहिजेतच, पण मुख्य बाबी ह्या नव्हेत. त्यांच्या चुकीच्या पॅनइस्लामी राष्ट्रवादाची जागा राष्ट्रीय भावनेनेंच भरून निघूं शकेल. ती मोकळी राहूं शकणार नाहीं किंवा तिला आर्थिक समतावादानें भरून काढतां येणार नाहीं. ही दुसरी राष्ट्रीय भावना म्हणजेच महाराष्ट्र या राष्ट्राबद्दलचें प्रेम. संयुक्त बहुराष्ट्रीय भारताचें चित्र त्यांनीं पाहिलें तर एकात्म भारतांत अल्पसंख्याक जमात म्हणून भरडले जाण्याची त्यांची भीति नाहींशी होऊन ते महाराष्ट्राचे खरेखुरे नागरिक बनतील. चीन, युगोस्लाव्हिया वगैरे देशांतील मुस्लीमांनीं किंवा अनेक राष्ट्रांत पसरलेल्या यहुद्यांनीं आपापल्या वसतीच्या राष्ट्रालाच आपलें राष्ट्र मानलें आहे. तीच गोष्ट मराठी मुस्लीम करतील यांत शंका नाहीं.

शेवटीं, गुजराथी वगैरे अल्पसंख्याकांचा प्रश्न पाहूं. ब्रिटिश वर्चस्वामुळें देशाची कृत्रिम अर्थरचना झाली आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील शहरी उद्योगधंदे व व्यापार अशा अल्पसंख्याकांच्या मुठींत गेला आहे. खेड्यांतूनहि दुकानदारी व सावकारी अशीच मराठेतरांकडे आहे. मुंबईसारखें मराठी शहर " सार्वजनिक " समजावें असें म्हणण्याचें धारिष्ट ह्या अल्पसंख्याकांकडून होत आहे.

यावर उपाय हाच कीं मुंबईतील व इतर ठिकाणच्या मराठेतर

विभागांना आहे. या बाबतींत जो विचार व कदाचित् लढा करावा लागेल त्यांत समभागी झाल्यानें एकात्म, निदान, संयुक्त, महाराष्ट्रांत सामील होणें कोंकणी लोकांना आवश्यक वाटेल.

दुसरा प्रश्न मालवण व कोल्हापूर यांच्या संबंधाचा घ्या. या प्रश्नाला श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांनीं नुकतीच चालना दिली आहे. मालवणचा कब्जा कोल्हापूरकरांना मिळावा या मागणीला कोणाकोणाचा, कसा व कां पाठिंबा मिळेल तें सांगवत नाहीं. परंतु, सामान्य जनतेला ही सूचना कधींच मान्य होणार नाहीं. संस्थानी मुत्सद्यांकडून ज्या अनेक हालचाली यापुढें होणार आहेत, त्यांची ही सलामीची चुणूक आहे. या बाबतींत संस्थानाबाहेरील कोंकणी व इतर मराठी जनतेनें एकजुटीनें प्रतिकार करणें निकडीचें आहे, व या सहकार्यामुळेंहि कोंकणी समाजाला महाराष्ट्राविषयीं आत्मीयता वाटूं लागणें साहजिक आहे. वऱ्हाड व मराठवाडा येथील जनतेप्रमाणेंच कोंकणी समाजहि खऱ्याखुऱ्या एकात्मतेच्या भावनेनें महाराष्ट्रांत सामील होणें हें "संयुक्तमहाराष्ट्र परिषदेच्या" चळवळीला लोकशाहीचें उदार स्वरूप येण्यावर सर्वस्वी अवलंबून आहे.

वारली समाजाचा प्रश्न घ्या. त्यांना वेगळें न समजणें व त्यांच्या जीवनाची स्वायत्त अशी वाढ करण्याबद्दल उदासीन राहणें योग्य नाहीं. महाराष्ट्रांत समजा व्यापक परंतु भोंगळ लोकशाही नांदत राहिली व सर्वांना एकसारखें मानण्यांत आलें तर काय होईल! वारल्यांच्या प्रदेशांत पुढारलेले मराठी लोक घुसतील व त्यांच्यावर कुरघोडी करतील. ही अनुमानाची गोष्ट नाहीं, कारण गेल्या पांचपन्नास वर्षांत हें प्रत्यक्ष घडलेंच आहे.

मराठी मुसलमान समाजाचे कांहीं प्रश्न आतां बिकट झाले आहेत.

पाकिस्तानच्या प्रचारामुळें केवळ धार्मिकच नाहीं तर ' राष्ट्रीय ' वेगळे-पणाची जाणीव त्यांच्यांत आली आहे. मुसलमान तेवढे एका राष्ट्राचे असा चुकीचा सिद्धान्त त्यांच्यांत पसरला आहे. त्यांच्या या गैरसमजाचें उच्चाटन झालेंच पाहिजे. त्यासाठीं मुसलमानांना समानता किंवा धार्मिक अभय देऊन भागणार नाहीं. " पोटापाण्याच्या " प्रश्नाकडे त्यांचीं मनें वळवून त्यांना पाकिस्तानी राष्ट्रवादापासून परावृत्त करण्याचा प्रयत्नहि पुरे पडणार नाहीं. ह्या गोष्टी केल्या पाहिजेतच, पण मुख्य बाबी ह्या नव्हेत. त्यांच्या चुकीच्या पॅनइस्लामी राष्ट्रवादाची जागा राष्ट्रीय भाव-नेनेंच भरून निघूं शकेल. ती मोकळी राहूं शकणार नाहीं किंवा तिला आर्थिक समतावादानें भरून काढतां येणार नाहीं. ही दुसरी राष्ट्रीय भावना म्हणजेच महाराष्ट्र या राष्ट्राबद्दलचें प्रेम. संयुक्त बहुराष्ट्रीय भार-ताचें चित्र त्यांनीं पाहिलें तर एकात्म भारतांत अल्पसंख्याक जमात म्हणून भरडले जाण्याची त्यांची भीति नाहींशी होऊन ते महाराष्ट्राचे खरेखुरे नागरिक बनतील. चीन, युगोस्लाव्हिया वगैरे देशांतील मुस्ली-मांनीं किंवा अनेक राष्ट्रांत पसरलेल्या यहुद्यांनीं आपापल्या वसतीच्या राष्ट्रालाच आपलें राष्ट्र मानलें आहे. तीच गोष्ट मराठी मुस्लीम करतील यांत शंका नाहीं.

शेवटीं, गुजराथी वगैरे अल्पसंख्याकांचा प्रश्न पाहूं. ब्रिटिश वर्चस्वामुळें देशाची कृत्रिम अर्थरचना झाली आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील शहरी उद्योगधंदे व व्यापार अशा अल्पसंख्याकांच्या मुठींत गेला आहे. खेड्यां-तूनहि दुकानदारी व सावकारी अशीच मराठेतरांकडे आहे. मुंबईसारखें मराठी शहर " सार्वजनिक " समजावें असें म्हणण्याचें धारिष्ट ह्या अल्प-संख्याकांकडून होत आहे.

यावर उपाय हाच कीं मुंबईतील व इतर ठिकाणच्या मराठेतर

लोकांशीं आपण मित्रत्वाचें धोरण ठेवलें पाहिजे. उदा. मुंबईचा गुजराथी साधारण समाज जर मुंबई महाराष्ट्रांतच रहावी असें म्हणूं लागला तर ती " सार्वजनिक " व अलग रहावी अशी मागणी करण्यांत गुजराथी व इतर भांडवलदारांचा कावा आहे हें चांगलेंच उघडकीला येईल. मुंबईचा साधारण गुजराथी समाज मुंबईला मराठी शहरच समजेल, किंबहुना आजहि समजतो. पण त्यासाठीं " संयुक्त महाराष्ट्रा " च्या परिषदेच्या व्यासपीठावरून नवोदित मराठी राष्ट्राच्या लोकसत्तात्मक व उदार भूमिकेची ओळख या अल्पसंख्याक समाजघटकांना करून दिली पाहिजे. कानडी, गुजराथी, तेलगू, मुसलमान इत्यादि लोकसमूहांच्या भवितव्याबद्दल परिषदेनें स्पष्ट व व्यापक प्रचार करण्याची अत्यंत जरूर आहे व निकडहि आहे.

★

परिशिष्ट

# महाराष्ट्र गीतें

: ३ :

डॉ. श्री. व्यं. केतकरांनीं मराठी काव्यासंबंधीं एक बिनचूक व महत्त्वाचा सिद्धान्त सांगितला आहे तो असा कीं त्याची वाढ राजाश्रयानें न होतां लोकाश्रयानेंच होत आली आहे. ( " महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण, " पान ६ ). याला अपवाद असण्याची शक्यता मराठेशाहीच्या काळांत होती, आणि स्वराज्यसंस्थापनेच्या काळांत मोठी वाङ्मयनिर्मिति झाली हेंहि खरें. या वाङ्मयनिर्मितीला स्वराज्यामुळें मोठें उत्तेजन मिळालें असेंहि कांहीं मराठी विद्वानांनीं मांडलेलें आहे. शिवकालीन राज्यविषयक घडामोडींना राष्ट्रीय उत्थापनाचें स्वरूप होतें असें मानणाऱ्या विद्वानांचा वरील समज असणें क्रमप्राप्त आहे. डॉ. केतकरांचें मतमात्र अगदीं वेगळें आहे. त्यांच्यामतें " महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापनेचा काल हा वाङ्मयाच्या दृष्टीनें महत्त्वाचा काल होता पण याचें कारण राजसत्ता होती असें म्हणतां येत नाहीं. तुकाराम हा संतकवींतील श्रेष्ठ कवि खरा पण त्याचें काव्य राज्य असतें अगर नसतें तरी तसेंच चाललें

असतें. रामदासांची गोष्ट तशीच आहे. वामनपंडित देखील राजाश्रयाचा कवि नाहीं. शिवाजीनें ज्या प्रकारच्या काव्यास आश्रय दिला तें काव्य संस्कृत किंवा व्रज भाषेंतील होय. " ( वरील ग्रंथ, पानें ५३–५४ पहा ).

डॉ. केतकरांनीं केलेलें निदान बरोबर आहे. असें होण्याचीं कारणें मीं सातव्या प्रकरणांत तपशीलवार मांडलीं आहेतच. जनसमाजाच्या संस्कृतीपासून राज्यकर्त्यांची संस्कृति विलग होती. ती संस्कृत किंवा फारशी भाषेच्या आहारीं चटकन् जाऊं शकणारी होती. उलट, बहुजनसमाजाची संस्कृति अगदीं स्थिर स्वरूपाची आणि वटवृक्षाप्रमाणें दृढमूल व विस्तारत जाणारी होती. तिच्या सांवलींतच मराठी वाङ्मयाची जोपासना शतकानुशतकें लोकाश्रयावर चालली होती. ह्या मूलभूत भूमिकेवरून मराठी काव्याच्या परंपरेकडे पाहणें जरूर आहे.

वरील भूमिका घेतली कीं एका प्रश्नाचें उत्तर चटकन् मिळतें. जुन्या मराठी काव्यांत राष्ट्राभिमानाचें एकहि काव्य कां नाहीं ? हा तो प्रश्न. त्याचें उत्तर असें कीं ज्या मराठी लोकसमूहाच्या आधारावर प्राचीन मराठी वाङ्मय वाढलें तो समाज राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें एकात्म झालेला नव्हता; विस्कळित ग्रामीण जीवनक्रमांत तो गुंतून रुतून पडलेला होता. त्याला नव्हती स्वत्वाची भावना व विजिगीषा नव्हती.

मराठी राज्य लयाला गेल्यावर कांहीं दशकांनंतर मराठी समाजाला एका नव्या तऱ्हेनें ही स्वत्वाची जाणीव झाली. ती जाणीव पारतंत्र्याच्या प्रतिकारासाठीं उत्पन्न झाली व या भावनेचा पहिला उद्गार म्हणजेच पहिलें मराठी राष्ट्रीय काव्य. सन १९०५ सालीं बॅ. सावरकरांनीं वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलेला " सिंहगडाचा पोवाडा " हें या आधुनिक

राष्ट्रीय काव्याच्या युगाचें अरुणगीत आहे, असें म्हणावयास पाहिजे. ऐतिहासिक घटनेवर आधारलेलें असलें तरी वस्तुतः तें आधुनिक राष्ट्र-गीतच आहे. नव्या मराठी राष्ट्राभिमानाच्या तरुण व जोमदार अभिनि-वेशामुळें त्या पोवाड्याला विलक्षण लोकप्रियता मिळाली व तेव्हांपासून सन १९२० पर्यंत अशा राष्ट्रगीतांची एक सतत परंपराच चालू राहिली. या सर्व काव्यामध्यें "रम्य भावी काळाची" आकांक्षा व तिचें अधिष्ठान म्हणून " दिव्य पूर्वाची " किंवा ऐतिहासिक वैभवाचीं स्तोत्रें गायलेलीं आढळतात. सन १९२० नंतर एकराष्ट्रीयत्वाचें तत्त्व प्रभावी झालें व महाराष्ट्रीय राष्ट्रगीतांची निर्मिति जवळजवळ थांबलीच, पण तोंपर्यंतचें " राष्ट्रीय मराठी काव्य हें महाराष्ट्रीयच होतें, " असें दिसून येईल. ( श्री. रा. श्री. जोग, "अर्वाचीन मराठी काव्य," पान २५० पहा. )

" महाराष्ट्रीय " काव्यरचनेच्या या काळांत पुष्कळ महाराष्ट्र–गीतें निर्माण झालीं. कोल्हटकरांचें गीत लोकप्रिय आहेच, शिवाय गोविंद-कवीचें " महाराष्ट्र–गीत, " श्री. तुळजापुरकरांची "महाराष्ट्र–भूपाळी," गडकऱ्यांचें " महाराष्ट्र–गीत, " " गोमंतक " काव्याच्या उत्तरार्धांतील श्री. सावरकरांचें महाराष्ट्रभाटाचें विजयगीत, आणि विनायकांचें " महाराष्ट्र–लक्ष्मी " वगैरे प्रसिद्ध गीतें आहेत. श्री. टेकाडे, सेनापति बापट प्रभृति लोकांचींहि बरींच महाराष्ट्र–गीतें आहेत.

या सर्व गीतांचा तपशीलवार अभ्यास करावयास हवा. पण जीं थोडीं गीतें मी वाचलीं आहेत, त्यांत दोन प्रवृत्ति मला दिसून आल्या, (१) त्यांतील महाराष्ट्रीय राष्ट्रवादाला मराठी साम्राज्यवैभवाच्या विझ-लेल्या दिव्यांतून विझतांना निघालेल्या धुराचा दुर्गंध येत आहे. अटक नदीचें पाणी प्यायल्यामुळें मराठी घोड्यांना जें स्फुरण आलें असेल त्याचा पडसाद या काव्यांतून उमटलेला आढळतो, आणि (२) या

काव्यांतून महाराष्ट्राच्या पलीकडे जाण्याची जी आक्रमक प्रवृत्ति आढळते ती हिंदुराष्ट्रवादाकडे झुकलेली आहे. (या प्रवृत्तीचा आधार घेऊन महाराष्ट्र—गीतांचें "हिंदुत्वनिष्ठ भारतीय" स्वरूप दाखविणारा एक लेख "वाङ्मयशोभे"च्या १९४५ च्या दिवाळी अंकांत श्री. ज. गं. करंदीकर यांनीं लिहिला आहे, तो पहा).

महाराष्ट्रीय राष्ट्रगीतांमध्यें दिसणाऱ्या या दोन प्रवृत्तींचीं एकदोनच उदाहरणें पुरेशीं होतील. मराठ्यांनीं अटकेवर झेंडे लावले या गोष्टीचा साभिमान उल्लेख श्री. कोल्हटकर व विनायक यांच्या कवितांतून अनेकदां आढळतो. ("यापुढें" ही विनायकाची कविता पहा). आक्रमक वृत्तीचा जास्त उघड आविष्कार गोविंदाग्रजांच्या "श्रीमहाराष्ट्रदेश" या कवितेंतील पुढील उद्गारांत दिसतो: कवि म्हणतो, "आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल, इकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल." आधुनिक लोकसत्ताक महाराष्ट्रीय राष्ट्रवादाचा पुरस्कार मी केला आहे. त्या दृष्टीनें, नव्या "संयुक्त महाराष्ट्रा"च्या चळवळीला अनुरूप असें गीत या जुन्या महाराष्ट्र—गीतांत आढळणार नाहीं. नव्या मराठी राष्ट्रवादाला अनुरूप असें राष्ट्रगीत आतां निर्माण झालें पाहिजे. त्यादृष्टीनें एक दोन गीतें मी रचलीं, तीं पुढें दिलीं आहेत. असे अनेक प्रयत्न अनेकांनीं केल्यावर त्यांतून विचार व कलात्मकता या दृष्टीनें चांगलें व उत्कट असें गीत तयार होईल, अशी मला खात्री आहे.

## नवें महाराष्ट्र-गीत.

( "तरुण भारताच्या " फेब्रुवारी १९४५ च्या अंकांत हें प्रसिद्ध झालें होतें. त्यांत बराच फेरफार करून हें दिलें आहे. )

तुटे शृंखला संपली काळरात
उदेली उषा लोकसत्ता महान्
मराठे मिळोनी उठा गर्जुनीया
महाराष्ट्र ही आमुची मायभू १
महासंपदा पूर्वजांनीं दिलेली
महाराष्ट्र–श्री शब्दरूपें वसे
अशी धीरगंभीर जी ज्ञानवाणी
असे लाभली मायबोली अम्हा २
पवाडे अम्ही गात ज्या पूर्वजांचे
महावीर ज्ञानी कवी संत ते
तसे निर्मिले आजही कर्मयोगी
महाराष्ट्रभूनें महानायक ३

* *

जरी संपली कालची काळरात
इथें ग्रासतो आज अंधेर कां ?
भिजे खड्ग रक्तांत हें बांधवांच्या
धडाडे कसा यादवी–अग्नि हा ! ४
जरी वीरभूचे अम्ही पुत्र सारे
जरी वारसा पूर्वजांचा महान्
फिरंगी निजामी अशा राजसत्ता
अजूनी अम्ही साहतों ह्या कशा ! ५

उपाशी इथें राबतों बारमास
असोनी अम्ही भूमिचे मालक
इथें कारखाने अम्ही चालवीतों
अम्ही अर्धपोटीं कसे राहतो ? ६

इथें हीन अस्पृश्य जाती म्हणोनी
कुणी भोगिती क्रूर कां यातना ?
इथें वारली ठाकुरांना वनांत
कशी गांजती मानवी श्वापदें ? ७

* *

उठा ! व्हा पुढारे ! मराठेच सारे
पुराण्या नव्या शृंखला भंगुया
चला निर्मुया हिंदवी लोकसत्ता
जिथें संस्कृति, धर्म, राष्ट्रें समान् ८

अम्ही पुत्र जे आपुल्या मायभूचे
जरी भोगितों आपदा भीषण
उठा ! वाट काढोनि निर्मू उद्यांचा
महाशक्तिशाली नवा भारत ९

अम्हां संगती नांदतीं बंधुराष्ट्रें
जशीं सिंध, बंगाल, कर्नाटक
अम्हा राष्ट्रकांचीच ही हिंदभूमी
महाशक्तिशाली करूं निस्तुला १०

चला मेळवूं तीन कोटी मराठे
दुज्या राष्ट्रिकांचे बनूं बांधव

उठा रे उठा रंजले गांजलेले
उद्यांचा महाराष्ट्र हा आपुला

*　　　　*

महाराष्ट्र होईल आनंदभूमी
महाराष्ट्र होईल स्वातंत्र्यभू
जिथें लोक आम्ही बनूं दंडधारी
जिथें न्याय हा एकला दंडक　　१२

---

## महाराष्ट्राच्या शेतकऱ्याचें गीत

शेतकरी मऱ्हाट–देशाचें

लाखकोटी आम्ही भाइ भाइ
करुन् दावूं आतां नवलाइ ॥ ध्रु ॥
नाना धर्मांचे जातीचे लोक
आम्ही मराठे सारेच एक
राखुं इमान खंबीर नेक
एकदिलाचं सैनिक हाइ—१
बोलि मराठी आमुची धीट
गोडि अमृतापरीस नीट
दावि उज्वल संस्कृति–वाट
ज्ञानमाऊली प्रेमळ हाइ—२
इथं समाधि ह्या संतांच्या
गडाकिल्ल्यांवरी वीरांच्या
आठवणींस जागून त्यांच्या
बलिदान करूं देशापायीं—३

पालवितात समृद्ध खोरी
कृष्णा भीमा तशी गोदावरी
जला उपमा नाहीच खरी
वीरमातेचं दूधचं हाइ—४
उंच पर्वत सह्याद्रीचा
मान मऱ्हाटि नरवीरांचा
धीर अढळ कीं राष्ट्राचा
अस्मानालाच खेटून जाइ—५
दऱ्याखोऱ्यांतला रानवारा
घोंघावतो असा हा भरारा
अन्यायाला हा बसे दरारा
क्रांतिगीतास गातच जाइ—६
किती सुंदर दर्याकिनारा
बागफळांचा कोंकण प्यारा
गडकिल्ल्यांचा वर पहारा
मायभूमीचि शोभाच लइ—७
मोठा मनोहर गोवा प्रांत
पोर्तुगीजाचि तेथ दहशत
अशी लावूं त्याची वासलात
जहाज् गांठायला फावायचं नाइ—८
घाटमाथ्याचा विस्तार थोर
जसं लोकांचं मन उदार
मराठ्वाड्याचं मराठ शूर
आतां गुलाम व्हायाच नाइ—९

भिजविली मी माझ्या घामान
वऱ्हाडांतली काळी जमीन
पिकवील ती कापूस–सोन
    धनी साऱ्याच आम्हीच हाइ—१०

निजामान हे रोखिल डोळ
जमविल सार दारुगोळ
माझ्या भाल्याच तिखट फाळ
    त्याला अजून ठाऊक नाइ—११

क्रांतिसैनिक हे कामगार
जागविल शहर न् शहर
खेड्यांतुन अम्ही मदतगार
    रक्त आमुच बी लाल हाइ—१२

आतां शेतकरी जागला सारा
नाहि वैऱ्यास कोठें निवारा
वाघ वारली झाला पुढारा
    मागं आतां बघायच नाइ—१३

भारताच्या दुज्या राष्ट्रांचं
शेतकरी हे साऱ्या धर्मांचं
सगेसोयरे बांधव अमुचं
    सारे मिळून करूं चढाइ—१४

हाति कुऱ्हाड पोलादी धार
तोडु जुलमाचं रानचं सार
लोकराष्ट्रांचं मंदीर न्यार
    आम्हा इथंच बांधायचं हाइ—१५

परिशिष्ट

: ४ :

# महत्त्वाच्या घटना

महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाची चळवळ बहुजनसमाजापर्यंत पोंचविण्यासाठीं महाराष्ट्राच्या आधुनिक राष्ट्रीय विकासाचा चित्रपट लोकांच्या डोळ्यांपुढें मांडला पाहिजे. त्यासाठीं खालील घटनांची तारीखवार यादी उपयोगी पडेल. ही यादी अगदीं तुटपुंजी व सदोष आहे. केवळ कल्पना येण्यापुरता तिचा उपयोग आहे. ह्याची जाणीव ठेवूनच ती दिली आहे.

**१. मध्ययुगीन महाराष्ट्राचा शेवट. (१८१८–१८६०).**

१८१८ पेशवाईचा शेवट.

१८२९ शनिवारवाडा भस्मसात.

१८४४ कोल्हापूरकर व सांवतवाडीकर यांचें अयशस्वी बंड.

१८४५ घाटावरील कोळी व नाशिकचा राघोजी अंग्रे यांचें बंड.

१८४९ सातारकरांचें राज्य खालसा.

१८५७ सातारा व कोल्हापूर येथें " शिपायांच्या बंडाचें " पडसाद.

१८६० हत्याराचा कायदा.

## २. जुन्या व अर्वाचीन महाराष्ट्रांतील संक्रमणकाळ (१८६०–१८७८).

१८७० मुंबई विश्वविद्यालयांत मराठीला मज्जाव.

१८७१ सार्वजनिक सभेची स्थापना.

१८७५ (१२ मे) शेतकऱ्यांचा सार्वत्रिक उठाव.

१८७९ विश्रामबागवाडा व बुधवारवाडा भस्मसात. प्रजासत्ताकासाठीं वासुदेव बळवंताचा सशस्त्र उठाव.

१८७८ मराठी ग्रंथकारांची न्यायमूर्तींनीं व लोकहितवादींनीं बोलाविलेली परिषद.

१८७८ कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचा मृत्यु.

## ३. अर्वाचीन महाराष्ट्राचें राष्ट्रीय उत्थापन (१८७८–१९०६).

१८८० मराठी शाकुंतलाचा नव्या मराठी रंगभूमीवर प्रयोग. न्यू इंग्लिश स्कूलची व केसरी आणि मराठा पत्रांची स्थापना.

१८८४ डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.

१८८५ राष्ट्रीय सभेची स्थापना.

१९०० न्यायमूर्ति रानडे यांचा मृत्यु.

१९०५ मराठी साहित्य-संमेलन स्थापना.

१९०५ " सिंहगडचा पोवाडा " प्रसिद्ध झाला. शिवजयंत्युत्सवाचा महाराष्ट्रांत व बंगालमध्यें प्रसार. भारतीय राजकारणांत महाराष्ट्राचें मानाचें स्थान. " अभिनव भारत " या जहाल राष्ट्रवादी संघटनेचें प्रभावी कार्य.

## ४. प्रांतिक व जातीय प्रवृत्तींची वाढ व एकराष्ट्रीय भारताच्या कल्पनेचा वाढता प्रभाव (१९०६–१९२७).

१९११ भाषावार प्रांतरचनेसंबंधीं श्री. अयंगार व शर्मा यांनीं मध्यवर्ती कायदेमंडळांत आणलेला ठराव.

१९११ (डिसेम्बर) श्री. न. चिं. केळकर यांचा "भाषा व राष्ट्रीयत्व" हा केसरींतील लेख. महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचें प्रतिपादन.

१९११ श्री. केळकर यांचा "हिंदु-राष्ट्रवादा" चा पुरस्कार करणारा लेख.

१९२१ कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केला व भाषावार प्रांतिक समित्या बनविल्या.

१९२६ विनोबा भावे यांचे "महाराष्ट्र–धर्मा"वर लेख.

१९२८ नेहरू कमिटीचा अहवाल. एकराष्ट्रीय भारताच्या तत्त्वाचें सार्वभौमत्व.

१९२०–२९ महाराष्ट्रीय टिळकपक्षीय पुढाऱ्यांचा अखिलभारतीय चळवळीशीं विसंवाद.

## ५. प्रांतिक स्वायत्ततेच्या आवरणांत महाराष्ट्रीय राष्ट्रवादाची वाढ (१९२८-१९३९).

१९२७ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना.

१९३०–३२ ब्राह्मणेतर पुढारी श्री. जेधे व मोरे यांचा कॉंग्रेसमध्यें प्रवेश.

१९३७- ३९ कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांतील घडामोडी. खरे प्रकरणाचा महाराष्ट्रीयांवर परिणाम. गुजराथी विरुद्ध मराठी आणि कानडी विरुद्ध मराठी "वादां"ना व्यापक स्वरूप.

१९३८ (ऑगस्ट) महाविदर्भ—स्थापनेचा ठराव मध्यप्रांतीय कायदे मंडळांत पास झाला.

## ६. " संयुक्त महाराष्ट्र " चळवळीला सुरुवात.

१९४० (जानेवारी २८) बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं " संयुक्त महाराष्ट्र सभेची " स्थापना.

१९४० (मे २४) डॉ. केदार यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें संयुक्त-महाराष्ट्र परिषदेचें अधिवेशन.

१९४० ( ऑगस्ट १८ ) " महाविदर्भ " स्थापन झाली.

१९४२ ( जून २९ ) " संयुक्त महाराष्ट्र " या विषयासंबंधीं श्री. माडखोलकर यांनीं पाठवलेल्या पत्रास गांधीजींचें सहानुभूतिपर पत्र.

१९४६ ( मे १२ ) श्री. माडखोलकरांचें बेळगांवच्या साहित्यसंमेलनांतील भाषण.

१९४६ ( मे २८ ) श्री. माडखोलकर यांचें मराठवाडा साहित्यसंमेलनांतील भाषण.

१९४६ ( जुलै २८–३० ) " **संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें** " **मुंबई येथील अधिवेशन.**

१९४६ ( सप्टेंबर ३० ) " सं. म. प "च्या घटनासमितीची सभा.

१९४६ ( ऑक्टोबर २१–३० ) श्री. देव व श्री. ध. रा. गाडगीळ यांचा नागपूर व वऱ्हाडमधील परिषदेच्या प्रचारासाठीं दौरा.

१९४६ ( मे ) महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीचा परिषदेसंबंधीं ठराव.

१९४७ ( एप्रिल १३ ) **पारिषदेचें जळगांव येथील अधिवेशन.**

१९४७ ( मे ५ ) महाराष्ट्र प्रांतिक किसान सभेचा परिषदेला पाठिंबा देणारा ठराव ( करंजी )

१९४७ ( मे १८ ) श्री. डाह्याभाई पटेल यांची मुंबईला वेगळें ठेवण्याची मागणी.

१९४७ ( मे ) मुंबई गिरणी कामगार यूनियनच्या परिषदेच्या कार्यासंबंधीं व मुंबईसंबंधीं ठराव.

१९४७ ( जून ) वऱ्हाडच्या भवितव्याबद्दल श्री. वल्लभभाई पटेल, श्री. अंबेडकर, श्री. अणे, श्री. वि. घ. देशपांडे प्रभृतींचीं वक्तव्यें.

१९४७ ( जुलै २२ ) महाराष्ट्रांतील ख्रिश्चनसमाजातर्फे संयुक्तीकरणाच्या चळवळीला पाठिंबा देणारें पत्रक.

१९४७ ( ऑगस्ट ७ ) अकोला येथें उपप्रांताच्या पद्धतीनें महाविदर्भ व पश्चिम महाराष्ट्र यांच्या संयुक्तीकरणाचा ठराव.

१९४७ ( ऑगस्ट १७ ) महाराष्ट्र प्रांतिक कम्यूनिस्ट पक्षाच्या अधिवेशनांत संयुक्तीकरणासंबंधीं ठराव.

★

परिशिष्ट

: ५ :

# "महाराष्ट्र-दर्शन" योजना

" संयुक्त महाराष्ट्र " परिषदेच्या तात्त्विक भूमिकेचा विचार करतांनाच आपण पाहिलें कीं नव्या महाराष्ट्राचें राष्ट्रीय ध्येय जर शेतकरी वर्गांत ताबडतोब पसरलें नाहीं तर परिषदेच्या कार्याला विस्तृत, सशक्त व स्थिर असा आधार राहणार नाहीं. साऱ्या शेतकरी वर्गाला नव्या महाराष्ट्राचें स्वरूप सर्वांगीण तऱ्हेनें समजाविणें हें अवघड काम आहे. तें करण्यासाठीं निरक्षर शेतकऱ्यांना महाराष्ट्राची कल्पना सुलभतेनें कशी द्यावयाची हा प्रश्न आहे. चित्रें, नकाशे इत्यादि साधनांनीं हें कार्य केलें पाहिजे. अशा साधनांनीं परिपूर्ण असें एक प्रदर्शन बनवून तें महाराष्ट्रांतल्या सर्व शहरांतून, गांवांतून व खेड्यांतून फिरतें ठेवल्यास परिषदेचें प्रचारकार्य झपाट्यानें होऊं शकेल. या प्रदर्शनासच " महाराष्ट्र—दर्शन " असें नांव मी सुचविलें असून त्याची अगदीं जुजबी व ढोबळ योजना मी पुढें मांडीत आहे.

या प्रदर्शनाचें भव्य व अंतिम स्वरूप मनःश्चक्षूंपुढें आणलें तर महाराष्ट्राच्या प्राचीनतम ज्ञात काळापासून तों अद्यावत् कालापर्यंत घडलेल्या सर्वच घडामोडींची संगतवार चित्रमय मांडणी त्यांत असली पाहिजे. परंतु सुरुवातीला आधुनिक काळापासूनच्या माहितीच्या जमावाजमवीला आपण लागावें. परिशिष्ट नंबर ४ मध्यें ज्या घटनांचा निर्देश आहे त्यांना धरून प्रथम चित्रें, नकाशे वगैरे बनविले तर पन्नाससाठ तक्त्यांचें एक प्रदर्शन थोड्या अवधींत बनवितां येईल. हळूंहळूं यांतच सुधारणा करून व भर टाकून आपल्याला जास्त व्यापक ज्ञान देतां येईल.

या प्रदर्शनांत, ( १ ) राजकीय जीवन, ( २ ) औद्योगिक जीवन, ( ३ ) लोकसंस्थांचें जविन, ( ४ ) इतर शेजारीं राष्ट्रांशीं व भारताशीं महाराष्ट्राचे संबंध, ( ५ ) मराठी वाङ्मयाचा विकास, असे विभाग सध्यां तयार करतां येतील. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनांतील प्रमुख व्यक्ति, ब्रिटनविरोधी लढ्यांत चिरस्मरणिय झालेलीं स्थळें, इत्यादि विविध माहिती चित्ररूपानें व नकाशांच्या साहाय्यानें जनतेपुढें मांडल्यास तिच्या मनांत महाराष्ट्राबद्दल एक साभिमान जागृति उत्पन्न होईल. अशा जागृतीवरच "संयुक्त महाराष्ट्र परिषदे"च्या कार्याची इमारत नीट रचली जाणें शक्य आहे.

औद्योगिक व शेतकी विभागांत महाराष्ट्रांतील साधनसंपत्तीची देऊन मराठी मजूर व शेतकरी यांच्या वर्गीय संघटनांचें कार्य, जेथें महत्वाचे लढे झाले त्या स्थळांचें नकाशावर चित्रीकरण, इत्यादि मार्गांनीं श्रमजीवि मराठी जनतेच्या मनांत नव्या महाराष्ट्राबद्दल आदर व अभिमान जागृत करतां येईल.

वाङ्मयीन विकासाचा चित्रपट समोर ठेवल्यानें साक्षर व सुसंस्कृत वर्गांना या चळवळींशीं एकरूप करतां येईल. विद्यार्थीवर्गाला या विभा-

गाविषयीं व इतर विभागांविषयीं कुतूहल व आस्था वाटल्यास प्रदर्शनाला लोकप्रिय करण्यास या वर्गांतून हजारों स्वयंसेवक स्वयंस्फूर्तीनें पुढें येतील.

ही योजना परिषदेनें अधिकृत रीतीनें पार पाडण्याचें ठरविल्यास महाराष्ट्रांतील सर्व पक्षांचे व सार्वजनिक संस्थांचें साहाय्य तिला मिळेल अशी मला आशा वाटते.

☆

परिशिष्ट

## महाराष्ट्रांत
# विद्यापीठ–स्थापनेची चळवळ : ६ :

महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा प्रश्न व महाराष्ट्रांतील विद्यापीठ–स्थापनेची चळवळ यांचा संबंध जसा निकटचा व जिव्हाळ्याचा आहे तसाच अगदी जुनाहि आहे; किंबहुना मराठी जनतेच्या राष्ट्रीयत्वाचा उदय, विकास व त्याला भोगावे लागलेले चढउतार यांचे स्पष्ट व सरळ परिणाम आपल्याला विद्यापीठासंबंधींच्या चळवळीच्या इतिहासांत दिसून येतात. महाराष्ट्रीयांमध्यें सन १८६० नंतर उदय पावलेली राष्ट्रीयत्वाची भावना ही नुसती आर्थिक व राजकीय स्वरूपाची नसून सर्वोदयाची व्यापक आकांक्षा होती, हें विद्यापीठाच्या या आकांक्षेवरून दिसून येतें.

सन १८८० पर्यंत मराठी सुशिक्षितांच्या राष्ट्रीयत्वाला स्पष्ट व कार्यक्षम रूप आलें व स्वतंत्र बाण्याचीं मराठी वृत्तपत्रें व शिक्षणसंस्था सुरू झाल्या. त्या वेळच्या शिक्षणतज्ज्ञाना प्रथम एक गोष्ट दिसली कीं "मुंबई-प्रांत" ही जशी जबरदस्तीनें बनविलेली आवळ्यांची मोट आहे तशीच

मुंबई विद्यापीठ ही देखील कृत्रिम चीज आहे. इंग्रजी या परभाषेतून मराठी, कानडी, गुजराती व सिंधी अशा चार लोकभाषा बोलणाऱ्या कोट्यावधि जनतेला शिक्षण देणें, हें या विद्यापीठाचें विपरीत ध्येय! अशा या विद्यापीठाऐवजीं आम्हांला खरेंखुरें लोकशिक्षणाचें ज्ञानकेंद्र हवें अशी मागणी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे प्रि. वा. शि. आपटे यांनीं तेव्हां केलेली आढळते. एका मानपत्रांत लॉर्ड री यांना उद्देशून ते म्हणतात:

" खऱ्या युनिव्हर्सिटींत लोकांच्या उपयोगी पडणारें शिक्षण मिळालें पाहिजे व असली युनिव्हर्सिटी आपण आपल्या कारकीर्दीत येथें स्थापाल व तींत प्रत्येक शास्त्रांत पारंगत असलेल्या शिक्षकांचाच काय पण उत्कृष्ट पुस्तकालयांचा, रासायनिक उपकरणांचा व सर्वसंग्रहालयाचा समावेश करून विद्यामृत प्राशन करण्यास उत्कंठित असलेल्या विद्यार्थ्यांची तृषा शांत करून, पुढें त्यांचें पोषण करणारी उपमाता निर्माण कराल अशी आशा आहे." ('केसरी', अग्रलेख, १६ जून १८८५).

किती स्पष्ट व विशाल दृष्टीनें महाराष्ट्राच्या विद्यापीठाची आवश्यकता त्या वेळच्या महाराष्ट्रीयांच्या मनाला पटली होती याची साक्ष वरील उताऱ्यांत पटेल. गेली बासष्ट वर्षें या ध्येयासाठीं मराठी विद्वानांची धडपड चालू आहे व जनताहि या ध्येयाकडे आपुलकीनें बघत आहे. परकीय सत्ताधाऱ्यांना या प्रश्नाचें महत्त्व कळत नव्हतें असें नव्हे; पण लोकजागृतीला आधारभूत होईल अशी कोणचीहि गोष्ट त्यांना मुद्दामच करावयाची नव्हती. सन १९०५ पासून सन १९२० पर्यंतचा काळ हा महाराष्ट्रीय राष्ट्रीयत्वाच्या प्रखर अभिमानाचा व धडाडीच्या कर्तृत्वाचा काळ होता. यासंबंधींचें विस्तृत विवेचन मी चौथ्या व पांचव्या प्रकरणांत केलेलें आहेच. त्या काळांत मराठी माध्यमांतून प्राथमिक शिक्षणापासून

उच्चतम शिक्षण व संशोधन–कार्य करण्याची ध्येयवादी परंपरा महाराष्ट्रांत निर्माण झाली व प्रा. विजापूरकर, इतिहासाचार्य राजवाडे यांच्यासारख्या विद्वानांनीं "मराठी विद्ये'चा पाया घातला. या काळांतच राष्ट्रीय शिक्षणाचे जे प्रयत्न झाले त्यांतून मराठी विद्यापीठाचा प्रश्न व मागणी जास्त नेटानें पुढें येऊं लागली व प्रा. ज. वि. ओक व प्रा. विजापूरकर यांनीं या प्रश्नाला पुष्कळ चालना दिली.

सन १९०५ पासून १९२० पर्यंतच्या या सर्व प्रयत्नांना यश तर आलें नाहींच, उलट सन १९२० नंतर राष्ट्रीयत्वाचें महाराष्ट्रीय स्वरूप मागें पडूं लागलें व एका 'भारतीय राष्ट्रवादाचा' प्रभाव जाणवूं लागला. या नव्या घटनेचा परिणाम महाराष्ट्रीय विद्यापीठाच्या चळवळीलाहि मारक झालाच. सन १९१७ मध्येंच मध्यवर्ती सरकारनें सॅलडर कमिशन नेमून हिंदी विद्यापीठांची सुधारणा व पुनर्रचना करण्याचें ठरविलें खरें, पण या पुनर्घटनेंतून महाराष्ट्रांत स्वतंत्र विद्यापीठ स्थापण्याची आशा उरली नव्हती. आपल्या भारतीय जीवनांत नव्या अखिलभारतीय स्वरूपाच्या राष्ट्रवादाचा प्रभाव इतका झाला होता कीं सर फिरोजशहा मेथांसारखे पुढारी महाराष्ट्राभिमानी विद्वानांना उघडपणें म्हणूं शकत होते कीं "राष्ट्रीय असें शिक्षणांत काय असूं शकते हेंच मला कळत नाहीं."

अशा रीतीनें काळ फिरला होता तरी आपल्या विद्वानांनीं मराठी विद्यापीठासाठीं धडपड चालू ठेवलीच. फरक एवढाच झाला कीं 'राष्ट्रीय शिक्षणाचा' स्वतंत्र सुभा उत्पन्न करण्याची तुटक व बहिष्कारवादी वृत्ति जाऊन सरकारी गोटांत शिरूनच पोखरीत रहावयाचें व आपल्याला अनुकूल लोकमत करीत धीमेपणानें ध्येयसिद्धीची वाट पहात रहावयाचें

असें नवें धोरण प्रा. पोतदार प्रभृति विद्वानांनीं स्वीकारलें. या धोरणाचा नमुना म्हणून सन १९१७ (जुलै २) च्या मुंबई इलाखा शिक्षण परिषदेंतील प्रा. धोंडो केशव कर्वे यांचा ठराव दाखवितां येईल. ह्या निमसरकारी परिषदेंत मोठ्या कडाक्याच्या चर्चेनंतर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पुरस्कर्त्यांनीं असा ठराव पास करून घेतला कीं मुंबई प्रांतांत **भाषानुसारी पांच विद्यापीठें** असावींत. याचबरोबर लोकमताला जागृत करण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांचें उदाहरण म्हणून सन १९२१ सालीं बडोदें येथील मराठी साहित्यपरिषदेच्या अधिवेशनांतील एक ठराव घेतां येईल. यांत म्हटलें आहे कीं ,' सर्व विद्या मराठींत शब्दमूल होऊन पक्क्या रुजाव्या व वाढाव्या '' यासाठीं मराठी विद्यापीठ स्थापन होणें जरूर आहे.

वर सांगितलेले प्रयत्न चालू होते, परंतु राजकीय जीवनाच्या वाढत्या वेगवान् प्रवाहांत पूर्वी समाविष्ट असणारें "महाराष्ट्रीय" शिक्षणाचें ध्येय सन १९२० नंतर त्याच्या बाहेर पडूं लागलें. याचा दुष्परिणाम किती व कसा झाला हें पहावयाचें असल्यास आपल्या परिस्थितीची बंगाली शिक्षणाशी तुलना करावी. कर्झननें लादलेली फाळणी नष्ट होऊन सन १९११ पासून बंगालचें जीवन एकात्म झालें व कलकत्ता विद्यापीठामध्यें बंगाली विद्येची नीट वाढ होत गेली. त्यामुळें तेथें बंगाली वाङ्मय, संशोधन वगैरे सर्व बाबतींत एक राष्ट्रीय अभिमान, कर्तृत्व व एकसूत्रता निर्माण झाली. उलट, मुंबईच्या बहुभाषिक व बारभाई व्यवहारांत गुजराथी, मराठी, कानडी इत्यादि सर्वच भाषिकांची कुचंबणा झाली व महाराष्ट्रांतील जुन्या राष्ट्रीय परंपरेंतील संस्थांचा मुंबई विद्यापिठांत अंतर्भाव होऊं शकला नाहीं.

सन १९२८ सालीं मराठी विद्यापीठाचा प्रश्न हातीं घेणारी "महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन" स्थापन झाली व प्रि. वै. कां. राजवाडे,

श्री. न चिं. केळकर, श्री. जगताप, डॉ. केतकर प्रभृति लोकाग्रणींनीं या संस्थेचें कार्य चालविलें, परंतु सरकारनें या संस्थेच्या मागणीकडे पूर्ण दुर्लक्ष्य करून सन १९३३ सालीं असें जाहीर केलें कीं मुंबई विद्यापीठांतील दोष काढून नव्या विद्यापीठाची गरज भागविण्याचा सरकारचा निश्चय आहे !

म. यु. असोसिएशनचें कार्य मध्यंतरीं थांबलेंच होतें, पण प्रा. पोतदार यांनीं असोसिएशनचें पुनरुज्जीवन करून प्रचाराचें व संघटनेचें बरेंच कार्य केलें. आज सत्तादान होऊन लोकभाषेंतून शिक्षण देण्याचा प्रश्न सुटण्याची वेळ आली आहे व यावेळीं त्या असोसिएशननें केलेलें लोक-जागृतीचें कार्य फळाला येण्याचा क्षण आला आहे.

विद्यापीठासंबंधींची ही परंपरा संक्षेपानें दिल्यानंतर मराठी विद्यापीठें निर्माण करण्याच्या प्रश्नाशीं आज संयुक्तिकरणाचा संबंध कसा आहे, यासंबंधीं कांहीं विचार मी मांडतों. विद्यापीठाच्या वादाला सध्यां जरी कांहीं स्वरूप आलें असलें तरी आज एक गोष्ट स्पष्ट दिसतें कीं महाराष्ट्रा-सारख्या विस्तृत व बहुजिनसी राष्ट्रांत अनेक विद्यापीठें हवींत; एक " महाराष्ट्र विद्यापीठ " न बनतां मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, पुणें, अमरावती, नागपूर एवढीं प्रादेशिक विद्यापीठें हवींत, शिवाय कर्व्यांच्या विद्यापीठासारखीं विशिष्ट कार्यमर्यादेनें व्याप्त अशीं पीठें आहेतच व आणखीहि निघतील. या सर्व विद्यापीठांना मराठी विद्यापीठें म्हणावें लागेल व यांच्या कार्यांत सुसूत्रता आणण्यासाठीं या सर्वांचें एखादें बोर्ड बनवितां येईल व त्यांत कांहीं सामान्य प्रश्नांबद्दल शिफारसी करतां येतील.

ब्रिटनसारख्या महाराष्ट्राइतक्या लहान क्षेत्रव्याप्तीच्या राष्ट्रांत पंधरावीस विद्यापीठें आहेत व तशाच प्रकार येथें होणें जरूर आहे. मागील एका

प्रकरणांत उपप्रांतांबद्दलच्या योजनेचा विचार मी केला आहेच. त्याच्या अनुरोधानें असें म्हणतां येतें कीं बहुजिनसीपणाच्या आधारावर स्वायत्त उपप्रांतांची निर्मिती जशी राजकीय क्षेत्रांत न्याय्य व लोकशाहीला धरून आहे तशी विद्यापीठांच्या बाबतींत दृष्टि ठेवणें भाग आहे; किंबहुना प्रत्येक उपप्रांताला आपल्या विभागांतील उच्च-विद्यालयीन शिक्षणाची (परीक्षांची व संशोधनाची) सोय स्वायत्तपणें लावण्यास मुभा देणें व उत्तेजन देणें परिणामीं सर्वांच्या हिताचें होणार आहे.

यांत मुंबई विद्यापीठाचा प्रश्न कसा येतो तें पाहूं. आज या विद्यापीठाला सर्व प्रांतांतील परीक्षेचा मक्ता दिला गेला आहे. थोडेंफार संशोधन–कार्य विद्यापीठाशीं निगडित अशा संस्थांतून चालू आहे. उद्यां मुंबईला महाराष्ट्राचा एक उपप्रांत मानला तर मुंबई विद्यापीठाचें सध्यांचें परीक्षक–पीठाचें रूप उरणार नाहीं, उरलें तरी तें मुंबई व उपनगर एवढ्या लोकसंख्येपुरतें राहील. उलट या विद्यापीठामध्यें नाविक शास्त्र, औद्योगिक–यंत्रशास्त्र, रसायनशास्त्र, इत्यादि शास्त्रांचें संशोधन चालूं शकेल व या विद्यापीठाला संशोधन–पीठाचें स्वरूपहि येत जाईल. परीक्षक–पीठ व संशोधन–पीठ हीं दोन्हीं स्वरूपें कायम राहून मुंबई विद्यापीठाचें कार्य नव्या घडीमध्यें चालू लागेल.

याच तत्त्वानुसार औरंगाबाद वगैरे केंद्रांतील नवीं विद्यापीठेंहि परीक्षा व संशोधन या दोन्ही कार्यांची जबाबदारी आपापल्या उपप्रांतीय प्रदेशापुरती उचलतील. या व्यवस्थेमुळें प्रत्येक विद्यापीठांचा आपल्या प्रदेशांतील लोकसमाजाशीं सरळ व प्रत्यक्ष संबंध राहील व त्या लोकसमाजाच्या ज्या कांहीं विशिष्ट आर्थिक, शेतीविषयक, औद्योगिक व सांस्कृतिक गरजा असतील त्यांवर लक्ष ठेवून ज्ञानाचें संवर्धन करतां

येईल. सर्व महाराष्ट्राच्या जीवनाचें सूत्र ह्या उपप्रांतीय जीवनांतहि अखंड राहीलच; तें राजकीय जीवनांत राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेमुळें राहील आणि ज्ञानसंपादनाच्या क्षेत्रांत विद्येच्या देवघेवीमुळें राहील. विद्यापीठांची अनेकता व त्यांचा प्रादेशिक वैशिष्ट्यपूर्ण विकास हा महाराष्ट्रीय ज्ञानकार्याच्या अंतिम एकात्मतेला विघातक नसून उलट पोषकच आहे. ( उदाहरणार्थ, मुंबईसारख्या " सार्वजनिक " महानगरीमधील विद्यापीठांत जर मराठीबरोबरच इंग्रजी हें माध्यम ठेवलें व औरंगाबादला मराठीबरोबर उर्दू माध्यम ठेवलें, तसेंच नागपूरला मराठीबरोबर हिंदी माध्यम ठेवलें तर या विद्यापीठांतून महाराष्ट्रीय, ख्रिश्चन, मुसलमान व हिंदी भाषिकांची सोय होईल, इतकेंच नव्हे तर इतर भारतीय राष्ट्रांचे विद्वान् या विद्यापीठांतून कार्य करूं शकतील व त्यांच्या सहकार्यामुळें मराठी विद्येला जास्त व्यापक दृष्टि व समृद्धी येऊं शकेल. )

महाराष्ट्रीय संयुक्तीकरणाचा प्रश्न फार गुंतागुंतीचा व दीर्घकालीन प्रयत्नानें व तीव्र लढ्यानें सुटणारा आहे, तेव्हां तो टांगता राहील तोंपर्यंत नव्या विद्यापीठांचा प्रश्नहि भिजत ठेवणें योग्य नाहीं. उलट विद्यापीठांचा प्रश्न ताबडतोब हातीं घेतला कीं त्यांतून मुंबई प्रांताच्या भाषावार फाळणीची गोष्ट हातीं घ्यावीच लागेल व ' संयुक्त कर्नाटक, ' ' संयुक्त महाराष्ट्र' इत्यादि प्रश्नांना नेटानें तोंड लागेल. मागें बेल्लारी जिल्हा आंध्र विद्यापीठाच्या कक्षेंत गेल्यानें कर्नाटकीय समाज खडबडून उठला व अलीकडे नव्या सागर विद्यापीठांत मराठी भाषिकांचे तालुके दडपले गेल्याची तक्रार महाविदर्भीय वृत्तपत्रांतून येत आहे. उद्यां, समजा, कर्नाटक विद्यापीठ स्थापन झालें व बेळगांव आणि कारवार जिल्ह्यांतील मराठी विभाग त्या विद्यापीठाच्या कक्षेंत डांबले गेले तर काय होईल ? त्यामुळें महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाच्या ध्येयाला तादृश अपाय झालेला दिसला तरी वस्तुतः


फायदाच होईल; कारण वर सांगितलेला अन्यायमूलक प्रकार होतांच त्यावर मराठी जनमत जागृत होईल व संयुक्तीकरणाच्या व्यापक प्रश्नाकडे जागरूकतेनें पाहूं लागेल. शेवटीं जेव्हां सरहद्दी सार्वमतानें ठरतील तेव्हां विद्यापीठांच्या कृत्रिम कक्षा सहजच बदलून जातील.

मुंबईचा प्रश्न किंवा इतर सर्व गौण प्रश्न संयुक्तीकरणाच्या महाप्रश्नांत समाविष्ट असल्यानें या राजकीय प्रश्नांचा खुलासा होईपर्यंत न थांबतां आज पुण्यास किंवा इतर केंद्रातूनहि नवीं विद्यापीठें काढण्याचा प्रश्न सोडवावा, असें मला वाटतें.

☆

# महानुभाव-कालीन महाराष्ट्र

: ७ :




महानुभावी ग्रंथांत महाराष्ट्राचा जो उल्लेख आहे त्याच्या आधारानें वरील नकाशा तयार करण्यांत आला आहे. प्रा. द. वा. पोतदार यांनीं हा नकाशा तयार करण्यासंबंधींच्या सूचना दिल्या व आधारासंबंधींचें स्वतःचें विवेचन पुढील टिपणाच्या रूपानें त्यांनींच दिलें आहे.

"नेने–मवाळकर—चक्रधरसिद्धान्त सूत्रें उपोद्घात–पृ. २:—

आचारमहाभाष्य ( महानुभावी )—आचारपाठ स्पष्टीकरण, सूत्र १ लें:—

" देश म्हणजे खंडमंडळ । जैसे फलेठाणापासौनि दाक्षिणेस मऱ्हाटी भाष जेतुला ठाई वर्ते तें एक मंडल । तयासि उत्तरं बाले-घाटाचा सेवट असे । ऐसें एक खंडमंडळ । मग उभय गंगातीर तेंहि एक खंडमंडळ । आन तयापासौनि मेघकरघाट तें एक मंडळ । तया-पासौनि आवघें वराड; तेंहि एक मंडळ ।पर आघवींचि मिळौनि महा-राष्ट्राचि बोलिजे । किंचित किंचित भाषेचा पालट असें म्हणौनि खंड-मडळें म्हणावीं ॥ "

नकाशावर याची मांडणी आम्ही पुढें दिल्याप्रमाणें करितों:—


( १ ) फलेठाण–फलटणच्या दाक्षिणेकडील भागापासून तों उत्त-रेस बालेघाटाचें टोंक अर्थात् बालेघाटाचें पश्चिम टोंक—बीड भागापर्यंत.

( २ ) उभय गंगातीर:—गोदेलाच गंगाहि म्हणतात. या गंगेची उभय-तीरें असा एक अर्थ संभवतो. उलट उभय गंगा म्हणजे दोन–गंगा घेतल्या तर एक गंगा गोदावरी आणि दुसरी गंगा पाइन-गंगा ही होय. आम्हांस दुसरा अर्थ अधिक ग्राह्य वाटतो. महा-नुभवी वाङ्मयांतील एतद्विषयक अधिक उल्लेख मिळाल्यास निर्णयास मदत होईल.

( ३ ) तिसरा भाग मेघकरघाट:—मेघकर म्हणजेच हल्लींचें मेहकर होय हें निर्विवाद. परंतु घाट म्हणजे काय ? आमच्या मतें मेहेकराच्या पूर्वोत्तर भागांत ' इंध्याद्रि ' पर्वताची ओळ लांबवर पूर्वपश्चिम पसरलेली आहे. तिचा बोध घाट या शब्दानें घ्यावा.

( ४ ) ' इंध्याद्रि ' पर्वतापलीकडे सारा वऱ्हाड आणि हें सर्व मिळून मराठी भाषा बोलणाऱ्यांचा महाराष्ट्र असा या महानुभावी विधा-नाचा निष्कर्ष निघतो. "

## मराठी साम्राज्याचा नकाशा (सन १७९५)



## कांहीं दुरुस्त्यांची नोंद

या पुस्तकांत मला व माझ्या मित्रांना आढळलेल्या दोन चार ठळक दुरुस्त्या खालीं देत आहे. अशाच आणखी दुरुस्ती-संबंधींच्या सूचना मला खालील पत्त्यावर केल्यास माझ्या या विषयासंबंधींच्या चालू अभ्यासांत मला मदत होईल. म्हणून या सहकार्याबद्दल मी ही विनंति करीत आहे.

( पत्ता ; दि. के. बेडेकर, १२५९।२ जंगली महाराज रोड पुणें ४ )

(१) पान १४, दुसऱ्या ओळींत सोबतचा नकाशा पहा असें म्हटलें आहे. पण सोयीच्या दृष्टीनें तो नकाशा परिशिष्ट ६ मधें पान २१६ वर दिलेला आहे.

(२) पान १७, ओळ २२ : या ठिकाणीं उल्लेखिलेल्या प्रा. मुगळी यांच्या ग्रंथाचें नांव "हेरिटेज् ऑफ कर्नाटक" असें आहे. संदर्भासाठीं, पानें ४५ ते ५५ व पान ५९ पहा.

(३) पान ७१,ओळी ५–७ याठिकाणीं असें वाचावें: श्री. जांभेकर ( १८१०–१८४६ ) हे मुंबईचे महाराष्ट्रीय पुढारी व लोकहितवादी (१८२३–१८९२), चिपळूणकर, टिळक, आगरकर प्रभृति पुण्याचे पुढारी......".

(४) पान १०८ ओळ १८ : अ. भा. कॉं. कमिमिटीच्या तारीख चुकली आहे. सन १९४४ ऐवजीं सन १९४७ असें वाचावें.

(५) पान २०१ वरच्या घटना-सूचीमध्यें शेतकरी व शहरी कामगार वर्गांमध्यें सन १८७० पासून जागृतीचें प्रयत्न करणारे म. जोतीबा फुले, श्री. भालेकर व श्री. लोखंडे यांच्या कार्यांचा तारीखवार उल्लेख व्हावयास पाहिजे होता.

समोर संयुक्त महाराष्ट्राचा मोठा नकाशा लावलेला आहे. तो संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें तयार केलेला असून पुस्तकांत घेण्यास त्यांनीं परवानगी दिली, त्याबद्दल त्यांचे आभारी आहोंत.

लेखक

REFBK-0006954
REFBK-0006954

# आमचीं कांहीं महत्त्वाचीं प्रकाशनें

**इतिहासाचार्य वि. का. राजवाडे**

महिकावतीची बखर
राधामाधव विलासचंपू
प्रस्तावना खंड
[मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें. या बावीस खंडांना लिहिलेल्या प्रस्तावनांचा संग्रह]
राजवाडे लेखसंग्रह भाग २ व ३

**कै. दत्तोपंत आपटे**

इतिहासमंजिरी
श्रीरंगपट्टणवरील मोहीम
ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी भाग १ व २

**कै. दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ**

इतिहासः शास्त्र व तत्त्वज्ञान

× ×

मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष
शिवचरित्र साहित्य खंड ३ रा
ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे (काव्येतिहास संग्रहांतील)
प्राचीन भारतवर्षीय कोष
राजतरंगिणी (काश्मीरचा जुना इतिहास)

**कै. शि. म. परांजपे**

मराठ्यांच्या लढायांचा इतिहास
गोविंदाची गोष्ट
स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ
ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला

**महामहोपाध्याय द. वा. पोतदार**

विविध दर्शन

**श्री. त्र्यं. र. देवगिरीकर**

फेडरेशन
वसाहतींचें स्वराज्य
घटना परिषद्
अल्पसंख्याकांचा प्रश्न
आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास
फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास
गीतांजलि


**श्री. दि. के. बेडेकर**

सोव्हिएट राष्ट्र व लोक

**प्रो अ. रा. कामत**

सोव्हिएट आर्थिक नियोजन

**चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग, पुणें २.**




म.ग्रं.सं.ठाणे.